# उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2013-2014

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे उल्हासनगर महानगरपालिका यांनी 2013-2014 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

उल्हासनगर महानगरपालिका 2013-2014 वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल.

जा.क्र.स्था.18/ब/उल्हास. मनपा/लेपअ 2013-14/ ५०७

सह संचालक (म.न.पा.ले.प.)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला,रायगड भवन
सी.बी.डी. बेलापुर,
नवी मुंबई-400 614.
दिनांक- 30 NOV 2017

प्रति,

आयुक्त,
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर.

उल्हासनगर महानगरपालिकेचे 2013-2014 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण श्रीम. अश्विनी आनंद भोसले, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (म.न.पा.ले.प.), नवी मुंबई यांच्या पथकाने दिनांक 25/04/2016 ते दिनांक 13/01/2017 या कालावधीत पूर्ण केले आहे.

श्रीम. अश्विनी आनंद भोसले, सहाय्यक संचालक (म.न.पा.ले.प.), उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी सदर अहवालाचे पुनर्विलोकन केले असून श्री. मंगेश ना. गावडे, उप संचालक (म.न.पा.ले.प.), उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दिनांक 10/10/2017 रोजी श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे समवेत सदर अहवालावर चर्चा करुन लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण केले आहे.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी उल्हासनगर महानगरपालिकेचे कामकाज पहात होते.

| अ.क्र. | पदाधिकारी / अधिकारी | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1. | श्रीम. आशा राजु (जीवन) इदनानी | महापौर | 01/04/2013 ते 31/03/2014 |
| 2. | श्री.बालाजी खतगांवकर | आयुक्त | 01/04/2013 ते 31/03/2014 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....................................................................... 1

**I PART I : भाग १ ....................................................................... 2**

मागील लेखा परीक्षण अहवाल ....................................................................... 2

**PART II ....................................................................... 8**

**कलम ९ अ खालील आक्षेप ....................................................................... 9**

1 उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2013-14या आर्थिक वर्षाची अर्थसंकल्पीय निरीक्षणे व आर्थिक स्थितीवरील भाष्य 10

2 31 मार्च 2014 चे बॅंक ताळमेळ पत्रक तयार न केल्याबाबत. ....................................................................... 15

3 महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प 1 ते 5 मधील भुयारी गटारांची चौकट व आर.सी.सी. कव्हर्स आणि गोल एस.एफ.आर.सी. फ्रेम व कव्हर्स पुरविणे व बसविणे कामातील अनियमितता. ....................................................................... 16

4 प्रभाग समिती-3 क्षेत्रात सीव्हर लाईन क्लिनिंग मशीन क्र.एम.एच-05-216 वर काम करणेकरिता 29 जाने.2013 ते 28 जाने.2014 या कालावधीसाठी दररोज 5 मजूर पुरवठा करणे या कामातील अनियमितता. ........... 18

5 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितता. ....................................................................... 20

6 भविष्य निर्वाह निधीची बॅंक खाती व विनावापर गुंतून राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत. ....................................................................... 22

7 भविष्य निर्वाह निधी लेख्यातील अनियमिततेबाबत. ....................................................................... 23

8 दि. 01/11/2005 नंतरनियुक्त कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजने ऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्याबद्दल. ....................................................................... 26

9 मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत .. 28

10 मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी बेंच पुरवठयासाठी केलेल्या प्रदानाबाबत ....................................................................... 30

11 मनपा शाळामधील विदयार्थ्यांना सन 2010-11 करीता रेनकोट पुरविणे कामातील अनियमितता.. ............. 31

12 2013-14 मध्ये सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत ........... 33

13 आरोग्य विभागाने लस खरेदी केलेली नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करून न दिलेबाबत. ....................................................................... 35

14 उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय मागे स्थानिक संस्था कर विभागाकरीता नवीन कार्यालय बांधणेच्या कामात अनियमितता झालेबाबत. ....................................................................... 35

15 निर्मल एम.एम.आर.डी. योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबत खर्चाचे अभिलेखे व त्या अनुषंगाने ठेवलेल्या नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध न करून दिलेबाबत. ....................................................................... 36

16 उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणंचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झालेल्या कामात अनियमितता बाबत. ....................................................................... 38

17 नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत उल्हासनगर-5 येथील प्र.क्र. 38 ब मधील पटेलनगर मध्ये विविध ठिकाणी सी.सी पेव्हमेंट आणी नाली बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. ....41
18 उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये इ-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART संकल्पनेच्या कामात अनियमितता झालेबाबत. ....43
19 महानगरपालिकेच्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत. ....45
20 महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहना वरील खर्चातील अनियमिततेबाबत....46
21 उल्हासनगर मनपा अग्निशमन विभागांतर्गत सर्वसाधारण अभिप्राय... ....47
22 आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या खर्चासंबंधी अनियमितता ....50
23 प्रभाग कार्यालय क्र.1 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत ....51
24 मालमत्ता कर विभागातील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसलेबाबत....53

**कलम ९ ब खालील आक्षेप....56**

25 महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शांतीनगर व नेहरूनगर या मलउपसा केंद्रे विद्युत उपकेंद्रासहित चालविणे,देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता....57
26 वार्ड क्र.17 मधील रामभाऊ म्हाळगी चौक, आम्बिकानगर येथे 200 मिमी.व्यासाचे आर.सी.सी.एन.पी.2 क्लास पाईप टाकणे व वार्ड क्र. 31 बॅरेक 1050,1013,1028,1029 येथे 200 मिमी.व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे या दोन कामातील अनियमितता. ....59
27 उल्हासनगर मनापांतर्गत विविध बुस्टरपंपिंग स्टेशन येथे कंत्राटदारामार्फत अतिरिक्त पंपचालक पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत ....62
28 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरींवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितताबाबत. ....63
29 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे 2013-14 कालावधीतील वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता ....65
30 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक योजनांची साध्यता/यशस्वीता पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करूण देणेबाबत. ....67
31 पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमां बाबत. ....69
32 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2010-11 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा करणे च्या प्रदानातील अनियमितता. ....70
33 शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 2013-14 मध्ये खाजगी शाळांना व स्वयंसेवी संस्थाना आहार खर्चासाठी अनुदान वाटपातील अनियमितता ....73
34 उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ई-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART संकल्प या कामात अनियमितता झालेबाबत. ....74

35 समाज मंदिर बांधणे कामात अनियमितत झालेबाबत. ....76
36 राजीव आवास योजने अंतर्गत झोपडयांचे सर्वेक्षण करणेच्या कामात अनियमितता झालेबाबत. ....79
37 नगररचना विभागाने बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी/शुल्क आकारणी केली नसलेबाबत. .81
38 उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितताबाबत. ....82
39 जीना,पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता आकारणी कमी केलेबाबत. ....84
40 इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत. ....85
41 इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कराची कमी रक्कम वसूल केलेबाबत. ....87
42 महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पावर स्विपिंग मशिनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमिततेबाबत. ....88
43 भविष्य निर्वाह निधीचे रक्कम ठेवी स्वरुपात राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये गुंतवणूकीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत. ....90
44 मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत ....92
45 मिळकतीची आकारणी चुकीची केल्याने फरकाची रक्कम वसुलीबाबत व अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने मागणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झालेबाबत. ....93
46 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याबाबत. ....96
47 महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांचे चेसिस खरेदी करणे कामातील अनियमिततेबाबत ....97
48 जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान अभियानांर्गत पाणी पुरवठा वितरण योजना निविदा प्रक्रीया व 2013-2014 मधील खर्च विषयक अंमलबजावणीतील अनियमितता बाबत. ....99
49 महानगरपालिकेत क व ड च्या लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड खरेदीतील अनियमिततेबाबत ....102

**कलम ९ क खालील आक्षेप ....104**

**------------------- निरंक ------------------- ....105**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....107**

50 खेमानी नाल्यातील कचरा बाहेर काढण्यासाठी खाजगी ठेकेदारामार्फत चार महिन्याकरिता मजूर व मुकादम पुरविणे कामातील अनियमितता. ....108
51 वार्ड क्र. 21 मधील बॅरेक क्र. 1135, 1136, 1137 व 1139 येथे 225 मिमी. व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे या कामातील अनियमितता ....110
52 पाणी पुरवठा विभागातील जमेचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे ....111
53 प्रभाग क्र.16 मध्ये विविध ठिकाणी पेव्हमेंट व नाली बसविणेच्या खर्चातील अनियमिततेबाबत. ....112
54 उल्हासनगर मनपा उद्याना जवळ व आस्था हॉस्पिटल समोर सि.सि.पेव्हमेंट व नाली बसविणेच्या कामातील अनियमिततेबाबत. ....114

55 उल्हासनगर मनपा क्षेत्रातील प्रभाग 11- मध्ये गारूडीपाडा येथे बॅरेक क्रमांक 1201 जवळ आरोग्य केंद्र बांधणे कामातील अनियमिततेबाबत......115
56 प्रभाग क्र. 59 मधील बॅरेक क्रमांक 1666 जवळ सरस्वती शाळा रोड येथे समाजमंदिर बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत......117
57 प्रभाग क्र.15 मधील निळकंठ अपार्टमेंट ते पोलिस प्लॉट पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे व C.C.M-350 रस्ता बनविणेच्या कामातील अनियमिततेबाबत......119
58 उल्हासनगर-4 विलास कंट्रीबार जवळ कल्व्हर्ट बनविण्याच्या खर्चातील अनियमितेबाबत......120
59 कर निर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवले नसलेबाबत......122
60 महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांच्या फायर वॉटर टेंडरचे फॅब्रिकेशनचे काम करणे कामातील अनियमितता......123
61 प्रभाग कार्यालय क्र.2 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत......125
62 प्रभाग कार्यालय क्र.3 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत......126
63 प्रभाग कार्यालय क्र.4 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत......128
64 शिक्षण मंडळ येथील जादा प्रदान निवृत्तीवेतन व लेख्यासंबंधी इतर अनियमिततेबाबत......130
65 जाहिरात व मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत......132
66 संगणकाची दुरूस्ती व देखभाल तसेच मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामातील अनियमिततेबाबत......134
67 अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील जमा रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत......136
68 अनाधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला रु.75 लाख खर्च संबंधिताकडून वसूल केला नसल्याबाबत......136
69 अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत......138
70 अतिक्रमण विभागाकडून अनधिकृत/धोकादायक बांधकाम निष्कासनाकरीता केलेल्या खर्चाबाबत अभिप्राय... 139
71 नगररचना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत......142
72 नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता......143
73 क्रीडा विभाग खर्चाचे प्रमाणके व संबधित निविदा नस्ती व इतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत......146
74 कर्ज निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केलेबाबत......146
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र......149
**विवरणपत्रे व जोडपत्रे......150**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 14, 15, 16, 17 | 35, 36 | | 53, 54, 55, 56, 57, 58 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 3, 4 | 25, 26, 27, 28, 29, 30, 31 | | 50, 51, 52 |
| लेखा विभाग | 1, 2 | 43 | | |
| लेखापरीक्षण | | | | 74 |
| नगर रचना | | 37, 38, 39, 40, 41 | | 71, 72 |
| कर निर्धारण व संकलन | 24 | 44, 45 | | 59 |
| आरोग्य | 13 | | | |
| वाहन विभाग | 19, 20 | 46 | | |
| जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम | | 48 | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 12 | 42 | | |
| भांडार | | 49 | | |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | 18 | 34 | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | 5, 6, 7, 8, 9, 10, 11 | 32, 33 | | 64, 65, 66 |
| क्रिडा विभाग | | | | 73 |
| अग्निशमन विभाग | 21, 22 | 47 | | 60 |
| अतिक्रमण विभाग | | | | 67, 68, 69, 70 |
| प्रभाग कार्यालये | 23 | | | 61, 62, 63 |

# I Part I : भाग १

## मागील लेखा परीक्षण अहवाल

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरीक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.स्थानिले1010/प्र.क्र.26ब/विमाप्रशा, दिनांक 31/03/2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे लेखापरीक्षण 2011-12 या वित्तिय वर्षांपासून सुरू करण्यात आले. प्रलंबित परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
लेखापरीक्षण अहवाल वर्ष 2011-12 व 2012-13.

| अ.क्रं. | ले.प.वर्ष | परिच्छेद क्रं. | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 1 ते 171 | 171 |

**2012-2013 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद. (चालू लेखापरीक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)**

| परिच्छेद क्र. | शिर्षक |
|---|---|
| 1 | उल्हासनगर महापालिकेच्या 2012-13 आर्थिक वर्षाच्या आर्थिक स्थिती व वार्षिक लेख्याबाबत. |
| 2 | जनगणना खर्च रु.51,46,107 चे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत. |
| 3 | द्विनोंद (DOUBLE ENTRY) पद्धतीने लेखे ठेवणे तसेच राष्ट्रीय लेखासंहिता (NMAM) प्रमाणे लेखा कार्यपद्धतीच्या अंमलबजावणी बाबत. |
| 4 | निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत स्वच्छतागृहे बांधणेच्या कामातील अनियमितता बाबत. |
| 5 | राजीव आवास योजने अंतर्गत खरेदी केलेल्या संगणक, लॅपटॅप,लेसर प्रिंटर,हार्ड वेअर इ.खरेदीतील अनियमितता बाबत. |
| 6 | उल्हानगर-4 ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोलपंप पर्यंत रस्ता रुंदीकरण,सिमेंट कॉक्रीटीकरण करणे कामातील अनियमितता. |
| 7 | नेताजी चौक ते बरॅक 2108 व्हाया तहसीलदार ऑफिस रस्त्याचे पुनपृष्ठांकन करणे व वॅको जंक्शन ते मणेर जंक्शन रस्त्याचे पुनपृष्ठांकन करणे कामातील अनियमितता. |
| 8 | उल्हासनगर क्र.-5 दुधनाका ते गणेश नगरपर्यंत रस्ता रुंदीकरण,सिमेंट कॉन्क्रीटीकारण व नाला बांधणेचे काम करणे कामातील अनियमितता. |
| 9 | उल्हासनगर क्र.3 राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉक्रीटीकरण कामातील अनियमितता. |
| 10 | उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील प्रभाग 1 ते 5 मधील अंतर्गत रस्त्याचे खड्डे भरणेचे काम विनानिविदा केल्याने झालेली अनियमितता. |
| 11 | उल्हासनगर-3 येथील गुरुद्वारा सि ब्लॉक्स ते अमित टॉवर पर्यंत मधुबन हॉटेल रस्त्याचे |

| | |
|---|---|
| | सिमेंट कॉक्रीटीकरण व रुंदीकरण करणे कामातील अनियमितता. |
| 12 | चोपडा पंपिंग स्टेशन यथील रोहित्राच्या दुरुस्तीच्या केलेल्या कामामध्ये महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 5(2) चे उल्हंगण झालेले आहे. |
| 13 | पाणीपट्टी थकबाकी रु.106.38 कोटी असल्याबाबत. |
| 14 | पाणीपुरवठा विभागातील कॅम्प-4 मधील देखभाल दुरुस्तीसाठी कुशल कामगार व मजूर पुरविणे कामातील अनियमितता. |
| 15 | उल्हासनगर मनपा अंतर्गत असलेले विविध बुस्टर पंपिंग चालविणे व देखभाल दुरुस्ती कामातील अनियमितता. |
| 16 | 13 व्या वित्त आयोगाच्या रु.13.02 कोटी जमा व खर्चाचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत. |
| 17 | पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभागामधील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसलेबाबत. |
| 18 | पावसाळ्यापूर्वी माशिनरीद्वारे मोठ्या नाल्यांची सफाई करणे व कचरा/गाळ वाहतूक करणे या कामावर झालेल्या रु.42,21,206 खर्चातील अनियमितता. |
| 19 | डम्पिंग ग्राउंडवरील घनकचरा सपाटीकरणासाठी पोकलन, बुलडोझर मशीन भाडे तत्वावर घेणे याकामी झालेल्या खर्चातील अनियमितता. |
| 20 | जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक औषधे खरेदीवर केलेल्या रक्कम रु.68,58,600 खर्चातील अनियमिततेबाबत. |
| 21 | कर निर्धारण चुकीचे करणे,मोठय निवासी कराची आकारणी न करणे व इतर अनियमितता बाबत. |
| 22 | मिळकतकर निर्धारण,करांची संगणकात नोंद घेणे व कर निरीक्षकांच्या कामातील अनियमितता. |
| 23 | महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडे तत्वावरील देण्यात आलेल्या वाहनावरील खर्चातील अनियमितता. |
| 24 | महापालिकेच्या असलेल्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमितता. |
| 25 | दलित वस्ती अंतर्गत कन्स्ट्रक्शन ऑफ नाला ॲट मिलिंद नगर वार्ड क्र.48 मधील कामास प्रशासकीय मान्यता नसताना काम केल्याबाबत. |
| 26 | दलितवस्ती सुधारणा अंतर्गत योजनेवरील प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याबाबत. |
| 27 | सुवर्ण जयंती योजनेच्या पुस्तकातील अनियमितता. |
| 28 | महापालिका अनुदानित शाळातील विध्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रीडा साहित्य वाटप करणे खरेदीमधील अनियमितता. |
| 29 | मनपा शाळेतील विध्यार्थ्यासाठी मे.जे.पी. कॉम्पुटर यांचे कडून केलेल्या भाला खरेदीतील अनियमितता. |
| 30 | प्रलंबित अंतर्गत लेखापरीक्षण तसेच प्रलंबित आक्षेपाबाबत. |
| 31 | परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणी व लेख्यातील अनियमितता. |
| 32 | 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर परतफेड केलेली व थकीत असलेल्या कर्जाच्या रकमेची |

| | |
|---|---|
| | विवरणपत्रे शासनास सादर केली नाही. |
| 33 | बांधकाम विभागातील प्रभाग क्र.52 मधील आर.के.कम्पाउंड जवळ चार शीटचे शौचालय बांधणे कामाच्या प्रदानातील अनियमितता. |
| 34 | बांधकाम विभागातील ठेकेदारांची देयके प्रदान करताना मूल्यवर्धित कर कमी व विमा रक्कम वसूल न केल्याबाबत. |
| 35 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा लेखाशिर्षांतर्गत सार्वजनिक बांधकाम उल्हासनगर मनपा यांचे मार्फत करण्यात आलेल्या कामातील अनियमितता. |
| 36 | आमदार विकास निधी अंतर्गत कॅम्प क्र. 3 येथील रॉयल एमरोल्ड बिल्डींग ते पारस रेसिडेन्सी पर्यंत नळी व रस्ता तयार करणे कामातील अनियमितता. |
| 37 | साईबाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबी घाट मंडळ रस्त्याचे पुनपृष्ठांकन करणे कामातील अनियमितता. |
| 38 | उल्हासनगर क्र.3 हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन अपार्टमेंट पर्यंत रस्ता रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामातील अनियमितता. |
| 39 | उल्हासनगर मनपा क्षेत्रातील प्रभाग क्र.1 ते 4 मधील रस्त्याचे खडडे दुरूस्तीच्या कामातील अनियमितता. |
| 40 | पिण्यासाठी टॅंकरने पाणीपुरवठा करणे या कामातील अनियमितता. |
| 41 | पिण्याचा पाणीपुरवठा टॅंकरने करण्यात आलेल्या कामामधील अनियमितता. |
| 42 | पाणीपुरवठा वसूल रकमांच्या भरणा करण्यातील अनियमितता. |
| 43 | जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत उल्हासनगर पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचे कामातील अनियमितता. |
| 44 | पाणीपटटी वसुलीचा दर कमी आकारल्याने महानगरपालिकेस झालेल्या तोटयाबाबत. |
| 45 | पाणीपुरवठा विभागामधील देखभाल दुरूस्तीच्या साहित्य खरेदी व कामामधील अनियमितता. |
| 46 | स्थानिक संस्था कराची रक्कम रु.3621486/- व्यापा-याने कमी भरणा केल्याने महानगरपालिकेचे नुकसान झालेबाबत. |
| 47 | कामगार कल्याण उपकर व स्थानिक संस्था कराची शुल्क आकारणी करून वसुल न केलेबाबत. |
| 48 | इमारत बांधकाम प्रकरणांत विकास शुल्क रु.1595291/- व जमीन विकास शुल्क रु.527435/- ची आकारणी करून वसुली न केल्याबाबत. |
| 49 | जीना,पॅसेज व लॉबी इ.बाबींच्या सवलतीकरीता प्रचलित दराने अधिमुल्य शुल्काची आकारणी न केल्याने मनपाचे रु.6154807/- नुकसान झालेबाबत. |
| 50 | उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनिमितता. |
| 51 | बांधकाम परवानगी मंजूरी देतांना जिन्याचा प्रिमियम आकारणी करतांना रेडीरेकनर दर चुकीचा घेतल्याने झालेले मनपाचे आर्थिक नुकसान रु.6903266/-. |
| 52 | बांधकाम परवानगी मंजूरी देतांना इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कराची आकारणी रेडीरेकनरच्या दरानूसार केली नसल्याने मनपाचे रु.1871286/- आर्थिक नुकसान झाल्याबाबत. |
| 53 | बांधकाम परवानगी मंजूरी देतांना इमारत बांधकाम कामगार कल्याण उपकर व स्थानिक संस्था कराची आकारणी कमी केल्याने मनपाचे रु.493391/- आर्थिक नुकसान झालेबाबत. |

| | |
|---|---|
| 54 | उल्हासनगर मनपा क्षेत्रातील घनकचरा गोळा करून वाहतूक करणे कामातील अनियमितता. |
| 55 | उल्हासनगर मनपा क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पॉवर स्विपिंग मशीनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमितता. |
| 56 | अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाकरीता मनपाने केलेला रु.46.61 लाख खर्च संबंधितांकडून वसुल केला नसल्याबाबत. |
| 57 | सुवर्ण जयंती योजनेच्या शासन निधीचा वापर केलेला नसल्यामुळे योजनेचा उददेश सफल झाला नसल्याबाबत. |
| 58 | समावेक्षक आरक्षणाच्या माध्यमातून मनपास प्राप्त झालेल्या मालमत्ता मनपाने ताब्यात घेतल्या नसल्याबाबत. |
| 59 | शहीद अरुणकुमार वैदय सभागृह (टाऊन हॉल) चे थकीत भाडे व करारनाम्यातील अटी व शर्तीची पुर्तता नसल्याबाबत. |
| 60 | शिधावाटप कार्यालयास जागा भाडयाने देण्यात आलेली अनियमितता. |
| 61 | वाहनतळाची जागा भाडयाने देण्याचे कामामधील अनियमितता. |
| 62 | उल्हासनगर मनपाच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहीत मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत. |
| 63 | मोबाईल टॉवर बसविणेच्या मंजूरी व थकीत रक्कमेबाबत. |
| 64 | उल्हासनगर मनपा क्षेत्रातील अवैध बांधकामास शास्ती न लावलेबाबत. |
| 65 | मनपा कर्मचा-यांकरीता मे.मोहीत एन्टरप्रायझेज यांचेकडून केलेल्या गणवेश व कापड खरेदीतील अनियमितता. |
| 66 | कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींना वाटप केलेल्या डिनर सेट, प्रेशर कुकर व इस्त्री वाटपातील अनियमिततेबाबत. |
| 67 | आरोग्य विभागाकडून श्वानांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविणे कामातील अनियमिततेबाबत. |
| 68 | मे. नमन एन्टरप्रायझेज यांचेकडून ॲन्टी रेबीज इंजेक्शन खरेदीतील अनियमितता. |
| 69 | अग्निशमन विभागाने ना-हरकत दाखल्याची कमी रक्कम स्विकारलेबाबत तसेच इतर अनियमितता. |
| 70 | मे.केअरटेल इन्फोटेक लि.कंपनीकडून मनपासाठी कॉल सेंटर सेवा पुरवणे कामातील अनियमितता. |
| 71 | मे. मासटेक लि. कंपनीकडून मनपासाठी स्थानिक संस्था कराची आयपॅडद्वारा स्कॅनिंग संगणक प्रणाली अदयावत करणे कामातील अनियमितता. |
| 72 | जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुन निर्माण अभियान अंतर्गत ई-गव्हर्नन्स प्रकल्यापाच्या कामातील अनियमितता. |
| 73 | मिळकत कराची रु.202.84 कोटी रक्कम वसूल केली नसल्याबाबत. |
| 74 | जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियांन अंतर्गत गरीबांसाठी मुलभूत सुविधा पुरवणे कामातील अनियमितता. |
| 75 | मनपाने मंजूर केलेल्या दरापेक्षा स्थानिक संस्था कराची कमी भरणा केल्याने रु.76109/- चे नुकसान झाले आहे. |

| | |
|---|---|
| 76 | स्थानिंक संस्था कराची आकारणी चुकीची झाल्याने महानगरपालिकेचे रू. 8,82,822/- आर्थिक नुकसान झालेबाबत. |
| 77 | स्थानिंक संस्था कराची रक्कम कमी भरणा करणेबाबत. |
| 78 | स्थानिंक संस्था कराच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेल्या स्थानिक खरेदीबाबत. |
| 79 | महानगरपालिका अंतर्गत जकात विभागातील जकात ठेक्यामधील अनियमितता. |
| 80 | भविष्य निर्वाह निधीच्या लेख्या मधील अनियमिततेबाबत. |
| 81 | प्रभाग क्र. 56 मधील शिव मार्ग परिसरात एम 250 रोड बांधणे, पायवाट व नाला बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे कामातील अनियमितता बाबत. |
| 82 | आमदार विकास निधी अंतर्गत प्रभाग क्र. 57 सेक्शन 32 येथील नाभिक समाजाचे सामाजिक सभागृह बांधणे कामातील अनियमितता. |
| 83 | आमदार विकास निधी अंतर्गत उल्हासनगर कॅम्प नं. 3 शांतीनगर व कॅम्प नं. 2 येथील स्मशानभुमीतील अनियमितता. |
| 84 | उल्हासनगर मनपा अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत करणेत आलेल्या कामातील सर्वसाधारण अनियमितता. |
| 85 | उल्हासनगर 1 ते 5 मधील मनपा चौक ते कटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्तयाचे पूनर्पृष्टाकन करणेकामातील अनियमितता. |
| 86 | प्रभाग क्र. 11 मधील सावित्री बाई फुले नगर येथे समाज मंदिर बांधणे कामातील अनियमीतता. |
| 87 | गटारे नाला बांधणे लेखा शिर्षातंर्गत कामातील अनियमितता. |
| 88 | उदयानाचे बांधकाम या लेखाशिषंगतर्गत कामातील अनियमितता. |
| 89 | पाणी पुरवठा विभागातील विदयुत वाहिनीच्या दुरूस्ती व Booster पंप कार्यनिवत करणे कामातील अनियमितता. |
| 90 | नगररचना विभागातील जमा पावती पावतीनोदवही, चलने, व भरणा नोदवहीतील अनियमितता |
| 91 | नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता. |
| 92 | मिळकत कर विभागातील जमा रक्कम वसुलीतील अनियमितता बाबत. |
| 93 | लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने मालमत्ता (मिळकत कर) विभागातील अभिलेखे उपलब्ध न झाले बाबत. |
| 94 | महानगरपालिकेच्या मालकी हक्काच्या परंतु भाडेतत्वावर दिलेल्या तसेच शासनाच्या मालमत्तवेर मिळकत कर न लावणेबाबत. |
| 95 | महानगरपालिकेतील न्यायलयीन कामाकरिता वकिलांची नेमणूक व वकिल फी देयके प्रदानातील अनियमितता. |
| 96 | प्रभाग कार्यालय क्र. 1 अंतर्गत लेख्यातील अनियमिततेबाबत. |
| 97 | प्रभाग कार्यालय क्र. 4 अंतर्गत लेखेतील अनियमिततेबाबत. |
| 98 | प्रभाग समिती क्र. 3 मधील अंतर्गत वसुलीच्या पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत. |
| 99 | शासनाची मंजूरी न घेता महापालिका सदस्याना वाढीव बैठक भत्ता प्रदान केल्याने झालेली |

| | |
|---|---|
| | अनियमितता. |
| 100 | मे. रिको इंडिया लि. कंपनी कडून केलेल्या गेस्टेटनर कॉपी प्रिंटर खरेदीतील अयिमितता बाबत. |
| 101 | मालमत्ता विभागाने मार्केट मधील गाळयाच्या भाडयाच्या रकमा विलंबाने भरणा केल्या बाबत. |
| 102 | उल्हासनगर मनपा क्षेत्रात सन 2011 च्या वर्षसाठी श्री गणेदर्शन प्रतियोगीता अयोजित करणे कामातील अनियमितता. |
| 103 | शासन निर्णयनुसार क्रिडा विभागाकरीता तरतुद प्रत्यक्ष खर्च न केल्याबाबत. |
| 104 | उल्हासनगर मनपातील कर्मचारी अधिकारी यांचे सेवापुस्ताकातील अनियमितता. |
| 105 | नेताजी चौक येथील फायर स्टेशन बांधण्याचे काम विभागनी करून दोन मंजूर सहकारी संस्था कडून करून घेतल्याबाबत. |
| 106 | प्रभात सिनेमा येथील फायर स्टेशन बांधण्याचे काम विभागणी करून तीन मजूर सहाकरी संस्था कडून करून घेतले बाबत. |
| 107 | अग्निशमन विभागातील फायर स्टेशन बांधणे व नविन गाडया खरेदी करीता मनपाचे स्वत:चे हिस्साखर्च न केल्याबाबत. |
| 108 | मे. मोहीनी इटंरप्रायजेस यांचेकडून केलेल्या फर्निचर खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 109 | मे. जे.एस.के.डिस्टीब्यूटर्स व डायमंड डीस्ट्रीब्युटरर्स यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या औषध खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 110 | आमदार निधीतून नागरी आरोग्य केंद्रास आवश्यक वैद्यकीय उपकरण खरेदीमधील अनियमितता. |
| 111 | उल्हासनगर शहरातील व्यापा-यांनी स्थानिक संस्था कर नोंदणीहत व्यापा-यांची वार्षिक विवरणपत्र सादर केली नसल्याबाबत. |
| 112 | उल्हासनगर महानगरपालिकेचे अतिक्रमाण विभागाती अभिलेखे उपलब्ध झाले नसल्याबाबत. |
| 113 | आदित्य कम्प्युटर सर्व्हिस यांचेकडून मालमत्ता कर विभागातील बिले छपाई करून घेतलेल्या कामातील अनियमितता. |

**"उपरोक्त नमुद केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या प्रथम पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत."**

**पुनर्विलोकन अहवालामध्ये समविष्ट परिच्छेदांचा तपशील :-**

**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समविष्ट परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1. | 2011-12 | 1,4,8,18,20,21,26,36,40,41,46,54,58,62,77,78,87,92,114,131,138,148. | 22. |
| 2. | 2012-13 | 2012-13 चे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालाचे काम सुरू आहे. | |

# Part II

# भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2013-14या आर्थिक वर्षाची अर्थसंकल्पीय निरीक्षणे व आर्थिक स्थितीवरील भाष्य*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***उल्हासनगर महानगरपालिकेचे 2013-14 या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज वास्तववादी नाहीत. मागील तीन वर्षाच्या जमेची सरासरी वाढ विचारात न घेता वाढीव तरतुदीचे अंदाजपत्रक बनविले आहे. शासनाने विहित केलेल्या नियमानुसार महिला बाल कल्याण, अपंग कल्याण व क्रिडा क्षेत्रातील योजनेसाठी पुरेशी तरतूद केलेली नाही. महानगरपालिकेचे सर्वकरांपासून मिळणारे उत्पन्न धोरणात्मक त्रुटींमुळे व वसुलीच्या अत्यल्प प्रमाणामुळे करविषयक मागणीच्या तुलनेत केवळ22.54% इतके अत्यल्प आहे. तर थकबाकीचे प्रमाण 77.46% इतके आहे. तसेच मागील दहा वर्षात करांच्या दरात कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. मार्च 2014 अखेर एकून थकीत कर्ज 31.27 कोटी रुपये इतके आहे.2013-14 चे महानगरपालिकेचे दायित्व 862 कोटी व मत्ता 789 कोटीआहे. शासनास देय असलेली 2013-14 ची जल उपकराची एकूण रक्कम 53 लाख रुपये इतकी आहे.2013-14 अखेर रक्कम देय असलेल्या अपूर्ण कामांची संख्या 530 इतकी आहे. 2013-14 चे वार्षिक लेखे*** **National Muncipal Accounting Mannual** ***प्रमाणे विहित नमुन्यात तयार केलेले नाहीत. दैनिक लेखे बंद करून त्याच्या नोंदी रोखवहीत घेतल्या जात नाहीत. पाणीपुरवठा व साफसफाई सेवा स्वयंमाधारित नाहीत. पाणीपट्टीची एकूण थकबाकी 72% इतकी आहे. महानगरपालिका अधिनियमात दिलेली बंधनकारक कार्ये करण्यास महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. केंद्र व राज्य शासन अनुदानित जवाहरलाल नेहरु नागरी पुनुरूत्थान अभियान अंतर्गत भुअंतर्गत जलवाहिन्या जोडणे ही 268 कोटी रुपयांची भांडवली स्वरुपाची पाणी पुरवठा योजना मार्च 2014 अखेर अपूर्ण आहे.***

अर्थसंकल्पावरील निरीक्षणे उल्हासनगर महानगरपालिकेचे 2013-2014या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज वास्तववादी नाहीत. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका प्रकरण 3 मधीलपरिच्छेद 30 (बी) नुसार मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष जमा व खर्च विचारात घेऊन अर्थसंकल्पीय अंदाज करणे आवश्यक असतांना असे केलेले दिसून येत नाही. ते पुढील आकडेवारी वरून स्पष्ट होईल.

| आर्थिक वर्ष | प्रस्तावित जमा | प्रत्यक्ष जमा | फरक |
|---|---|---|---|
| 2010-11 | 235.90 कोटी | 185.54 कोटी | (-)21.35% |
| 2011-12 | 190.34 कोटी | 182.11 कोटी | (-)04.33% |
| 2012-13 | 192.57 कोटी | 181.49 कोटी | (-)5.76% |
| 2013-14 | 255.20 कोटी | 224.77 कोटी | (-)11.93% |

मागील तीन वर्षातील जमेची वाढीची टक्केवारी नगण्य असताना सरासरी11% प्रस्तावित वाढ गृहीत धरून अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. यावरून जमेच्या रकमा वाढविल्याचे स्पष्ट होते. खर्च बाजू वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्तवरित्या वाढविलेली आहे. अर्थसंकल्प हा वास्तववादी असणे आवश्यक आहे. मुळ अर्थसंकल्पाच्या आधारे कामांना मंजूरी असल्याने प्रत्यक्ष उत्पन्न कमी प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये 789 कोटी रुपये इतक्या मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

**महिला बाल विकास, अपंग वक्रिडा विकास तरतूद**

1)नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-1093/325/प्र.क्र.24 नवि 32 दि.17/04/1993 व नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन 1093/1198/नवि 14 दि.14/07/1993 अन्वये महिला व बालविकास कल्याण विभागासाठी बांधील खर्च वजा जाता 5 टक्के तरतुद करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.ते पुढील आकडेवरून स्पष्ट होईल.

| 2013-14 | आवश्यक तरतूद रु. | प्रत्यक्ष तरतूद रु. | प्रत्यक्ष खर्च रु. | तरतूदीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| महिला बाल विकास | 14.17 कोटी | 3 कोटी | 22 लाख | 1.05% |

**2)** नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.जीईएन-1655/प्र.क्र.46/नवि 33 दि.14/02/2002 अन्वये अपंगासाठी 3 टक्के तरतुद व खर्च करणे आवश्यक आहे.अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

| 2013-14 | आवश्यक तरतूद (3%) | प्रत्यक्ष तरतूद | प्रत्यक्ष खर्च | तरतूदीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अपंग विकास | 8.50 कोटी रु. | 50 लाख रु. | 46 हजार रु. | 0.17% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

वरील आकडेवारीवरून अपंगासाठी प्रत्यक्ष तरतूद विहित प्रमाणात केली नसून प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण अत्यल्प आहे.

1) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीइएन 1098/प्र.क्र.21/98/नवि 24 दि.09/03/1998 नुसार महानगरपालिकेने आपल्या वार्षिक खर्चापैकी 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्राकरीता शासन निर्णयात नमुद केलेल्या कामांवर करणे आवश्यक आहे. तथापी अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

| 2013-14 | आवश्यक तरतूद | प्रत्यक्ष तरतूद | प्रत्यक्ष खर्च | तरतूदीची टक्केवारी | 2013-14 |
|---|---|---|---|---|---|
| क्रिडा विकास | 14.17 कोटी रु. | 50 लाख रु. | 27.87 लाख रु. | 0.28% | क्रिडा विकास |

वरील आकडेवारीवरून अपंगासाठी प्रत्यक्ष तरतूद विहित प्रमाणात केली नसून प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण अत्यल्प आहे.

**आर्थिक स्थितीवरील भाष्य**

1) जमाविषयक अभिप्राय

कराधन नियम 21(2) प्रकरण8 मधील तरतुदीनुसार ठराविक कालावधीनंतर नवीन कर आकारणी पुस्तक तयार करणे अर्थात करांच्या दरांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असलेचे म्हंटले आहे. तथापि उल्हासनगर महानगरपालिकेचे सर्व करांपासून मिळणारे उत्पन्न कर आकारणी व कर वसुली विषयक धोरणात्मक त्रुटीमुळे व वाढत्या थकबाकीमुळे मागणीच्या तुलनेत अत्यल्प आहे.हे पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.

| वित्तीय वर्ष | करविषयक मागणी | प्रत्यक्ष खर्च | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 2013-14 | 300.82 कोटी रु. | 67.28 कोटी रु. | 233.54 कोटी रु. |

वरील आकडेवारीवरून महानगरपालिकेचे वसुलीचे प्रमाण केवळ 22.54% असून थकबाकीचे प्रमाण 77.64% इतके प्रचंड आहे हे स्पष्ट होते.करविषयक विविध निरीक्षणे, थकबाकी व अन्य धोरणात्मक त्रुटी याबाबतचे स्वतंत्र विवेचन मालमत्ताकर,स्थानिकसंस्था कर,पाणीपट्टी व अन्य जमा विषयकबाबींच्या परिच्छेदांमध्ये विस्तृतपणे समावेशित केले आहे

**2) मत्त्ता व दायित्व विषयक अभिप्राय**

उल्हासनगर महानगरपालिकेने दिलेल्या मत्ता व दायित्व विवरण पत्रानुसार वर्ष 2013-14 मध्ये 862 कोटीरु. मत्ता व 789 कोटी रु. दायित्व असल्याचे म्हंटले आहे. तथापि विवरणपत्रामध्ये मत्तेच्या बाजूस रोख रकमा, गुंतवणुका, अदत्त आगाऊ रकमा, अदत्त कर, दंडाच्या रकमा, सहायक अनुदाने याबाबत विस्तृत विवरण दिलेले नाही. तसेच दायित्वाचे विस्तृत विवरण दिलेले नाही.

**3) थकीत कर्ज विषयक अभिप्राय**

उल्हासनगर महानगरपालिकेचे मार्च 2014 अखेर एकूण थकीत कर्ज31.27 कोटी रु. इतके आहे याबाबतचे

विवेचन पुढील आकडेवारी वरून स्पष्ट होईल.

(रक्कम कोटीमध्ये)

| कर्ज देणारी संस्था | कर्जाचे कारण | मुद्दल | व्याज | एकूण |
|---|---|---|---|---|
| एम.जे.पी | भुयारी गटार | 9.2 | 4.33 | 13.53 |
| ए.जे.पी | भुयारी गटार | 7.65 | 5.54 | 13.19 |
| एम.जे.पी (LIC) | पाणी पुरवठा | 3.06 | 1.49 | 4.55 |
| एकूण | | 19.91 | 11.36 | 31.27 |

वरती नमूद केलेल्या भांडवली स्वरूपाच्या योजना पूर्ण करण्यासाठी सदरची कर्ज उभारणी करण्यात आली तथापि त्या अद्याप अपूर्ण आहेत.परिणामी महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये कोणत्याही निष्पत्ती शिवाय भर पडली आहे. याबाबतचे विस्तृत विवेचन अहवालामध्ये स्वतंत्र परिच्छेदांमध्ये करण्यात आले आहे.

3)**पुरवठा किंवा बांधकामे याबाबत देय रकमांबाबत अभिप्राय**

पुरवठा किंवा अपूर्ण बांधकामे याबाबत देय असलेल्या रकमाबाबत अर्धसामास पत्र क्र.18 नुसार विचारणा करण्यात आली तथापि उत्तर अप्राप्त असल्याने याबाबत निश्चित भाष्य करता येत नाही. तथापि उपलब्ध माहितीनुसार मार्च 2014 अखेर कार्यान्वित झालेली अद्याप अपूर्ण असलेली एकूण बांधकामे 530 इतकी आहेत.कार्यादेशात नमूद केलेल्या मुदतीत बहुतांशी कामे पूर्ण न झाल्याने महानगरपालिकेवरील दायित्व सातत्त्याने वाढत आहे.

4) **लेखे विषयक अभिप्राय**

दैनंदिन लेखेबंद करणे (day closing) व त्याची दैनिक नोंद रोखवहीत घेणे या पद्धतीचा अवलंब उल्हासनगर महानगरपालिकेत केला जात नाही. त्यामुळे वर्षातील सर्वात कमी रोख शिल्लक व शासनाने निश्चित केलेली किमान रक्कम यांची पडताळणी करता आली नाही. तसेच जमा व खर्चाचे मासिक गोषवारे संगणकीकृत प्रणालीत तयार होणाऱ्या रोखवहीतून काढले जातात. सदर रोखवहीत संबधित प्राधीकाऱ्यांचे सही व शिक्के नसल्याने सदर रोखवहीची अधिकृत मानता येणार नाही.

शासन निर्णय क्रमांक लेखास-102004/71/प्र.क्र. 5/04/न.वि.31दि.-06/07/2005 अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता (NAM) प्रकरण 2 ते5 मधील तरतुदीनुसार सन 2005-06 पासून महापालिकांनी उपार्जित पद्धतीवर आधारित द्विनोंद पद्धतीने लेखे ठेवणे क्रमप्राप्त आहे. उपर्जीत तत्वावर ताळेबंद पत्रक, रोखप्रवाह विवरणपत्र, जमा खर्चाचे विवरणपत्र, लेख्यावरील टिपण्या (Financial Indicators) आर्थिक सूचना (Financial Performanace Indicators) या बाबींसह वार्षिक लेखे तयार करून स्थायी समिती समोर सादर करणे आवश्यक आहेत. तथापि उल्हासनगर महापालिकेत या पद्धतीचा अवलंब केला जात नाही.तसेच वार्षिक लेखे प्रमाणित करून ते शासनास सादर केले जात नाहीत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 9 चे कलम 106 (3) अन्वये प्रत्येक सरकारी वर्ष

सुरू झाल्यावर मुख्य लेखापरीक्षकाने मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तसेच कलम 106(4) प्रमाणे आयुक्तांनी उक्त अहवाल छापून त्याची प्रत प्रशासन अहवालाच्या व लेखा विवरण पत्राच्या छापील प्रतिसह प्रत्येक पालिका सदस्यास पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच कलम 105 अन्वये मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी व लेखापरीक्षण करून त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहीजे. अशी तरतूद आहे.तथापि उल्हासनगर महापालिकेत 2008-09 पासून विहित पद्धतीने एकदाही कार्यवाही झालेली नाही.

5) **महापालिकेच्या सेवा स्वंनिर्धारना बाबत अभिप्राय**

महाराष्ट्र शासन,नगर विकास विभागाच्या दि.02/08/2010 च्या शासन निर्णयानुसार महापालिकेची पाणीपुरवठा व साफसफाई सेवा स्वंनिर्धारित असणे आवश्यक असलेचे नमूद केले आहे. तथापि उल्हासनगर महानगरपालिकेचे पाणिपट्टीचे थकबाकीचे प्रमाण 72% असून गेल्या 10 वर्षात कराच्या दरामध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. जवहारलाल नेहरू नागरी पुनुरुत्थान अभियान अंतर्गत भूअंतर्गत जलवाहिन्या टाकणे या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेचा 50% निधी महापालिका उत्पन्नातून उभारणे अपेक्षित असताना त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरणा कडून कर्ज उभारणी केली आहे. वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीतील मोठा हिस्सा व्याज व हप्त्यापोटी खर्ची पडतो. तथापि अद्याप ही योजना अपूर्ण आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 63 मध्ये नमूद केलेली सर्व बंधनकारक कार्ये करण्यास उल्हासनगर महानगरपालिका समर्थ नाही. कारण महानगरपालिकेचे उत्पन्न कमी असून कर्जाचे प्रमाण अधिक आहे.करांची टक्केवारी शासनाने शिफारस केलेल्या मर्यादेपर्यंत आणण्यासाठी महानगरपालिकेने कोणतीही पुरेशी उपाययोजना केलेली नाही.तसेच कर दर सुधारणा तर नाहीच व वसुलीची टक्केवारी 22.54% इतकी अत्यल्प आहे.

6) **इतर महत्वपूर्ण अभिप्राय**

ठेवी व आगाऊ रकमांची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. महानगरपालिकेने द्यावायाच्या सहायक अनुदानातील प्रमुख बाब जल उपकर असून 2013-14ची देय रक्कम 53 लाख रुपये इतकी आहे. वटवण्यात न आलेल्या धनादेशाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 7 दिनांक 3/5/2016 नुसार माहिती मागवण्यात आली होती.तथापि ती उपलब्ध केली नाही .कालावधी पूर्ण झालेल्या परंतु चुकत्या न केलेल्या दायित्वाच्या रकमे बाबतचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने दायित्वाच्या रकमेतून वजा केल्यानंतरची शिल्लक रक्कम याबात निश्चित स्थिती मांडता येत नाही. तथापि उपलब्ध माहितीनुसार 2013-14 मधील रोख शिल्लक 25.22कोटी रुपये इतकी आहे.

7) अहवालासोबत विवरण पत्र क्र.02 शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्रातील रकाना क्र.3 ते 6 व 10 ते 13 मध्ये तपशिल नमुद नाही. तसेच अनुदान निहाय तपशिल नमुद न करता एकत्रितरित्या अनुदान दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे लेखापरिक्षणास अनुदान निहाय मंजुर करणारे प्राधिकारी, लेख्यातील प्रधानशिर्ष, लेखापरिक्षण वर्षानंतर खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम, शासनास परत करावयाचे अनुदान व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले अथवा नाही याबाबतचा तपशिल उपलब्ध होवू शकला नाही. त्यामुळे याबाबत सविस्तर अभिप्राय देता येत नाहीत.

8) अहवालासोबत विवरणपत्र क्र.04 मूल्य निर्धारण कर संकलन विभाग-करांची येणे वसुली व थकबाकी दर्शविणारे विवरणपत्र जोडण्यात न आल्यामुळे महापालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या विविध करांची मागणी, वसुली व थकबाबी बाबतची पडताळणी करता आली नाही.

9) अहवालासोबत विवरण पत्र क्रं..5 (अ) महानगरपालिकेने दिलेल्या व लेखापरिक्षण वर्षा अखेर थकीत कर्ज व

आगावू रक्कम दर्शविणारे विवरण पत्रातील माहीती निरंक दर्शविण्यात आली आहे. याबाबतची साधार स्पष्टता झाली नाही तर विवरणपत्र 5 (ब) महानगरपालिकेने दिलेल्या व लेखापरिक्षण वर्षा अखेर आगावू रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र जोडलेले नाही.

10) पुढील विविरण पत्र लेखा परिक्षण अहवालासोबत जोडण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र. | विवरण पत्र क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 1 | 6 (अ) | प्रलंबित अग्रमि रक्कम दर्शविणारे विवरणपत्र |
| 2 | 6 (ब) | प्रलंबित अनामत (ठेव) रक्कम दर्शविणारे विवरण पत्र |
| 3 | 7 | अपुर्ण बांधकामाची यादी दर्शविणारे विवरण पत्र |
| 4 | 8 | गुंतवणुकीबाबतचे विवरण पत्र |
| | | |

त्याअभावी विषंयाकीत बाबीबाबत लेखापरीक्षणास अभिप्राय नोंदता आले नाहीत.

DATAPJF8101 (Ref No : 85, Hmm No : 18)

## *2 31 मार्च 2014 चे बॅक ताळमेळ पत्रक तयार न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेने विहीत नमुन्यात रोखपुस्तक व इतर नोंदवहया ठेवून त्यामध्ये क्रमवार दिनांक सहित नोंदी केलेल्या नाहीत. राष्ट्रीय लेखा संहितेच्या परिच्छेद क्र. 29.11 व प्रकरण 30 मध्ये नमूद केल्यानुसार महिना अखेरीस रोखपुस्तकातील शिल्लक रक्कम व बँक पुस्तकातील शिल्लक रक्कम यांचा ताळमेळ घेतलेला नाही. रोख पुस्तक रोजच्या रोज बंद करूण शिल्लक रक्कम पुढील तारखेला आंरभिची रक्कम म्हणून दर्शविलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2013-2014 या वित्तीय वर्षातील सर्वसाधारण रोखवहीतील 29 मार्च 2014 च्या शिल्लक रकमेचे व उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण AXIS BANK खात्यातील 29

मार्च 2014 च्या शिल्लक रकमेबरोबर ताळमेळ घेतलेला नाही.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण रोखवहीची तपासणी केली असता दि. 1 मार्च 2014 ची आरंभिची रक्कम रु.417345950 इतकी असून दि. 29/03/2014 ची शिल्लक रक्कम रु. 298963033 इतकी आहे. महानगरपालिकेचे सर्वसाधारण खाते AXIS BANK, उल्हासनगर येथे असून खाते क्र. 910020045288278 हा आहे. सदर खात्यामध्ये दि. 01/03/2014 ची आरंभिची रक्कम रु. 32828096 इतकी असून दि. 29/03/2014 ची शिल्लक रक्कम रु.26249804 इतकी आहे. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण रोखवहीतील 29/03/2014 ची शिल्लक रक्कम व AXIS BANK खात्यातील शिल्लक रक्कम यामध्ये रक्कम रु.272713229 इतका फरक दिसून येतो. अर्धसमास पत्र क्र.20 दि 14/06/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.

याबाबत खालील अनियमितता आहेत.

1) राष्ट्रीय लेखा संहितेच्या परिच्छेद क्र 29.11 व प्रकरण 30 मध्ये नमुद केल्यानुसार महिना अखेरीस रोख पुस्तकातील शिल्लक रक्कम व बँक पुस्तकातील शिल्लक रक्कम यांचा ताळमेळ घेणे आवश्यक असतांना ताळमेळ घेतलेला नाही.

2) राष्ट्रीय लेखा संहिता नियम पुस्तिकेच्या प्रकरण 5 मधील परिच्छेद 5.3 च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेने विहीत नमुन्यात रोखपुस्तक व इतर नोंदवहया ठेवून त्यामध्ये क्रमवार दिनांक सहित नोदीं करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

3) राष्ट्रीय लेखा संहिता प्रकरण 29 मधील परिच्छेद 29.5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रोख पुस्तक रोजच्या रोज बंद करूण शिल्लक रक्कम पुढील तारखेला आरंभिची रक्कम म्हणून दर्शविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 20, Hmm No : 20)

## *3 महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प 1 ते 5 मधील भुयारी गटारांची चौकट व आर.सी.सी. कव्हर्स आणि गोल एस.एफ.आर.सी. फ्रेम व कव्हर्स पुरविणे व बसविणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 844650.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 842980.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 16750.00/-

***सन 2010-11 च्या म.जि.प्राधिकरणाच्या दरसूचित 0.90 बाय 0.45 मी. आर.सी.सी. कव्हर पुरविणे व बसविणे या बाबींचे दर नसताना अंदाजपत्रकात रु.335 प्रतिनग दर नमूद करणे व कामाची मोजमाप पुस्तिका क्र.16 तपासणीस उपलब्ध न करणे, कामाच्या बाब क्र.1 च्या दरात लोडिंग,अनलोडिंग व वाहतूक करणे समाविष्ट असताना सदर बाबीसाठी वाहतुकीचे स्वतंत्र प्रदान केल्याने वाहतुकीसाठी रु.16,750 चे जादा प्रदान,कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.1 व 2 मधील दरात एस.आर.एफ.सी.फ्रेम व कव्हर व आर.सी.सी. फ्रेम व कव्हर यांचे शासकीय मान्यता प्राप्त प्रयोगशाळे कडील चाचणी प्रमाणपत्र घेणेची बाब समाविष्ट असताना अशा शासकीय मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडील चाचणी प्रमाणपत्रा शिवाय ठेकेदारास पूर्ण दराने प्रदान करणे, केलेल्या साविंदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे.***

कॅम्प 1 ते 5 मधील भुयारी गटारांची चौकट व आर.सी.सी. कव्हर्स आणि गोल एस.एफ.आर.सी. फ्रेम व कव्हर्स पुरविणे व बसविणे या कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- महापालिका आयुक्त दिनांक 26.02.2013.
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.8,44,650. ता.म.क्र.143 दि.26.12.2012 कार्यकारी अभियंता.
3. मंजूर निविदा रक्कम रु. 8,44,650. जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ,ठाणे यांची शिफारस.
4. लेखाशिर्ष - “क” अंदाजपत्रक सी-5 भुयारी गटार, महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे.श्री सिद्धिविनायक मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित,उल्हासनगर.

7.कार्यादेश - क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./65 दि.14.01.2013 (अंदाजपत्रकीय दर)

8.करारनामा- रु.100.

9. कामाचा कालावधी - 2 महिने.
10. काम पूर्ण दि.-14.03.2013

11.एकुण खर्च रु .8,44,650(प्र.क्र.2691 दि.07/10.2013 रु.3,54,422 व प्र.क्र.3737 दि.5.12.2013 रु.4,90,228)

12. मोजमाप पुस्तक क्र.-16 पृ.क्र.20 ते 23 व 44 ते 47

सदर कामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मंजुरी नस्ती व प्रमाणके यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.64 दि.22/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2010-11 व 2011-12 च्या जिल्हा दरसूचीनुसार करण्यात आले आहे. कामात 250 नग एस.आर.एफ.सी. फ्रेम व कव्हर पुरविणे व बसविणे व आर.सी.सी. फ्रेमसह 400 नग कव्हर पुरविणे व बसविणे या बाबींचे काम समाविष्ट होत्या. याबाबत सन 2010-11 च्या म.जि.प्राधिकरणाच्या दरसूचित 0.90 बाय 0.45 मी. आर.सी.सी. कव्हर पुरविणे व बसविणे या बाबींचे दर नसताना अंदाजपत्रकात रु.335 प्रतिनग दर कसे घेणेत आले याबाबत खुलासा झाला नाही. तसेच कामाची मोजमाप पुस्तिका क्र.16 तपासणीस उपलब्ध झाली

नाही.

2) अंदाजपत्रकात बाब क्र.3 नुसार 250 नग एस.आर.एफ.सी. फ्रेम व कव्हर व आर.सी.सी. फ्रेम व 400 नग कव्हर कामावर पुराविणेसाठी वाहतुकिसाठी प्रतीनग रु.67 दराने रु.40,200 ची तरतूद करून त्याप्रमाणे प्रत्यक्ष काम दर्शवून ठेकेदारास प्रदान केले आहे. तथापि कामाच्या बाब क्र.1 च्या दरात लोडिंग,अनलोडिंग व वाहतूक करणे समाविष्ट असल्याने सदर बाबीसाठी वाहतुकीचे स्वतंत्र प्रदान केल्याने 250 नग एस.आर.एफ.सी. फ्रेम व कव्हरच्या वाहतुकिसाठी रु.16,750 चे जादा प्रदान झाले आहे. त्यामुळे सदर जादा प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

3) कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.1 व 2 मधील दरात एस.आर.एफ.सी.फ्रेम व कव्हर व आर.सी.सी. फ्रेम व कव्हर यांचे शासकीय मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडील चाचणी प्रमाणपत्र घेणेची बाब समाविष्ट असताना अशा शासकीय मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडील चाचणी प्रमाणपत्रा शिवाय ठेकेदारास पूर्ण दराने प्रदान करणेत आले आहे.

4) केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

वसूलपात्र रक्कम रु.16,750

आक्षेपाधीन रक्कम रु.8,42,980

DATBEPM6101 (Ref No : 3, Hmm No : 64)

## *4 प्रभाग समिती-3 क्षेत्रात सीव्हर लाईन क्लिनिंग मशीन क्र.एम.एच-05-216 वर काम करणेकरिता 29 जाने.2013 ते 28 जाने.2014 या कालावधीसाठी दररोज 5 मजूर पुरवठा करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 578062.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 547618.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 30444.00/-

***मजुरांच्या दैनिक वेतन दराबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2011-12 ची जिल्हा दरसूची तसेच मोजमाप पुस्तिका व मजुरांचा दैनिक उपस्थिती अहवाल तपासणीस उपलब्ध न होणे,प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी व कार्यादेश तसेच करारनामा करणे तसेच कामाचे कार्यादेशानंतर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी दिली असताना कामाचे प्रदान करणेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कोणतीही तरतूद नसताना नियमबाह्य प्रदान करणे,केलेल्या साविंदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे,नगरविकास विभाग***

***परिपत्रक क्र.जी.ई.एन./1098/1357/प्र.क्र-166/98,नवि-24 दि.03/11/ 2003 अन्वये कामांचा व कामगारांचा विमा न काढल्यास देयकातून 1% विमा रक्कम रु.5,074 कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करणे, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे दि.04/04/2012 च्या नोटीफिकेशनुसार दि.1/4/2012 पासुन 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक असताना देयकातून रु.25,370 कार्यकंत्राट कर कपात न करणे.***

प्रभाग समिती-3 क्षेत्रातील सीव्हर लाईन क्लिनिंग मशीन क्र.एम.एच-05-216 वर काम करणेकरिता 29 जाने.2013 ते 28 जाने.2014 या कालावधीसाठी भुयारी सिव्हरलाईन व चेंबर साफसफाई व चोकप काढणेसाठी मजूर पुरवठा करणे या केलेल्या कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1.प्रशासकीय मंजुरी- महापालिका आयुक्त दिनांक 31.01.2013.
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.5,94,806 ता.म.क्र.68 दि.25.09.2013 कार्यकारी अभियंता.
3. मंजूर निविदा रक्कम रु.5,94,806. जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ,ठाणे यांची शिफारस.
4. लेखाशीर्ष-"क" अंदाजपत्रक सी-5 अंडर ग्राउंड ड्रेनेज देखभाल,महसुली खर्च.
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे. विश्वनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित,उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./1226 दि.28.08.2013 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा-रु.100.
9. कामाचा कालावधी - 365 दिवस.
10. काम पूर्ण दि.-काम अपूर्ण
11.एकूण खर्च रु.5,78,062(प्र.क्र.4123 दि.26/12.2013 प्रथम धावते देयक)

12. मोजमाप पुस्तक क्र.-14 पृ.क्र.31 ते 32 .

सदर कामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मंजुरी नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.67 दि.22/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2011-12 च्या जिल्हा दरसूचीतील लेबरच्या दैनिक वेतन दरानुसार करण्यात आले आहे. तथापि सदरची दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध न झाल्याने प्रतिदिन दर रु.346.06 अचूक असल्याची खात्री करता आली नाही.

2) कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिका क्र.14 पृ.क्र.31 व 32 वर घेतल्याचे देयकात नमूद करण्यात आले आहे. तथापि सदर मोजमाप पुस्तिका व मजुरांचा दैनिक उपस्थिती अहवाल तपासणीस उपलब्ध न झाल्याने केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) कामाची अंदाजपत्रकाप्रमाणे दि.29.01.2013 ते दि.28.01.2014 या बारा महिने कालावधीसाठी मजूर पुरवठा करणेचा असताना कामास आयुक्त यांची दि.31.01.2013 रोजी म्हणजेच प्रत्यक्ष कामगार पुरवठा करणेचा कालावधी सुरु झाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी घेतली आहे.प्रत्यक्ष कामाचा कार्यादेश दि.28.08.2013 रोजी व करारनामा दि.28.08.2013 रोजी म्हणजेच कामाचा कालावधी सुरु झाल्यानंतर आठ महिन्यानंतर देण्यात आला आहे. सदर कार्यादेशात व करारनाम्यात कामाचा

कालावधी दि.29.01. 2013 ते दि.28.01.2014 असा 12 महिने नमूद करण्यात आला आहे. कामाच्या अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता यांनी दि.25.09.2013 रोजी काम सुरु झाल्यानंतर तांत्रिक मंजुरी दिली आहे.त्यामुळे अशाप्रकारे प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी, कार्यादेश व करारनामा करून तसेच कामाचे कार्यादेश दिल्यानंतर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी दिली असताना कामाचे प्रदान करणेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कोणतीही तरतूद नसताना नियमबाह्य प्रदान केले आहे. विभागाने याबाबत कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नसल्याने केलेल्या प्रदानाची रक्कम आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

4) केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) कामाच्या कालावधीचा कामगारांचा विमा काढण्यात आल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जी.ई.एन./1098/1357/प्र.क्र-166/98,नवि-24 दि.03/11/2003 अन्वये कामांचा व कामगारांचा विमा न काढल्यास देयकातून 1% विमा रक्कम रु.5,074 कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने विमा रक्कम रु.5,074 सबंधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) कामाच्या देयकातून कामगार कल्याण उपकर कपात करण्यात आला आहे. तथापि विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे दि.04/04/2012 च्या नोटीफिकेशन नुसार दि.01/04/2012 पासुन 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक असताना देयकातून कार्यकंत्राट कर कपात केला नाही. त्यामुळे कार्यकंत्राट कराची रु.25,370 सबंधीताकडून वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.30,444

आक्षेपाधीन रक्कम रु. 5,47,618

DATBEPM6101 (Ref No : 4, Hmm No : 67)

## ***5 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितता.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 12**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1500000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1500000.00/-

***सहलींसाठी अयोजकासोबत केलेल्या संविदाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस 15 दिवसात न कळविणे,सहलीसाठी जाणाऱ्या सदस्यांची संख्या व अपेक्षित खर्च यावर केलेल्या उपरीलेखनाबाबत प्रशासन अधिकारी अथवा अन्य अधिकाऱ्याने स्वाक्षरी नसणे,सहली काढल्याची***

***तारीख व सहलींसाठी किती विध्यार्थी, किती शिक्षक व किती शिपाई उपस्थित होते याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख नसणे, सहलींचे आयोजन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण पाच मधील नियम 2 नुसार निविदा मागवून आयोजकांची नेमणूक न करणे, इयत्ता सातवीत व सहावीत 2013-14 या शैक्षणिक वर्षात किती मुले व मुली शिक्षण घेत होती व त्यातील सहलीसाठी किती विध्यार्थी उपस्थित होते व अशा विध्यार्थी, शिक्षक व शिपाई यांचे उपस्थिती नुसार खर्च झाल्याची पूर्तता न दर्शविणे, कपात आयकर स्टेट बँकेत भरल्याचे भरणा चलने उपलब्ध न होणे, इयत्ता सहावीच्या विध्यार्थ्यासाठी शैक्षणिक सहल आयोजित करणेच्या रु. 660000 खर्चाच्या प्रकालानास अतिरिक्त आयुक्त यांनी मान्यता घेतल्याची टिप्पणी नस्तीसोबत नसणे व मंजूर टिप्पणीनुसार बस भाड्याचे देयक व रिसोर्टचे बिल प्रमाणकासोबत नसणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ शाळेतील 2013-14 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 6 वी व 7 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विध्यार्थ्यासाठी शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी शिक्षण विभागाने 2013-14 या वित्तीय वर्षात प्र.क्र.ए-36 दि.18.03.2014 रु.840000 व प्र.क्र.एबी-248 दि. 18.03.2014 रु.660000 नुसार एकूण रु.1500000 खर्च केला आहे. याबाबत विभागाने लेखापरीक्षणात उपलब्ध करून दिलेल्या दोन नस्त्या व खर्च प्रमाणके यांची तपासणी करुन आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.135 दि.25.10.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

अ) शैक्षणिक वर्ष 2013-14 इयत्ता 7 वी शैक्षणिक सहल.

1) विभागाने लेखापरीक्षणात सादर केलेल्या नस्तीतील टिप्पणीनुसार इयत्ता 7 वी च्या 1300 मुला/मुलीं, 25 शिक्षक व 20 शिपाई एकूण 1345 व्यक्तीची एक दिवसाची शैक्षणिक सहल शहापूर तालुक्यातील भातसा धारण येथे आयोजित करणेस व त्यासाठी प्रतिव्यक्ती रु.175 प्रवास खर्च व सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, संध्याकाळचा नाश्ता व रिसोर्ट फी रु.450 प्रतिव्यक्ती एकूण रु.625 प्रतिव्यक्ती खर्च धरून रु.840625 खर्च 2013-14 च्या मंजूर अर्थसंकल्पातील रु.15 लाख तरतुदीतून करणेस आयुक्त यांची दि.13.01.2014 रोजी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त केली आहे.सदर मंजुरीत आयुक्त यांनी शिक्षण मंडळ गठीत नसल्याने स्थायी समितीच्या मंजुरीस सादर करणेस सूचित केले आहे. तथापि अशी स्थायी समितीची मंजुरी घेतल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

2) उपरोक्त नमूद अशा टिपणीत अर्थसंकल्पीय तरतूद रु.10 लाख रक्कमेवर उपरीलेखन करून रु.15 लाख नमूद,1100 मुलांच्या संख्येवर उपरीलेखन करून 1300 नमूद,10 शिपाई संख्येवर उपरीलेखन करून 20 नमूद व एकूण व्यक्तींची संख्या 1135 वर उपरीलेखन करून 1345 संख्या नमूद तसेच येणारा खर्च रक्कम रु.709375 वर उपरीलेखन करून रु.840625 नमूद केल्याचे दिसते. सदर उपरीलेखनाबाबत प्रशासन अधिकारी अथवा अन्य अधिकाऱ्याने स्वाक्षरी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात एकूण किती व्यक्तींच्या व किती रक्कमेच्या खर्चास मान्यता प्राप्त केल्याची पडताळणी करता आली नाही.

3) सदरची सहल कोणत्या तारखेस काढण्यात आली व त्यामध्ये किती विध्यार्थी, किती शिक्षक व किती शिपाई उपस्थित होते याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख नाही.

4) सदर सहलीच्या आयोजनाचे प्रदान मे.सिद्धांत समाज विकास संस्था,उल्हासनगर यांना प्र.क्र. ए-36 दि.18.03.2014 रु.840000 नुसार करणेत आले आहेत.तथापि त्यांनी सहलीचे आयोजन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण पाच मधील नियम 2 नुसार निविदा मागवून त्यांची निविदा मंजूर करून त्यांना कार्यादेश दिल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) मे.सिद्धांत यांना एकूण 1344 व्यक्तींच्या एक दिवसाच्या सहलीचे दर रु.625 प्रती व्यक्ती प्रमाणे रु.840000 चे प्रदान केल्याचे त्यांचे प्रमाणका सोबतचे बिलावरून दिसून येते. विभागाने 2013-14 मध्ये दफ्तर पुरवठा करणेस पुरवठादारास दिलेल्या कार्यादेशात इयत्ता 7 वी च्या मुलामुलींची संख्या 1203 नमूद केली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात इयत्ता सातवीत 2013-14 या शिक्षणिक वर्षात किती मुले व मुली शिक्षण घेत होती व त्यातील सहलीसाठी किती विध्यार्थी उपस्थित होते व अशा विध्यार्थी, शिक्षक व शिपाई यांचे उपस्थितीनुसार खर्च झाल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

6)मे.सिद्धांत यांचे देयकातून कपात आयकर रु.16800 प्र.क्र.ए-37 दि.18.03.2014 नुसार स्टेट बँकेत भरणा केला आहे. याबाबतचे भरणा चलन नस्तीसोबत नाही.

ब) शैक्षणिक वर्ष 2013-14 इयत्ता 6 वी शैक्षणिक सहल.

1) विभागाने लेखापरीक्षणात सादर केलेल्या नस्तीतील टी/3 वरील दि.17.01.2014 च्या टिप्पणीनुसार इयत्ता 6 वी च्या मुलामुलींसाठी शैक्षणिक सहल आयोजित करणेबाबतच्या रु.660000 च्या प्रकालानास अतिरिक्त आयुक्त यांनी दि.13.01.2014 रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिल्याचे नमूद केले आहे. यासाठी मंजूर निधीतून एस.टी.महामंडळ भाडे व रिसोर्ट बिल शिक्षण मंडळामार्फत थेट देणेस अतिरिक्त आयुक्त यांची दि.24.01.2014 रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतली आहे. त्यानुसार प्र.क्र.एबी 248 दि.18.03.2014 रु.646800 व प्र.क्र. एबी 249 दि.18.03.2014 रु.13200 नुसार एकूण रु.660000 खर्च केला आहे. तथापि याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

2)उपरोक्त नमूद अशा टिपणीत इयत्ता सहावीच्या विध्यार्थ्यासाठी शिक्षणिक सहल आयोजित करणेच्या रु.660000 खर्चाच्या प्रकालानास अतिरिक्त आयुक्त यांनी मान्यता दिल्याचे नमूद केले आहे.तथापि सदरचे प्राकलन व अतिरिक्त आयुक्तांची मंजुरी नस्तीसोबत नाही.

3) सहल कोणत्या तारखेस काढण्यात आली व त्यामध्ये किती विध्यार्थी, किती शिक्षक व किती शिपाई उपस्थित होते,तसेच सहल कोणत्या ठिकाणी काढण्यात आली याबाबत नस्तीत तसेच मे.ओम मनीष यांचे बिलात कोठेही उल्लेख नाही.तसेच मंजूर टिप्पणीनुसार बस भाड्याचे देयक व रिसोर्टचे बिल प्रमाणकासोबत नाही.

4)सहलीच्या आयोजनाचे प्रदान मे.ओम मनीष इंटरप्रायसेस,उल्हासनगर यांना करणेत आले आहे. तथापि त्यांनी सहलीचे आयोजन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण पाच मधील नियम 2 नुसार निविदा मागवून व निविदा मंजूर करून त्यांना कार्यादेश दिल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) मे.ओम मनीष यांना एकूण 1056 व्यक्तींच्या एक दिवसाच्या सहलीचे दर रु.625 प्रती व्यक्ती प्रमाणे रु.660000 चे प्रदान केल्याचे त्यांचे प्रमाणका सोबतचे बिलावरून दिसून येते. विभागाने 2013-14 मध्ये दफ्तर पुरवठा करणेस पुरवठादारास दिलेल्या कार्यादेशात इयत्ता 6 वी च्या मुलामुलींची संख्या 1241 नमूद केली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात इयत्ता सातवीत 2013-14 या शैक्षणिक वर्षात किती मुले व मुली शिक्षण घेत होती व त्यातील सहलीसाठी किती विध्यार्थी उपस्थित होते व अशा विध्यार्थी, शिक्षक व शिपाई यांचे उपस्थितीनुसार खर्च झाल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

6)मे.ओम मनीष यांचे देयकातून कपात आयकर रु.13200 प्र.क्र.एबी-249 दि.18.03.2014 नुसार स्टेट बँकेत भरणा केला आहे. याबाबतचे भरणा चलन नस्तीसोबत नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.1500000 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.1500000

DATBEPM6101 (Ref No : 8, Hmm No : 135)

## *6 भविष्य निर्वाह निधीची बॅक खाती व विनावापर गुंतून राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : शिक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 3944.00/-

| |
|---|
| ***भविष्य निर्वाह निधीचे एसबीआय बॅक व आयडीबीआय बॅक अशा दोन बॅकेंत बचत खाती असून आयडीबीआय*** |

***बॅकेच्या खात्यामध्ये मार्च 2013 अखेर 41,519/- एवढी रक्कम शिल्लक असून सदर बॅक खात्यात 2013-2014 या वित्तीय वर्षात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नसल्याने सदर शिल्लक रक्कम विनावापर व विनांगुतवूनक पडून राहिली आहे. तसेच सदर रक्कम भ.नि. निधीच्या गुंतवलेल्या रक्कमाप्रमाणे मुदत ठेवीत गुंतविण्यात आली नसल्यामुळे सदर रकमेवरील एप्रिल-2013 ते मार्च 2014 या कालावधीच्या व्याजाचे नुकसान झाले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या भविष्य निर्वाह निधीच्या बॅक खात्याची पडताळणी केली असता आढळून आलेल्या त्रुटीचा खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 118 दि. 18/10/2016 अन्वये खुलासा मागविला असता उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील अनियमितता दिसून येतात.

1) उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाच्या भविष्य निर्वाह निधीचे आयडीबीआय बॅक व स्टेट बॅक ऑफ इंडीया अशा दोन बॅकेत खाते उघडण्यात आले आहे. एकाच निधीचे दोन वेगवेगळया बॅकेत खाते उघडण्यात आल्याचे दिसून येते. याबाबतचे प्रायोजन स्पष्ट झाले नाही.

2) आयडीबीआय बॅकेतील बचत खाते क्र. 0221104000008292 मध्ये दि. 31/03/2013 अखेर रू. 41,519/- एवढी रक्कम शिल्लक आहे. सदर बॅक खात्यामध्ये दि. 31/03/2013 पासून लेखापरिक्षणाच्या दिनांकापर्यंत कोणताही व्यवहार करण्यात आलेला नाही. त्यामुळे रू. 41,519/- एवढी रक्कम विना वापर व विना गुंतवून पडून आहे. शिक्षण मंडळाकडून केलेल्या गुंतवणुकी सोबत सदर शिल्लक रक्कम मुदत ठेवीने न गुंतविल्याने द.सा.द.शे 9.5% दराने सदर रक्कमेवर शिक्षण मंडळास वर्ष 2014 अखेर रू. 3,944/- एवढे व्याजाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम रू. 3,944/- वसूलपात्र आहे.

DATPKCM7101 (Ref No : 31, Hmm No : 118)

## *7 भविष्य निर्वाह निधी लेख्यातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : शिक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 26261716.00/-

***भविष्य निर्वाह निधीची नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. लेख्यांच्या नोंदीमध्ये खाडाखोड, उपरीलेखन, व्हाईट इंकचा वापर करून नोंदीमध्ये बदल करण्यात आले असून सदर बदल फेरफार केलेल्या नोंदी सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत. भ.नि.निधीच्या शिल्लक रक्कमेचे सुयोग्य नियोजन करून गुंतवणुक न केल्याने महिना निहाय सारासरी 32.00 लाख एवढी रक्कम खात्यात पडून राहिली आहे.***

***बृहत्तपत्रकानुसार खात्यातील रक्कम व प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये रू.26261716 इतकी तफावत असल्याचे दिसून येते.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळातील एप्रिल 2013 ते मार्च 2014 च्या भविष्य निर्वाह निधी लेख्याची तपासणी करतांना आढळून आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र. 120 दि.18/10/2016 रोजी निर्गमित केले असता शिक्षण विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.याबाबत खालील अनियमितता दिसून येतात.

1) मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 नियम 21(1) नुसार भविष्य निर्वाह निधीची रोखवही ही सर्वसाधारण निधीच्या रोखवही प्रमाणे नमुणा क्र.1 मध्ये ठेवणे आवश्यक असून नियम 21(2) नुसार रोखवहीमध्ये दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी घेवून प्रत्येक दिवसा अखेरची शिल्लक नोंदविणे आवश्यक आहे परंतु शिक्षण मंडळाकडील भ.नि.निधीची रोखवही उपरोक्त प्रमाणे विहीत नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही.

2) भविष्य निर्वाह निधी नियम 26 व 29 नुसार सेवानिवृत्त कर्मचा-याच्या बाबतीत सेवानिवृत्तीपूर्व 3 महिने अगोदर त्याच्याकडून अग्रिम व वर्गणीची वसुली थांबविण्यात येईल तसेच नियत सेवावधीच्या कमीत कमी 1 महिना अगोदर परंतु नियत सेवा निधीच्या दिनांकास कर्मचा-यास ती रक्कम मिळेल अशा पध्दतीने भविष्य निर्वाह निधीचा अंतिम प्रदान आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. परंतु मनपा शिक्षण मंडळाने खालील कर्मचा-याची सेवानिवृत्तीच्या महिन्यापर्यंत भविष्य निर्वाह निधीची वर्गणी कपात केली आहे.

| भ.नि.नि. खाते क्र | वर्गणीदराचे नाव | सेवानिवृत्तीचा दिनांक | वर्गणीवसुलीचा अखेरचा महिना |
|---|---|---|---|
| 465 | इंदिरा अ.आहुजा | 30/06/2013 | जुन-2013 |

तसेच वरील सेवानिवृत्त कर्मचा-याची भ. नि.नि. चे अंतिम प्रदानाचे आदेश काढण्यात आले नाही.

1) 2013 ते 2014 मधील भविष्य निर्वाह निधी लेख्याची खातेवहीची तपासणी करतांना खालील कर्मचा-यांच्या लेख्यांच्या नोंदीमध्ये खाडाखोड, उपरीलेखन, व्हाईट इंकचा वापर करून नोंदीमध्ये बदल करण्यात आले असून सदर बदल/फेरफार केलेल्या नोंदी सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत.

| भ.नि.नि. खाते क्र. | खातेदाराचे नाव |
|---|---|
| 426 | श्रीम.कलावती वाणी |
| 459 | श्रीमती सरला कुदनानी |
| 479 | श्रीमती अ. पोतदार |
| 485 | श्रीमती दया आर. दावरा |
| 509 | श्री. माणिक सौंदरकर |

सदर खात्याच्या नोंदीमध्ये केलेल्या दुरूस्त्या, उपरीलेखन करून केलेले बदल सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेले नाही.

1) भविष्य निर्वाह निधी लेख्याच्या रोखवहीनुसार वर्ष 2013-2014 मधील महिना निहाय अखेरच्या शिलकेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

महिना रोखवहीनुसार महिना अखेरची शिल्लक रक्कम रूपये पासबुकनुसार बॅंक खात्यात महिना अखेरची शिल्लक

रू.

| महिना | रोखवहीनुसार महिना अखेरची शिल्लक रक्कम रूपये | पासबुकनुसार बॅक खात्यात महिना अखेरची शिल्लक रू. | | |
|---|---|---|---|---|
| | | एसबीआय बॅक रूपये | आयडीबाआय बॅक रूपये | एकुण रक्कम रूपये |
| एप्रिल 2013 | 1189964.86 | 1189964.86 | 41519.00 | 1231483 |
| मे 2013 | 3908079.86 | 4408079.86 | 41519.00 | 4449598 |
| जुन 2013 | 2145734.86 | 2445734.86 | 41519.00 | 2487253 |
| जुलै 2013 | 1924657.86 | 1924657.86 | 41519.00 | 1966176 |
| ऑगस्ट 2013 | 1419194.86 | 2449194.86 | 41519.00 | 2490713 |
| सप्टेंबर 2013 | 3383776.86 | 3383776.86 | 42347.00 | 3426123 |
| ऑक्टोबर 2013 | 5122910.86 | 5122910.86 | 42347.00 | 5165257 |
| नोंव्हेंबर 2013 | 4227910.86 | 4302910.86 | 42347.00 | 4345257 |
| डिसेंबर 2013 | 3045826.86 | 3045826.86 | 42347.00 | 3088173 |
| जानेवारी 2014 | 4962926.86 | 4962926.86 | 42347.00 | 5005273 |
| फेब्रुवारी 2014 | 4199401.86 | 4199401.86 | 42347.00 | 4241748 |
| मार्च 2014 | 2835312.86 | 2835312.86 | 43196.00 | 2878508 |
| एकुण सरासरी | 38365699.32 / 12 =3197141.61 | 40270699.32 / 12 =3355891.61 | 504873 / 12 =42072.75 | 40775562 / 12 =3397963.5 |
| | 3197141.61 | | | 3397963.00 |

वरील भविष्य निर्वाह निधी लेख्यात रोखवहीनुसार महिना अखेर सरासरी रू.3197141.61 एवढी रक्कम शिल्लक राहिली असल्याचे दिसून येते तरी लेख्यात महिना निहाय जमा होणा-या रकमा सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या अंतिम प्रदानाच्या रकमा इतर कर्मचा-यांच्या मागणीनुसार अदा करावयाच्या अग्रिम रकमांचा वेळोवेळी आढावा घेवून भ.नि.निधीच्या शिल्लक रकमेचे सुयोग्य नियोजन करून गुंतवणुक न केल्याने महिना निहाय मोठया प्रमाणात खात्यात रक्कम अनावश्यक पडुन राहिली आहे पर्यायाने शिक्षण मंडळास सदर रकमेवरील व्याजाचे नुकसान झालेले आहे.

1) भविष्य निर्वाह निधीच्या खातेवहीनुसार असलेल्या शिल्लकेशी बॅकेतील शिल्लक रक्कम अधिक भ.नि.निधीच्या गुंतवणुकीच्या रकमा यांचेशी पडताळणी केली असता खातेवहीतील शिलकेपेक्षा बॅकेतील शिल्लक अधिक गुंतवणुक यांची एकुण रक्कम कमी असल्याचे दिसुन येते त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दि. 31/3/2014 रोजी भनिनिच्या शिलकेचा तपशिल | रक्कम रू . |
|---|---|---|
| 1 | बृह्त्तपत्राकानुसार भ.नि.नि. शिल्लक एकुण खात्यामधील | 98359784/- |
| 2 | अ गुंतवणुकीच्या (मुददलाची एकुण रक्कम रू. | 69219560/- |
| 3 | ब. आयडीबीआय बँक खात्यातील शिल्लक रक्कम रु | 43196/- |
| 4 | क.रू रक्कम शिल्लक खात्यातील बॅक एसबीआय | 2835312/- |
| 5 | एकुण (2+3+4) | 72098068/- |
| | बृहत्तपत्र व रोखवहीतील शिल्लकेतील तफावत रक्कम रू. ( अ.क्र. 1 वजा 5) | 26261716/- |

वरील प्रमाणे भविष्य निर्वाह निधीच्या बृह्त्तपत्राकानुसार वर्गणीदाराच्या खांत्यांमधील दि. 31/03/2014 अखेर एकुण 9,83,59,784/- एवढी रक्कम शिल्लक आहे. परंतु गुंतवणुकीची रक्कम व रोखवहीची शिल्लक विचारात घेता शिक्षण मंडळाकडे भविष्य निर्वाह निधीच्या खाती शिल्लक एकुण रक्कम रू. 7,20,980,68/- एवढी आहे त्यानुसार ब्रॉडशीटच्या रकमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रक्कम रूपये 2,62,61,716/- ने कमी आहे मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 8(1)(2) नुसार सदर तफावतीचा ताळमेळ घेतलेला नसुन तफावत दुर केलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 32, Hmm No : 120)

## *8 दि. 01/11/2005 नंतरनियुक्त कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजने ऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्याबद्दल.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : शिक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शिक्षण मंडळाचे दि. 31/10/2005 नंतर नियुक्त झालेल्या खाली नमुद केलेल्या कर्मचा- यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु केली असुनही दि. 01/11/2005 नंतर नियुक्त कर्मचा- यांच्या वेतनातून भ.नि.निधी योजनेतंर्गत वर्गणी वसूल करून त्यांना नियमबाहयपणे सदर योजनेचा लाभ दिला आहे.***

शासन निर्णय वित्त विभाग क्र. अनियो-1005/126/सेवा-4 दि. 31 ऑक्टोबर 2005 अन्वये शासन सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी, सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्त वेतन योजनेऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर, नविन "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागु करण्यात आली असुन सदर कर्मचा-यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी यांच्या तरतुदी लागु होणार नाहीत. असे शासनाचे आदेश आहेत, तथापि, उल्हासनगर मनपा शिक्षणमंडळाचे 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करतांना भविष्य निर्वाह निधी लेख्यांची पडताळणी करता शिक्षण मंडळाचे दि. 31/10/2005 नंतर नियुक्त झालेल्या खाली नमुद केलेल्या कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु न करता सदर कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे उघडण्यात आले असुन कर्मचा-यांच्या वेतनातुन दरमहा भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसुल करून सदर कर्मचा-यांना नियमबाहयपणे सदर योजनेचा लाभ दिला आहे.

| अ.क्र. | कर्मचानाव यांचे- | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | भ .नि.नि. .खाते |
|---|---|---|---|---|
| 1 | लीना अ. पाटील | उ.शि. | 28/12/2007 | 712 |
| 2 | सौ महाजन .प्र विद्या . | उ.शि. | 05/06/2006 | 709 |
| 3 | पंकज म भंगाळे . | उ.शि. | 01/06/2006 | 704 |
| 4 | श्रीम केदार .ना दिपमाला . | उ.शि. | 03/03/2006 | 699 |
| 5 | सौ .नेमाडे .यों जयश्री . | उ.शि. | 01/06/2006 | 703 |
| 6 | श्रीमती गौरी नेहाते | उ.शि. | 07/11/2009 | 766 |
| 7 | सौ. एडके पल्लवी अ. | उ.शि. | 15/06/2006 | 700 |
| 8 | श्रीमती सरीता वि.सुर्यवंशी | उ.शि. | 01/06/2006 | 715 |
| 9 | श्री पंकज ना पवार . | उ.शि. | 01/06/2006 | 721 |
| 10 | श्री शंकर र खरेल . | शिपाई | 22/02/2010 | 710 |
| 11 | श्री हेमंत शेजवळ | लिपीक | 14/07/2007 | 694 |
| 12 | श्रीम. कदम .चं निलम | लिपीक | 28/10/2009 | 711 |
| 13 | श्रीम पवार रोहिणी . | उ.शि. | 25/11/2009 | 739 |
| 14 | श्रीमती रंजना व्ही जाधव . | उ.शि. | 15/06/2009 | 740 |
| 15 | श्रीमती माधुरी खैरनार | उ.शि. | 16/08/2006 | 743 |

उपरोक्त बाबत अर्धसमास पत्र क्र.119 दि.18/10/2016 रोजी निर्गमित केले असता शिक्षण विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATPKCM7101 (Ref No : 33, Hmm No : 119)

## *9 मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 09**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2895982.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2895982.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 350982.00/-

***वर्ष 2013-14 मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठी पुरवठादारास रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर खर्चासाठी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण 7 मधील कलम 73(क) नुसार स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली नाही. पादत्राणे पुरवठयाबाबतची पुरवठा चलने, साठा नोंदवहया पडताळणीसाठी विद्यार्थी पटसंख्येपेक्षा जादा पादत्राणे खरेदी करण्यात आली आहेत. कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेली आयकर वसुलीची रक्कम रु.63,712/- शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत उपलबध नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी वर्ष 2013-14 या वर्षात पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठीच्या मा.आयुक्त यांनी दि.15.07.2013 रोजी दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थी पादत्राणे खरेदी (बुटमोजे) या लेखाशीर्षाखाली रु.30.00 लक्ष मंजुर अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून दि.19.07.2013 ते 25.07.2013 या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आल्याचे विभागाच्या टिपणीत नमूद करण्यात आले आहे. जाहिर निविदेमध्ये मे.ओम मनिष एन्टरप्रायजेस या लघुत्तम निविदाधारकाची निविदा मंजूर करण्यात आली असून पुरवठादाराशी दि.05.09.2013 रोजी रु.2100/- एवढया मुद्रांक शुल्क रकमेवर करारनामा करुन वर्ष 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.मनपाशिमंड/शिक्षण/564/13 दि.5.09.2013 अन्वये बालवाडी व इ.1ली ते 7 वी मधील एकूण 8622 विद्यार्थ्यांसाठी रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले असून प्रमाणक क्र.एबी-84 दि.24.09.2013 रु.3,98,169/- प्रमाणक क्र.एबी-86 व 87 दि.24.09.2013 रु.24,97,813/- असे एकूण रु.28,95,982/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

सदर बुटमोजे खरेदीच्या निविदेच्या प्रशासकीय मान्यतेची नस्ती, पुरवठा चलने, खर्च प्रमाणके व प्रमाणकांसोबतची कागदपत्रे यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.152 दि.29.11.2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत

काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण 7 मधील कलम 73(क) नुसार रु.25लाख रुपयांहून अधिक खर्च अंतर्भूत असेल अशा कोणत्याही संविदेस स्थायी समितीने मान्यता दिल्याशिवाय आयुक्तांनी अशी कोणतीही संविदा करता कामा नये. वर्ष 2013-14 मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे ( बुटमोजे) खरेदीसाठी पुरवठादारास रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. परंतु सदर कामासाठी स्थायी संमितीची मंजूरी घेण्यात आल्याबाबतचा ठराव नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे सदर खर्चास सक्ष म प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

2) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-2010/प्र.क्र.34/39 दि.06/08/2010 नुसार रु.10 लक्ष पेक्षा अधिक मुल्यासाठी ई-निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठी निविदा मागवितांना ई-निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार वस्तु खरेदीसाठी निविदा मागवितांना स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दी देवून निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतू शिक्षण विभागाकडून बुटमोजे खरेदीसाठी मागविलेली निविदा राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिर प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. परशुराम समाचार, नगर न्युज व अमृत कलश या वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली परंतू सदर वृत्तपत्रातील जाहिरातीची कात्रणे नस्तीत उपलबध नाहीत.

4) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.8.3(क) नुसार निविदा उघडतांना निविदाकार उपस्थित असल्याबाबत उपस्थिती अहवाल नस्तीत आढळून आला नाही.

5) आयुक्त यांनी दि.15.07.2013 रोजी दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे ( बुटमोजे) खरेदीसाठी निविदा मागविणेस 2013-14 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार मंजुरी दिली असल्याने निविदा 2013-14 या एक वर्षासाठी मागविणे आली असतांना पुरवठादारास 2014-15 साठी कार्यादेश क्र.मनपाशिमंड/शिक्षण/950/14 दि.07.02.2014 अन्वये बालवाडी व इ.1ली ते 7वी मधील एकूण 8622 मुले व मुलींसाठी पुरवठा करण्याबाबत रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72 मधील तरतूदीनुसार अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापुर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेण्यात आल्याचे आढळून आले नाही.

6) प्रमाणकांची तपासणी करता वर्ष 2013-14 मध्ये पुरवठादारास एकूण 8622 मुले व मुलींना बुटमोजे पुरवठयासाठी रु.28,95,982/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. परंतु शिक्षण विभागाकडील मनपाच्या 28 शाळांमधील पटसंख्येबाबत उपलब्ध केलेल्या आकडेवारीनुसार इ-1ली ते 7वी मुले व मुलींची विद्यार्थी संख्या ही एकुण 7304 एवढी असल्याचे दिसून येते. बालवाडीतील विद्यार्थी संख्या 552 विचारात घेता वर्ष 2013-14 मध्ये मनपा शाळांमधील बालवाडीतील विद्यार्थ्यांसह इ.1ली ते 7 वी मधील विद्यार्थी संख्या 7856 (7304+552) एवढी असतांना 8622 एवढया बुटमोजे पुरवठयाचे प्रदान करण्यात आले आहे. यावरुन विद्यार्थी संख्येपेक्षा 766 एवढे जादा बुटमोजे खरेदी केल्यामुळे रु.375/- प्रतीनग सरासरी दराने रु .2,87,250/- एवढे जादा प्रदान करण्यात आले. सदर जादा प्रदानाची एकूण रक्कम रु.2,87,250/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

7) कार्यादेशानुसार पुरवठादारास बुटमोजेंचा पुरवठा मनपाच्या 28 शाळांमध्ये करणेबाबतचे आदेश आहेत. परंतु संबधीत शाळांकडील साठा नोंदवहया तसेच मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेली पुरवठा चलने पडताळणीसाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या बुटमोज्यांच्या पुरवठयाच्या साठा नोंदवहीतील नोंदींची पडताळणी करुन प्राप्त साठा योग्य असल्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा यांची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

8) बुटमोजे पुरवठा खर्चाच्या प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. पुरवठादाराकडील उपप्रमाणकावर प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. तसेच प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

9) बुटमोजे खरेदीच्या देयकातून वर्ष 2013-14 मध्ये कपात केलेला टिडीएस रक्कम रु.63,712/- शासन खाती भरणा करण्यात आल्याबाबतचे चलन प्रमाणकांसोबत लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कपात केलेली टीडीएस आयकराची रक्कम शासन खात्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.
आक्षेपाधीन रक्कम रु.28,95,982/-
वसुलपात्र रक्कम रु. रु.2,87,250/- अधिक रु.63,712/- एकूण रु.3,50,962/-

FDSANMM7201 (Ref No : 44, Hmm No : 152)

## *10 मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी बेंच पुरवठयासाठी केलेल्या प्रदानाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3431250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3431250.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 75488.00/-

***वर्ष 2010-11 मध्ये मे.डी-वन एन्टर प्रायजसेय या पुरवठादराकडून उल्हासनगर मनपाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी बेंचेस पुरवठयासाठी केलेल्या खर्चाचे प्रदान 2014-15 मध्ये करण्यात आले आहे. सदर खर्चासाठी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट-ड प्रकरण 5 मधील कलम 2 नुसार निविदा प्रक्रीयेची नस्ती कंत्राटदाराशी केलेला करारनामा पडताळणीस उपलबध झाला नाही. वर्ष 2010-11 मधील खर्चाचे प्रदान वर्ष 2013-14 मधील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून करण्यात आले आहे. यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 102 नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. खर्चाच्या प्रदानास प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही. तसेच खर्च प्रमाणकावर प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. आयकर भरणा चलन उपलब्ध झाले नाही.***

उल्हासनगर मनपाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी बेंचेस पुरवठयाबाबत मे.डी-वन एन्टर प्रायजसेय या पुरवठादारास वर्ष 2010-11 मध्ये दिलेल्या कार्यादेश क्र.UMCSB/EDU/1039/10 दि.02/08/2010 अन्वये दिलेल्या कार्यादेशानुसार बेंचेस पुरवठयाबाबत पुरवठादाराने उपप्रमाणक (Tax Invoice) क्र.002 दि.6/12/2010 अन्वये केलेल्या मागणीनुसार वर्ष 2013-14 मध्ये प्रमाणक क्र.एसबी-304, एसबी-305 व एसबी-306 दि.19/12/2014 अन्वये रु.34,31,250/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची व सोबतच्या कागदपत्रांची पडताळणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमिततांचा खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.153 दि.29/11/2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण का लावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही . त्यामुळे खालील प्रामणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट-ड प्रकरण 5 मधील कलम 2 नुसार रु.3.00 लक्ष पेक्षा जादा

खर्चासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. परंतु सदर खर्चाबाबत प्रशासकीय मान्यतेची नस्ती, त्यानुषंगाने मागविण्यात आलेल्या निविदांची अभिलेख, कंत्राटदाराशी केलेला करारनामा इ. तपशील पडताळणीस उलपब्ध झाला नसल्याने सदर कामासाठी जाहिर निविदा मागवून खर्च करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

2) शिक्षण मंडळाने पुरवठादारास दिलेले बेंचेस पुरवठयाचे कार्यादेश, पुरवठा कालावधी, साठा नोंदवहया पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. तसेच प्रमाणकासोबत पुरवठा चलने व उपप्रमाणकांच्या मुळ प्रती उपलब्ध नसून छायांकीत प्रती जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर अभिलेख्यांअभावी खर्चाच्या सत्येतेची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3) खर्चाच्या प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांचा प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. यामुळे सदर खर्चाच्या सत्येतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

4) वर्ष 2010-11 मधील खर्चाचे प्रदान वर्ष 2013-14 मधील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून करण्यात आले आहे.यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 102 नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

5) फर्निचर पुरवठा खर्चाच्या प्रमाणकावर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही अथवा प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

6) देयकातून कपात केलेला टिडीएस रक्कम रु.75,488/- शासन खाती भरणा करण्यात आल्याबाबतचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कपात केलेली टीडीएस आयकराची रक्कम शासन खात्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही. तरी टिडीएस कपातीची रक्कम रु.75,488/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे . तसेच फर्निचर पुरवठयाच्या खर्चाची रक्कम रु.34,31,250/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.75,488/-

आक्षेपाधीन रक्कम रु.34,31,250/-

FDSANMM7201 (Ref No : 45, Hmm No : 153)

## *11 मनपा शाळामधील विदयार्थ्यांना सन 2010-11 करीता रेनकोट पुरविणे कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3452823.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 78462.00/-

***उदयोग,उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखंस1088/2512/उदयोग 6 दि.02.01.1992 मधील अ.क्र.8.3 (ह) व परिशिष्ट 7 मध्ये पुनर्प्रत्ययी आदेशाबाबत मार्गदर्शक तत्वे विहित केली असून सुध्दा त्याचे पालन झाल्याचे***

***आढळून आले नाही. शासन मान्य सहकारी संस्थेकडून रेनकोट खरेदी करणे आवश्यक असतांना खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करणेत आले आहे. नविन निविदा प्रक्रिया न राबविता सन 2009-10 च्याच पुरवठादारास पुरवठयाचे आदेश 10 टक्के अधिक दराने दिले आहे. आयकर कपातीची रक्कम बँकेत भरणा केल्याचे चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् झाली नाही. रेनकोट पुरवठा आदेश व वितरण सन 2010-11 मध्ये केले असतांना माहे एप्रिल 2013 मध्ये केलेल्या प्रदानाच्या विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत नमूद केलेले नाही. तसेच सदर रेनकोट पुरवठा केलेले प्रदान यापुर्वी केले नसलेबाबत प्रमाणपत्र प्रमाणकासोबत किंवा नस्तीत आढळून आले नाही. रक्कम रु.2600/- मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना रक्कम रु.100/- च्या मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर केला असल्याने रक्कम रु.2500/- शासनखाती जमा करणे आवश्यक आहे. शाळांना पुरवठा केलेल्या रेनकोट साठयाची आवक व वितरण नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत बालवाडी वर्ग येत नसतांना त्यांचेकरीता रेनकोटची मागणी केल्याने अतिप्रदान झाले आहे.***

कामाचे नाव:- मनपा शाळामधील विदयार्थ्यांना रेनकोट पुरविणे.
कार्यादेश क्र. 937 दि.07/07/2010
पुरवठा कालावधी- 15 दिवस
पुरवठादाराचे नाव:- मे.रेनपृफ गारमेंटस
प्रदानाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | एसबी-1 | 04/04/2013 | 2500000/- |
| 2 | एसबी-2 | 24/04/2013 | 876861/- |
| 3 | एसबी-3 | 24/04/2013 | 75962/- |
| | एकूण रक्कम रुपये | | 3452823/- |

प्राथमिक शिक्षण मंडळातील विदयार्थ्यांना रेनकोट पुरविणेबाबतच्या खर्चाच्या नस्तीचे लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.126 दि.18/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उदयोग,उर्जा व कामगार विभाग शा .नि.क्र.भाखंस1088/2512/उदयोग 6 दि.02.01.1992 मधील अ.क्र.8.3 (ह) व परिशिष्ट 7मध्ये पुनर्प्रत्ययी आदेशाबाबत मार्गदर्शक तत्वे विहित केली असून सुध्दा त्याचे पालन झाल्याचे आढळून आले नाही.

2) उदयोग,उर्जा व कामगार विभाग शा .नि.क्र.भाखंस1088/2512/उदयोग 6 दि.02.01.1992 मधील तरतूदीनूसार शासन मान्य सहकारी संस्थेकडून रेनकोट खरेदी करणे आवश्यक असतांना खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करणेत आले आहे.

3) उपरोक्त विषयाप्रकरणी निविदा प्रक्रिया न राबविता सन 2009-10 च्याच पुरवठादारास पुरवठयाचे आदेश 10 टक्के अधिक दराने दिले आहे.

4) प्रमाणक क्र.एसबी-3 दि.24/04/2013 अन्वये रक्कम रु.75962/- इतकी रक्कम आयकर विभागात भरणेकरीता बँकेत भरणा केली असल्याचे दिसून येते. परंतू चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् न

झाल्याने पडताळणी करता आली नाही. चलनाअभावी सदर रक्कम वसुलपात्र ठरविण्यात येते.

5) रेनकोट पुरवठा आदेश व वितरण सन 2010-11 मध्ये केले असतांना माहे एप्रिल 2013 मध्ये केलेल्या प्रदानाच्या विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत नमूद केलेले नाही . तसेच सदर रेनकोट पुरवठा केलेले प्रदान यापुर्वी केले नसलेबाबत प्रमाणपत्र प्रमाणकासोबत किं वा नस्तीत आढळून आले नाही. त्यामुळे यापुर्वी प्रदान केले किंवा कसे याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही.

6) करारनामा अंदाजपत्रकीय रक्कम रु .3500000/- वर रक्कम रु .2600/- मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना रक्कम रु.100/- च्या मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर केला आहे. सबब, उर्वरीत रक्कम रु.2500/- शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

7) शाळांना पुरवठा केलेल्या रेनकोट साठयाची आवक व वितरण नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. सबब, मागणी व उपस्थितीप्रमाणे विदयार्थ्यांना रेनकोट पुरवठा झाला किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

8) शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत बालवाडी वर्ग येत नसतांना त्यांचेकरीता रेनकोटची मागणी केल्याने अतिप्रदान झाले आहे.

वसुलपात्र रक्कम रु.78462/-

DATPVWM7501 (Ref No : 55, Hmm No : 126)

## *12 2013-14 मध्ये सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2255540.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2255540.00/-

***प्रचलित दरानुसार बाजार भाव मागवून अंदाजित खर्च निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खरेदी दरकरारपेक्षा किफायतशिर झाली असे लेखा परिक्षणास म्हणता येणार नाही. बाजार भावाशी तुलना न करता येत निविदा मागवुन खरेदी केल्याने तो वाजवीदराने झालेबाबत खात्री झाली नाही.***

प्रचलित बाजार भावानुसार अंदाजित खर्चाची निश्चिती करून त्याअनुषांगने निविदा मागविणे व त्यानुसार तुलनात्मक न्युनत्तम निविदाकार निश्चित करणेची प्रक्रीया राबविण्याचे व किफायतशीर दराने खरेदी झालेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत घनकचरा विभागाने सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदी केले आहे. 2013-14 मधील सदरील साहीत्य खरेदीसाठी मा. आयुक्त यांची दि. 20/06/2013 अन्वये मान्यता घेउन सदरील साहीत्य खरेदीची निविदा सुचना दै.नवाकाळ व दै. धनुषधारी या वृतपत्रात दि. 25/06/2013 रोजी प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. प्रस्तुत खरेदीसाठी मे. डॉल्फीन, मैं. जेपी कॉम्प्युटर ॲण्ड इन्टरप्रायजेस, मे. मोहित व मोहीणी एन्टरप्रायजेस अशा चार निविदा प्राप्त झाल्या असून ज्या ज्या ठिकाणी निविदा धारकांनी प्रत्येक साहीत्याच्या बांबीसाठी न्यून दर सादर केले आहेत. अशा निविदा धारकांना त्या त्या साहीत्याचा पुरवठा मागणीनुसार करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. 2013-14 या वर्षात एकुण रक्कम रु. 22,55,540/- ची सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदी करण्यात आली असून, या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) प्रस्तूत सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीमध्ये गॅलवनाईजड बादल्या, गोवा ब्रुम, बाम्बू, खरी हात मोजे, हातरुमाल, साबन, फावडे घमेला, ॲपरन, दातरी, लोखंडी हातगाडया, फेस मास्क (कापडी), फावडे दांडे, वगेरे असे 23 प्रकारे सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने घनकचरा विभागाने सफाई साहीत्य व सरंक्षणार्थ साधने खरेदीसाठी शासनाचे कृषी विभाग व आरोग्य विभाग यांच्या दरकरानुसार खरेदी न करता जाहीर निविदा मागवून सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साहीत्य खरेदी केलेली आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियमातील नियम 74(2) नुसार किफायतीशिर असलेली निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू दरकारपेक्षा खरेदी किफायतीशीर झाली असल्याबाबत खात्री न करता जाहिर निविदा प्रसिध्द करून खरेदी करण्यात आली आहे.

उदयोग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भाखस/1088/(2512) उदयोग-6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलंब केलेले दिसून आले नाही.

2) आरोग्य विभागांतर्गत घनकचरा विभागाने स्वच्छता साहित्य व संरक्षणार्थ साधने खरेदीच्या निविदा मागविण्यापूर्वी सदर साहीत्याचे प्रचलित दर अधिकृत विक्रेत्याकडून मागवून घेउन कमीत कमी दर असलेल्या बाबी (कोटेशनप्रमाणे) निश्चित करून त्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करणे व सिलबंद निविदा मागविणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे साहित्य खरेदी किफायतशीर दराने केल्याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे खरेदीवर झालेला खर्च रक्कम रू. 22,55,540/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबत अर्धसमास क्र. 25 दि. 27/06/2016 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता विभागाने दि. 25/07/2016 च्या प्राप्त खुलाश्यामध्ये दरकरार बाबत सदरील सहीत्य हे खासनाचे दर उपलब्ध नाहीत त्याची जाहिर ई निविदा वृतपत्रात पसिध्द करून प्रक्रिया पूर्ण करण्यात येत असते असे नमूद केले आहे. इतर नगरपालिका व महानगरपालिका यांचे दर विचारात घेऊन खरेदी केली जाते असे नमूद केले आहे. सदरील खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही. आक्षेपाधिन खर्च रू. 22,55,540/-

DATRYJM7501 (Ref No : 9, Hmm No : 25)

## *13 आरोग्य विभागाने लस खरेदी केलेली नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करून न दिलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1947630.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1947630.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाने 2013-14 मध्ये Purified Anti Rabies Vaccine with Disposed 5% with needle लस खरेदी खर्चाची निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करूण देण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 मधील कलम 6 चे महानगरपालिकाकडून उल्लघन झाले आहे***

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभाग यांचे 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता आरोग्य विभागाने Purified Anti Rabies Vaccine with Disposed Sy. With Needle ही लस मे. नमन एन्टरप्रायजेस मानीकपूर वसई (प) ठाणे यांचेकडून खरेदी केली होती तथापि खालील खर्चाच्या निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

| प्रमाणक क्र. | दिनांक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|
| 1176 | 20/06/2013 | 9,83,815/- |
| 5933 | 28/03/2014 | 4,53,560/- |
| 5947 | 29/03/2014 | 5,10,255/- |

उपरोक्त खर्चाच्या नस्तीचे अर्धसमास पत्र क्र. 24 दि. 22/06/2016 नुसार मागणी केली असता. आरोग्य विभागाने त्यांच्या अनुपालन दि. 20/07/2016 च्या उत्तरात नस्ती शोधण्याचे काम चालू असून नस्ती मिळताचा तात्काळ उपलब्ध करूण देण्यात येईल असा उल्लेख केला आहे. तरी सदरील लेखा परीक्षणास कालावधी पर्यंत सदरील नस्ती उपलब्ध करून दिलेली नाही.

तरी याबाबींवर झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करणे शक्य झालेले नाही.

DATRYJM7501 (Ref No : 10, Hmm No : 24)

## *14 उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय मागे स्थानिक संस्था कर विभागाकरीता नवीन कार्यालय बांधणेच्या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 773519.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 773519.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय मागे स्थानिक संस्था कर विभागा करीता नवीन बांधकाम केले आहे. सदरील काम मजुर कामगार सहकारी संस्था मे. ओम साई राम मजूर कामगार संस्था यांचेकडून करून घेतलेले आहे. प्रमाणक कंरमांक 5799 दि. 18/03/2014 असून कामाची एकुण रक्कम 7,73,519/- अशी आहे. याकामाबाबत निविदा नस्ती व त्याअनुषंगाने दस्ताऐवज लेखा परिक्षणास उपलब्ध करणेत आली नाही, त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 मधील कलम 6 चे महानगरपालिकाकडून उल्लघन झाले आहे***

उल्हासनगर महानगरपालिका बांधकाम विभाग यांचे 2013-14 चे लेखा परीक्षण केले असता, उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय मागे स्थानिक संस्था कर विभागा करीता नवीन बांधकाम केले आहे. सदरील काम मजुर कामगार सहकारी संस्था मे. ओम साई राम मजूर कामगार संस्था यांचेकडून करून घेतलेले आहे. प्रमाणक कंरमांक 5799 दि. 18/03/2014 असून कामाची एकुण रक्कम 7,73,519/- अशी आहे. सदरील प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता, सदरील कामाबाबतची निविदा नस्ती त्या अनुषंगाने कोणतेही दस्ताऐवज लेखा परीक्षणास लेखा परीक्षण संपणेच्या तारखेपर्यंत दाखविण्यात आलेले नाही तरी सदरील बाबतीत अर्धसमास ज्ञापन क्र. 39 दि. 22/07/2016 अन्वये खुलासा मागविला असता विभागाचे अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे रक्कम रू. 7,73,519/- आक्षेपधिन ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 12, Hmm No : 39)

## *15 निर्मल एम.एम.आर.डी. योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबत खर्चाचे अभिलेखे व त्या अनुषंगाने ठेवलेल्या नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध न करून दिलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष :00 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 9682070.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9682070.00/-

***2013-14 या वित्तीय वर्षात मुंबई महाप्रदेश विकास प्राधिकरण मुंबई यांच्या अनुदानातून खर्च केलेल्या***

***प्रमाणकांची तपासणी केली असता रू 96,82,070/- रक्कमेची अभिलेखे तपासणीसाठी प्राप्त केली नाहीत अभिलेखे उपलब्ध करून देणे हि स्थानिक प्राधिकरण या नात्याने महानगरपालिकेची जबाबदारी आहे. परंतु जबाबदारी पार न पाडल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 मधील कलम 6 चे महानगरपालिकाकडून उल्लघन झाले आहे.***

अर्धसमास क्र. 15 दि.03/05/2016, अर्धसमास क्र. 104 दि. 14/10/2016 व अर्धसमास क्र. 176 दि. 14/12/2016 पत्रान्वये लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करणेबाबत विनंती करण्यात आली होती. तथापी लेखापरीक्षण संपेपर्यत विभागाचे कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणांस सदरील खर्चाची खात्री न झाल्याने पुढील प्रमाणे आक्षेप देण्यात येत आहे.
मुंबई महाप्रदेश विकास प्राधिकरण बांद्रा मुंबई यांचे 100% अनुदानातुन निर्मल अभियान कार्यक्रमातंर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रा मध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालयांची निर्मिती विविध संस्था/ कंत्राटदार यांचेकडून निविदा मागवून कामे करूण घेतली आहे. तशी 2013-14 या वर्षामधील लेखा विभागाचे लेखा प्रमाणक परीक्षण केले असता मुंबई महाप्रदेशविकास प्राधीकरण बांद्रा मुंबई यांचे 100% अनुदानातुन उल्हासनगर महानगरलिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय निर्मितीची कामे 2013-14 मध्ये 15 प्रमाणकांची रक्कम रू. 96,82,070/- खर्च खालील कंत्राटदारामार्फत करून घेतली आहे.
1) मे. जागृत महिला मंडळ, 2) मे. सप्रेम 3) अकांशा सामाजिक प्रतिष्ठान 4) मे. जय दुर्गा माँ महिला गाहक सहकारी संस्था लिमिटेड, 5) मे. साईनाथ सेवा समिती 6) मे. श्रमिक सुशिक्षित बेरोजगार सेवा संघ 7) मे. सोसायटी फॉर प्रमोशन ऑफरिया रीसर्च सेंटर
सदरील ठेकेदाराचे 2013-14 मधील प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता सदरील ठेकेदारामार्फत बांधकाम विभागाने कामे करून घेतली आहे. संबंधित योजनेवर 2013-14 मधील रक्कम रू. 96,82,070/- केल्याचे प्रमाणक लेखे दिसून येत आहे सदर खर्चाचे लेखापरीक्षण करणेसाठी याबाबतचे खर्चाची प्रमाणका व्यतिरिक्त खालील अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून देण्यात आलेले नाही ते खालीलप्रमाणे आहे.
अ) निर्मल एम.एम.आर.डी. योजना
1) योजनेचा मंजूर ठराव व इतर दस्ताऐवज
2) प्रशासकीय मंजुरी व अंदाज पत्रक
3) तांत्रिक मंजुरी व त्यासंबंधातील दरसुची व दर पृथकरणे
4) एम.एम.आर.डी. यांची मंजुरी व त्या अनुषंगाचे योजनेचे दस्ताऐवज
5) निविदा नस्ती, निविदा अटी व शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, त्या अनुषंगाचे दस्ताऐवज
6) कार्यादेश व करारनामे त्या अनुषंगाचे दस्ताऐवज
7) सुधारीत प्रशासकीय मंजुरी व सुधारी अंदाजपत्रक, सुधारीत तांत्रिक मंजुरी व त्या संबंधित जिल्हा दरसुची पत्रक व दरपृथकरणे त्या अनुषंगानचे दस्ताऐवज
8) सुधारीत निविदा नस्ती फी, निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा निविदा मंजुरी प्रस्ताव निविदा मंजुरी ठराव त्या अनुषंगाचे दस्ताऐवज
9) सुधारीत कार्यदेश व सुधारीत करारनामा, सुधारीत ठरावची प्रत,
10) एम.एम.आर.डी.कडून प्राप्त अनुदाने कर्जे यांचा तपशिल त्यानुसार पाठविलेली युटीलायेजेशन सर्टीफिकेट,

योजनेची रोखवही
11) वेळोवेळी एम.एम.आर.डी. यांना सदरील कामाच्या प्रगतीचा अहवाल पाठविलेबाबत पत्रके त्यांचा दस्ताऐवज
तसेच सदरील संस्थाना कोणत्या नियमानुसार कामे दिले ते प्रमाणक नस्ती सोबत लेखा परीक्षणास कोणतेही अभिलेखे व त्या अनुषंगाने त्याचे दस्ताऐवज पडताळणीसाठी दाखविण्यात आलेली नाही, त्यामुळे लेखा परीक्षणास सदरील खर्चाची सत्यता पडताळणी करण्यात आलेली नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्धसमास क्र. 104 दि. 14/10/2016 अन्वये विचारणा करण्यात आली होती विभागाचे लेखा परीक्षण संपेपर्यंत उत्तर अप्राप्त आहे.

DATRYJM7501 (Ref No : 14, Hmm No : 176)

## *16 उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणंचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झालेल्या कामात अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 13044476.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11616738.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1427738.00/-

***उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झालेल्या कामाची मुळ निविदा नस्ती दाखविण्यात आलेली नाही त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 मधील कलम 6 चे महानगरपालिकाकडून उल्लघन झाले आहे. व त्या अनुषंगाचा मुळ करारनामाही दाखविण्यात आलेला नाही तसेच मान्य निविदेची सुरक्षा अनामत रक्कम नियमानुसार कंत्राटदाराकडून भरून घेतलेली नाही कंत्राटदाराच्या देयकातून वॅट कपात केलेला नाही, कंत्राटदाराचा कंत्राट मुल्याचा दएकुण मुल्याच्या रक्कमेवर स्थानिक संस्था कर रक्कम कपात करून घेतलेली नाही कामगारांचा शासकीय विमा निधी कपात केलेला नाही.***

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानांअंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभुत सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत DPR-1 मधील वाल्मिकी वसाहत व राहुलनगर येथील 600 घरकुलाचे रू. 35.38 कोटी रक्कमेचे सविस्तर प्रकल्प आराखडा मे. सुभाष पाटील असोसिएटस यांचेकडून तयार करून घेउन म्हाडाच्या मान्यतेनंतर राज्यस्तरीय सुकाणु समितीची दि. 29/12/2008 व केंद्रस्तरीय सुकाणू समितीची दिनांक 03/02/2009 रोजीच्या बैठकीत मंजुरी प्राप्त झाल्यावर त्याची निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

सदरचे निविदा प्रक्रियेबाबत मे. माधव कन्स्ट्रक्शन यांनी शासनास केलेल्या तक्रारीनुसार शासनाने दिनांक 20/01/2009 पासून स्थगिती दिल्यामुळे योजनेचे काम बंद ठेवण्यात आले होते. सदरचा स्थगन आदेश शासनाचे दि. 25/05/2009 चे पत्रानुसार रद्द करण्यात आला, त्यानंतर मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या संस्थेस दिनांक 25/08/2009 रोजी कार्यारंभ देण्यात आले होते. सदर कामासाठी 18 महिने दिनांक 25 फेब्रुवारी, 2011 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.
त्यानंतर, वाल्मिकी वसाहत येथील सफाई कामगारांच्या चार इमारती खाली करून तेथील सफाई कामगारांना अन्य जागी स्थलांतरीत करणेत आल्यानंतर सदर इमारती निष्कांसित करणेची कार्यवाही दि. 25/12/2012 रोजी करण्यात आली.
सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर योजनेतील इमारतींचे बांधकाम सुरू करणेचे होते, बीएसयुपी योजनेसाठी शासनाने यापूर्वी मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ दिली होती. त्यानंतर म्हाडाने दि. 26/09/2013 च्या पत्रान्वये या योजनेचा कालावधी केंद्र शासनाने मार्च 2015 पर्यंत वाढवून दिलेला आहे. सदर पत्रामध्ये "केंद्र शासनाचे क्र. 2 दि. 18/09/2013 च्या पत्रान्वये हा कालावधी दि. 31 मार्च 2015 पर्यंत वाढवून बीएसयुपी योजनेकरीता वितरीत करावयाच्या निधीची सुधारीत पध्दत नमुद केली होती. तसेच ज्या योजना सुरू झालेल्या नव्हत्या अशा योजना रद्द करण्याचे प्रस्ताव दि. 31 ऑक्टोबर, 2013 पर्यंत राज्य शासनास पाठवून राज्य शासनाच्या परवानगीने आठ दिवसात केंद्र शासनास पाठववयाच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.
त्याअनुषंगाने उल्हासनगर महापालिकेसाठी बीएसयुपी योजनेअंतर्गत DPR-1 व DPR-II प्रमाणे प्रस्तावित योजनेबाबत मा. महासभेपुढे DPR-1 मधील राहुलनगर व DPR-II मधील राजीवगांधी, बाळकृष्णनगर या वसाहतीच्या घरकुलांची बीएसयुपी मधील, योजना रद्द करून राजीव आवास योजनेअंतर्गत शासनाकडुन मान्यतेसाठी व DPR-1 मधील वाल्मिकी वसाहत योजनेचे काम सुरू असल्याने वाढीव मुदतीत सदर काम पूर्ण करण्यास व त्याअनुषंगाने सदर कामाची प्राकलने संबंधित सल्लागाराकडुन सुधारित करणेसाठी प्रस्तावित केले होते.
या प्रस्तावास मा. महासभेने ठराव क्र. 38, दिनांक 25/11/2013 नुसार DPR-1 मधील वाल्मिकी वसाहत या ठिकाणचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत त्याच ठेकेदारांकडुन करूण घ्यावे असे म्हटले आहे व DPR-1 मधील राहुलनगर व DPR-II मधील राजीव गांधीनगर व बाळकृष्णनगर या वस्तीसाठी सुधारित आराखडा तयार करुन राजीव आवास योजनेअंतर्गत प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. असे नमूद आहे. तरी सदरील श्रमसाफल्य योजनेच्या कामाबाबतची खर्च केलेली रक्कम प्रमाणके यांचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.
1) मे. कोणार्क इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना सदरील कामासाठी दि. 25/08/2009 अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे तरी सदरील कामाबाबतची मुळ निविदा नस्ती, तांत्रिक लिफाफे व वाणीज्यक दरपत्रके व सुधारीत करारनामा लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण-5 नुसार संविदा करणे नियम-1 संविदा करण्याची पध्दत व नियम-2 विवक्षित संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे यांचा अवलंब केलेला दिसून येत नाही. तसेच सदरील निविदा नस्ती लेखा परीक्षण कालावधीत मागणी करुनही विभागाने निविदा नस्ती न दिल्यामुळे लेखा परीक्षणास सदरील कामाच्या बाबतीत निविदा केली किंवा कस? याबाबत खात्री झालेली नाही.
2) बीएसयुपी योजना रद्द झाल्यानंतर महानगरपालिकेच्या निधीतून महासभा ठराव क्र. 38 नुसार श्रमसाफल्य योजनेमधून करण्यासाठी एक इमारत तळमजला + सात मजले व इतर 3(तीन) इमारी +चार मजले अशा पध्दतीने बांधण्यासाठी सुधारीत नकाशे तयार करून त्यानुसार सहाय्यक संचालक नगररचना यांची मान्यता

घेतले बाबतची दस्तऐवज लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नसल्याने. त्यामुळे योजनेच्या सुधारीत नकाशत किती इमारती बांधणार आहे. याबाबत लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध कामांसाठी विहीत पध्दतीने कार्यवाही करून त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. 76 दि. 05/02/2014 नुसार मान्यता दिल्यानंतर पाच सल्लागारांची विविध कामांसाठी स्थापत्य सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे त्यामध्ये मे. स्पर्श प्रतिष्ठान यांना श्रमसाफल्य योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून दि. 01/08/2014 च्या आदेशान्वये नियुक्ती केली आहे. परंतु मे. स्पर्श प्रतिष्ठान यांचा कार्यादेश व त्याअनुषंगाने करारनामा तसे मे. स्पर्श प्रतिष्ठान यांना सल्लागार फी किती देणेसाठी करारनामा केलेला आहे याबाबत लेखापरीक्षणास कोणतेही दस्ताऐवज दिलेले नसल्याने मे. स्पर्श प्रतिष्ठान हे श्रमसाफल्य योजनेचे सल्लागार असल्याबाबतची लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही.

4) श्रमसाफल्य योजनेत मे. कोणर्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना देयक अदा केलेबाबतची धावते देयक यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 4651 (I[st], II[nd] & III[rd] RABill) | 24/01/2014 | रू. 1,60,16,738/- |

उपरोक्त प्रमाणकांत कपाती करावयाच्या रक्कमा हया नियमानुसार केलेल्या नाही. त्यापुढील प्रमाणे आहे.

अ) प्रमाणक.क्र. 4651 दि. 24/01/2014 ची एकुण स्थूल रक्कम रू. 1,60,16,738/- अशी आहे

1) सदरील रक्कमेवर सुरक्षा अनामत रक्कम ही किती टक्के कपात केली याची खात्री झालेली नाही, देयकातून सुरक्षा अनामत कपात केलेली रक्कम रू. 42,795/- एवढी आहे. प्रत्यक्षात नियमानुसार सुरक्षा अनामत 5% रक्कम ही रू. 8,00,836/- एवढी येते परंतु कपात केलेली रक्कम रू. 42,795/- वजा करून रू. 7,58,041/- वसुलपात्र

2) महाराष्ट्र शासन यांचेकडील नोटीफीकेशन क्र. व्हॅट-1506/सी.आर.134/टॅकसेशनदि. 31/11/2006 अन्वये बांधकामावरील ठेक्यावर कंत्राटदाराकडून 5% व्हॅट कपात करणे आवश्यक आहे. कंत्राटदाराचे तांत्रिक कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात न आल्याने कंत्राटदाराच्या देयकातून वॅट वसूल करून शासन खाती भरणा करावयाची आहे परंतू तशी केलेली नाही. व्हॅट कपात केलेली रक्कम रू. 3,20,335/- एवढी आहे प्रत्यक्षात 5% कपात रक्कम ही. रू. 8,00,836/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली रक्कम रू. 3,20,335/- वजा करून रू. 4,80,501/- वसुल पात्र.

3) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.ऐन 1098/357/प्र.क्र. 165/98 नवि-24 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि. 03/11/2003 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकिय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे त्याप्रमाणे सदरील प्रमाणकात कपात केलेली रक्कम रू. 11,013/- एवढी दिसून आली आहे. आहे प्रत्यक्षत स्थुल रक्कमेवर 1% कपात रक्कम ही रू. 1,60,167/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली रक्कम रू. 11,013/- वजा करून रू. 1,49,154/- वसुलप्रात्र.

4) स्थानिंक संस्थ कर नियम 2010 नियम 27 मधील (5) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हती घेतलेल्या कंत्राटदाराने प्रदान करावयाची ठोक रक्कम महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही कामहाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिंक संस्था कर प्रदान करावयाच्या किंवा त्यांच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसुल करावयाचा आहे त्यामुळे सदरील प्रमाणकातील रक्कमेवर स्थानिंक संस्थाकर रक्कम 0.25% ही स्थुल रक्कमेवर वसुल न केल्याने वसुलपात्र रू.

40,042/-
उपरोक्त आक्षेपाबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र. 150 दि. 29/11/2016 अन्वये खुलासा मागविला असता विभागचे अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे आक्षेपाधीन रक्कम रू. 1,60,16,738/- व वसुल पात्र रक्कम रू. 14,27,738/-( सुरक्षा अनामत 7,58,041/- + मुल्यावधीत रक्कम 4,80,501/- + कामगाराचा विमा रक्कम रू. 1,49,154/- + स्थानिक संस्था कर 40,042/-)

DATRYJM7501 (Ref No : 16, Hmm No : 150)

## *17 नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत उल्हासनगर-5 येथील प्र.क्र. 38 ब मधील पटेलनगर मध्ये विविध ठिकाणी सी.सी पेव्हमेंट आणी नाली बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 17**

*लेखा शीर्ष :00 केंद्र व राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1480200.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1480200.00/-

***एकाच मजुर संस्थेस 50 लाख रूपयांपेक्षा अधिक रकमेचे काम दिले जाणार नाही याची दक्षता न घेणे, 100% कामे मजुर सहकारी संस्थाना देणे कार्यकारी अभियंता यांनी 5% कामाची तपासणी न करणे, विमा निधीकडे विमा उतरविल्याचे दस्तऐवज उपलब्ध नसणे, चलन, वाहतूक पास कंत्राटादाराकडून प्राप्त करून न घेणे मोजमाप पुस्तिकेत तारीखनिहाय नोंदी नसणे, कामगार कल्याण उपकर, स्वामित्वधन व आयकर शासनाकडे भरणा केल्याचे चलन उपलब्ध नसणे, कामाचे प्रदाबाबत दरपृथ्थकरण पत्रक लेखा परीक्षणास उपलब्ध नसणे, Site Visit Book कंत्राटदारने न ठेवणे, उपयोगिता प्रमाणपत्र खर्चाचे ताळमेळ, पुर्णत्वाचे दाखले विनियोजन दाखले इ. बाबी लेखापरीक्षणास उपलब्ध न होणे.***

कामाचे नाव :- नागरी दलित वस्ती सुधारणा योजेअंतर्गत उल्हासनगर - 5 येथील प्र.क्र. 38 ब मधील पटेलनगर मध्ये विविध ठिकाणी सी.सी.पेव्हमेंट आणी नाली बाधणे (2013-14)

तांत्रिक मान्यता व दिनांक :- तांत्रिक मान्यता क्र. 335 दि. 10/01/2013

प्रशासकीय व वित्तीय मान्यता रक्कम :- 14,90,200

कार्यादेश क्र. व दिनांक :- No. UMC:PWD:EE 576 दि. 24/09/2013

काम पुर्ण होणेची मुदत :- 180 दिवस

प्रत्यक्ष काम पुर्ण दिनांक :- 18/10/2013

प्रत्यक्ष खर्च :- 14,80,200/-

प्रमाणक क्र. :- 3900

उपरोक्त विषयाबाबत अर्धसमास पत्र क्र.106 दिनांक14/10/2016 रोजी नुसार खुलासा मागविण्यात आला होता ताथापी तो अप्राप्त असल्याने लेखा परीक्षणात आढळून आलेल्या पुढील अनियमितता नोंदविण्यात येत आहेत.

1) दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत उल्हासनगर - 5 येथील प्र.क्र. 38 ब मधील पटेलनगर मध्ये सी.सी.पेव्हमेंट व नाली बांधणेचे काम विजयलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. यांना देण्यात आले. तथापि महाराष्ट्र शासन सार्व. बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सी.एटी 07/05/प्र.क्र.94/इमा.2/दि. 16/11/2006 मधील तरतुद क्र. 2 नुसार महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता यांनी मजुर सहकारी संस्थाना कार्यादेश देण्यापूर्वी सदर संस्थेचे पासबुक तपासून एक वर्षात सदर संस्थेस 50 लक्ष पेक्षा जास्त काम दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी तथापि याबाबतचे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) शासन निर्णयातील तरतुद क्र. 4 नुसार 5 ते 15 लक्ष रू. पर्यंतच्या कामाचे वाटप मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमीत कंत्राटदार यांच्यामध्ये 33:33:34 प्रमाणात करणे आवश्यक आहे तथापि दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत 2013-14 मध्ये देण्यात आलेली 100% कामे मजुर सहकारी संस्थाना देण्यात आली आहेत.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहीता 1984 परिशिष्ट 24 अनु. क्र. 11(2) नुसार 5% कामाची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे तथापि अशी तपासणी सदर कामाबाबत झालेली नाही

4) महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाच्या दि. 03/11/2003 च्या शासन निर्णयनुसार कंत्राटी कामांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक केले आहे तथापि सदर विमा उतरविले बाबतचे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

5) राष्ट्रीय लेखा सहींता नियम क्र. 12.82 नुसार कामासाठी वापलेल्या मालसाहित्याच्या खरेदीचे चलन / Invoice वाहतूक पास इ. अभिलेखे प्रदानापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करून घेणे आवश्यक असते तथापि सदर कामात याबाबत कार्यवाही झालेली नाही.

6) सार्वजनिक बांधकाम लेखा संहीता परि. क्र. 10.01.04 मधील तरतुदीनुसार मोजमाप पुस्तकातील कामाच्या नोंदी कामाच्या प्रगतीनुसार तारीखनिहाय नोंदवविणे आवश्यक तथापि सदर कामाच्या मोजमाप पुस्तिकेत याप्रमाणे नोंदी ठेवण्याची कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभागाच्या दि. 17/06/2010 च्या शासन निर्णयानुसार कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक आहे. ठेकेदाराच्या प्रदानातून सदर कराची रक्कम रु.1,19,17,060 वसुल केला आहे तथापि त्याचा शासनाकडे भरणा केल्याचे आभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) महसुल व वनविभाग अधिसुचना दि. 10/02/2003 व महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय दि. 01/02/2010 च्या शासन निर्णयानुसार वाळु, खडी व मुरूम यावरील स्वामित्वधन रकमेचा भरणा शासनाकडे करणे आवश्यक आहे सदर कामाची रक्कम रु.30208 स्वामित्वधन रक्कम शासनाकडे भरणो केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत म्हणून सदर रक्कम वसुलपात्र ठरते.

9) कार्यादेशात नमुद केलेनुसार सदर कामाचे प्रदान जिल्हा दर सूची 2012-13 दरसूचीप्रमाणे करावयाचे आहे परंतू प्रत्यक्षात प्रदानासाठी वापरलेले दर यामध्ये तफावत आहे. 2012-13 च्या जिल्हा दरसूचीतील दरांमध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्राची 5 टक्के वाढ गृहीत धरूनही हे दर अवास्तव असल्याचे दिसते तसेच दरांपेक्षा अधिक दर असलेबाबतचे दरपृथ्थकरण पत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

10) करारातील अटीत नमुद केल्यानुसार कंत्राटदाराने site visit book ची प्रत ठेवणे आवश्यक आहे ते लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

11) करारातील अटीत नमुद केल्यानुसार कंत्राटदाराने देयकातून आयकर कपात करावयाची आहे तथापि कपात केलेल्या रक्कम रु.1,19,17,060 आयकराचा भरणा केल्याची पावती / चलन लेखा परीक्षणास आढळून आले नाही.

12) मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र. सामान्य/कक्ष-3/टे-2/नपा कावि/295 2013 दि. 03/07/2013 मधील अट क्र. 1 नुसार योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाचा विनियोग करणे विनियोजन लेखा आयूक्त यांनी सादर करणे आवश्यक आहे तथापी प्रत्यक्षात विनियोजन लेखे सादर केलेले नाहीत.

13) आदेशातील अट क्र. 3 नुसार योजनेअंतर्गत विकास कामांचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल प्रत्येक तीन महिन्याच्या अखेरीस विहीत प्रपत्रात जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तथापी याबाबत अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

14) आदेशातील अट क्र. 5 नुसार काम सुरू करणेपूर्वी व नंतरचे छायाचित्र काढून ते अभिलेखात जतन करून ठेवणेबाबत सूचीत केले आहे तथापि सदर कामात केवळ एकाच स्थळाचा फोटो ठेवला असून प्रत्यक्ष मोजमाप पुस्तीकेतील नोंदी नुसार सदर कामासाठी एकुण 11 बाबींचा समावेश असून त्याची अंमलबजावणी एकुण 20 विविध ठिकाणी करण्यात आली आहे.

15) आदेशातील अट क्र. 6 नुसार सदर कामाची तपासणी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे याबाबतचे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत तथापि सदर कार्यवाही झाली नाही.

16) आदेशातील अट क्र. 9 योजनेअंतर्गत प्रस्तावित कामे विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत असल्याबाबतची खात्री नगररचना विभागाकडे केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास आढळून आले नाहीत.

17) आदेशातील अट क्र. 14 नुसार सदर कामाच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ, व विनियोजन लेखे बनविणे ही जबाबदारी मनपाची असते तथापि प्रत्यक्षात सदर दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

DATAPJF8101 (Ref No : 74, Hmm No : 106)

## *18 उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये इ-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART संकल्पनेच्या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1514628.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1514628.00/-

***पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपमधून नागरीकांना कंत्राटदाराने मालमत्ता कर (टॅक्स पावती) पणीपुरवठा कर पावती, जन्म मृत्यु प्रमाणपत्र व ग्रीव्हलेक्स इतर सेवा दिलेबाबत उल्हासनगर महानगरपालिका नागरी सेवा***

***सुविधा केंद्र यांनी सेवानिहाय संगणकीय प्रणालीचा डाटा ठेवला नसल्याने, ई- गर्व्हन्स पध्दतीचा अवलंब बाबतच्या अटी व शर्ती पूर्ण झाल्याचे लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होउन प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने महापालिका कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करुन शासनास अपेक्षित असलेली SMART (Simple, Moral, Accountable, Responsive & Transparent) या संकल्पनेची अंमलबजावणी करणेबाबतचा प्रस्ताव महासभा ठराव क्र. 50 दि. 31/10/2007 अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नागरिकांना महापालिकेतर्फे पुरविल्या जाणा-या विविध सेवा प्रभाग कार्यालये व नागरीकांची जास्तीत जास्त वर्दळ असलेली ठिकाणे उदा. रेल्वे स्टेशन, गार्डन, मार्केट चौक अशा ठिकाणी उपलब्ध करुन देणेबाबत तसेच बांधकाम परवानगीचे संगणक आज्ञावलीव्दारे तात्काळ पडताळणीसाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपव्दारे दहा वर्षे कालावधीसाठी प्रकल्प राबविणेबाबत निविदा मागवून न्युनतम दरपत्रधारक मे सन डिजिटल उल्हासनगर यांचेकडून कार्यादेश क्र. UMC/CFC/318/319/08 01/12/2008 KIOSK Multi Utility Center व्दारे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मधून नागरीकांना सेवा उपलब्ध करुन देउन तशी Tax पावती, पाणी पुरवठा Tax पावती, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, इतर सेवा, ग्रीव्हनॅवस व थकित देयके बाबतची कामे, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप व्दारे महानगरपालिकेला नागरी सेवा सुविधेव्दारे सेवा देत आहेत, त्यानुसार न्यूनतम दरपत्रधारक मे. सन डिजिटल यांची मुळ निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्याप्रमाणे न्युनतम निविदाकार मे. सन डिजिटल यांचेशी मनपाने केलेल्या करारनामाच्या मुळ प्रती व त्यांच्या अटी व शर्ती लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास निविदा नस्ती व करारनामा यांची खात्री झालेली नाही.मे. सन डिजिटल यांनी प्रती माहेव्दारे संगणक विभागाला देयके सादर करुन कामाची देयके वेळोवेळी लेखाविभागातून प्राप्त करुन घेतलेले आहे. सदरील कंत्राटदाराचे सन 2013-14 व 2014-15 मधील कामाची देयके प्राप्त करूनण घेतलेली आहे त्यानुसार लेखा परीक्षणसाठी आवक्यानुसार निवडक महिन्यातील प्रमाणके व सर्वसाधारण प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता, देयक निहाय प्रमाणकाला नागरी सुविधा केंद्र विभागाने कंत्राटदारानी सेवा पुरविलेबाबतचे महिना निहाय व कंत्राटदाराने सेवा पुरविलेल्या सेवा निहाय संगणकीय प्रणालीचा मुळ डाटा लेखा परीक्षणास उपलब्ध करुन नसल्याने त्यामुळे लेखा विभागामधून मे. सन डिजिटल यांना अदा केलेली रक्कम अक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.1) प्रती Kiosk सेंटर रक्कम रू. 21,500/- 2) टॅक्स पावती, पाणी पुरवठा टॅक्स पावती जन्म मृत्यू प्रमाणपत्र व इतर सेवा प्रती नग रू. 11.50/- पैसे

| अ.क्र. | देयक तपशिल | प्रमाणक क्रमाक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 1)मालमत्ता कर(टॅक्स) पावती, पाणी पुरवठा कर(टॅक्स) पावती जन्म मृत्यू प्रमाणपत्र इतर सेवा ग्रीव्हनॅवस व थकित देयके<br>2)kiosk सेंटर | 3095 | 31/10/2013 | 9,30,231/- |
| 2 | 1)टॅक्स पावती, पाणी पुरवठा टॅक्स पावती जन्म मृत्यू प्रमाणपत्र इतर सेवा ग्रीव्हनॅवस व थकित देयके<br>2)kiosk सेंटर | 3096 | 31/10/2013 | 5,84,397/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण रक्कम 2013-14 | | | 15,14,628/- |

उपरोक्त नमुद केलेली प्रमाणकांची तपासणी केली असता संगणक माहिती व तसी ठेकेदाराची नोंद वही उपलब्ध न केल्याने सदरील बाबीने आक्षेपाधीन रक्कम 2013-14 मधील एकुण रक्कम रू.15,14,628/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.41 दि.22/07/2016 अन्वये खुलासा मागविण्यात आला असता, विभागाचे दि.09/08/2016 च्या खुलासामध्ये सदरील निविदा नस्ती व करारनामा प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली, बाबत खुलासा केला असता, सदरील बाबतीत मुद्दा क्र. 1 नुसार विभागाने निविदेची मुळ नस्ती व करारनामा उपलब्ध करून दिलेला नाही. तसेच मुद्दा क्र. 2 नुसार विभागाने कंत्राटदाराने वेगवेळया प्रकारच्या टॅक्सेस च्या प्रती अदा केलेबाबतचा संगणक डाटा लेखा परीक्षण संपे पर्यंत लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे विभागाने दिलेला खुलासा सुसंगत नसल्याने सदरील अक्षेप मान्य करता येत नाही. आक्षेपाधिन एकुण रक्कम रू. 15,14,628/-

DATRYJM7501 (Ref No : 19, Hmm No : 41)

## *19 महानगरपालिकेच्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7544810.00/-

***वाहनांच्या स्कंद नोंदवहयामध्ये लेखा संहितेप्रमाणे नोंदी घेतलेल्या नाहीत. वाहनांची मासिक व वार्षिक सरासरी धाव याबाबत गोषवारा काढण्यात आलेला नाही. लेखा शाखेकडे सादर करण्यात येणारी देयके यांची कार्यालयीन प्रत विभागाकडे ठेवण्यात आली नाही.***

महानगरपालिकेच्या वाहन विभागात 2013-2014 या आर्थिक वर्षात जड वाहने 39 तसेच हलकी वाहने 11 अशी एकुण 50 वाहने कार्यरत आहेत या वाहनांच्या इंधनासाठी महानगरपालिकेने रक्कम रू.7544810 एवढा खर्च

केला असुन एकुण इंधनावर झालेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र.193 दिनांक 28/12/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर विचारात घेउन लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महानगरपालिकेने नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 153 नुसार नमुना क्र.127 नुसार प्रत्येक वाहनासाठी ठेवलेल्या स्कंद नोंदवहया (लॉगबुक) यांची तपासणी करण्यात आली असता स्कंद नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवशी वाहन धावलेल्या किलोमीटर्सची संख्या नोंदविण्यात आलेली नाही. प्रवास कोठून ते कुठपर्यंत केला याबाबतच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या नाहीत एकुण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक अशा नोंदी घेण्यात आल्या नाहीत प्रवासाचे प्रयोजन नोंदविण्यात आलेले नाही वरील नियमानुसार स्कंद नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

2) वाहनांच्या स्कंद नोंदवहीमध्ये वाहनांची दरमहा एकुण झालेली सरासरी धाव तसेच वार्षिक सरासरी धाव यांचा गोषवारा काढण्यात आलेला नाही वाहनांचे मॉडेल वर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे वाहनांची प्रतिलिटर इंधनामागे किलोमीटर धाव योग्य असल्याची तपासणी करता आली नाही तसेच इंधनावरती केलेला खर्च रक्कम रूपये 7544810 चा योग्य वापर झाला नाही.

3) इंधन खर्चाची देयके वाहन विभागा मार्फत लेखाशाखेकडे पारित होण्यासाठी सादर केली जातात. परंतु अशा देयकांची कार्यालयीन प्रत वाहन विभागाने स्वत:कडे ठेवलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 34, Hmm No : 193)

## *20 महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहना वरील खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8832224.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6160.00/-

***वाहनांच्या वापरा संबंधी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. वाहनांची सरासरी धाव विहित मर्यादेपेक्षा जास्त झाल्यामुळे खर्च रक्कम रू 6160 वसुल पात्र आहे. ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा केलेली वाहने 2005 नंतरची असल्याबाबत खात्री करून कार्यादेश देण्यात आल्याचे दिसुन येत नाही.***

महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसाठी भाडेतत्वावरील वाहने एक वर्षाच्या कालावधीसाठी ठेक्याने पुरविणे कामी दिनांक 17/06/2010 च्या दैनिक सामना, दै प्रेस जनरल, दै. प्रात:काल, दै.नगर न्युज या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देउन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदापैकी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर यांची न्युनत्तम दराची निविदा स्विकारण्यात येउन स्थायी समिती ठराव क्र.138 दिनांक 20/02/2012 अन्वये मंजुरी दिली परंतु निविदा एक वर्षाच्या कालावधी करिता मागविलेली असतांना स्थायी समितीने ठेकेदाराच्या विनंतीनुसार त्याच दरात सदर निविदेचा कालावधी 5 वर्ष असा केला तथापी ठेकेदाराची

एका वर्षाची भाडेतत्वावरील वाहने पुरविण्याची सेवा समाधानकारक असल्यास पुढील कालावधीचा विचार करण्यात येईल व त्यानुसार अनमोल ट्रान्सपोर्ट यांचा प्रस्ताव मंजुर केला. तसेच दर वर्षी प्रशासकीय मान्यता घेउनच मुदतवाढ देण्याचे आयुक्तांनी आदेश दिलेले आहे त्याप्रमाणे 2013-2014 वर्षात या ठेक्याला मुदतवाढ दिलेली असून प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावर वाहने ठेक्यावर पुरविणे कामी 2013-2014 या वर्षात रक्कम रू.8832224 इतका खर्च केला असून एकूण झालेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र.194 दिनांक 28/12/2016 रोजी निर्गमित केले असता प्राप्त उत्तर विचारात घेऊन खालील प्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) प्रस्तुत भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचा ठेका मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांना वेळोवेळी आवश्यक असलेली वाहने पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडून करारनामा करून निविदा अटी व शर्ती क्र. 19 नुसार पुरवठा करण्यात येणारी वाहने ही नविन किंवा 2005 नंतरची (म्हणजे 2006 पासुन) खरेदी केलेली असावीत. व सर्व वाहनाचे आर.टी.ओ. नियमाप्रमाणे सर्व पेपरची पूर्तता कार्यादेश देतेवळी करावी असे नमुद करण्यात आले आहे परंतु ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा केलेली वाहने 2005 नंतरची असल्याबाबत खात्री करून कार्यादेश देण्यात आल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

2) वाहन विभाग कार्यालयात पुरवठादाराकडून प्रत्येक महिन्यात कार्यादेश देउन किती व कोणत्या प्रकारची वाहने ठेक्याने किती दिवसासाठी मागविण्यात आली व अशा वाहनांचा वापर कोणत्या अधिका-यांनी केला याबाबतचा संपूर्ण तपशिल ठेवणे बाबत निविदा अटी व शर्तीनुसार स्वतंत्र नोंदवही ठेवून अशा नोंदी नोंदविण्यात आलेल्या आढळून येत नाही. त्यामुळे भाडयाने घेण्यात आलेली वाहने यांचा योग्य वापर झाल्याची खात्री होत नाही.

3) मा. आयुक्त यांच्या कडील कार्यालयीन आदेशा क्र. उमपा/आ.का/163 दि 27/09/2012 नुसार भाडयाने घेण्यात आलेल्या वाहनांच्या वापराबाबत अधिकारी यांच्यावर निर्बंध घालण्यात आलेले असुन त्यानुसार प्रतिमहा 1250 किं.मी. पेक्षा जास्त व प्रति दिवस 12 तासांपेक्षा जास्त वाहन वापर टाळावा तसेच सार्वजनिक सुट्टया , दुसरा चौथा शनिवार आणि सर्व रविवार या दिवशी वाहन वापरण्याची आवश्यकता भासल्यास वाहन विभागास पूर्व सूचना देउन महानगरपालिकेचे वाहन वापरण्यात यावे. तसेच उपायुक्त व वाहन विभाग प्रमुख यांनी ज्या वाहनांचा वापर जास्त किंवा अयोग्य होत आहे असे वाटल्यास सदर बाब आयुक्तांच्या निदर्शनास आणावी असे आदेशात स्पष्ट सुचना देण्यात आल्या आहेत याबबात भाडयाने घेण्यात आलेली वाहने व ठेकेदारास केलेल्या प्रदानाबाबत काही निवडक महिन्यातील प्रमाणकांचे लेखापरिक्षण करण्यात आले असता खालीप्रमाणे 1250 किं.मी पेक्षा जास्त धाव झालेले वाहन त्या अनुषंगाने ठेकेदारास रूपये 6160 जादा प्रदान झालेले आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | वाहनाचा प्रकार | प्रतिमहा भाडे | प्रत्यक्षात झालेली धाव | जास्त झालेली धाव | जास्त प्रदान रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1518 दि. 16/07/2013 बील क्र. 914 | इंडिका | 1250 | 2090 | 840 | 840x7=5880 जास्त तास 8x35=280 |
| | एकुण जादा प्रदान रक्कम रूपये | | | | | 6,160/- |

DATPKCM7101 (Ref No : 35, Hmm No : 194)

## *21 उल्हासनगर मनपा अग्निशमन विभागांतर्गत सर्वसाधारण अभिप्राय...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,2006 चे कलम 25 अन्वये आग सुरक्षा निधी स्थापन करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे/1407/360/211 दि.31/08/2009 मधील परिच्छेद क्र.3 अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.26 दि.09/07/2012 अन्वये विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना-हरकत दाखला घेणेकरीता कार्यवाही होत नसलेचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 13 अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या 1 टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3(3) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महीन्यात मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी यांच्याकडे सादर करणेची कार्यवाही होत नाही. बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अॅक्ट अंतर्गत खाजगी रुग्णालयांना नोंदणी किंवा पुर्ननोंदणी देतांना अग्निशमन दलाकडून किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे परीपत्रक क्र.संआसे/फायर सेफटी/कक्ष 3/2011 दि.17/12/2011 नुसार बंधनकारक केले आहे. 12 रुग्णालयांनी अग्निशमन सुरक्षा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे नमूद आहे.***

अग्निशमन विभाग,उल्हासनगर महानगरपालिका येथील लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.97 दि.14/09/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,2006 चे कलम 25 अन्वये आग सुरक्षा निधी स्थापन करणे आवश्यक आहे. तरी सदर अधिनियमानूसार उल्हासनगर मनपातर्फे आग सुरक्षा निधी स्थापन केला किंवा कसे व वित्तीय वर्ष 2014-15 अखेरपर्यंत जमा रक्कम किती? तसेच रोखवहीनूसार जमा होणे अपेक्षित रक्कम किती? याबाबत आक्षेपाच्या प्राप्त अनुपालनात आग सुरक्षा निधी स्थापन करण्यात आला असून दि.01/04/2013 ते दि.31/03/2015 पर्यंत एकूण रक्कम रु.45,70,940/- जमा करण्यात आली असल्याचे नमूद आहे. तसेच सोबत विवरणपत्र जोडले असल्याचे नमूद आहे. परंतू अनुपालनासोबत विवरणपत्र जोडले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे/1407/360/211 दि.31/08/2009 मधील परिच्छेद क्र.3 अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवायचा आहे. उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.65 दि.08/09/2011 अन्वये अग्निशमन विभागात एकूण 60 फायरमनच्या मंजूर पदापैकी केवळ 18 पदे कार्यरत असून एकूण 42 पदे रिक्त आहेत. तरी अग्निशमन विभाग कार्यक्षम

ठेवणेकरीता महानगरपालिकेकडून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3)उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.26 दि.09/07/2012 अन्वये विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना-हरकत दाखला घेणेकरीता प्रथमवेळी रु.1000/- व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी नुतनीकरणाकरीता रु.500/- इतके शुल्क आकारणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकूण किती व्यवसाय कार्यरत आहेत? याबाबतची माहीती अग्निशमन विभागाकडे उपलब्ध नसल्याने तशा प्रकारची माहीती मनपाच्या किंवा शासनाच्या संबंधित विभागाकडून प्राप्त् करून त्या त्या व्यवसाय मालकांकडे अग्निशमन दलाचा ना-हरकत दाखला घेणेबाबत नोटीस व तदनंतर नुतनीकरण करण्याकरीता नोटीस पाठवून त्यांच्याकडून येणे रक्कमांचा तपशिल वसुलपात्र ठरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसलेचे निदर्शनास आले आहे. याबाबत प्राप्त अनुपालनात स्थानिक संस्था कर विभागाकडून मनपा क्षेत्रातील व्यवसायांची माहीती प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

4) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 13 अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या 1 टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा क्षेत्रातील एकूण किती इमारतींना अग्निशमन विभागाने ना-हरकत दाखला दिला आहे. तसेच त्यापैकी किती इमारतधारकांनी वार्षिक शुल्काची रक्कम मनपा खाती जमा केली आहे? याबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने वार्षिक शुल्क भरणा न केलेल्या इमारतींचीकडून वसुलपात्र रक्कमेची पडताळणी करता आली नाही . याबाबत प्राप्त अनुपालनात एकूण 18 प्रकरणांची शुल्क रक्कम रु.7950/- वसूल केलेचे नमूद आहे. परंतू सदर माहीती अपुर्ण आहे.

5) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3(3) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महीन्यात मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे प्रमाणपत्र संबंधित इमारतींकडून सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतचे प्राप्त अनुपालन अपुर्ण आहे.

6) बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत खाजगी रुग्णालयांना नोंदणी किंवा पुर्ननोंदणी देतांना अग्निशमन दलाकडून किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे परीपत्रक क्र.संआसे/फायर सेफटी/कक्ष 3/2011 दि.17/12/2011 नुसार बंधनकारक केले आहे. तरी उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकूण किती खाजगी रुग्णालये अस्तित्वात आहेत? त्यापैकी किती रुग्णालयांनी अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले किंवा कसे, याबाबतची एकत्रित माहीती अग्निशमन विभागाकडे नसल्याचे निदर्शनास आले आहे. उल्हासनगर मनपा आरोग्य विभागाकडे किंवा स्थानिक संस्था कर नियम 2010 नियम 10(1) अन्वये मनपा क्षेत्रातील व्यवसायाची नोंद करणे बंधनकारक आहे. संबंधित विभागाकडून खाजगी रुग्णालयांची माहीती प्राप्त करून ना-हरकत प्रमाणपत्र न घेतलेल्या रुग्णालयांना नोटीस पाठवून ना -हरकत प्रमाणपत्र घेणेबाबत सुचित करणे शक्य आहे . याबाबतच्या प्राप्त अनुपालन व अनुपालनासोबतच्या विवरणपत्रात उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकूण 78 खाजगी रुग्णालये असू न त्यापैकी 11 रुग्णालये बंद आहेत व 12 रुग्णालयांनी अग्निशमन सुरक्षा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे नमूद आहे. तरी शासन परिपत्रकानूसार काग्रवाही होणे आवश्यक आहे.

DATPVWM7501 (Ref No : 48, Hmm No : 97)

## *22 आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या खर्चासंबंधी अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1800000.00 /-

***महसुल व वनविभाग( मदत व पुर्नवसन), शासन निर्णय क्र.आव्यप्र-2012/प्र.क्र.111/आव्यप्र-1 मंत्रालय दि.07/12/2013 मधील अट क्र.2 नूसार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केलेला कृती आराखडा लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने शासन अनुदानाचा विनियोग योग्य झालेबाबत पडताळणी करता आली नाही. अनुदानातून पायाभूत सुविधा निर्माण करणा- यात येणा- या भांडवली स्वरुपाचा अनावर्ती खर्च करणे आवश्यक असतांना सर्व्हर, संगणक, नेटवर्किंग इत्यादी बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे. विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवितांना शासकीय संस्था तसेच शासकीय नामनिर्देशित खाजगी संस्थांचा अनुभव व कार्यकुशलता पाहून वापर करण्यात यावा, असे नमूद आहे. परंतू खर्चासंबंधी अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत. उर्वरीत रक्कम रु.10.50 लक्ष अखर्चित असल्याने शासनास परत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. अनुदानाच्या खर्चाची नोंदवही पाहता जनजागृती व जाहिरातीकरीता रक्कम खर्च केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच अखर्चित रक्कम रु.7.50 लक्ष शासनास परत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. शासनास सादर केलेले विनियोग प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.***

महसुल व वनविभाग (मदत व पुर्नवसन), शासन निर्णय क्र.आव्यप्र-2012/प्र.क्र.111/आव्यप्र-1 मंत्रालय दि.07/12/2013 अन्वये राज्यातील आपत्ती व्यवस्थापन केंद्रांना नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रमांतर्गत त्यांच्या आपत्ती नियंत्रण कक्षाचे बळकटीकरणासाठी तसेच आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करणे, जनजागृती करणे, संबंधित कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे इत्यादीसाठी उल्हासनगर महानगरपालिकेस सन 2012-13 या आर्थिक वर्षात रु.50 लक्षचे सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे. प्राप्त् अनुदानाच्या निधीपैकी सर्वसाधारणपणे 60 टक्के खर्च(रु.30 लक्ष) आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे बळकटीकरण तसेच आपत्ती दरम्यान आवश्यक असलेल्या साधन सामुग्रीच्या खरेदीवर करण्यात यावा. 25 टक्के (रु.12.50 लक्ष) खर्च प्रशिक्षणावर व 15 टक्के (रु.7.50 लक्ष)खर्च जनजागृती व इतर कारणांसाठी करावा, अशी अट आहे.

याबाबतच्या नस्तीची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या अभिप्रायांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.99 दि.14/09/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे

अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महसुल व वनविभाग(मदत व पुर्नवसन), शासन निर्णय क्र.आव्यप्र-2012/प्र.क्र.111/आव्यप्र-1 मंत्रालय दि.07/12/2013 मधील अट क्र.2 नूसार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या दि.06/02/2013 च्या कृती आराखडयानूसार सदर रक्कमेचा विनियोग करण्यात यावा, असे नमूद आहे. परंतू सदर कृती आराखडा लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने शासन अनुदानाचा विनियोग योग्य झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

2) शासन निर्णयातील अट क्र.3 नूसार सदर अनुदानातून पायाभूत सुविधा निर्माण करणा-यात येणा-या भांडवली स्वरुपाचा अनावर्ती खर्च करण्यात यावा, असे नमूद असतांना सर्व्हर, संगणक, नेटवर्किंग इत्यादी बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे.

3) शासन निर्णयामधील अट क्र.6 नूसार विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवितांना शासकीय संस्था तसेच शासकीय नामनिर्देशित खाजगी संस्थांचा अनुभव व कार्यकुशलता पाहून वापर करण्यात यावा, असे नमूद आहे. अनुदानाच्या खर्चाची नोंदवही पाहता प्रशिक्षणावर रक्कम रु.2,00,000/- इतकी रक्कम खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतू खर्चासंबंधी अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत. उर्वरीत रक्कम रु.10.50 लक्ष अखर्चित असल्याने शासनास परत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

4) शासन निर्णयामधील अट क्र.7 नूसार जनजागृती व जाहिरातीसाठी निधी खर्च करतांना शासकीय दरकरारावर नामनिर्देशित असलेल्या शासकीय वा खाजगी संस्थांच्या कामकाजाचा अनुभव विचारात घेऊन जनजागृती व जाहिरातीसाठी नियुक्ती करण्यात यावी, असे नमूद आहे. अनुदानाच्या खर्चाची नोंदवही पाहता जनजागृती व जाहिरातीकरीता रक्कम खर्च केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच अखर्चित रक्कम रु.7.50 लक्ष शासनास परत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

5) शासन निर्णयामधील अट क्र.8 नूसार चालू आर्थिक वर्षात सदर रक्कमेचा विनियोग करून विनियोग प्रमाणपत्र शासनास सादर करावे, असे नमूद असतांना सदर विनियोग प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 49, Hmm No : 99)

## *23 प्रभाग कार्यालय क्र.1 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 2300.00/-

***पावती पुस्तकांची साठा नोंदवही व चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नाही. पावतीनूसार जमा रक्कम रु.1950/- मुख्यालयातील लेखा विभागात जमा केलेचे चलन लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही व तशी नोंद रोखवहीवरदेखील नोंदविण्यात आलेली नाही. विवाह नोंदणीची रक्कम शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रभाग कार्यालयाकडील प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नाही. जमा रक्कम विलंबाने भरणा करण्यात आली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.1 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .108 दि.15/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच प्रभाग कार्यालय स्तरावरील जमा रक्कम मुख्यालयात जमा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत.

2) प्रभाग समिती क्र.1 अंतर्गत 2013-14 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 30 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही.

3) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नि यम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे . पावती क्र.34901 अन्वये रक्कम रु.500/- जमा केलेची रोखवहीत नोंद आहे. परंतू पावतीची स्थळ प्रत लेखापरीक्षणास प्राप्त झाली नसल्याने पावतीवरील रक्कमेबाबतची पडताळणी करता आली नाही. खालीलप्रमाणे पावतीनूसार जमा रक्कम रु.1950/- मुख्यालयातील लेखा विभागात जमा केलेचे चलन लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही व तशी नोंद रोखवहीवरदेखील नोंदविण्यात आलेली नाही.

| अ.क्र. | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 34913 | 14/02/2014 | 250 |
| 2 | 34914 | 17/02/2014 | 250 |
| 3 | 34915 | 17/02/2014 | 250 |
| 4 | 34916 | 17/02/2014 | 150 |
| 5 | 34917 | 20/02/2014 | 50 |
| 6 | 34918 | 21/02/2014 | 1000 |
| | | एकूण रक्कम रुपये | 1950 |

4) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14

नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आली नाही . माहे मार्च 2014 मधील श्री.सिध्दार्थ जाधव व श्री .प्रशांत भाटीया यांची विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

5) प्रभाग कार्यालयात जमा झालेली विवाह नोंदणीची रक्कम मुख्यालयातील लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे सदर रक्कम शासनाकडे जमा केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात . परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रभाग कार्यालयाकडील प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 50, Hmm No : 108)

## *24 मालमत्ता कर विभागातील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मालमत्ता कर विभागातील अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध केले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील कलम 6 चे विभागाकडून उल्लघंन झाले आहे.***

स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 मधील कलम 4 व 6 अन्वये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थेने लेखापरीक्षणाकरीता लेखे सादर करणे बंधनकारक आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.20/10/2016 अन्वये मालमत्ता कर विभागातील लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत कळविले होते. परंतू अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने दि.27/10/2016 च्या पत्रान्वये अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत संबंधितांना सुचना देणेबाबत मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना विनंती करण्यात आली. तसेच पुन:च्छ अर्धसमास क्र.156 दि.29/11/2016 अन्वये अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले होते. तरीदेखील खालीलप्रमाणे अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

1) मिळकत कर विभागातील 2013-2014 वित्तीय वर्षामधील एकूण कर निर्धारणांची एकूण प्रकरणे किती आहेत? त्यापैकी लेखापरीक्षणाकरीता निवडक महीना मार्च 2014 मधील एकूण कर निर्धारणाची मुळ प्रकरणे

नस्ती, कर निर्धारणाची नोंदवही, कर निरीक्षकांचे स्थळ पाहणी अहवाल, त्यांची क्षेत्रीय स्तरावरील अहवालाची नोंदवही इ., तसेच मार्च 2014 मधील सर्व कर निर्धारण प्रकरणांची ॲसेसमेंट डिटेल्स व प्रॉपटी कार्डची प्रिंट आऊट.

2) मिळकत कराची कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही, तसेच सन 2013-14 पर्यंत कर निर्धारण केले परंतू कराची संबंधित ग्राहकांकडे मागणी केली नाही किंवा विलंबाने प्रत्यक्ष कर निर्धारणाच्या दिनांकापासून मागणी न करता चालू कालावधीपासून मागणी केली, असे प्रकरणांची यादी व प्रकरणांच्या नस्ती.

3) मालमत्ता करामध्ये सुट किंवा परतावा देण्याची कार्यवाही केलेली प्रकरणांची नस्ती, वाढ-घट नोंदवही.

4) 2010-11, 2011-12 व 2012-13 या तीन वर्षांत बांधकाम प्रारंभ परवानगी देण्यात आलेली प्रकरणे व त्यांची संख्या, त्यानंतर त्यापैकी किती प्रकरणे मिळकत कर निर्धारणाकरीता घेण्यात आली व उर्वरीत कर निर्धारण न केलेल्या मिळकतींवर केलेली कार्यवाही,

5) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे मालमत्ता असलेले परंतू भाडेतत्वावर दिलेल्या प्रकरणांवर मालमत्ता कराअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत अभिलेख/नस्ती. तसेच शासनाच्या मालमत्तेवर कर आकारणी केलेल्या कराची प्रकरणे व अभिलेख

6) अनधिकृत बांधकामांवर कर निर्धारणाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेख तसेच मिळकत कराची थकबाकी वसुलीकरीता कोणकोणत्या सवलतीच्या योजना राबविण्यात आल्या त्यांच्या मंजूरीचे व त्याप्रमाणे झालेल्या कार्यवाहीचे अभिलेख

7) मिळकत कराच्या अनुषंगाने विवाद व कोर्टातील दावे प्रकरणे व अभिलेखे

8) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 च्या नियम 21(2) नुसार आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पाच वर्षांतून एकदा तरी आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे, अशी तरतूद आहे. याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे नव्याने कर निर्धारण केले किंवा कसे? केले असल्यास त्यासंबंधीचे अभिलेख नस्ती. जर केले नसल्यास त्यामागील कारणमिमांसा.

9) शासनाच्या वतीने मिळकत करात समाविष्ठ असलेला मोठा निवासी कर, रोजगार हमी योजना कर, शिक्षण उपकर इ. शासनास भरणा करण्याच्या रकमांचे अभिलेख.

10) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीएस-1810/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13 दि.26/07/2011 अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात शासनाने धोरण निश्चित केले आहे. मोबाईल टॉवर प्रकरणी मिळकत कराची प्रकरण नस्ती व नोंदवही, कर निरीक्षकांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेल्या ठिकाणाचा स्थळ पहाणी अहवाल व नोंदवही, त्याप्रमाणे तसेच विहीत पध्दतीनूसार मिळकत कर आकारणीचे देयक तयार होते किंवा कसे इ. अभिलेख.

11) मा.आयक्त, उल्हासनगर मनपा यांचे कार्यालयीन आदेश क्र.उमपा/करविभाग/195/13 दि.01/01/2014 अन्वये 'अ' प्रमाणे मासिक भाडे दरात सुधारणा केली आहे. तसेच 'ब' प्रमाणे वापरकर्ता प्रवर्गनिहाय कर आकारणी करणेचे आदेशित आहे. तरी खालीलप्रमाणे कर आकारणी प्रकरणांची यादी व कर निर्धारण प्रकरणे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. सबब, त्यांचे लेखापरीक्षण करता आले नाही.

a) उमपा क्षेत्रातील निवासी प्रकरणांची यादी व त्यांची कर निर्धारण प्रकरण नस्ती

b) उमपा क्षेत्रातील दुकाने कार्यालय व वाणिज्यीक वापर असलेल्या मिळकती यांची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

c) उमपा क्षेत्रातील बियर बार / परमिट रुम यांची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

d) विदेशी बँकाची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

e) राष्ट्रीयकृत बँक, शेडयुल्ड बँक , मोबाईल टॉवर, सिनेमा हॉल/सिनेमागृह/नाटयगृह, खुले सिनेमागृह-रंगमंच, मल्टीप्लेक्स, मॉल, बँकेतर वित्तीय संस्थ, जीवन विमा योजना कार्यालय, जनरल विमा योजनेंतर्गत कार्यालये, व इतर ज्यांना भाडे नियंत्रण अधिनियमात संरक्षण नाही. अशी प्रकरणांची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

f) सहकारी बँक, पतसंस्था यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

g) हॉटेल ( 3 व त्यापेक्षा अधिक तारांकीत हॉटेल) यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

h) स्वतंत्र बंगले यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

I) खाजगी हेल्थ क्लब,जिम्नॅशियम,शिकवणी वर्ग यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

j) दवाखाने, क्लिनीक, पॅथॉलाजी, नर्सिंग होम, हॉस्पिटल यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

k) फॅक्टरी/इंडस्ट्री ज्यांना फॅक्टरी ॲक्ट 1948 लागू आहे. यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

l) महाराष्ट्र शासन क्र. आयटीपी 2003/सीआर/3311/इंड, मंत्रालय, मुंबई 32 दि.12/07/2003 महाराष्ट्र शासनाने आयटी/आयटीइएस योजना 2003 मधील परिशिष्ठ - 4-6 या संस्थांच्या मिळकती तसेच ज्या संस्थामध्ये डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रिज महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र असलेल्या आयटी/आयटीइएस संस्थांच्या मिळकती यांचे यादी व प्रकरण नस्ती

m)नोंदणीकृत धर्मदाय / सार्वजनिक संस्था म्हणून नोंद असलेल्या मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

n) राज्य शासन / मनपा मालकीच्या मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

0) अनधिकृत व विनापरवाना मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

p)निवासी मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती.

DATPVWM7501 (Ref No : 58, Hmm No : 128)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *25 महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शांतीनगर व नेहरूनगर या मलउपसा केंद्रे विद्युत उपकेंद्रासहित चालविणे,देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1960502.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1749700.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 210802.00/-

***केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/ 2012-एस.टी.दि.6.जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात आल्याने व अंदाजपत्रकात कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास रु.2,08,502 जादा प्रदान होणे, मुंबई मुद्रांक अधिनियम मध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणेनुसार करारनामा रु.2,300 च्या कमी मुद्रांक पेपरवर करणे,कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कामगारांचा भविष्य निर्वाह निधी,इ.एस.आय.त्यांचे खाती जमा केलेबाबत तसेच किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन दिल्याची तसेच कामगारांचा 8.33% बोनस,रजा वेतन रक्कम,धुलाई भत्ता त्यांना प्रदान केल्याची व कामगारांना गणवेश,रेनकोट तसेच गमबूट दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नसणे, कामाच्या मोजमाप पुस्तिका क्र.210 मध्ये लेखा विभागाकडून प्रदानार्थ रक्कमा तपासल्याबाबत स्वाक्षऱ्या नमूद नसणे.***

महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शांतीनगर व नेहरूनगर या मलउपसा केंद्रांत वितरण व्यवस्थेतील वाहिन्याद्वारे सांडपाणी येते व सदर सांडपाण्याचा उपसा खेडेगोळवली येथील मलप्रक्रिया केंद्रात करण्यात येतो. महापालिकेने अशा मलउपसा केंद्रांची विद्युत उपकेंद्रासहित चालविणे, देखभाल व दुरुस्ती साठी वार्षिक निविदा काढून ठेकेदारामार्फत काम करून घेतले आहे. सदर कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- स्थायी समिती मंजुरी उपलब्ध झाली नाही.आयुक्त मान्यता दि.20.09.2012.
2. तांत्रिक मंजुरी क्र./तारीख व अंदाजपत्रकिय रक्कम- क्र.8/दि.05.09.2012 रु.30,99,428.
3. मंजूर निविदा रक्कम रु.32,85,393.
4. निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.81 दि.28.03.2013
5. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-2 महसुली खर्च

6. निधी - म.न.पा.
7. ठेकेदाराचे नाव - मे.ओम इंडस्ट्रीयल इंजिनियरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली.
8.कार्यादेश क्र.यु.एम.सी./एस.एस.एस.एस.डी./ई.ई./552 दि.05.04.2013 (6%टक्के जादा दर)
10.करारनामा-रु.100.
11. कामाचा कालावधी - 12 महिने.
12. काम पूर्ण दि.-मुदत वाढ
13. एकूण खर्च रु.19,60,502 (प्र.क्र.5510/07.03.2014 रु.7,84,964,व प्र.क्र.5929/28.03.2014 रु.11,75,538)
14. मोजमाप पुस्तक क्र.- 210

सदर कामाचे अंदाजपत्रक,निविदा व देयकाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदवहीतील नोंदीची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.44 दि.27.07.2016 निर्गमित करण्यात आले होते.याबाबत विभागाने दिलेले ( क्र.व दिनांक नाही.) व दि.07.09.2016 रोजी प्राप्त झालेले उत्तर तपासून खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक आस्थापना, दळणवळणासाठी वाहन, 22 केव्ही सबस्टेशन देखभाल व मोटारींचे रिवायडिंग अशा चार भागात करण्यात आले आहे. यातील आस्थापना भागात दोनही पंपिंग स्टेशनसाठी आवश्यक कुशल व सेमीकुशल कामगारांचे व सेक्युरीटी गार्डचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन गृहीत धरून महिन्याचे वेतन काढून वार्षिक वेतन काढण्यात आले आहे. यामध्ये इलेक्ट्रिक ऑपरेटर 3, इलेक्ट्रिशियन 1,फिटर 1, हेल्पर/व्होल्व्हमन 3 व सेक्युरीटी गार्ड 5 अशा एकूण 13 कामगारांचा समावेश आहे. अशा कामगारांचे वेतन काढताना किमान वेतन + विशेष भत्ता + इ.पी.एफ.+ इ.एस.आय.+ रजा वेतन +लेबर लायसन्स व इतर + गणवेश/रेनकोट+धुलाई भत्ता+ इतर किरकोळ साहित्य + आस्थापना खर्च + बोनस + सेवाकर 12.36% + कामगार कल्याण कर + विमा समाविष्ट करून कुशल कामगाराचे रु.13,728 व सेमीकुशल कामगाराचे रु.13,541 मासिक वेतन तसेच सेक्युरीटी गार्डचे रु.14,634 मासिक वेतन निश्चित करण्यात आले आहे. सदर मासिक वेतन काढताना कुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,480 व सेमीकुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,460 व सेक्युरीटी गार्डच्या मासिक वेतनात रु.1,578 सेवाकराचा समावेश आहे. केद्रसरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी.दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात आल्याने सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. वित्तीय वर्ष 2012-13 व 2013-14 मध्ये ठेकेदारास एकूण 10 महिन्याचे रु.19,60,502 चे प्रदान करण्यात आले आहे. त्यामध्ये 6% जादा मंजूर निविदा दराने रु.2,08,502 च्या सेवाकराचा समावेश आहे. विभागाने त्यांचे उत्तरात अंदाजपत्रक जुलै-12 पूर्वी तयार केल्याने सेवाकराचा समावेश करणेत आल्याचे नमूद केले आहे.तथापि निविदा 2012-13 मध्ये काढल्याने सेवाकराविना सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते, तसेच ठेकेदारास प्रदान सेवाकर त्यांनी शासनखाती जमा केल्याची पूर्तता दर्शविली नसल्याने केलेला खुलासा सयुक्तिक नाही. त्यामुळे सदरची रक्कम रु.2,08,502 ची सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे. तसेच पुढील प्रदानावर सुद्धा जादा प्रदान सेवाकराची वसुली करणे आवश्यक आहे.

2) ठेकेदारासोबत रु.100 च्या मुंद्राक पेपरवर करारनामा करण्यात आलेला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम मध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणेनुसार करारनामा रु.2,400 च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना कमी मूल्याच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याने कमी मुद्रांक शुल्क रु.2,300 सबंधीताकडून वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.
3) निविदा अटी/शर्तीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना कंत्राटातील नमूद कामगारांचा भविष्य निर्वाह निधी,इ.एस.आय. त्यांचे खाती जमा केलेबाबत तसेच किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत.तसेच ठेकेदारास प्रदान कामगारांचा 8.33% बोनस,रजा वेतन रक्कम,धुलाई भत्ता त्यांना प्रदान केल्याची व कामगारांना गणवेश, रेनकोट तसेच गमबूट दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत. विभागाने उत्तरासोबत पूर्तता केलेबाबत कागदपत्रे जोडली नाहीत.
4) कामाच्या देयकाच्या सबंधित मोजमाप पुस्तिका क्र.210 पाहता त्यात लेखा विभागाकडून प्रदानार्थ मंजूर रक्कम,कपातीच्या रक्कमा व निव्वळ देय रक्कम लाल शाईने नमूद करण्यात आल्या आहेत, तथापि तपासल्याबाबत स्वाक्षऱ्या नमूद करण्यात आल्या नसल्याबाबत पूर्तता दर्शविली नाही.
उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.2,10,802 वसूलपात्र व रक्कम रु.17,49,700 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.17,49,700.
वसूलपात्र रक्कम रु.2,10,802.

DATBEPM6101 (Ref No : 1, Hmm No : 44)

***26 वार्ड क्र.17 मधील रामभाऊ म्हाळगी चौक, आम्बिकानगर येथे 200 मिमी.व्यासाचे आर.सी.सी.एन.पी.2 क्लास पाईप टाकणे व वार्ड क्र. 31 बॅरेक 1050,1013,1028,1029 येथे 200 मिमी.व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे या दोन कामातील अनियमितता.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनिय मितता संख्या : 07**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1329497.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1324120.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 53767.00/-

***महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अनुक्रमे सन 2012-13 व 2010-11 च्या जिल्हा दरसूच्या तपासणीस उपलब्ध न झाल्याने अंदाजपत्रकात नमूद दर अचूक असल्याची पडताळणी करता न येणे,कामांच्या मोजमापांच्या नोंदीबाबतच्या मोजमाप पुस्तिका क्र.05 व क्र.16 तपासणीस उपलब्ध न होणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जिल्हा दरसूची 2012-13 पृष्ठ-282 बाब-1 (अ व ब) व दरसूची 2012-13 बाब-6 नुसार चेंबर व मॅनहोल बाबत***

***रिडक्शन इन डेफ्थ पर रनिंग मीटर हि बाब अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आली नसल्याने झालेले जादा प्रदान रु.47,800, खोदाई न करता 10 चेंबरचे रु.77,800 चे काम करणे,वार्ड 31 च्या कामात अंदाजपत्रकाप्रमाणे पाईपसाठी व 64 नग चेंबरसह खोदाई 199.71 घ.मी. होणे आवश्यक असताना प्रत्यक्ष खोदाई 85.63 घ.मी. केल्याने टाकलेले पाईप अंदाजपत्रकात नमूद खोलीपर्यंत टाकल्याचे तसेच देयकात नमूद लांबीएवढेच टाकल्याची पडताळणी करता न येणे, खोदाई केलेल्या 43.41 घ.मी. साहित्याची जादा वाहतूक दर्शविल्याने रु.5,967 चे जादा प्रदान करणे, वापरलेल्या पाईपचे इन्स्पेक्शन अहवाल नस्ती व देयकासोबत नसताना प्रदान करणे.***

उपरोक्त नमूद दोन कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रामभाऊ म्हाळगी चौक,आम्बिकानगर येथे 200 मिमी.व्यासाचे आर.सी.सी.एन.पी.2 क्लास पाईप टाकणे.वार्ड-17. | वार्ड क्र.31 बॅरेक 1050, 1013, 1028, 1029 येथे 200 मिमी. व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे. |
|---|---|---|
| 1 | प्रशासकीय मंजुरी- अति.आयुक्त दि.11.02.2014 | आयुक्त-तारीख नमूद नाही. |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम रु. 7,76,723 | रु.5,16,708- |
| 3 | तांत्रिक मंजुरी-क्र.189 दि.18.01.2014 | क्र.70 दि.04.07.2011 |
| 4 | निविदा मंजुरी- रु.7,76,723 डी.डी.आर. शिफारस. | रु. 5,16,708 डी.डी.आर. शिफारस |
| 5 | लेख शीर्ष- सी बजेट-सी-2 भाग-2 | सी बजेट-बि-10 भाग-1 |
| 6 | निधी-म.न.पा. | म.न.पा. |
| 7 | ठेकेदार-मे.नालंदा मजूर का.स.संस्था. | मे. वडार मजूर का.स.संस्था. |
| 8 | कार्यादेश-क्र.503 दि.03.03.2014 | क्र.2139 दि.31.12.2011 |
| 9 | कामाची मुदत-45 दिवस. | 45 दिवस. |
| 10 | काम पूर्ण दि.-15.04.2014 | 07.12.2012. |
| 11 | एकूण खर्च- रु.7,63,970(प्र.क्र.3858 दि.17.01.15. | रु.5,65,527(प्र.क्र.271 दि.22.04.13. |
| 12 | मोजमाप पुस्तिका क्र.- 05(पृ.145 ते 151) | क्र.16(पृ.1 ते 6) |

सदर कामांची अंदाजपत्रके,प्रशासकीय मंजुरी नस्ती व प्रमाणके यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.68 दि.22/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या अनुक्रमे सन 2012-13 व 2010-11 च्या जिल्हा दरसूचीत दरानुसार करण्यात आले आहे. तथापि सदरच्या दरसूच्या लेखापरीक्षणात उपलब्ध न झाल्याने अंदाजपत्रकात नमूद दर अचूक असल्याची खात्री करता आली नाही.

2) कामांच्या नोंदी अनुक्रमे मोजमाप पुस्तिका क्र.05 व क्र.16 मध्ये घेतल्याचे देयकात नमूद

करण्यात आले आहे. तथापि सदर मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न झाल्याने केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) वार्ड क्र.17 मधील कामात चौकोनी चेंबर 10 नग व गोलाकार मँनहोल 6 नग तयार करणेचे काम केले आहे. तथापि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जिल्हा दरसूची 2012-13 पृष्ठ-282 बाब-1(अ व ब) व दरसूची 2012-13 बाब-6 नुसार चेंबर व मँनहोल बाबत रिडक्शन इन डेफ्थ पर रनिंग मीटर हि बाब अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आली नाही. वार्ड क्र.31 मधील अंदाजपत्रकात चौकोनी चेंबरबाबत सदर बाब समाविष्ट करणेत आली आहे. वार्ड क्र.17 मधील कामात चौकोनी चेंबर 10 नग व गोलाकार मँनहोल 6 नग तयार करणेचे कामात सदर बाब समाविष्ट न केल्याने चेंबरच्या कामात 10x.60=6 र.मी.दर रु.4,482.32 प्रती र.मी.दराने रु.26,892 ची वजाती मुळ चेंबरच्या कामात झाली नाही. तसेच गोलाकार मँनहोल 6 नग च्या कामात 6x.60=3.6 र.मी. दर रु.5,808 प्रती र.मी.दराने रु.20,908 ची वजाती मूळ गोलाकार मँनहोल च्या कामातून झाली नाही. त्यामुळे सदर जादा प्रदान रक्कम रु.47,800 सबंधीताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

4) वार्ड क्र.17 मधील कामात अंदाजपत्रका प्रमाणेच पाईपसाठी खोदाई व्यतिरिक्त फक्त 6 नग मँन होलसाठी खोदाईचे काम करण्यात आले असून चेंबरसाठी खोदाई केल्याचे दिसून येत नाही. तथापि कामात 10 चेम्बरचे काम करणेत आले आहे. त्यामुळे खोदाईशिवाय चेम्बरचे रु.77,800 किंमतीचे काम करणेत आल्याचे दिसून येते.

5) वार्ड क्र.31 मधील कामात बाब क्र.2 व 3 नुसार एकूण 85.63 घ.मी. खोदाई केली आहे. त्यातील पाईप रिफिलिंग साठी 36.17 घमी. खोदाईतील साहित्य वापरले आहे. उर्वरित 49.46 घ.मी.साहित्याची वाहतूक केल्याचे दर्शविले आहे. वास्तविक 276 र.मी.पाईपचे आकारमान 8.67 घ.मी. वजा जाता व खोदाईत केलेले एम-150 चे 34.74 घ.मी.चे काम वजा जाता 6.05 घ.मी.खोदाई साहित्याची वाहतूक होणे आवश्यक असताना 49.46 घ.मी. साहित्याची वाहतूक दर्शविल्याने जादा 43.41 घ.मी.चे दर रु.137.46 ने रु.5,967 चे जादा प्रदान झाले आहे.त्यामुळे सदर जादा प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

6) वार्ड क्र.31 मधील कामाबाबत केलेल्या कामाचा तपशील पाहता 276 र.मी.पाईप टाकल्याचे दिसते. अंदाजपत्रकाप्रमाणे पाईपसाठी 0.85 रुंदीची व 0.75 मी. उंचीची खोदाई करणेची होती. 64 नग चेम्बर सह सदर खोदाई 199.71 घ.मी. होणे आवश्यक असताना प्रत्यक्ष खोदाई 85.63 घ.मी.केली आहे. त्यामुळे टाकलेले पाईप अंदाजपत्रकात नमूद खोलीपर्यंत टाकल्याचे तसेच देयकात नमूद लांबीएवढेच टाकल्याची पडताळणी करता आली नाही.

7) पाईप पुरविणे,जोडणे व बसविणे या अंदाजपत्रकातील बाबीत पाईपचे इन्स्पेक्शन करणे नमूद आहे. तथापि दोनही कामात वापरलेल्या पाईपचे इन्स्पेक्शन अहवाल नस्ती व देयकासोबत नसताना प्रदान केले आहे. इन्स्पेक्शन अहवाला अभावी कामात वापरलेले पाईप योग्य तांत्रिक दर्जाचे असल्याची खात्री करता आली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.53,767.

आक्षेपाधीन रक्कम रु.13,24,120.

DATBEPM6101 (Ref No : 5, Hmm No : 68)

## *27 उल्हासनगर मनापांतर्गत विविध बुस्टरपंपिंग स्टेशन येथे कंत्राटदारामार्फत अतिरिक्त पंपचालक पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :WS-B-6(XIII) मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 760642.00/-

***नव्याने उभारण्यात आलेल्या 04 बुस्टर पंपींग स्टेशनसाठी दि.18/08/2009 ते 14/09/2011 या कालावधीत अतिरिक्त पंपचालक व मदतनिस पुरवठा करण्याचे वाढीव काम महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 73(ड) नुसार आयुक्तांची प्रशासकीय मान्यता न घेता तसेच जाहिर निविदा न मागविता तत्कालीन कार्यरत कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले आहे. अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यात आल्याबाबत कर्मचाऱ्यांचे उपस्थिती अहवाल हजेरीपत्रके, वाढीव कामाबाबत कंत्राटदाराशी केलेला करारनामा पडताळणीस उपलब्ध नाहीत. त्यामुळे कामाच्या सत्यतेची खात्री करता आली नाही. 2009-10 ते 2011-12 मधील खर्चाचे प्रदान 2013-14 साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यात आले आहे. यास अधिनियमातील कलम 102 नुसार स्थायी समितीची मंजूरी न घेता पुरवठादारास प्रदान करण्यात आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे लेखा परिक्षण करता माहे ऑगस्ट 2009 मध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या 1) मेनका बुस्टर पंपींग स्टेशन, 2) काजल पेट्रोल पंप बुस्टर 3) सपना गार्डन बुस्टर, 04) गांधीनगर बुस्टर पंपींप स्टेशन या 04 बुस्टर पंपींग स्टेशनासाठी दि.18/08/2009 ते 14/09/2011 या कालावधीत अतिरिक्त पंपचालक व मदतनिस पुरवठा करण्याचे काम मे.कल्पतरु इंजिनिअर्स यांचेकडून करुन घेण्यात आल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या टिपणीत नमुद केले आहे. यासाठी 2008 च्या डी.एस.आर प्रमाणे अंदाजपत्रक तयार करून प्रतीपंपचालक रु.277/- प्रती दिन याप्रमाणे 04 पंपचालक पुरवठा करण्यासाठी दि.18/08/2009 ते 14/09/2011 या कालावधीत एकूण 2746 दिवसांसाठी एकूण रु.7,60,642/- एवढा खर्च करण्यात आला असून मे.कल्पतरु इंजिनिअर्स यांना एकूण रकमेपैकी प्रमाणक क्रमांक 5969 दि.29/03/2014 अन्वये रु.6,92,185/- एवढया निव्वळ रक्कमेचे प्रदान करण्यात आले असून यासाठी झालेला खर्च पाणी पुरवठा विभागास ब-पाणी खाते 13-बुस्टर मशीनरी चालवणे खर्च या लेखाशिर्षाखाली वर्ष 2013-14 या वित्तीय वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागविण्यात आला आहे. सदर मुळ खर्चाच्या प्रमाणकाची व सोबतच्या कागदपत्रांची पडताळणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमिततांचा खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.46दि.25/07/2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वर नमूद केलेली बुस्टर पंपींग स्टेशन चालविणेसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्याच्या कामासाठी होणाऱ्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यतेची नस्ती उपलब्ध नसल्याने मा.आयुक्तांच्या मान्यतेने पुरवठादारास कार्यादेश देण्यात आल्याबाबत तसेच महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(ड) नुसार मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आल्याचे आढळून आले नाही.

2) पुरवठादाराने अतिरिक्त पंपचालक पुरवठा केल्याबाबत कामाच्या कालावधीत उपस्थित पंपचालकांचे हजेरीपत्रके, उपस्थिती अहवाल प्रमाणकासोबत उपलब्ध झाले नाहीत. तसेच सदर कामासाठी कंत्राटदाराशी केलेला करारनामा लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सदर कामाच्या सत्यतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

3) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट "ड" प्रकरण 5 मधील कलम 02 नुसार रु.50,000/- किंवा त्यावरील खर्चासाठी जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतू नव्याने उभारण्यात आलेल्या बुस्टर पंपींग स्टेशनसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी जाहिर निविदा न मागविता तत्कालीन कार्यरत कंत्राटदाराकडून सदर काम करुन घेण्यात आले असून त्यासाठी रु.7,60,642/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

4) दि.18/08/2009 ते 14/09/2011 या कालावधीत अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चाचे प्रदान अतिरिक्त आयुक्त यांच्या दि.31/01/2014 रोजीच्या मान्यतेने वर्ष 2013-14 साठी ब-पाणी खाते 13-बुस्टर मशीनरी चालवणे खर्च या लेखाशिर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 102 नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

5) सदर कामासाठी दि.18/08/2009 ते 14/09/2011 या कालावधीत पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांच्या नोदी सदर कामाची मोजमाप नोंदवही क्र.156 व 172 मध्ये नोंदविण्यात आल्याचे लेखा विभागाकडे प्रदानार्थ सादर केलेल्या प्रमाणकावर नमूद करण्यात आले आहे. सदर मोजमाप नोंदवहया लेखा परिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

6) कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांना सदर कालावधीत किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतनाचे प्रदान केल्याबाबतचे अभिलेख प्रमाणकासोबत उपलब्ध झाले नाहीत.

7) देयकाच्या एकूण रु.7,60,642/- या रकमेपैकी कपातीची रकम (सुरक्षा अनामत 5%, आयकर 2%, विमा 1%, कामगार उपकर 1%) रु.68,457/- संबंधीत लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत भरणा चलन प्रमाणकासोबत पडताळणीस उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कपातीच्या रकमा संबंधीत लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे उपरोक्त प्रमाणकांन्वये केलेला खर्च आक्षेपाधीन आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.7,60,642/-

FDSANMM7201 (Ref No : 40, Hmm No : 46)

## *28 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरींवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमिततांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 316771.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 316771.00/-

***उल्हासनगर मनपांतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मधील एकूण 350 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.6,16,055/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर बोअरवेल्सची यादी अंदाजपत्रकासोबत उपलब्ध नाही. 350 बोअरवेलच्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल उपलब्ध नाही. अंदाजपत्रकात स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आलेली नाही. कंत्राटदाराकडून स्क्रॅप मटरियल मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत आढळून आले नाहीत. दुरुस्त केलेल्या बोअरवेलचा दोषदायित्व कालावधी विहीत केलेला नाही. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 72(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.***

उल्हास नगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे दि.01.04.2014 ते दि.31.03.2014 या कालावधीतील देखभाल व दुरुस्तीचे काम मजुर सहकारी संस्थेकडून करुन घेण्यात आले आहे. सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- अतिरिक्त आयुक्त मान्यता दि.13.11.2013
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.6,16,055/-, कार्यकारी अभियंता ता.म.क्र.94 दि.13.11.2013
3. मंजूर निविदा रक्कम-रु.6,16,055/-,जि.म.का.सह.संघ,ठाणेयांची शिफारस क्र.3610दि.27/12/2013
4. लेखाशिर्ष - ब अंदाजपत्रक बी-6 कुपनलिका दुरुस्ती महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे. गीतांजली मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित, उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./1561 दि.02.12.2013 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा- रु.100/-
9. कामाचा कालावधी - 365 दिवस. (1/04/2013 ते 31/03/2014)
10. काम पूर्ण दि----
11. एकूण खर्च रु.3,16,771/- (प्रमाणक.क्र.5365 दि.4.03.2014 प्रथम धावते देयक)
12. मोजमाप पुस्तक क्र.- सी/3/45 पृ.क्र.125-128

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके यांची तपासणी केली असता लेखा परिक्षणास आढळुन आलेल्या अनियमितांबाबत खुलासा करण्यासाठी अर्धसमास पत्र क्र.72 दि.22/08/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता लेखा परिक्षण कालावधीत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेली बोअरवेल याबाबचा तपशील मालमत्ता नोंदवहीतील नोंदीसह पडताळणीस उपलब्ध झाला नाही. त्यामुळे विभागांतर्गत एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेल्या बोअरवेल यांची लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

2) उल्हासनगर मनपांतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मधील एकूण 350 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.6,16,055/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर बोअरवेल्सची यादी अंदाजपत्रकासोबत उपलब्ध नाही. अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या 350 बोअरवेलच्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल पडताळणीस उपलब्ध झाला नसल्याने अंदाजपत्रकात समाविष्ट खर्चाची पडताळणी करता आली नाही.

3) मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद

स्थितीत असलेली बोअरवेल यांचा आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद करुन कंत्राटदारास कामाचे आदेश न देता एकूण 350 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करुन कामाचे आदेश देण्यात आले. त्यामुळे कंत्राटदारास कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे देण्यात आली याची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 72(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. मे.गितांजली मजुर कामगार सह.संस्था मर्या.उल्हासनगर या मजुर कामगार संस्थेस रु.6,16,055/- एवढया अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी रु.100/- एवढया रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करुन कार्यादेश देण्यात आले आहेत. उपरोक्त तरतूदीनुसार सदर बाब स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

5) कामाच्या अंदाजपत्रक बाब-1 लेबर पार्ट व बाब -2 मटेरिअल पार्ट अशा दोन भागात तयार करण्यात आले असून बाब-1 लेबर पार्ट याबाबीसाठी रु.1,63,331/- एवढा खर्च समाविष्ट असून बाब -2 मटेरिअल पार्ट याबाबींतर्गत विविध कामांसाठी रु.4,52,724/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. त्यामुळे कंत्राटदाराने स्क्रॅप मटेरियल मनपाकडे जमा करणे क्रमप्राप्त ठरते. तथापि, अंदाजपत्रकात स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आलेली नाही. कंत्राटदाराकडून स्क्रॅप मटरियल मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत आढळून आले नाहीत.

6) सदर कामासाठी दरवर्षी कंत्राटदार नियुक्त करुन बोअरवेल देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात. कंत्राटदाराशी करारनामा करतांना त्यात बोअरवेल दुरुस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नसल्याने पुन्हा पुन्हा त्याच बोअरवेलच्या दुरुस्तीसाठी खर्च करावा लागल्याची शक्यता नाकारता येत नाही. पहिल्या धावत्या देयकांन्वये कंत्राटदार संस्थेस 175 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी एकूण रु.3,16,771/- एवढया रकमेपैकी प्रमाणक क्र.5365 दि.4/03/2014 अन्वये रु.2,71,630/- एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता कंत्राटदाराने दुरुस्त केलेल्या 175 बोअरवेलची यादी व हिस्ट्रीशिट पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे त्यांची पडताळणी करता आली नाही.

7) सदर कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तक क्र.- सी/3/45 पृ.क्र.125-128 मध्ये नोंदविण्यात आल्या आहेत. सदर मोजमाप पुस्तक पडताळणीस उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे प्रमाणक.क्र.5365 दि.4.03.2014 अन्वये केलेला खर्च रु.3,16,771/- आक्षेपाधीन आहे.

आक्षेपाधीन खर्च रु.3,16,771/-

FDSANMM7201 (Ref No : 41, Hmm No : 72)

## *29 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे 2013-14 कालावधीतील वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 08**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 489685.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 489685.00/-

***उल्हासनगर मनपांतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मधील एकूण 50 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.8,17,940/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या 50 बोअरवेलची यादी, मालमत्ता नोंदवहीतील नोंदी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल, कंत्राटदाराने दुरुस्त केलेल्या 30 बोअरवेलची यादी व बोअरवेलच्या हिस्ट्रीशीट पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. दुरुस्त केलेल्या बोअरवेलचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नाही. तसेच स्क्रॅप मटेरिअलच्या रिबेटची तरतूद करण्यात आली नाही. कामाच्या मोजमाप नोंदवहया उपलब्ध करण्यात आल्या नाहीत. मजुर कामागार सहकारी संस्थेशी करारनामा करुन काम करुन घेण्यात आले आहे. परंतू सदर बाब महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 73(ड) नुसार 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.***

उल्हास नगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे दि.01.04.2014 ते दि.31.03.2014 या कालावधीतील देखभाल व दुरुस्तीचे काम मजुर कामगार सहकारी संस्थेकडून करुन घेण्यात आले आहे. सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- अतिरिक्त आयुक्त मान्यता दि.18.10.2013
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.8,17,940/-, कार्यकारी अभियंता ता.म.क्र.95 दि.14.11.2013
3. मंजूर निविदा रक्कम-रु.8,17,940/-,जि.म.का.सह.संघ,ठाणेयांची शिफारस क्र.3610 दि.27/12/2013
4. लेखाशिर्ष - ब अंदाजपत्रक बी-6 कुपनलिका दुरुस्ती महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे.गीतांजली मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित, उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./26 दि.03.01.2014 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा- रु.100/-
9. कामाचा कालावधी - 365 दिवस. (1/04/2013 ते 31/03/2014)
10. काम पूर्ण दि.-उपलब्ध नाही.
11. एकूण खर्च रु.4,89,685/- (प्रमाणक.क्र.5368 दि.4.03.2014 प्रथम धावते देयक)
12. मोजमाप पुस्तक क्र.- सी/3/45 पृ.क्र.133-138

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके यांची तपासणी केली असता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमितांबाबत खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र.73 दि.22/08/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये अस्तित्वात असलेली एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत असलेले बोअरवेल व बंद पडलेली बोअरवेल याबाबचा तपशील मालमत्ता नोंदवहीतील नोंदीसह पडताळणीसाठी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे विभागांतर्गत एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेल्या बोअरवेल यांची लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

2) उल्हासनगर मनपांतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मधील एकूण 50 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.8,17,940/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या 50 बोअरवेलची यादी, मालमत्ता नोंदवहीतील नोंदी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल पडताळणीस उपलब्ध झाला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात समाविष्ट खर्चाची पडताळणी करता आली नाही.

3) मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद

स्थितीत असलेली बोअरवेल यांचा आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार कंत्राटदारास कामाचे आदेश न देता एकूण 50 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करुन कामाचे आदेश देण्यात आले तसेच कंत्राटदारास दिलेल्या कार्यादेशात कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत. त्याबाबी नमूद करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे कंत्राटदारास कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे देण्यात आली याची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 73(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. मे.गितांजली मजुर कामगार सह.संस्था मर्या.उल्हासनगर या मजुर कामगार संस्थेस रु.8,17,940/- एवढया अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी रु.100/- एवढया मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करुन कार्यादेश देण्यात आले आहेत. अधिनियमातील उपरोक्त तरतूदीनुसार सदर बाब स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

5) पहिल्या धावत्या देयकांन्वये कंत्राटदार संस्थेस 30 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी एकूण रु.4,89,685/- एवढया रकमेपैकी प्रमाणक क्र.5368 दि.4/03/2014 अन्वये रु.4,19,903/- एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता कंत्राटदाराने दुरुस्त केलेल्या 30 बोअरवेलची यादी व बोअरवेलची हिस्ट्रीशीट पडताळणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे कंत्राटदाराने दुरुस्त केलेल्या बोअरवेलची हिस्ट्रीशिटसह लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

6) सदर कामासाठी दरवर्षी कंत्राटदार नियुक्त करुन बोअरवेल देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात परंतू कंत्राटदाराशी करारनामा करतांना त्यात बोअरवेल दुरुस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नसल्याने पुन्हा पुन्हा त्याच बोअरवेलच्या दुरुस्तीसाठी खर्च करावा लागल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) कामाच्या अंदाजपत्रक बाब-1 लेबर पार्ट व बाब-2 मटेरिअल पार्ट अशा दोन भागात तयार करण्यात आले असून बाब-1 लेबर पार्ट याबाबीसाठी रु.57,500/- व बाब-2 मटेरिअल पार्ट याबाबींतर्गत विविध कामांसाठी रु.7,60,032/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. तथापि, अंदाजपत्रकात स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कंत्राटदाराने स्क्रॅप मटेरियल मनपाकडे जमा करणे क्रमप्राप्त ठरते. परंतू कंत्राटदाराकडून स्क्रॅप मटरियल मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत आढळून आले नाहीत.

8) सदर कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तक क्र.- सी/3/45 पृ.क्र.133-138 मध्ये नोंदविण्यात आल्या आहेत. सदर मोजमाप पुस्तक पडताळणीस उपलब्ध करण्यात आली नसल्याने मोजमाप नोंदवहीतील नोंदींची पडताळणी करुन प्रदानाच्या रकमेची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे सदर कामासाठी केलेल्या खर्चाची रक्कम रु.4,89,685/- आक्षेपाधिन आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.4,89,685/-

FDSANMM7201 (Ref No : 42, Hmm No : 73)

## *30 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक योजनांची साध्यता/यशस्वीता पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करूण देणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :07 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 595853000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 599853000.00/-

***पाणी पुरवठा योजनांची साध्यता तपासणीसाठी आवश्यक दस्तऐवजाची अनुपलब्धता. एकाच योजनेवर प्रत्यक्ष सर्व रक्कम खर्ची पडूनही योजना आजतागायत पूर्ण नसलेबाबत.***

राष्ट्रीय लेखा संहीता 2004 मधील नियम क्र. 9.2 नुसार महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी उपयोगासाठी आवश्यक असाणारा पुरेसा पाणीपुरवठा योग्य व वाजवी दरात उपलब्ध करुन देणे तसेच त्यासाठीचे व्यवस्थापन देखभाल व गरजेनुसार नवीन काम हाती घेणे हे महानगरपालिकांना कार्यदेशीररित्या बंधनकारक आहे.

वरील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात 2013-2014 या वर्षात पाणीपरुवठा विषयक कोणत्या योजना राबविण्यात आल्या याबाबत खालील मुददयांच्या आधारे तपशील सादर करण्यात आलेला नाही.

1) एकुण नवीन जलवाहीनीची संख्या, लांबी व व्यास व त्यावरील एकुण खर्च

2) एकुण नवीन व जुने जलकुंभ व त्यावरील एकुण खर्च.

3) टँकर द्वारे पाणीपुरवठ़्या वरील एकुण खर्च.

4) एकुण नळ जोडणींची संख्या.

5) नवीन व जुन्या मीटरची एकुण संख्या.

6) केद्रपुरस्कृत J.N.N.U.R.M.(Water Supply) योजनेअंतर्गत मे. कोणार्क इंन्फ्रास्ट्रक्चर यांना योजना सुरू झाल्या पासून मार्च 2015 आखेर झालेले एकुण प्रदान.

7) महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) यांना देय असलेली एकुण थकीत रक्कम.

उपरोक्त विषयाबाबत अर्धसमास पत्र क्र.30 दिनांक 11/07/2016 नुसार मागणी करण्यात आलेल्या मोजमाप पुस्तिका, पत्रव्यवहार टिप्पण्या उपलब्ध करून न दिल्याने सदर बाबतचे लेखा परीक्षण करता आले नाही. म्हणून सदर उद्देशावर अंदाजपत्रकात नमुद केलेला 2013-2014 मधील 58,45,90,000/- (58.46 कोटी) खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

| अ.क्र. | बाब | खर्च |
|---|---|---|
| 1 | पावर पंप व पा.पु.साहित्य खरेदी व बसविणे (नविन) | 8070000 |
| 2 | पावर पंप व पा.पु.साहित्य खरेदी व बसविणे (दुर्बल घटक) | 2858000 |
| 3 | बुस्टर पंप मशिनरी खरेदी (नविन) | 3237000 |
| 4 | कुपनलीका व जेटपंप बसविणे | 313000 |
| 5 | पाणी पुरवठा व इमारती दुरूस्ती | 785000 |
| 6 | अमृत योजनानवर विकास कार्य | 584590000 |

वरील आकडेवरील निविदा योजनांवर प्रत्यक्ष खर्च झाल्याचे दिसते तथापी अर्धसमास पत्रात विचारणा केल्याप्रमाणे योजनेचे फलीत/ साध्य याबाबतचा खुलासा करण्यात आला नाही. तसेच 2013-2014 मध्ये सर्वाधिक खर्च अमृतयोजना

अंतर्गत विकास कार्य या योजनेवर करण्यात आला तथापी अदयापही सदर योजनेअंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणा कार्यान्वित झालेली नाही म्जणून पाणी पुरवठा योजनेवर 2013-2014 मध्ये खर्च झालेली 599853000 (59.98 कोटी रूपये) रक्कम आक्षेपधीन ठेवण्यात येत आहे.

DATAPJF8101 (Ref No : 77, Hmm No : 30)

## *31 पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमां बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी त्यांच्याकडे जमा होणा-या रकमांबाबतचे लेखा परीक्षण केले असता पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमांबाबत पावती पुस्तकातील पावत्यासबंधी चलने लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. तसेच सन 2013-14 मधील नमूद केलेल्या चलनांची रक्कम कोणत्या बॅकेत जमा केलयाची त्या बॅकेचे विवरणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी त्यांच्याकडे जमा होणा-या रकमांबाबतचे लेखा परीक्षण केले असता पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमांबाबत पावती पुस्तकातील पावत्यासबंधी चलने लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. तसेच सन 2013-14 मधील नमूद केलेल्या चलनांची रक्कम कोणत्या बॅकेत जमा केलयाची त्या बॅकेचे विवरणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. खाली नमुद केलेल्या पावती पुस्तकातील पावत्यासबंधी चलने.

| अ.क्र. | पावती पुस्तक क्रमांक | पावती क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 118 | 5851 ते 5990<br>दि. 22/05/2013 | 1570988/- |
| 2 | 119 | 5930<br>दि. 22/07/2013 | 43875/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | | 5931 ते 5933 | 82732/- |
| 4 | | 5934<br>दि. 2/08/2013 | 92033/- |
| 5 | | 5940 ते 5941<br>दि. 2/08/2013 | 8805/- 1601/- |
| 6 | 122 | 6063<br>दि. 25/07/2013 | 9876/- |
| 7 | 126 | 6287, 6288, 6297<br>दि 30/07/2013 | 5426/- व 14000/-<br>2500/- |
| 8 | 127 | 6314, 6316, 6317<br>दि. 1/08/2013 | 6060/-4962/-<br>6317/- |

1. चलन क्रं. 1869 दि.13/08/2013 ची रक्कम रु.287690/-
2. चलन क्रं. 2258 दि. 28/09/2013ची रक्कम रु 608279/-
3. चलन क्रं. 2333 दि 3/10/2013 ची रक्कम रु. 1422062/-

तसेच सन 2013-14 मधील वर नमूद केलेल्या चलनांची रक्कम कोणत्या बॅंकेत जमा केलयाची व त्या बॅंकेचे विवरणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

DATPPTM5902 (Ref No : 83, Hmm No : 83)

## *32 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2010-11 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा करणे च्या प्रदानातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 09**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3350088.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3201832.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 148256.00/-

***मागील वर्षात दफ्तर पुरवठा करणेस दिलेला कार्यादेश क्र.974/09 दि.18.08.2009 नस्तीसोबत नसल्याने शिक्षण मंडळाने मागिल वर्षीच्या ठेकेदारास दफ्तर पुरवठा करणेस दिलेली मंजुरी व दफ्तरांचे दर मागील वर्षापेक्षा 15% जादा मंजूर केल्याची पडताळणी करता न येणे,पुरवठादाराने इसारा रक्कम व तपासणी फी भरल्याची कागदपत्रे तसेच निविदा अटी/ शर्तीनुसार आवश्यक व्हॅट नोदणी, आयकर भरलेच दाखला, संस्था/दुकान नोंदणी, 5% सुरक्षा अनामत भरणा इ. कागदपत्रे नस्तीसोबत नसणे, निविदा अटी/ शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक असताना असा करारनामा नस्तीसोबत नसल्याने मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम अधिनियम मधील 2006 च्या सुधारणेनुसार शासनास रु.2,600 चा मुद्रांक शुल्काचा महसूल प्राप्त न होणे, साहित्याचे नमुने आवश्यक तांत्रिक दर्जाचे असल्याचे तपासणी अहवाल नस्ती व प्रमाणकासोबत नसणे, शिक्षण मंडळ सभापतीने 10% जादा दर मंजूर केले असताना 15% जादा दराने शिक्षण मंडळाच्या ठरावाशिवाय कार्यादेश दिल्याने 5% जादा दराने रक्कम रु.1,45,656 नियमबाहय जादा खर्च करणे, 2010-11 या वित्तीय वर्षाच्या देयकाच्या प्रदानासाठी आवश्यक रु.33,50,088 रक्कमेची महापालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-14 च्या मंजूर अर्थसंकल्पात तरतूद केल्याची पूर्तता न दर्शविणे,29 शाळेतील सर्व विध्यार्थ्यांना दफ्तरे वाटप झाल्याबाबत शाळाकडील साठ नोंदवह्या व वाटप रजिस्टर उपलब्ध न करणे, कमी आयकर कपातीबाबत पूर्तता न दर्शविणे, देयकातून कपात आयकर रु.33,501 स्टेट बँकेत भरणा केल्याचे चलन उपलब्ध न होणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ शाळेतील 2010-11 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या 11,416 विध्यार्थ्यांना प्रत्येकी एक दफ्तर पुरवठा करणेस शिक्षण मंडळ ठराव क्र.72 दि. 19.06.2010 नुसार मागील वर्षातील पुरवठादार मे.गिरी फँब यांना पत्र क्र.यु.एम.सी.एस.बी./ एज्यू./ 946/10 दि.08.07.2010 नुसार पूर्वप्राथमिक 567 विध्यार्थ्यासाठी दर रु.161 प्रती दफ्तर व पहिली ते सातवी च्या 10,899 विध्यार्थ्यासाठी दर रु.299 प्रती दफ्तर दराने 30 दिवसात पुरवठा करणेचे आदेश देणेत आले आहेत.त्यानुसार सदरची दफ्तरे महापालिकेच्या शाळांना ऑगस्ट 2010 मध्ये प्राप्त झाल्याचे प्रदानाच्या प्रमाणकासोबतच्या शाळावाइस चलनावरून दिसून येते.सदर दफ्तर पुरविणेचे प्रदान मे.गिरी फँब यांना वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये प्र.क्र.एस.बी.36 दि.22.05.2013 रु.32,76,386, प्र.क्र.एस.बी.45 दि.29.05.2013 रु.40,201 व प्र.क्र.एस.बी.66 दि.24.07.2013 रु.33,501 नुसार करणेत आले आहे. यासाठी एकूण रु.33,50,088 खर्च करणेत आला आहे.याबाबत विभागाने लेखापरीक्षणात उपलब्ध करून दिलेली नस्ती व खर्च प्रमाणके यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.115 दि.18.10.2016 निर्गमित करण्यात आले होते.तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) शिक्षण मंडळाने 2010-11 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा करणेस दिलेल्या कार्यादेशानुसार मंडळाचा ठराव क्र.72 दि.19.06.2010 तसेच ठेकेदारास मागील वर्षात दफ्तर पुरवठा करणेस दिलेला कार्यादेश क्र.974/09 दि.18.08.2009 नस्तीसोबत नसल्याने शिक्षण मंडळाने मागिल वर्षीच्या ठेकेदारास दफ्तर पुरवठा करणेस दिलेली मंजुरी व दफ्तरांचे दर मागील वर्षापेक्षा 15% जादा मंजूर

केल्याची पडताळणी करता आली नाही.

2) विभागाने लेखापरीक्षणात सादर केलेल्या नस्तीतील टिप्पणीत दफ्तर खरेदी अंदाजित खर्च रु.35 लाख, इसारा रक्कम रु.35,000 नमुने तपासणी फी रु.10,000 असल्याचे नमूद करून मे.गिरी फँब यांनी आवश्यक कागदपत्रे दि.08.07.2010 ते दि.14.07.2010 या कालावधीत सादर करणेचे व इसारा रक्कम रोख किवा धनाकर्ष स्वरुपात दि.14.07.2010 पूर्वी करणेचे नमूद केले करून त्याखाली प्रशासन अधिकारी व सभापती यांच्या सह्या आहेत. त्यासोबत निविदा फॉर्म, अटी/शर्ती,जोडपत्र “अ” नस्तीत जोडलेले आहे. तथापि याबाबत पुरवठादाराने इसारा रक्कम व तपासणी फी भरल्याची कागदपत्रे तसेच निविदा अटी/शर्तीनुसार आवश्यक व्हॅट नोदणी,आयकर भरलेच दाखला, संस्था/दुकान नोंदणी,5% सुरक्षा अनामत भरणा इ. कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

3)निविदा अटी/शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक असताना असा करारनामा नस्तीसोबत नसल्याने मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम अधिनियम मधील 2006 च्या सुधारणेनुसार शासनास रु.2,600 चा मुद्रांक शुल्काचा महसूल प्राप्त न झाल्याने सदर रक्कमेची सबंधीताकडून व्याजासह वसुली करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) निविदा अटी/शर्तीनुसार व कार्यादेशानुसार साहित्याचे नमुने आवश्यक तांत्रिक दर्जाचे असल्याचे तपासणी अहवाल नस्ती व प्रमाणकासोबत नाहीत. त्यामुळे प्राप्त साहित्य आवश्यक तांत्रिक दर्जाचे असल्याची पडताळणी करता आली नाही.

5) मे.गिरी फँब यांनी यांनी मंडळास दिलेल्या दि.19.06.2010 च्या पत्रानुसार मागील वर्षीच्या दरात 40% वाढ करणेची विनंती केल्याचे नस्तीसोबतच्या त्यांचे पत्रावरून दिसून येते. त्यावर दि.19.06.2010 रोजी अध्यक्ष शिक्षणमंडळ यांनी मान्य केलेल्या टिप्पणीनुसार 10% वाढीव दर देणेस मान्यता दिली आहे. तथापि मे. गिरी फँब यांना दिलेल्या कार्यादेशात मागील वर्षीच्या 15% वाढीव दराने दफ्तर पुरविणेचे नमूद केले आहे. याबाबत 15% जादा दर मान्य केले बाबत शिक्षण मंडळ ठराव तपासणीस उपलब्ध करून देणेचे सूचित करण्यात आले होते, तथापि सदर ठराव तपासणीस उपलब्ध न केल्याने 5% जादा दराची रक्कम रु.1,45,656 सबंधिताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

6) शैक्षणिक वर्ष 2010-11 मधील दफ्तर पुरवठा केल्याचे देयकाचे प्रदान वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये करणेत आले आहे. याबाबत सदर पुरवठ्याचे देयकाचे प्रदान यापूर्वी वित्तीय वर्ष 2010-11, 2011-12 व 2012-13 मध्ये केले नसल्याची पडताळणी आवश्यक अभिलेख्या अभावी करता आली नाही.तसेच यापूर्वी सदर देयकाचे प्रदान का करणेत आले नाही याबाबत खुलासा झाला नाही. मागील वित्तीय वर्षाच्या देयकाच्या प्रदानासाठी आवश्यक रु.33,50,088 रक्कमेची महापालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-14 च्या मंजूर अर्थसंकल्पात तरतूद केल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

7) प्रमाणकासोबत 11,446 दफ्तरे पुरविलेबाबत पुरवठदाराचे बील क्र.53 दि.19.08.2010 व 29 शाळेकडील दफ्तरे प्राप्त झालेबाबत 30 चलने (क्र.290 ते 319 दि.03.08.2010 ते 16.08.2010 या कालावधीतील) जोडली आहेत. तथापि याबाबत सदर 29 शाळेतील सर्व विध्यार्थ्यांना दफ्तरे वाटप झाल्याची पडताळणी अशा शाळाकडील साठ नोंदवह्या व वाटप रजिस्टर उपलब्ध न झाल्याने करता आली नाही.

8) सदर दफ्तर पुरवठ्याबाबत च्या देयकातून प्रथम 2.2% आयकर कपात करण्यात आला होता. तथापि त्यातील 1.2% आयकर रु.40,201 पुरवठादारास प्र.क्र.एस.बी.45 दि.29.05.2013 नुसार परत करण्यात आला आहे. याबाबत मागील वर्षीच्या त्यांचे देयकातून 2.2% आयकर कपात करण्यात आला

आहे. याबाबत कमी आयकर कपाती बाबत खुलासा करून पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.
9) प्र.क्र.एस.बी.66 दि.24.07.2013 रु.33,501 नुसार देयकातून कपात आयकर स्टेट बँकेत भरणा केला आहे.तथापि याबाबत भरणा चलन नस्तीसोबत आढळून येत नाही.
उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.1,48,256 वसूलपात्र व रक्कम रु.32,01,832 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.1,48,256.
आक्षेपाधीन रक्कम रु.32,01,832.

DATBEPM6101 (Ref No : 7, Hmm No : 115)

## *33 शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 2013-14 मध्ये खाजगी शाळांना व स्वयंसेवी संस्थाना आहार खर्चासाठी अनुदान वाटपातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 15086058.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 15086058.00/-

***खाजगी शाळांतील विद्‌यार्थ्यांसाठी शा.पो.आ. योजनेंतर्गत आहार खर्चाच्या रकमा संबधित स्वयंसेवी संस्थांना अदा करणे आवश्यक आहे. परंतू उमपा शिक्षण विभागाने शासन आदेशात तरतूद नसतांना खाजगी शाळांच्या नावे आहार खर्च प्रदान केला आहे. शासन आदेशानुसार विहीत निकषानुसार विद्‌यार्थ्यांना आहार पुरविण्यात आल्याबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून अशा स्वरुपाचे प्रमाणपत्र प्राप्त न करता शिक्षण विभागाकडून आहार खर्चाचे प्रदान करण्यात आले आहे. शिक्षण विभागाकडून प्रदान करण्यात आलेल्या आहार खर्चाच्या रकमा संबधीत शाळांना प्राप्त झाल्याबाबतची पोहोच प्राप्त करण्यात आलेली नाही.***

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 1ली ते 5वी या प्राथमिक वर्गातील विद्‌यार्थ्यांसाठी 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ.6 ते 8वी या उच्च प्राथमिक वर्गातील विद्‌यार्थ्यांसाठी 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रति विद्‌यार्थी प्राथमिक वर्गासाठी 100 ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी 150 ग्रॅम तांदुळ पुरविण्यात येतो. या तांदुळापासुन शा.पो.आ. तयार करण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत केलेल्या दराने आहार खर्च (Cooking Cost) प्रदान करण्यासाठी महापालिका क्षेत्रासाठी शासनाकडून शिक्षण मंडळास अनुदान वितरीत करण्यात येते.

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाकडून शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विविध खाजगी शाळांना तसेच महापालिका शाळांमध्ये कार्यरत स्वयंसेवी संस्थांना आहार खर्चाचे प्रदानासाठी वर्ष 2013-14मध्ये रोखवहीतील नोंदीनुसार माहे जुन-2013 ते मार्च-2014 या कालावधीत रु.1,50,86,058/- एवढा खर्च करण्यात आला आहे. सदर खर्चाच्या प्रमाणकांची तपासणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमितांबाबत खुलासा

करण्यास विभागास अर्धसमास पत्र क्र.141 दि.11/11/2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.शापोआ2010/प्र.क्र.18/प्राशि.4 दि.02.02.2011 नुसार शालेय पोषण आहार योजनेतंर्गत आहार शिजवून शाळेमध्ये शिजविलेल्या अन्नाचे वाटप करण्यासाठी नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थांकडून “Expression of Interest” मागवून त्याव्दारे संस्था निवड करुन कैंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहार पुरविणे आवश्यक आहे. परंतू वर्ष 2013-14 मध्ये स्वयंसेवी संस्थां / बचतगट यांना प्रदान केलेल्या आहार खर्चाच्या प्रमाणकांची पडताळणी करता स्वयंसेवी संस्थांच्या निवड प्रक्रीयेचा तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सदर स्वयंसेवी संस्था / बचतगट यांची निवड प्रक्रीयेची पडताळणी तसेच अशा संस्थांना कोणत्या शाळांमध्ये तयार अन्न पुरवठा करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे, सदर शाळांमधील लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे मनपाच्या शाळांमध्ये तयार अन्न पुरवठा करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना शिक्षण मंडळाकडून प्रदान करण्यात आलेल्या आहार खर्चाच्या रक्कमा योग्य असल्याची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

2) नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थांकडून “Expression of Interest” मागवून त्याव्दारे संस्था निवड करुन कैंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहार पुरविणे आवश्यक आहे. त्यानुसार खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी शा.पो.आ.योजनेंतर्गत आहार खर्चाच्या रकमा संबधित स्वयंसेवी संस्थांना अदा करणे आवश्यक आहे. परंतू उमपा शिक्षण विभागाने खाजगी शाळांच्या नावे आहार खर्चाच्या रकमा वितरीत केल्या आहेत. याबाब शासन आदेशात तरतूद नसतांना आहार खर्च प्रदान करण्यात आला आहे.

3) उपरोक्त दि.02.02.2011 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.6 नुसार संबंधित मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याच्या आहारामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश केला असल्याचे तसेच आहार चविष्ट असल्याची खात्री करुन आहार शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे संबंधीत यंत्रणेस खर्च अदा करण्याची कार्यवाही करावी. असे आदेश आहेत. परंतू स्वयंसेवी संस्था / बचत गटांना तसेच खाजगी शाळांना आहार खर्चाच्या प्रदानाच्या प्रमाणकांची तपासणी करता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून अशा स्वरुपाचे प्रमाणपत्र प्राप्त न करता शिक्षण विभागाकडून आहार खर्चाचे प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे संबधित संस्थांनी विद्यार्थ्यांना पुरविलेला आहार शासन आदेशातील विहीत निकषानुसार असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

4) शिक्षण विभागाकडून खाजगी शाळांना आहार खर्चाच्या रकमा संबंधीत शाळेच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्या आहेत. परंतू अशा वितरीत केलेल्या रक्कमा संबधित शाळेस प्राप्त झाल्याबाबत शाळांकडून पोहोच प्राप्त करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वर्ग केलेल्या रकमा संबधीत शाळेस प्राप्त झाल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे सदर खर्चाची रक्कम रु.1,50,86,058/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.1,50,86,058/-

FDSANMM7201 (Ref No : 43, Hmm No : 141)

## *34 उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ई-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART संकल्प या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1957557.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1957557.00/-

***पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपमधून नागरीकांना कंत्राटदाराने नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी संगणक आज्ञावलीव्दारे सेवा दिलेबाबत उल्हासनगर महानगरपालिका नागरी सेवा सुविधा केंद्र व नगर रचना विभाग यांनी सेवानिहाय संगणकीय प्रणालीचा डाटा ठेवला नसल्याने ई- गर्व्हन्सच्या अटी व शर्तीनुसार काम झाल्याचे लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होउन प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने महापालिका कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करुन शासनास अपेक्षित असलेली SMART (Simple, Moral, Accountable, Responsive & Transparent) या संकल्पनेची अंमलबजावणी करणेबाबतचा प्रस्ताव महासभा ठराव क्र. 50 दि. 31/10/2007 अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. त्याअनुषांगने नागरिकांना महापालिकेतर्फे पुरविल्या जाणा-या विविध सेवा पुरविणेसाठी नगररचना विभागा मार्फत बांधकाम परवानगीचे वितरण संगणक आज्ञावलीव्दारे तात्काळ पडताळणीसाठी पब्लिक पार्टनरशिपव्दारे दहा वर्ष कालावधी साठी प्रकल्प राबविणेबाबत निविदा मागवून न्युनतम दरपत्रधारक मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांचेकडून कार्यदेश क्र. Umc/cfc/320/08 दि. 01/12/2008 व्दारे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप नागरीकांना सेवा उपलब्ज्ञ करुन देणेसाठी मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांना दि.01/12/2008 रोजी “Auto CAD Based Software System मार्फत प्राप्त होणारे बांधकाम परवानगी प्रकरणांची आवक झाल्यानंतर सदर प्रकरणे विकास नियंत्रन नियमावलीनुसार आहे किंवा नाही यांची छाणनी करणेकामी दर निश्चित करारनाम्यानुसार काम देण्यात आलेले आहे.

1) Scrutinizing Residential Area Rs.36.80 per sq. Mtr.

2) Scrutinizing commercial Area Rs. 55.20 per Sq. Mtr.

सदरील बाबीनुसार पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपव्दारे न्यूनतम दरपत्रधारक मे. आदित्य कॉम्प्युटर्स हे महानगरपालिकेला नागरी सेवा सुविधाव्दारे सेवा देत आहेत, त्युनसार मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांची मुळ निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच न्युनतम निविदाकार मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांचेशी सदरील निविदेविषयी मनपाने केलेल्या करारनामाच्या अटी व शर्ती लेखा परीक्षणास पहावयास मिळालेले नाही.

मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांनी प्रती माहेव्दारे नगररचना विभगाला Scrutinizing Residential Area व Scrutinizing commercial Area या कामाची देयके सादर करुन कामाचे देयके वेळोवेळी प्राप्त करुन घेतलेले आहे. सन 2013-14 मधील लेखा परीक्षण आवाक्यामधील निवडक महिना प्रमाणके व सर्वसाधारण प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता, देयक निहाय प्रमाणकाला नगररचना विभागाने कंत्राटदाराने सेवा पुरविलेबाबतचे महिना निहाय व संगणकीय प्रणालीचा दैनंदिन कामकाजाचे ठेकेदाराने काम केलेबाबतचे मुळ डाटा लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेला नाही, तसेच नगर रचना विभागाचेही महिनानिहाय

Scrutinizing Residential Area व Scrutinizing commercial Area यांची नोंद वही व तसे त्या बाबतची कोणतीही नोंदी प्राप्त झाली नाही.
त्यामुळे लेखा विभागातून मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांना अदा केलेली रक्कम खालीलप्रमाणे आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

| अ.क्र. | देयक तपशिल | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 1) Scrutinizing Residential Area 2) Scrutinizing commercial Area | 582 | 18/05/2013 | 5,52,883/- |
| 2 | 1) Scrutinizing Residential Area 2) Scrutinizing commercial Area | 4335 | 10/01/2014 | 14,04,674/- |
| | एकुण | | | 19,57,557/- |

उपरोक्त नमुद केलेल्या प्रमाणकांची अक्षेपाधीन रक्कम 2013-14 मध्ये एकुण रक्कम रू. 19,57,557/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
याबबतचा अर्धसमास ज्ञापन क्र. 42 दि. 22/07/2016 खुलासा मागविण्यात आला असता नागरी सुविधा केंद्र विभागाने दिनांक 09/08/2016 खुलाश्यामध्ये सदरील कामाची देयके नगर रचना विभागाकडून लेखा विभागात पारीत करणेसाठी सादर केली जातात असे म्हटले आहे. तरी सदरील बाबतीतील नगररचना विभागाने कोणताही आक्षेपाचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे आक्षेपाधीन एकुण रक्कम रू. 19,57,557/-

DATRYJM7501 (Ref No : 11, Hmm No : 42)

## *35 समाज मंदिर बांधणे कामात अनियमितत झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4186221.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3580379.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 605842.00/-

***पुष्पांजली अपार्टमेंटजवळ प्रभाग क्र. 4 व शिवसेना भवन उल्हासनगर येथे समाज मंदिर बांधणेचे काम प्राकलन रक्कमेपेक्षा जास्ती केले आहे स्थानिक संस्थाकर रक्कम, गौण खनिज (स्वामित्वधन) (रॉयल्टी) व प्राकलन पेक्षा जास्त खर्च केलेली रक्कम वसुलपात्र आहे. तसेच कामाची सुरक्षा अनामत रक्कम FDR नुतनीकरण केलेली नाही.***

2013-14 मधील बांधकाम विभाग अंतर्गत लेखा शिर्ष मनपा इमारत दुरूस्ती व निगा इतर या लेखा शिर्ष खालील प्रमाणके खर्च करून मनपाने वेगवेगळया प्रकारची कामे ठेकेदाराकडून संस्था यांचेकडून करुन घेतलेली आहे. सर्वसाधारण आवक्यामधील प्रमाणकांचे लेखापरीक्षण केले असता, कामाची रक्कम रू. 35,80,379/- आहे ती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | प्रमाणक क्र. | दिनांक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | समाज मंदिर बांधणे पुष्पाजली अॅपार्टमेंट जवळ प्रभाग क्र. 4 उल्हासनगर | मे. ए.एम रामचंदानी | 1743 | 31/07/2013 | 17,73,204/- |
| 2 | समाज मंदिर बांधणे शिवसेना भवन जवळ | मे. ए. एम. रामचंदानी | 3735 | 05/12/2013 | 1807175/- |
| | | | | एकुण | 35,80,379/- |

1) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - 1949 मधील प्रकरण क्र. 73(ड) नुसार 25 लाख पेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्गत असलेल्या अशा आयुक्तांने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्यांने अशी संविदा केलेल्या तारखेपासून 15 दिवसाचा आत स्थायी समितीस कळविले पाहिजे असे असतांना या नियमानुसार कार्यवाही झाली असले बाबत अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

2) महसूल व वनविभाग यांची अधिसूचना 10/02/2003 व शा.नि.क्र. गौण खनिज 10/1009 सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी, मुरूम, माती इत्यादी गौण खानिजाचे स्वामित्वधन (रॉयल्टी) ची रक्कम घ.मी.रू.70.67 प्रमाणे शासन खाती भरणे बंधनकारक आहे, याची खातरजमा मनपा कडून करण्यात आलेली नाही गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून शासनखाती भरणा न केल्याने रू. 70.67 प्रती घ.मी. प्रमाणे प्रमाणक क्र. व प्रमाणक क्र. 1743 दि. 31/07/2013 133.66 घ.मी करीता रू. 9446/- व प्रमाणक क्र. 3735 दि. 05/12/2013 76.79 घ.मी करीता रू. 5427 अशी दोन्ही प्रमाणकांची एकत्रित रक्कम रू. 14,873/- न भरल्याने शासनास महसूल जमा झाला नाही तसेच ठेकेदाराने स्वमित्वधनाची रक्कम शासनाकडे भरणा केलेबाबतची पावती प्रमाणकासोबत जोडलेली नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास स्वामित्वधन रक्कम भरलेबाबतची खात्री करता आलेली नाही.

3) स्थानिक संस्थाकर नियम-2010 नियम 27(5) मधील महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेतलेल्या कंत्राटदाराने प्रदान करावयाची ठोक रक्कम महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही काम हाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्थाकर प्रदान करण्याचा किंवा त्यांच्या कंत्राट मुल्यांच्या एकुण संस्था कर प्रदान कराव्याचा किंवा त्यांच्या कंत्राट मुल्यांच्या एकुण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने LBT प्रदान करण्याचा पर्याय आहे. दोन्ही प्रमाणकांची एकत्रित रक्कम रू. 34,35,804/- चे 0.25% रक्कम रू.

8,590/- वसुल पात्र आहे.

4) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परि. क्र. 24 मधील नियम क्र. 8 (एच) नुसार झालेल्या कामाची 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेत नोंद केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदरील प्रमाणकासोबत जोडलेले मोजमाप पुस्तके यांच्यात कंत्राटदाराने कार्यादेश प्रमाणे कामाच्या वर्गानुसार काम केले आहे, तसे नमूद केलेले नाही व तसे तारखेनिहाय मोजमाप केलेबाबत अभियंताने वेगवेगळया Estimated कामाच्या तारखा लिहून काम तपासणीची स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे काम कालमर्यादित असतांना कंत्राटदाराने काम केव्हा केव्हा, केलेले आहे, त्याबाबत लेखा परीक्षणास मोजमाप पुस्तिकेची खात्री करता आलेली नाही. नस्ती सोबत कामा आगोदर कामाचे फोटो काढलेले नाही व त्यावर संबंधित अभियंता यांची तारीखनिहाय स्वाक्षरीही केलेली नाहीत. सदरील कामे पूर्ण झाल्यानंतर कामाचे फोटो काढलेले नाहीत, त्यामुळे काम समाधानकारक पूर्ण झाले किंवा कसे असे प्रत्येक्षात लेखा परिक्षणास खात्री झालेली नाही. कामाचे स्विकृतीपत्र दाखविण्यात आलेले नाही कंत्राटदाराचा मनपाबरोबर केलेला करारनामा लेखा परिक्षणास दाखविण्यात आलेला नाही तसेच कामाची मुळ निविदा नस्ती लेखापरीक्षणात लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेली नाही त्यामुळे सदरील कामे प्रचलित निविदा प्रक्रिया करून केली किंवा कसे याची लेखा परीक्षणास खात्री करता आलेला नाही.

5) प्रमाणक क्र. 1743 दि. 31/07/2013 कामासाठी झालेला खर्च रू. 17,73,204/- एवढा झाला असून सदरील ठेकेदारासाठी रक्कम रू. 14,99,000/- कामासाठीची प्रत्यक्ष कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे परंतू सदरील कामाचा प्राकलन रक्कमेपेक्षा रक्कम रू. 2,74,204/- एवढया जास्त रक्कमेचे काम ठेकेदाराकडून करून घेतले आहे. तसेच सदरील कामात वाढीव काम खर्च करणेसाठी सुधारीत वाढीव खर्चास प्रशाकिय मान्यता घेतले बाबतचे दस्तऐवज लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाहीत. तसेच प्रमाणक क्र.3935 दि. 05/12/2013 रक्कम रू. 18,07,175/- प्रत्यक्ष झालेला खर्च एवढा असून सदरील कामासाठी ठेकेदारास रक्कम रू. 14,99,000/- कामासाठीचा प्रत्यक्ष कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे परंतू सदरील कामाच्या प्राकलन रक्कमेपेक्षा रक्कम रू. 3,08,175/- एवढया जास्त रक्कमेचे काम ठेकेदाराकडून करून घेतले आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम क्र. 313 नूसार जेव्हा मंजूर अंदाजपत्रकात पूर्वीचे दर अपुरे असल्याचे आढळून आल्याकारणाने किंवा पूर्ववर्ती परिच्छेदात नमूद केलेल्या कारणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणाने 5% हून अधिक वाढ होण्याची शक्यता असते तेव्हा सुधारीत अंदाजपत्रक तौलनिक विवरणपत्र आणि त्या तारखेपर्यंतची प्रगती दर्शविणारा व सुधारणेचे कारण सविस्तरपणे विशद करण्याच्या अहवालही सादर करणे आवश्यक आहे सदर मुळ प्राकलनानुसार अंदाजपत्रकीय रक्कम पेक्षा जास्त खर्च झाली आहे.

6) प्रमाणक क्र. 173 च्या रक्कम रू.14,99,000/- च्या 5% सुरक्षा अनामत रक्क्म रू. 52,465/- रू. ची ठेवीची मुदत दि. 18/08/2011 रोजी संपुष्टात आली. तथापि सदरचे काम दि. 10/06/2013 पर्यंत सुरू होते. परंतु सुरक्षा अनामत रक्कमेचे ठेवीचे नुतनीकरण करण्यात आले नाही तरी सदर रकमेपैकी 30,000/- रक्कम FDR NO. 0461000P00002328 PUNJAB NATIONAL BANK, ULHANSAGAR, यांचेकडून काढून घेतलेली आहे सरुक्षा अनामत रक्कम ठेवीचे वेळोवेळी नुतनीकरण केलेबाबत व काम पूर्ण होईपर्यंत व दोष दायित्व कालावधी संपेपर्यंत ती बॅकेकडे ठेवलेबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास सादर न केल्याने याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

सदरील कामाबाबतच्या प्रमाणकांची एकत्रित रक्कम रू 35,80,379/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. (स्वामित्वधन रक्कम रू. 14,873/- स्थानिक संस्था कर रक्कम रू. 8,590/- व कामाच्या प्राकलन

रक्कमेपेक्षा जास्त खर्च केलेली रक्कम रू. 5,82,379/-) यांची एकत्रित रू. 6,05,842/- ही वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 112 दि. 15/10/2016 नुसार विभागास विचारणा केली असता विभागाने लेखा परीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत कोणतेही अर्धसमासाचे उत्तर दिलेले नाही.

DATRYJM7501 (Ref No : 13, Hmm No : 112)

## *36 राजीव आवास योजने अंतर्गत झोपडयांचे सर्वेक्षण करणेच्या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 केंद्र राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2371725.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2075114.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 296611.00/-

***राजीव आवास योजनेअंतर्गतची मुळ निविदा नस्ती लेखापरीक्षणासाठी दाखविण्यात आलेली नाही. मुळ करारनामाकरणेसाठी नियमानुसार स्टॅम्प ड्युटी भरून दस्ताऐवज दाखविण्यात आलेले नाही. पायलट डिपीआर केंद्रशासनाकडे पाठविणेबाबत त्याअनुंषगाचे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध केले नाहीत, तसेच नियमानुसार सेवाकर वसुल केलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील घोषित व अघोषित झोपडपटटयां मध्ये राहणा-या नागरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा बीएसयुपी योजनेअंतर्गत घरबांधणी कार्यक्रमाची अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयाप्रमाणे रहिवाशी क्षेत्रातील 36 झोपडपटटयांचे सर्वेक्षण करणकामी व सदर झोपडपटयांचे सर्वेक्षण करूण सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी दि. 25/08/2008 नुसार मे. सुभाष पाटील स्थापत्य सल्लागार यांची कार्यादेश देउन नियुक्ती करणेत आली होती.
तदनंतर एक वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी केवळ 07 झोपडपटटयांचे सर्वेक्षण करून स्थानिक रहिवाशांची अनुकुलता नसल्याचे कारण दर्शवून, राहूलनगर, वाल्मिकी वसाहत या दोनच झोपडपट्टयांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केले होते. त्यांच्या कामाची गती अत्यंत संथ व कार्यक्षमता अपूरी पडत असल्याने योजनेच्या अंमलबजावणीस विलंब झाल्यामुळे शासनाच्या या योजनेचे, अमलबजावणीचे धोरण अन्य स्थापत्य सल्लागारांची नियुक्ती करणे आवश्यक होते. असे विभागाच्या टिप्पणीत नमूद केले आहे.
त्याअनुषंगाने प्रस्ताव तयार करून मा. स्थायी समिती ठराव क्र. 145 दि. 27/02/2009 अन्वये मे. विसतार अर्किटेक्ट ॲण्ड प्लॅनर्स या स्थापत्य सल्लागाराची कार्यारंभ आदेश देउन दि. 02/03/2009 अन्वये नेमणूक करण्यात आली होती. मे. विस्तार आर्किटेक्ट ॲण्ड प्लॅनर्स यांनी बीएसयुपी योजनेअंतर्गत राजीव गांधी नगर व बाळकृष्णनगर, कौशल्यनगर, दत्तवाडी व मिनाताई ठाकरेनगर, इत्यादी झोपडपट्टींचे सर्व्हेक्षण करून

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून म्हाडाकडे मान्यते साठी सादर केला होता.
त्यानंतर केंद्र शासनाची राजीव आवास योजने अंतर्गत (झोपडपटटीमुक्त शहर) उल्हासनगर महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला. शासनाने शहराचे GIS/MIS तयार करून पायलट डिपीआर सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.
त्यानुसार निविदा कार्यवाही करूनही निविदा प्रक्रियेस मुदतवाढ देउनही प्रतिसाद मिळाला नाही असे टिप्पणीत उल्लेख केला आहे.
मे. विस्तार कन्सलटंट यांनी बीएसयुपी योजनेअंतर्गत केलेल्या करारनाम्यानुसार राजीव आवास योजनेचा पायलट डिपीआर तयार करणेसाठी GIS/MIS प्रणाली वापरून सॅटेलाईट इमेज वर सर्व्हेक्षणाचा डेटा सुपरइंपोज लिंक करणेकामी मे.विस्तार कन्सलटंट यांची दि. 22/11/2011 च्या आदेशान्वये नियुक्ती केली आहे.
तरी 2013-14 मधील राजीव आवास या योजनेअंतर्गत प्रमाणक.क्र. 3159 दि. 07/11/2013 रक्कम रू. 12,04,557/- व प्र.क्र. 2430 दि. 08/10/2014 रक्कम रू. 8,70,557/- या प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता, लेखा परीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.
1) राजीव आवास योजनेअंतर्गत मिनाताई ठाकरे नगर झोपडपटटी पायलट डिपीआर तयार करणेसाठी स्थापत्य सल्लागार नेमणूकीसाठी मनपाने प्रचलित निविदा प्रक्रिया केलेबाबत तशी मुळ निविदा नस्ती लेखा परीक्षणासाठी दिलेली नाही. त्यामुळे निविदाबाबत लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण-5 नुसार संविदा करणे, नियम -1 संविदा करण्याची पध्दत व नियम - 2 विवक्षित संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे या नियमाचा अवलंब करण्यात आलेला नाही.
2) मीनाताई ठाकरे नगर या प्रकल्पाची एकूण किंमत रू. 50.51 कोटी इतकी आहे. यांचे बांधकाम विभागने तयार केलेले Estimate लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. तसेच सदर प्रकल्पाच्या म्हणजे 2.50% प्रमाणे1.26 कोटी एवढी फी. मे. विस्तार कन्सल्टंन यांची एकूण होत आहे. तरी सदरील फीच्या रक्कमेवर मनपाने रक्कम रू. 1.26 कोटी रक्कमेबाबत मे. विस्तार कन्सल्टंन यांचेबरोबर सुधारीत करारनामा केलेला नाही, तसे प्रमाणकासोबत जोडलेले नाही तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुंद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र. 12/कलम/34/133/09 दि. 20/07/2009 नुसार स्टॅम्प डयुटी फी शासनास रू. 10 लाखपर्यंत रू. 100/- 10 लाख रूपयांच्या पुढे प्रति लाख रू. 100/- प्रमाणे स्टॅम्प डयुटी मनपाने मे. विस्तार कन्सल्टंन यांचेकडून करारनामा करून घेतलेला नसल्याने शासनाची स्टॅम्पडयुटी एकुण रक्कम रू. 11,600/- शासनाकडे जमा झालेली नाही, त्यामुळे कंत्राटदाराकडून सदरील रक्कम वसुलपात्र करणे आवश्यक आहे.
3) प्रमाणक क्र. 3159 दि. 07/11/2013 रक्कम रू. 12,04,557/- या रक्कमेवर नियमा प्रमाणे 5% सुरक्षा अनामत रक्कम रू. 60,228/- त्या देयकातून कपात केलेली नाही तसेच निविदा प्रक्रिया झाल्यावर मान्य निविदाकार यांची सुरक्षा अनामत रक्कम भरले बाबतचे कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास दाखविण्यातही आलेले नाही, त्यामुळे सुरक्षा अनामत रक्कमे विषयी लेखा परीक्षणास खात्री झाली नसल्याने वसुलपात्र रक्कम रू. 60,228/-
4) प्रकल्पाचा 55% व 100% GIS/MIS तयार करून, पायलट डिपीआर केंद्रशासनाकडे पाठविल्याबाबतची कोणतीही कागपत्रे व त्या विषयी दस्ताऐवज लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे किती झोपडयांचे सर्वेक्षण झाले याबाबत लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही.
5) वित्तीय अधिनियम 1994 65B(105) नुसार सेवाकर नियमानुसार देयकातून ठेकेदाराने घेतलेला आहे,

त्यामुळे नियमाप्रमाणे केंद्रशासनाला सर्व्हिस् टॅक्स भरण केली किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही उपरोक्त आक्षेपित मुद्दयांबाबत विभागाला अर्धसमास क्र. 149 दि. 29/11/2016 रोजी कळविले असता विभागाचे अनुपाल प्राप्त न झाल्याने आक्षेपाधिन रक्कम रू. 20,75,114/- व वसुलपात्र रक्कम रू.2,96,611/- (स्टॅम्प डयुटी रक्कम रू. 11600+ सरुक्षा अनामत रू. 60228+ सर्व्हिटॅक्स रू. 2,24,783/-

DATRYJM7501 (Ref No : 15, Hmm No : 149)

## *37 नगररचना विभागाने बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी/शुल्क आकारणी केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1030000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1030000.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. 91 दि: 10/03/2010 अन्वये बांधकाम लाईन आउट व जोता चेकींग शुल्क चौ.मी प्रमाणे वसुल केले नाही तसेच बांधकाम प्रारंभ प्रमाण पत्र मधील अट क्र. 7 नुसार विभागाकडील जोता तपासणी अहवाल लेखा परिक्षणास उपलब्ध केला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना कार्यालयाचे 2013-14 मधील बांधकाम परवानगी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता, उल्हासनगर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. 91 दि. 10/03/2010 अन्वये बांधकाम लाईन आउट व जोता चेकिंग साठीची फी दर 200 चौ.मी साठी रू. 7,500/- व 200 चौ.मी पेक्षाजास्त बांधकमासाठी रू. 10,000/- अशा प्रत्येक बांधकामासाठी लाईन आउट व जोता चेकिंग फीचे दर घेणेसाठी ठराव केलेला आहे तसेच उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर बांधकाम प्रारंभ प्रमाणापत्र मधील अट क्र. 7 जोत्या पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु विशारदने दाखल्यासह मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून महानगरपालिकेचा दाखला प्राप्त करून घेउन नंतरच जोत्यावरील बांधकाम करावे असे नमूद आहे.
तरी 2013-14 मध्ये नगररचना विभागाने 112 बांधकामाना बांधकाम परवानगी दिली आहे, त्यानुसार सदरील बांधकाम परवानगीचे किती बांधकाम जोत्याच्यावर झाले आहे, तसे प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून बांधकामधारक/वास्तु विशारद यांनी महानगरपालिकेकडून दाखले प्राप्त करून घेतले नाही त्यामुळे 2013-14 मधील 112 बांधकामा पैकी किती बांधकामाना जोता प्रमाणपत्र दिले आहे याबाबत खात्री झाली नाही तसेच जोता चेकिंग शुल्क वसुल केलेबाबत लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. सदरील अक्षेपाबाबत

अर्धसमास क्र. 200 दि. 28/12/2016 विभागाला कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे 2013-14 मध्ये एकुण किती बांधकाम धारकाकडनू जोता चेकिंग शुल्क वसुल झाले नसल्याने 200 चौ.मी 36 बांधकाम प्रारंभ प्रकरणे आहे व 200 चौ.मी पेक्षा जास्त 76 बांधकाम प्रारंभ प्रकरण आहे त्यांची एकत्रित वसुल पात्र रक्कम रू. 10,30,000/- (36X7500=2,70,000/- व 76X10000=7,60,000/-)

| अ.क्र. | चौ.मी.बांधकाम प्रकरणे | बांधकाम प्रकरणे | जोता चेकिंग शुल्क | एकून वसूलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 200 चौ.मी | 36 | 7500 | 270000 |
| 2. | 200 चौ.मी.पेक्षा जास्त | 76 | 10000 | 760000 |

एकून 1030000

DATRYJM7501 (Ref No : 17, Hmm No : 200)

## *38 उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6091506.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4557190.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1534316.00/-

***उल्हासनगर शहराचा विकास आराखडा योजना कामासाठी एकूण 3 निविदा धारकांनी निविदा सादर केल्या असून EOI च्या CLAUSE 5.4 अन्वये 70% पेक्षा जास्त गुण असणा-या सल्लागार संस्था पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकाच संस्थेस 70% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम घेणेपासून आयुक्त यांनी सुट दिली आहे. अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास सुट देणे नियमबाहय आहे. त्यामुळे मान्य निविदेच्या 5% अनामत व सुरक्षा अनामत वसुल करणे आवश्यक आहे नियमानुसार आयकर कपात केलेला नाही व सेवाकर नियमानुसार वसुल केलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाचे 2013-14 लेखा परीक्षण केले असता सुधारीत आराखडाबाबत स्थायी समिती ठराव क्र. 116 दि. 05/2/2010 नुसार उल्हासनगर शहराचा सुधारीत

योजना आराखडा बनविण्याचे काम “CEPT” अहमदाबाद यांना दिलेले आहे. सदर कामाबाबतची नस्ती व प्रमाणक क्र. खालीलप्रमाणे आहेत

| अ.क्र. | रक्कम अदा केलेल्या कंत्राटदाराचे नाव | प्र.क्र | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 1684 | 25/07/2013 | 14,22,870/- |
| 2 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 1938 | 16/8/2013 | 14,49,444/- |
| 3 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 4255 | 7/1/2014 | 10,87,083/- |
| 4 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 4428 | 16/1/2014 | 7,81,837/- |
| 5 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 5169 | 25/1/2014 | 15,956/- |
| एकुण | | | | 45,57,190/- |

उपरोक्त खर्चाबाबतच्या कामाची निविदा नस्ती तपासणी केली असता 3 निविदा पात्र नसतानाही “CEPT” अहमदाबाद यांची निविदा मान्य केली आहे. सर्व दर हे करासहित असताना सेवाकर बिलात वेगळा नमूद केला आहे. आयकर कमी कपात केला आहे. वाढीव फी बाबतची कारणे नमूद केली नाहीत. सदरील खर्चाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) कामाची वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे अभिलेख नाहीत. एकूण 3 निविदाधारक यांनी निविदा सादर केल्या असून EOI च्या Clause 5.4 अन्वेय 70% पेक्षा जास्त गुण असणा-या सल्लागार संस्था पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकच संस्थेस 70% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही तसेच अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम मान्य निविदेच्या 5% अनामत व सुरक्षा अनामत रक्कम रू. 5,31,250/- घेतलेली दिसून आलेली नाही. सदरील बाबतीत विभागाने अनुपालनात मा. आयुक्त निर्णय घेतल्याचे कळविले आहे. तरी सदरील बाबतीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

2) मान्य निविदा फी व वाढीव फी असे एकूण रू. 1,06,25,000/- असून प्रत्येकी रू. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम-1958मधील कलम 63 नुसार रू. 9,800/- या रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते परंतु रू. 100/- च्या दोन मुद्रांक पेपरवर केला आहे. उर्वरित रू. 9,600/- वसुलपात्र आहे.

3) निविदाधारक CEPT अहमदाबाबद यांन वाटाघाटीनुसार दिलेले दर हे एकत्रीत असल्याने सर्व करांसहीत आहेत. हया बाबी विचारात घेउन स्थायी समिती ठराव क्र. 116 दि. 5/02/2010 निविदा मान्य केली आहे. तसेच करारनामा अट क्र. 2.6.4 नुसार सर्व दर करासहित असल्याचे नमूद आहे.

असे असताना उपरोक्त बिले प्रदान करताना 12.36% सेवाकर सबंधित संस्थेला अदा केला आहे. त्यामुळे सेवाकरापोटी रू. 5,17,747/- जादा प्रदान झाले आहे. सदर बाबतीत विभागाने लेखा विभागाशी संबंधित असल्याने कळविले आहे. तरी सेवाकरापोटी रू. 5,17,747/- जादा केलेले प्रदान वसूल होणे आवश्यक आहे.

4) उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे कामासाठी 2013-14 मध्ये रू. 45,57,190/- इतका खर्च झाला असून आयकर अधिनियम 1961मधील कलम 1964(J) सल्लागार फी म्हणून 10% आयकर कपात करणे बंधनकारक आहे. सदर बाबतीत विभागाने लेखा विभागाशी संबंधित असल्याने कळविले आहे. तरी नियमानुसार आयकर रक्कम रू. 4,75,719/- एवढी कपात केलेली दिसून आलेली नाही

5) कामाची मुदत 28 महिने असून 4/08/2012 रोजी पूर्ण झाली आहे. पहिली मुदतवाढ संपणेपूर्वी दुसरी मुदतवाढ घेणे आवश्यक होते. परंतु दि.04/06/2013 रोजी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. मा. महासभेने दि. 05/02/2014 अन्वये मंजुरी दिली आहे. विलंब कालावधीसाठी दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते त्याचे पालन झाले नाही. तसेच वाढीव फी रू. 41,65,000/- मंजूर करण्याची करणे नमूद नाहीत. ही बाब आयुक्त व महासभेने मान्य केली असल्याने कामाच्या स्कोप प्रमाणे काम झाल्याचे प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे कामाबाबत लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. सदर बाबतीत विभागाने लेखा विभागाशी संबंधित असल्याने कळविले आहे. सुधारीत विकास आराखडा बनविण्यास विलंब झाल्याने वाढीव फी दयावी लागली. त्यामुळे रू. 41,65,000/- खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडलेला दिसून येत आहे. सदरील आक्षेप मुदयांबाबत अर्धसमास क्र. 198 दि. 28/12/2016 अन्वये विभागाला खुलासा मागविला असता तरी विभागाचा उपरोक्त मुद्दयाबाबत खुलासा समाधान कारक नसल्याने खालील प्रमाणे आक्षेपाधीन व वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रू. 45,57,190/- (कामावरील खर्च)

वसूल पात्र रक्कम रू. 15,34,316/- (सुरक्षा अनामत रू. 5,31,250/- +मुद्रांक शुल्क रू. 9,600/-+सेवा शुल्क जादा प्रदान रू. 5,17,747/-+आयकर रू. 4,75,719/-)

DATRYJM7501 (Ref No : 18, Hmm No : 198)

## *39 जीना,पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता आकारणी कमी केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 350691.00/-

***जीना,पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता रक्कम रु.350691/-***

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.91 दि.10/03/2010 अन्वये इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ जीना,लॉबी,पॅसेज इ.बाबींच्या सवलतीकरीता शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या 150 टक्के (रहिवास प्रयोजनार्थ) व 250 टक्के (वाणिज्य प्रयोजनार्थ) अधिमुल्य शुल्क आकारणेचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना विभागाकडून देण्यात आलेल्या इमारत बांधकाम परवानगीच्या काही प्रकरणांची तपासणी केली असता आकारणी कमी केल्याने एकूण रुपये 3,50,691/- इतकी रक्कम कमी आकारण्यात आल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. आक्षेपाच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.188 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | वापराचा प्रकार | जिन्याचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | महासभा ठराव क्र.91 दि.10/03/2010 अन्वये आकारावयाचे अधिमुल्य शुल्क (जमीनीचा दर) | ठरावानूसार आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | आकारलेली रक्कम (रुपये) | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| 1 | विधी जितू धनवानी | 70/13/513 दि.28/08/13 | रहिवास | 143.64 | 14650 x1.5 | 3156489 | 3682600 | 350691 |
| | | | वाणिज्य | 23.94 | 14650 x2.5 | 876802 | | |
| | | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रुपये | | | 350691 |

DATPVWM7501 (Ref No : 66, Hmm No : 188)

## ***40 इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 111178.00/-

***निवडक प्रकरणांच्या लेखापरीक्षणांती इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेली रक्कम रु.111178/-वसुलपात्र आहे.***

नियोजन व नगररचना(सुधारणा) अधिनियम 2010 ची अधिसूचना दि.27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि.01/03/2011 नूसार इमारत बांधकाम विकास कर रहिवास क्षेत्राकरीता रेडीरेकनरमधील जमीन मुल्याच्या दोन टक्के व वाणिज्य वापरासाठी चार टक्के आकारणेबाबत शासन आदेश आहेत.

नगररचना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही निवडक तपासणी केलेल्या प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रु.111178/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.186 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ .क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | जागेचे क्षेत्रफळ (चौ (.मी. | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौ(.मी. | नगरविकास विभाग अधिसुचनेनुसार शुल्क (जमीनीचा दर( | आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | आकारलेली रक्कम (रुपये( | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | (7x8) | | (9-10) |
| 1 | श्री . आनंद भाटीया | उमपा बांप/नरवि/ /1/13/207 दि.14/06/13 | 426 | 528 | 14650 x 2 टक्के | 154704 | 119000 | 35704 |
| 2 | श्रीमहेश. सचदेव | 64 दि.30/07/13 | 418 | 547 | 9800 x 2 टक्के | 107212 | 81697 | 25515 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | विधी जितू धनवानी | 70/13/513 दि.28/08/13 | 418 | 559 | 14650 x 2 टक्के | 163787 | 115200 | 48587 |
| 4 | श्रीमती शिला लुंड व श्रीमती रेश्मा लुंड | 12/13/204 दि.14/06/13 | 86.12 | 62 | 16900 x 2 टक्के | 12152 | 10780 | 1372 |
| | | | | | | | एकूण रक्कम | 111178 |

DATPVWM7501 (Ref No : 67, Hmm No : 186)

## *41 इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कराची कमी रक्कम वसूल केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 23200.00/-

***इमारत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एकूण रक्कम रु.25200/- वसुलपात्र आहे.***

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. स्थासंक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.06/08/2012 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम खालीलप्रमाणे आकारणी करून वसूल करणे आवश्यक आहे.
चौथ्या मजल्यापर्यंत रु.100/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
पाचवा मजला ते सातव्या मजल्यापर्यंत रु.150/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
सात मजल्यावरील बांधकामास रु.150/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका विभागामधील काही निवडक प्रकरणे तपासली असता खालील प्रकरणांत स्थानिक संस्था कराची एकूण रक्कम रु.25200/- विकासकांकडून कमी जमा

करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.184 दि. 26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

इमारत बांधकाम स्थानिक संस्था कराच्या वसुलीचे विवरणपत्रक

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (.मी.चौ) सवलतीच्या) बाबींच्या क्षेत्रफळासह( | नगरविकास शासन निर्णय दि.06/08/12 नूसार आकारणी (रुपये) | स्थानिक संस्था कर रक्कम (रुपये) | स्थानिक संस्था कर भरलेली रक्कम (रुपये) | स्थानिक संस्था कर वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | 4x5 | | 6-7 |
| 1 | विधी जितू धनवानी | 70/13/513 दि.28/08/13 | 586 | 150 | 87900 | 62700 | 25200 |
| | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रुपये | | | 25200 |

DATPVWM7501 (Ref No : 68, Hmm No : 184)

## *42 महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पावर स्विपिंग मशिनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : घनकचरा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1766676.00/-

***करारनामा करतांना कंत्राटदाराची एकून रक्कम विचारात न घेता कमी रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. दि. 03/11/2013 ते 24/01/2014 या कालावधीची बँक हमीची वैधता नस्तीसोबत***

***आढळलेली नाही. पावर स्विपिंग मशिन सोबत असलेले सफाई कामगारांचे हजेरी पुस्तक, वेतन पट तसेच विमा उतरविल्याचे कागदपत्र लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांची साफसफाई करण्यासाठी अभिकर्त्यांची नेमणुक करणेबाबत स्थायी समितीने ठराव क्र 16 दि. 01/06/2009 अन्वये मंजुरी दिली असुन सदर कामाची निविदा सूचना दैनिक अमृत कलश, दैनिक नगर न्यूज, एशियन एज व मुंबई लक्षव्दिप या वर्तमानपत्रात दि. 05/06/2009 रोजी प्रसिध्द करण्यात येऊन निविदा मागविण्यात आली होती. एकुण चार निविदा प्राप्त झाल्या त्या अनुक्रमे 1) मे. अएलएल सर्व्हिसेस 2) मे. वेस्ट हॅन्डलिंग.सेल. प्रा.लि. 3) मे. लायन सर्व्हिसेस 4) मे. राम इंजिनिअरिंग या पैकी मे. अन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा. लि. यांची न्युनतम दराची निविदा 1375 रू. प्रती किलो मीटर असल्याने स्थायी समिती ठराव क्र. 52 दि. 20/08/2009 अन्वये त्यांचेशी संविदा करण्यास मान्यता दिली आरोग्य विभागाचे पत्र क्र.196 दि. 24/08/2009 नुसार कार्यादेश देण्यात आला आहे. घनकचरा विभाग उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडील प्राप्त नस्तीचे लेखापरीक्षण करून अर्धसमास पत्र क्र. 26 दि. 29/06/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर विचारात घेउन लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र. 12/कलम/34/133/09 दि. 20/07/2009 नुसार एकुण कंत्राट रक्कमेच्या रु. 10 लाखाकरिता रु. 100 व पुढील प्रत्येक लाख रुपयास रुपये 100 प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. निविदाकाराच्या दहा वर्ष कालावधीकरिता कंत्राटाची एकुण रक्कम रु. 160697811 वर रु.159798 इतकी मुद्रांक नोंदणी शुल्क रक्कम आकारणे आवश्यक असतांना रु.100 च्या मुंद्राक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. उर्वरीत रक्कम रु.159698 निविदाकाराकडून वसुल करुण शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे. याबाबतचे कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नाहीत.

2) सदर ठेका दहा वर्ष इतक्या कालावधीकरिता दिला असल्याने ठेक्याच्या कालावधीपर्यंत बँक ग्यारंटी वैधता वाढविणे आवश्यक आहे. दि. 3/11/2013 ते 24/01/2014 चा कालावधीची बँक गॅरटी नस्तीत आढळुन आलेली नाही.

3) निविदेत नमुद केल्याप्रमाणे पावर स्विपिंग मशिनसोबत प्रत्येक 2 किलोमीटरवर एक कर्मचारी फुटपाथ सफाई व पावर स्विपिंगच्या मेन्टेन्ससाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे यानुसार 25 किलोमीटरसाठी 13 सफाई कामगार नेमलेले आहेत. सदर सफाई कामगारांचे दैनंदिन हजेरी पुस्तक तसेच वेतनपट लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.त्यामुळे त्यांना किमान वेतन कायदा 1970 नुसार वेतन मिळाले याची खातरजमा करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.जी.ईएन 1098/1357/प्र.क्र.166/98 नवि-24 नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई दि. 3/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमा पत्राखाली उतरविणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणात कंत्राट कामाचा विमा उतरविला आहे.कंत्राटी कामगारांचा विमा उतरविल्या बाबतचे कागदपत्र नस्तीसोबत नाहीत. तरी 1% रक्कम रुपये 1606978 ठेकेदाराकडून वसूल करण्यात आल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

DATPKCM7101 (Ref No : 21, Hmm No : 26)

## *43 भविष्य निर्वाह निधीचे रक्कम ठेवी स्वरुपात राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये गुंतवणूकीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 9 मधिल कलम 92 अनुसार शिल्लक रक्कमांचा गुंतवणूक संदर्भात महानगरपालिकेने भविष्य निर्वाह निधीचे रक्कम ठेवी स्वरुपात राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये गुंतवणूकीमध्ये महानगरपालिकेने रक्कम रु. 2 लाख ओरीयंटल बॅक ऑफ कॉमर्स,उल्हासनगर-4 या बॅकेत गुंतवणूक केली त्यावेळी सदर बॅकेव्यतिरिक्त अन्य बॅकांचे व्याजदर विचारात घेतलेले नाही.***

मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 9 मधिल कलम 92 अनुसार शिल्लक रक्कमांचा गुंतवणूक संदर्भात महानगरपालिकेने त्यांचे पत्र क्रं. निरंक दिनांक निरंक अनुसार ओरीयंटल बॅक ऑफ कॉमर्स,उल्हासनगर-4 या बॅकेकडे भविष्य निर्वाह निधीची शिल्लक रक्कम प्रत्येकी रु. 50,000/- याप्रमाणे प्र.व.रु 9.50% या व्याजदराप्रमाणे 23 महिन्यासाठी पुर्नगुंतवणूक करण्यांत आली. सदर ठेवीचा क्रमांक 05613031, 0188064,0188071,0188088,0188095 असा आहे.वरील ठेवी पहाता एकाच रक्कमेच्या 4 ठेवींची पुर्नगुंतवणूक करण्यांत आली व या सर्व ठेवींची मुदत,मुदत संपण्याची तारीख देखील सारखी आहे. यावरुन महानगरपालिकेने रक्कम रु. 2 लाखाची एकच गुंतवणूक न करण्याबाबतचे प्रयोजन स्पष्ठ होत नाही. तसेच सदरची ठेव एकाच बॅकेत ठेवण्यामागील महानगरपालिकेचा उद्देश काय आहे .ज्यावेळी महानगरपालिकेने रक्कम रु. 2 लाख ओरीयंटल बॅक ऑफ कॉमर्स,उल्हासनगर-4 या बॅकेत गुंतवणूक केली त्यावेळी सदर बॅकेव्यतिरिक्त अन्य बॅकांचे व्याजदर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बॅकांचे नांव | रक्कम रु. 1 कोटीहून कमी रकमांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ------ | ------------- | ------------------------------ |
| 1. | आंध्रा बॅक | 9.50% |
| 2. | पंजाब नॅशनल बॅक | 8.75% |
| 3. | कॅनरा बॅक | 8.80% |

| | | |
|---|---|---|
| 4. | बॅक ऑफ बडोदा | 8.75% |
| 5. | कार्पोरेशन बॅक | 8.75% |
| 6. | विजया बॅक | 9.00% |
| 7. | युनायटेड बॅक ऑफ इंडिया | 9.00% |
| 8. | देना बॅक | 8.75% |
| 9. | ओरीयंटल बॅक ऑफ कॉमर्स | 9.00% |
| 10. | इलाहाबाद बॅक | 9.00% |
| 11. | बॅक ऑफ इंडिया | 9.00% |
| 12. | युनियन बॅक ऑफ इंडिया | 9.00% |
| 13. | युको बॅक | 8.75% |
| 14. | सिंडीकट बॅक | 8.50% |
| 15. | बॅक ऑफ महाराष्ट्र | 9.00% |
| 16. | स्टेट बॅक ऑफ इंडिया | 8.75% |

वरील बॅकांचे व्याजांचे दर पहाता आंध्रा बॅक, उल्हासनगर-1 व्यतिरिक्त अन्य बॅकांचे व्याजदर रु. 9.50% टक्यापेक्षा कमी असतांना ओरीयंटल बॅक ऑफ कॉमर्स,उल्हासनगर-4 यांनी महानगरपालिकेस सदरच्या ठेवीच्या पुर्नगुंतवणूकीसाठी रु. 9.50% प्र.व. व्याजदर कसा दिला याचा बोध होत नाही. तसेच सदरच्या ठेवीवर रक्कम रु. 9.00% टक्के व्याजदर देण्याबाबतचे पत्र असतांना रु. 9.50 टक्के प्र.व. व्याजदर देत असल्याबाबतचे बॅकेचे पत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही. याबाबत वर नमूद केलेल्या बॅकांकडे रक्कमेबाबत व्याजदराची चर्चा केली असती तर ओरीयंटल बॅक ऑफ कॉमर्स प्रमाणे इतर बॅकांनी व्याजदर रक्कम रु. 9.50 टक्केपेक्षा अधिक व्याजदराचा फायदा महानगरपालिकेस मिळाला असता. सदर बॅकेच्या रक्कम रु. 50.00 हजार ठेवीवर रु. 9.50 टक्के प्र.वर्ष व्याजदर नमूद आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेने रक्कम रु. 2.00 लाख रकमेचे 4 तुकडे पाडून ठेवीमध्ये रक्कम (रक्कम रु. 50,000/-प्रमाणे) गुंतविण्याचे प्रयोजन काय ? महानगरपालिका, उल्हासनगर यांनी वरील ठेवी व्यतिरिक्त दि. 26/08/2013 रोजीची टिप्पणी पहाता महानगरपालिकेने भ्.नि.नि.मधील शिल्लक रक्कम रु. 50,000/- रक्कमेची आवश्यकता नसल्याने भ.नि.नि.खाते क्रं. 9110100666166647 मधून (धनादेश क्रं. 117005 दि. 30/08/2013) रु. 50,000/- त्वरीत आंध्रा बॅक, उल्हासनगर-1 या राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये पत्र कं. निरंक ता. 30/08/2013 नुसार 2 वर्षासाठी गुंतविली आहे. मात्र सदर नस्तीमध्ये व्याजदराचा तुलनात्मक तक्ता दिसून आला नाही.सदरील बाबतीत अर्ध समास क्र,22 दिनाक 15/06/2016 अन्वये विभागाला खुलासा मागविला असता लेखा विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

## *44 मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2103231742.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2103231742.00/-

***थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 42 ते 48 नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इत्यादी सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत महानगरपालिका क्षेत्रात मोकळया जागा जमिनी असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तावर कर आकारणी मागणी व वसुलीचे लेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका लेखापरिक्षणात मालमत्ता कराची वर्ष 2013-2014 अखेर खालीलप्रमाणे थकीत रक्कम असल्याचे दिसुन आले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) 2013-2014 ची थकबाकी मागणी | : | 1986655650 |
| 2) 2013-2014 ची चालु मागणी | : | 1021906495 |
| 3) एकुण मागणी | : | 3008562145 |
| 4) 2013-2014 मध्ये थकबाकी वसुली | : | 278259414 |
| 5) 2013-2014 चालु मागणी वसुली | : | 394835506 |
| 6) एकुण वसुली | : | 673094920 |
| 7) 2013-2014 अखेर थकबाकी पैकीबाकी | : | 1708396236 |
| 8) 2013-2014 चालु मागणी पैकीबाकी | : | 394835506 |
| 9) एकुण थकबाकी | : | 2103231742 |

कर निर्धारण व संकलन अधिकारी यांनी लेखा परीक्षणास सादर केलेल्या विवरणपत्र अभिलेख्यानुसार वर्ष 2013-2014 करीता मालमत्ता करांची एकुण मागणी रक्कम रूपये 3,008562146 इतकी असुन एकुण वसुली रूपये 673094920 आहे तर एकुण थकबाकी रक्कम रूपये 2103231742 इतकी दर्शविली आहे म्हणजेच वसुलीची टक्केवारी 22.37 टक्के आहे तर थकबाकीची टक्केवारी 77.63 टक्के आहे एकंदरीत वसुलीचे प्रमाण फारच कमी आहे. अर्धसमास पत्र क्र.164 दि.30/11/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर विचारात घेऊन खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 42 ते 48 नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे

बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इत्यादी सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत कर वसुली संदर्भात अशी कारवाई न केल्याने वसुलीचे प्रमाण कमी होऊन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाली आहे.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळया जागांवर कर आकारणी करणेचे आहे महानगरपालिका क्षेत्रात अशा मोकळया जागा-जमिनी असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तावर कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही

3) दि.1 मार्च 2014 ते 31 मार्च 2014 या कालावधीत मालमत्ता कराची रोख रक्कम व धनादेशाव्दारे जमा झालेली रक्कम रू. 72990041 इतकी आहे. दि.31/03/2014 रोजी प्राप्त झालेले 171 धनादेश रक्कम रूपये 9052686 स्टेट बॅक ऑफ इंडिया मालमत्ता कर खाते क्र. 910020040029894 यामध्ये जमा करण्यात आली असुन सदर धनादेशाची रक्कम ही 2014-2015 या आर्थिक वर्षाच्या एप्रिल 2014 मध्ये जमा झाल्याचे स्टेट बॅक ऑफ इंडिया चे बॅक विवरणपत्रावरून दिसुन येते मालमत्ता कराचे धनादेश हे 31 मार्च 2014 पर्यंत वटतील अशा पध्दतीने स्विकारणे आवश्यक होते. परंतु तशी कारवाई झालेली नाही.

4) 2013-2014 या आर्थिक वर्षात मालमत्ता कराचे एकुण जमा झालेल्या धनादेशापैकी 4 धनादेश रक्कम रूपये 85102 वटलेले नाहीत. मालमत्ता कराचा धनादेश न वटल्यास Negotiable Instrument Act 1881 चे कलम138 अन्वये नोटीस देणे, दंडात्मक किंवा जप्तींची कारवाई केली पाहिजे परंतु अशी कारवाई झालेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 30, Hmm No : 164)

### *45 मिळकतीची आकारणी चुकीची केल्याने फरकाची रक्कम वसुलीबाबत व अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने मागणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1368441.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नूसार दर पाच वर्षातून एकदा नवीन कर आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक असतांना सन 1996-97 नंतर अदयापपर्यंत नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले नाही. कर आकारणी विलंबाने , जागेच्या कमी क्षेत्रफळावर केली आहे. कर आकारणी नोंदवहीत संबंधीत लिपीक, कर निरीक्षक, कर निर्धारक यांची स्वाक्षरी नाही. कर निरीक्षकांचा स्थळ पाहणी अहवाल नाही. कर आकारणी नोंदवहीतील नोंदी अपुर्ण आहेत. कर आकारणी नोंदवहीत कराची परिगणना केलेली नाही. संबंधित प्रकरणांच्या मुळ नस्ती तपासणीकरीता अप्राप्त आहेत. कर आकारणी नोंदवहीतील नोंदी व संगणकात नोंद केल्यानंतरच्या नोंदीची पुर्नतपासणी केलेली नाही. निवासी / अनिवासी वापरातील बदलाबाबत पाणीपुरवठा***

***विभागास कळविले जात नाही. वापरातील बदलाबाबत कोणतेही कागदपत्रे मिळकतीच्या मालकाकडून न घेता मिळकतीच्या वापरात बदल मंजूर करण्यात आले आहेत. अनधिकृत बांधकामांवर नियम 267(अ) प्रमाणे शास्ती आकारणी केली जात नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.20/10/2016 च्या अनुषंगाने अदयापपर्यंत परिपुर्ण लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत.***

अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.20/10/2016 अन्वये मिळकत कर विभागामधील लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतू अर्धसमास ज्ञापनानूसार लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. काही प्रमाणात उपलब्ध झालेल्या नोंदवहया तपासल्या असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.156 दि.29/11/2016 दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यत येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 च्या नियम 21(2) नुसार आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पाच वर्षांतून एकदा तरी आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे, अशी तरतूद आहे. उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.4 दि.19/05/2004 मध्ये नमूद केलेनूसार सन 1996-97 नंतर अदयापपर्यंत नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले नाही.

2) श्री. हरीराम हरजानी, मिळकत कर क्र.43 सी आय 009844300 यांनी सदर मिळकतीची मे. किसना फार्मासिटयुकल्स ॲन्ड डिस्ट्रीब्युशन यांचेकरीता वाणिज्य दराने कर आकारणी केली आहे. परंतू सदर कंपनीचे व्हॅट व केंद्रिय विक्रीकर प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीची तपासणी केली असता सदर मिळकत दि.01/04/2006 पासून वाणिज्य वापरात आहे. सबब, दि.01/04/2006 पासून वाणिज्य दराने तसेच मा.आयक्त, उल्हासनगर मनपा यांचे कार्यालयीन आदेश क्र.उमपा/करविभाग/195/13 दि.01/01/2014 अन्वये दि.01/01/2014 पासून 1.6 पट मिळकत कराची आकारणी वसुली करणे आवश्यक आहे किंवा मिळकतची मालक श्री.हरजानी व किसना फार्मासिटयुकल्स यांचे दोहोंमध्ये झालेल्या मिळकतीच्या भाडे करारानूसार वार्षिक रक्कम किंवा मनपाचे दर यापैकी जे जादा असतील त्याप्रमाणे कर आकारणी करून फरकाची रक्कम वसुलपात्र आहे. भाडे करारपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने वसुलीच्या रक्कमेची परिगणना करता आलेली नाही.

3) श्री. हरेष छाप्रिया, मिळकत कर क्र.49 सी आय 0010637600

सदर मिळकत बँक ऑफ इंडियाला भाडेतत्वावर दिली असून मिळकतीचा कारारनामा दि.18/12/2012 रोजी केल्याने तेव्हापासून कर आकारणी करणे आवश्यक असतांना दि.01/04/2014 पासून कर आकारणी केल्याने दि.18/12/2012 ते दि.31/03/2014 पर्यंत मिळकत कराची रक्कम रु.1079790/- वार्षिक प्रमाणे खालीलप्रमाणे एकूण रक्कम रु.13,68,441/- जेव्हा सदर रक्कम मनपा निधीत जमा होईल तोपर्यंत प्रति माह दोन टक्के व्याजाची परिगणना करून रक्कमेसह वसुलपात्र आहे.

| कालावधी | वार्षिक मिळकत कराची एकूण रक्कम रुपये | आकारणी केलेली मिळकत कराची रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| दि. 18/12/2012 ते दि.31/12/2012 | 1079790.00 | 0.00 | 18704.00 |
| दि. 01/01/2013 ते दि.31/03/2013 | 1079790.00 | 0.00 | 269947.00 |
| 2013-2014 | 1079790.00 | 0.00 | 1079790.00 |
| | | | 1368441.00 |

4) उपरोक्त तपासणी केलेल्या मिळकतीच्या नोंदीबाबत खालीलप्रमाणे इतर सर्वसाधारण अनियमितता आहेत.

ए) कर आकारणी नोंदवहीत संबंधीत लिपीक, कर निरीक्षक, कर निर्धारक यांची स्वाक्षरी नाही.

बी) कर निरीक्षकांचा स्थळ पाहणी अहवाल नाही.

सी) कर आकारणी नोंदवहीतील नोंदी अपुर्ण आहेत.

डी) कर आकारणी नोंदवहीत कराची परिगणना केलेली नाही.

इ) संबंधित प्रकरणांच्या मुळ नस्ती तपासणीकरीता अप्राप्त आहेत.

एफ) कर आकारणी नोंदवहीतील नोंदी व संगणकात नोंद केल्यानंतरच्या नोंदीची पुर्नतपासणी केलेली नाही.

जी) निवासी कर आकारणीत पाणीपटटीची आकारणी करण्यात येते , परंतू वाणिज्य कर आकारणीत पाणीपटटी कर आकारणी केली जात नसल्याने निवासीतून वाणिज्य गटात कर आकारणी करतांना पाणीपटटी विभागास रहीवास वापराची नळजोडणी खंडीत करून वाणिज्य वापर असलेल्या दराने स्वतंत्र नळजोडणी घेणेकरीता व त्याप्रमाणे पाणीपटटी आकारणी होणे आवश्यकतेच्या अनुषंगाने कळविण्यात आलेबाबत अभिलेख अप्राप्त आहे. सबब , पाणीपटटी वाणिज्य दराने स्वतंत्र आकारणी होत नसल्याची शक्यता असून मुळ पाणी कनेक्शन्द्वारे पाणी पुरवठा बंद केला जात नसून कोणतीही आकारणी न करता पाणी पुरवठा होत असल्याची शक्यता आहे.

एच) निवासी वापरातून वाणिज्य वापरात कराचे रुपांतर करताना वाणिज्य वापराच्यापृष्ठयर्थ कोणतेही कागदपत्रे मिळकतीच्या मालकाकडून न घेता मिळकतीच्या वापरात बदल मंजूर करण्यात आले आहेत.

5) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनधिकृत बांधकामांवर नियम 267(अ) प्रमाणे शास्ती आकारणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याप्रमाणे शास्तीची रक्कम परिगणना करून मिळकतधारकांकडून वसुलपात्र आहे.

6) अर्धसमास ज्ञापन क्र. 128 दि. 20/10/2016 च्या अनुषंगाने अदयापपर्यंत परिपुर्ण लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत. सबब, त्याबाबतचा स्वतंत्र आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

वसुलपात्र रक्कम रु.1368441/-

DATPVWM7501 (Ref No : 59, Hmm No : 156)

## *46 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1611807.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च केला आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांकसंकीर्ण/2007/वाहनखरेदी/प्र.क्र.27/2008/नवि.26 दिनांक 18/02/2008 अन्वये आयुक्त यांना खर्चाचे अधिकार आहेत. परंतु उप आयुक्त यांनी अधिकारात नसतांना वाहन दुरूस्तीवरील खर्चास मंजुरी दिलेली असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे. वाहन दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधुन दरपत्रके मागवून करणे आवश्यक होते परंतु सर्व वाहनांची दुरूस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून करूण घेण्यात आलेली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांच्या दुरूस्तीवर 2013-2014 या आर्थिक वर्षामध्ये एकुण रक्कम रूपये 1611807 खर्च करण्यात आला असुन झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करून अर्धसमासपत्र क्र. 192 दिनांक 28/12/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर विचारात घेउन लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महानगरपालिकेच्या मालकीची 2013-2014 या आर्थिक वर्षात एकुण 39 अवजड व 11 हलकी वाहने असुन प्रस्तुत वाहनांच्या दुरूस्तीचे अभिलेखे यांची तपासणी केली असता वाहनांच्या दुरूस्तीवरील खर्चाबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवि. 26 दिनांक18/02/2008 नुसार काटकसरीच्या धोरणाची उपाययोजना करून उपलब्ध निधीचा जास्तीत जास्त सुयोग्य वापर होण्यासाठी व महानगरपालिकेकडील असलेली वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्याच्या दुरूस्तीच्या खर्चास मंजुरी देण्यासाठी काही विहीत पध्दती अंमलात आणलेल्या असुन त्यानुसार अतिरिक्त आयुक्त यांना पेट्रोलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी रूपये 25000 व डिझेल वर चालणा-या वाहनासाठी रूपये 30000 (टायर,टयुब,बॅटरी इत्यादी खर्चासह) खर्च करण्याच्या मंजुरीच्या शक्ती प्रदान केलेल्या आहेत. त्यापैकी निवडक वाहनांच्या नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र | वाहन क्रमांक | वाहनाचा | वर्ष | एकुण झालेला खर्च |
|---|---|---|---|---|

| | | प्रकार | | रूपये |
|---|---|---|---|---|
| 1 | MH-05-S-2984 | पीकअप व्हॅन | 2013-2014 | 56,500/- |
| 2 | MH-05-P-17 | पीकअप व्हॅन | 2013-2014 | 35,741/- |
| 3 | MH-05-P-64 | टाटा इंडीगो | 2013-2014 | 61,835/- |
| 4 | MH-05-R-651 | शव वाहिनी | 2013-2014 | 32,593/- |
| | | | एकुण रूपये | 1,86,669/- |

वाहनांचे दुरूस्तीच्या खर्चास मंजुरी देण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना शासन निर्णयाव्दारे दिलेले असतांना वरील झालेल्या खर्चास उप आयुक्त यांनी अधिकारात नसतांना मंजुरी दिलेली असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

2) उपरोक्त शासन निर्णयामध्ये सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधुन तीन दरपत्रके मागवून न्युनत्तम दर असलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहन दुरूस्ती करावयाची असताना सर्व वाहनांची दुरूस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहने दुरूस्त करून घेण्यात आलेली आहेत.

3) महानगरपालिकेच्या सर्व वाहनाच्या दुरूस्तीसाठी केलेल्या खर्चाचे हिस्ट्रीशीट (इतिहास पुस्तिका) यांची तपासणी केली असता अशी नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. प्रतिमहा वाहनाच्या दुरूस्तीचा गोषवारा तसेच वाहनावरती झालेल्या खर्चाची बेरीज घेउन मेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वर्षामध्ये प्रत्येक वाहनावर दुरूस्तीसाठी झालेल्या खर्चाची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

4) वाहनांचे हिस्ट्री शीट (इतिहास पुस्तक) मध्ये वाहनाचे मॉडेल वर्ष, इंजिन चेसी क्रमांक, विमा इत्यादी बाबतची माहिती, आरटीओ पासिंग, आरसी बुकची प्रत इत्यादी नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत तसेच नोंदवहीवर वाहनप्रमुख यांनी तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 36, Hmm No : 192)

## *47 महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांचे चेसिस खरेदी करणे कामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1137233.00/-

***मुल्यवर्धित कराची रक्कम रु.6000/-चे अतिप्रदान झाले आहे. मुल्यवर्धित कराची रक्कम रु.129473/- प्रती वाहन प्रमाणे चार वाहनांकरीता रक्कम रु.517892/- शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक आहे. आयकर अधिनियमानूसार आयकराची दोन टक्के रक्कम रु.93221/- कंत्राटदाराच्या देयकातून कपात करणे आवश्यक***

***आहे. केंद्रिय उत्पादन शुल्क अधिनियम 1985 , प्रोव्हिजन कलेक्शन ऑफ टॅक्सेस ॲक्ट 1931 तसेच वित्तीय अधिनियम 2010 नूसार रक्कम रु.520120/- केंद्रिय उत्पादन शुल्क विभागाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक आहे. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.अशंस 2012/प्र.क्र.45/नवि-20 दि.31/03/2012 अन्वये महानगरपालिकेस वाहन खरेदीकरीता अनुदान प्राप्त झाल्यामुळे खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09 दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम 1959 मधील कलम 63 नूसार करारनामा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 च्या नियम 94 ते 100 व 102 नूसार संयम, यंत्रसामग्री फर्निचर व स्थिरवस्तु या सारख्या वस्तु खरेदी करून किंवा मिळविलेल्या जडवस्तु संग्रहातील सर्व वस्तुंची वस्तुसुची नमूना क्र.8 मधील नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.***

कामाचे नाव- महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांचे चेसिस खरेदी करणे
निविदेचा प्रकार- शासनमान्य दरानूसार
प्रशासकीय मान्यता- स्थायी समिती ठराव क्र.22 दि.13/09/2012
कंत्राटदाराचे नाव-मे.टाटा मोटर्स मोटर्स,ठाणे
कार्यादेश क्र. 1338 दि.24/12/2012 व स्विकती पत्र क्र.114/12 दि.03/11/2012
प्रदान रक्कम धनादेश क्र.001980 रु.4661037/- (अँक्सिस बँक)

उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने निविदा नस्ती व देयक प्रदान स्थळ प्रत नस्तीची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.95 दि.14/09/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) दर करार पत्रकानूसार चेसिसची रक्कम रु.1023786/-प्रती वाहन असून वाहतूक शुल्क रक्कम रु.12000/- व व्हॅट 12.5% रक्कम रु.129473/- अशी एकूण रक्कम रु .1165259/- निश्चित केली असल्याचे नस्तीच्या अवलोकनांती निदर्शनास आले आहे . चेसिसची मुळ रक्कम रु .1023786/- वर मुल्यवर्धित कराची 12.5 टक्के इतक्या रकमेची परिगणना करणे आवश्यक असतांना वाहतूक शुल्क रक्कम रु.12000/- सह परिगणित केल्याने कंत्राटदारास एकूण रक्कम रु .6000/-चे अतिप्रदान झाले आहे. विभागाकडील सादर अनुपालनात लेखा विभागाने सदरची रक्कम कपात केली आहे किंवा कसे याची खात्री करून मे. टाटा मोटर्स यांना पत्र देण्यात येईल, असे नमूद केले आहे.

2) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील कलम 41 नूसार खरेदी करण्यात आलेल्या वस्तुचा उपयोग् लोकांच्या फायदयाकरीता होणार असल्यास शासन सदर वस्तुंवर आकारलेला मुल्यवर्धित कर परतावा करीन , अशी तरतुद आहे . सदर वाहनांचा उपयोग अग्निशमन (सार्वजनिक) कार्यासाठी करण्यात येणार असल्याने यामध्ये कोणताही लाभ मिळविण्याचा उददेश नसल्याने मुल्यवर्धित कराची रक्कम रु .129473/- प्रती वाहन प्रमाणे चार वाहनांकरीता रक्कम रु .517892/- शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. विभागाकडील प्राप्त अनुपालनात शासनाकडून प्रतिपुर्तीची कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

3) आयकर अधिनियमानूसार आयकराची दोन टक्के रक्कम रु .93221/- कंत्राटदाराच्या देयकातून

कपात करणे आवश्यक असतांना सदर रक्कम कपात न केल्याने रक्कम रु .93221/- वसुलपात्र आहे. याबाबत विभागाचे अनुपालन तपासले असता लेखा विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येईल असे नमूद आहे.

4) केंद्रिय उत्पादन शुल्क अधिनियम 1985 , प्रोव्हिजन कलेक्शन ऑफ टॅक्सेस अॅक्ट 1931 तसेच वित्तीय अधिनियम 2010 नूसार उत्पादित वस्तुचा वापर सार्वजनिक उपयोगाकरीता होणार असल्यास सदर वस्तुला उत्पादन शुल्क व शिक्षण उपकरातून सुट देण्यात येईल , असे नमूद आहे. दर करार पत्रकाच्या अनुषंगाने कंत्राटदाराने नमूद केलेली रक्कम रु .1023786/-मध्ये चेसिसची मुळ किंमत रु.893756/-वर 14% उत्पादन शुल्क व 0.125% अॅटो सेस व 3% शिक्षण उपकर अशी एकूण रक्कम रु.130030/-प्रती वाहनप्रमाणे चार वाहनांकरीता रक्कम रु.520120/-अदा करण्यात आली आहे. अग्निशमन वाहनाचा वापर सार्वजनिक प्रयोजनासाठी व त्याचा उपयोग लाभ मिळविणे नसल्याने रक्कम रु.520120/- केंद्रिय उत्पादन शुल्क विभागाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे . याबाबत विभागाचे अनुपालन तपासले असता लेखा विभागाकडून चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

5) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र .अशंस 2012/प्र.क्र.45/नवि-20 दि.31/03/2012 अन्वये महानगरपालिकेस वाहन खरेदीकरीता अनुदान प्राप्त झाल्यामुळे खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत विभागाच्या प्राप्त अनुपालनात अग्निशमन केंद्राचे शिल्लक काम पुर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात येईल, असे नमूद आहे.

6) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम 1959 मधील कलम 63 नूसार एकूण निवीदा रकमेच्या रु. 10 लक्षकरीता रु.100/- व पुढील प्रत्येक लक्ष रुपयास रु.100/- प्रमाणे कमाल रु.5,00,000/- इतक्या रकमेच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची रक्कम रु.4661037/-/-चा करारनामा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

7) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 च्या नियम 94 ते 100 व 102 नूसार संयम, यंत्रसामग्री फर्निचर व स्थिरवस्तु या सारख्या वस्तु खरेदी करून किंवा मिळविलेल्या जडवस्तु संग्रहातील सर्व वस्तुंची वस्तुसुची नमूना क्र.8 मधील नोंदवहीत ठेवावयाची आहे. खरेदी केलेल्या अग्निशमन वाहनांची नोंद जड वस्तु संग्रह नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतू नोंदीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् झाले नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 46, Hmm No : 95)

## *48 जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान अभियानांर्गत पाणी पुरवठा वितरण योजना निविदा प्रक्रीया व 2013-2014 मधील खर्च विषयक अंमलबजावणीतील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :J.N.N.R.U.M केंद्र राज्य शासन निधी*

उल्हासनगर महानगरपालिका

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 622558849.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 622558849.00/-

***विकास आराखडयानुसारचे प्रकल्प मुल्यापेक्षा देकार मुल्य 32.04% किंवा अधिक असणे,प्रकल्प मुल्यातील वाढीचा खुलासा सादर न करणे देकार अर्हता अटी लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे त्रयस्त संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून न घेणे, कार्यादेशातील विहित मुदतीत याजना पूर्ण न होणे, योजनेतील hydraulic testing न करणे, नविन जतमापके बसविले बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध नसणे, समान उद्दिष्टासाठी खर्चाची पुनरावृत्ती होणे.***

जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानांर्गत पाणी पुरवठा वितरण योजनेचा तपशिल पुढील प्रमाणे.

1) प्रत्यक्ष प्रकल्प खर्च:- 127.65 कोटी
2) केंद्र हिस्सा 35 टक्के:- 44.68 कोटी
3) राज्य हिस्सा 15 टक्के:- 19.14 कोटी
4) मनपा हिस्सा 50 टक्के:- 63.83 कोटी
5) प्रथम सुधारीत मुल्य:- 160.02 कोटी
6) व्दितीय सुधारीत मुल्य:- 265 कोटी
7) प्रकल्प मान्यता स्थायी समिती:- ठराव क्र. 112 दिनांक 07/12/2009
8)कार्यादेश:- 21/12/2009
9) काम पूर्ण होणेची मुदत:- 24 महिने
10) काम पूर्ण होणेची अपेक्षित दिनांक:- 21/12/2011
11) मुख्य उदिष्ट:- 270 कि.मी लांबीच्या नवीन जलवाहिन्या टाकणे

सदर योजनेबाबत 2013-14 मध्ये पुढील प्रमाणकांचे लेखा परीक्षण करण्यात आले.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | रक्कम |
|---|---|---|
| 1 | 204 | 2,32,50,000/- |
| 2 | 482 | 1,63,42,685/- |
| 3 | 712 | 1,00,00,000/- |
| 4 | 860 | 18,22,68,053/- |
| 5 | 1136 | 1,06,77,998/- |
| 6 | 1389 | 6,23,37,971/- |
| 7 | 2169 | 2,09,25,000/- |
| 8 | 2260 | 4,53,07,580/- |

| | | |
|---|---|---|
| 9 | 3609 | 74,58,880/- |
| 10 | 5458 | 18,59,81,681/- |
| एकुण | | 56,45,49,849/- |

उपरोक्त विषयाबाबत अर्धसमास पत्र क्र.105 दिनांक14/10//2016 नुसार खुलासा मागविण्यात आला होता तथापि तो अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात आढळून आलेल्या पुढील अनियमितता नोंदविण्यात येत आहेत.

1) महानगरपालिका, केंद्र शासन व राज्य शासन यांच्यात झालेल्या त्रिपक्षीय करारात दिनांक 29/12/2008 रोजी या योजनेचा विकास आराखडा अहवाल (DPR) नुसार 127.65 कोटी रुपये या प्रकल्प मुल्यास मान्यता दिली तथापी स्थायी समिती ठराव क्र. 112 दिनांक 07/12/2009 नुसार सदर देकार 32.04 टक्के जादा दराने म्हणजे 160.02 कोटी रूपये या दराने मंजुर केला. प्रत्यक्ष देकार मुल्य हे प्रकल्प मुल्या पेक्षा 32.04 टक्के अधिक आहे सदर तफावत कशामुळे निर्माण झाले याबाबतचा खुलासा सादर करावा.

2) सदर प्रकाल्पाचे सुधारित मुल्या 265. कोटी रूपये इतके निश्चीत करण्यात आले सदरची वाढ ही DPR मधील प्रकल्प मुल्यापेक्षा 108.66 टक्के अधिक आहे. प्रकल्प मुल्याची सदर वाढ का निर्माण झाली याबाबत खुलासा सादर केलेला नाही.

3) दिनांक 27/02/2009 रोजी पहिल्यांदा दिनांक 17/05/2009 रोजी दुस-यादा दिनांक 12/08/2009 रोजी तीस ऱ्यादा अशा एकुण तीन वेळा निविदा मगविण्यात आल्या पहिल्यावेळी DPR मुल्याच्या 59.70 टक्के आधिक दराने देकार प्राप्त झाला दुस-यादा 37 टक्के जादा दराने देकार प्राप्त झाला तीस-यांदा 35.73 टक्के जादा दराने देकार प्राप्त झाला वाटाघाटी अंती ते 32.04 टक्के जादा दराने मे. कोर्णाक इन्फ्रास्टक्चर प्रा. ली. यांची न्युनतम निविदा मान्य करण्यात आली
सदर निविदा प्रक्रीयेत प्रथम,व्दितीय व त्रितीय निविदेतील देकार अर्हता अटी मध्ये कोणते बदल करण्यात आले कोणत्या अटी व शर्ती रदद करण्यात किंवा शिथील करण्यात आल्या किंवा नव्याने समावेशीत करण्यात आला याबाबतची खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही. त्यामुळे निविदाप्रक्रीयेची पारदर्शकता तपासता आली नाही तरी तीनही निविदा प्रकल्पातील अटी व शर्ती लेखा परीक्षणास तात्काळ सादर करावे.

4) पाणी पुरवठा वितरण प्रकल्प अंतर्गत जलवाहीन्या व वितरणवाहीन्या या विहीत केलेल्या आरखडया नुसार व विहीत तांत्रिक निकषानुसार पुर्ण करण्यात आल्या आहेत याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय दिनांक 02/03/2009 नुसार 1 कोटी रूपये पेक्षा अधिक प्रकल्प मुल्य असलेल्या प्रकल्पांचे / विकास कामांचे तांत्रिक लेखा परीक्षण त्रयस्थ संस्थेकडून ( Third Party Technical Audit) करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि या प्रकल्पाबाबत असे तांत्रिक लेखा परीक्षण झालेले नाही याबाबत खुलासा सादर केलेला नाही.

5) दिनांक 21/12/2009 च्या कार्यादेशा नुसार प्रकल्प पुर्ण होण्याचा कालावधीची मुदत 24 महिने इतकी निश्चीत करण्यात आली होती तथापी तो आजआखेर अपूर्ण आहे 2013-14 च्या अर्थसंकल्पात सदर योजना अपूर्ण असल्याने व कार्यान्वीत होणार असल्याचे नमुद केले आहे. 2013-14 मध्ये सदर योजने वर 56,45,49,849/- इतकी रक्कम खर्ची पडली तथापि सदर योजना अपूर्ण आहे याबाबत खुलासा सादर कलेला नाही.

6) निविदेतील अटी नुसार प्रकल्पाची उंच सखल भागात पाण्याचे वितरण योग्य प्रमाणात होते तसेच कोठेही पाणी गळती होत नाही याबाबत कंत्रातदारास hydraulic testing करण्या बाबत सांगितले आहे तथापी सदर तपासणीचे अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7) निविदेतील अटी नुसार नवीन वितरण व्यवस्थे वर व त्या अंतर्गत येणार सर्व नळ जोडण्यांवर जलमालपके बसविणे बाबत सुचित केले आहे तथापी एकुण किती नवीन जलमापके बसविली याबाबतची आकडेवारी लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

8) सदर पाणी पुरवठा वितरण योजना विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने योजनेअंतर्गत येणारी उदिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रकल्प खर्चाव्यतिरक्त वर्ष 2013-14 मध्ये पुढील बाबींवर खर्च करणे भाग पडले आहे.

| अं.क्र. | बाब | रक्कम |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | टॅंकर भाडे | 16561000 |
| 2 | बुस्टर पंप | 27785000 |
| 3 | पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे | 995000 |
| 4 | कुपनलीका दुरूस्ती खर्च | 10000000 |
| 5 | पाणी पुरवठा निगराणी व दुरूस्ती खर्च | 2668000 |
| एकुण | | 58009000 |

वरील आकडेवारी वरून पाणी पुरवठा वितरण प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने महानगरपालिकेस रक्कम 5.80 कोटी रूपये इतका आधिक खर्च करावा लागला आहे. योजना अपूर्ण असल्याने पाणी पुरवठया वरील खर्चाची पुनरावृत्ती झाली आहे. याबाबत खुलासा सादर केलेला नसल्याने वरील अनियमितता कायम करण्यात येत आहेत.

DATAPJF8101 (Ref No : 73, Hmm No : 105)

## *49 महानगरपालिकेत क व ड च्या लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड खरेदीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 644000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 644000.00/-

***निविदा जाहीरात राजपत्रात प्रसिध्द न करणे, गणवेष कापड महाराष्ट्र राज्य महामंडळाकडून खरेदी न करणे, विहीत दर्जा बाबत तपासणी अहवाल उपलब्ध नसणे,आयकर भरणा चलन उपलब्ध नसणे,बाजारभावाशी निविदाकाराच्या दराशी तुलना न करणे इत्यादी.***

महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांकरीता 2011-2012 मध्ये मे.मोहीत एंटरप्रायझेस यांचेकडून 1840 मिटर गणवेष कापड (खाकी सफेद व नेव्ही ब्लु) खरेदी करण्यात आलेले आहे.सदर गणवेष कापड खरेदीचे रु.644000 चे प्रदान 2013-2014 मध्ये प्रमाणक क्र.2189 दि.03/09/2013 अन्वये करण्यात आलेले आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.33 दि.14/07/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1.गणवेष कापड खरेदीची निविदा जाहीरात ही स्थानिक वृत्तपत्र दैनिक अमृत कलश व दैनिक मुंबई लक्षदीप यात दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 अन्वये निविदा संबंधी जाहीरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णय दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8.1 अन्वये खरेदी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. परंतु सदर गणवेष कापड खेरदीची जाहीरात राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द न करता स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात आली आहे.

2.उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-1088 उद्योग-6 दि.02/01/1992 परिच्छेद मधील परिशिष्ट-5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच शासन पत्र क्र.संकीर्ण 2005/46/प्र.क्र.3/06नवि-20 दि.31/07/2006 नुसार गणवेषाचे कापड महाराष्ट्र राज्य वस्त्रोउद्योग महामंडळ/महाटेक्स/टेक्सकॉम/महाराष्ट्र राज्य यंत्रमार्ग महामंडळ यांचेकडून मागणी नोंदवून खरेदी करणे बंधनकारक आहे. परंतु अशी करवाई झालेली नाही.

3.उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भाखस-1088 उद्योग-6 दि.02/01/1992 मधील परिच्छेद 8.4 मधील तरतुदीनुसार खरेदी केलेले कापड विहित दर्जाचे पुरवल्याबाबत महाराष्ट्र राज्य वस्त्रोउद्योग महामंडळ/महाटेक्स/टेक्सकॉम/महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांचेकडून तपासणी करुन तसा तपासणी अहवाल ठेवणे आवश्यक आहे. परंतु तशी तपासणी केलेली दिसुन येत नाही. तसेच विहित दर्जाचे कापड पुरवठा केल्याची खात्री होत नाही.

4.निविदा सुचनेतील अटी व शर्ती मधील क्र. 1(ब) नुसार निविदाकाराकडे खरेदी करण्यात येणाऱ्या मालाचे संस्था नोंदणी अथवा दुकान नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तथापि मंजुर करण्यात आलेले निविदाधारक मे. मोहीत एन्टरप्राइझेस यांचेकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणीपत्र स्टेशनरी, इलेक्ट्रिक गुडस, हार्डवेअर, फर्निचर व कन्झुमर गुडस म्हणून नोंदलेले आहे गणवेष कापड साहीत्य विक्री बाबतचा नोंदणी प्रमाणपत्र उल्लेख नसतांना पुरवठा दारास पुरवठा आदेश देण्यात आला आहे. पुरवठादाराकडे गणवेष कापड पुरवठा केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र नाही. तसेच अ व ब मधील क्र. 1(ड) नुसार निविदाकाराकडे आयकर भरणा केलेल चलण असणे जरुरी आहे. पुरवठादाराकडे दुकान किंवा संस्थेच्या नावे आयकर भरणा केलेले  चलन श्री हिरो रमेशलाल पंजाबी असे वैयक्तिक नावाने चलन सादर केले आहे सदर बाब ही अट क्र.1 (ड) चे उल्लंघन करणारी आहे.

5.निविदा मागविण्यापूर्वी बाजारभावाच्या दराबाबत खात्री करणेसाठी बाजारातूल संबंधित वस्तुचे दर विचारात घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कारवाई झाली नाही. त्यामुळे पुरवठाराचे मान्य केले दर बाजारभावानुसार वाजवी असल्याची खात्री होत नाही.

6.करारनामा व पुरवठा आदेशात वस्तु पुरवठयाच्या कालावधीत विसंगती दिसुन आली आहे. मालाचा पुरवठा आदेश दि.31/12/2011 रोजीचा आहे. तथापि करारनाम्या वरील तारीख 04/01/2011 अशी पुरवठा आदेशापूर्वीची नोंद केल्याचे दिसुन येते.

7.पुरवठादारास आदेश क्र.263 दि.31/12/2011 अन्वये पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि मालाचा पुरवठा केल्याबाबतचे चलनावर माल प्राप्त झाल्याची दिनांक नोंद नसल्याचे दिसुन येते. याबाबत अर्धसमास पत्र क्र.33 दि.14/07/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालनाची तपासणी करुन आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKCM7101 (Ref No : 84, Hmm No : 33)

# कलम ९ क खालील आक्षेप

## लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

**-------------------- निरंक -------------------**

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *50 खेमानी नाल्यातील कचरा बाहेर काढण्यासाठी खाजगी ठेकेदारामार्फत चार महिन्याकरिता मजूर व मुकादम पुरविणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 361847.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 340137.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 21710.00/-

***कामाचे स्वरूप नाल्यातील कचरा काढणेचे असल्याने नाल्यातील काढावयाच्या कचऱ्याचे परिमाण निश्चित करून प्रचलित जिल्हा/ एम.जे.पी.दरसूचीतील दरानुसार अंदाजपत्रक बनविणे आवश्यक असताना 2011-12 च्या एम.जे.पी. दरसूचीतील मजूर व मुकादम यांचे प्रती दिन दरानुसार अंदाजपत्रक तयार करणेत आल्याने नाल्यातून किती कचरा काढायचा याचे परिमाण निश्चित न करता कामगार व मुकादम यांचे कामास आवश्यक दिवस निश्चित केल्याने केलेले अंदाजपत्रक वास्तववादी नसणे व त्यामुळे केलेल्या कामानुसार ठेकेदारास प्रदान झाल्याची पडताळणी करता न येणे, नाल्यातून किती कचरा बाहेर काढला याचा तपशील व कामावर हजर मुकादम व मजूर यांचे हजेरीपत्रक नस्ती व प्रमाणकासोबत नसणे,कामाची मोजमाप पुस्तिका क्र.50(सी) तपासणीस उपलब्ध न करणे,कामाच्या देयकातून 5% कार्यकंत्राट कर रु.18,092 व 1% लेबर सेस रु.3,618 कपात न करणे, कामाचे आदेश दि.19.05.2012 रोजी देवून काम दि.17.07.2012 रोजी पूर्ण झाले असताना ठेकेदारास कामाचे प्रदान दि.11.09.2013 रोजी दीर्घ विलंबाने करणे.***

महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या खेमानी नाल्यातून खूप कचरा नदीत येत असल्याने तो पम्पिंगच्या इंटेक व्हॉल्व्हजवळ जमा होऊन पंपिंग मध्ये अडकतो. त्यामुळे नाल्यातील कचरा काढण्यासाठी मजूर व मुकादम खाजगी ठेकेदारामार्फत पुरवून कचरा काढणेचे काम करून घेणेत आले आहे. सदर कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- महापालिका आयुक्त मान्यता दिनांक नमूद नाही.
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.3,61,847. ता.म.क्र.02 दि.13.04.2012 कार्यकारी अभियंता.
3. मंजूर निविदा रक्कम रु. 3,61,847. जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ,ठाणे यांची शिफारस.
4. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-1 महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे. गीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित,उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./536 दि.19.05.2012 (अंदाजपत्रकीय दर)

8. करारनामा-रु.100.
9. कामाचा कालावधी - 4 महिने.
10. काम पूर्ण दि.-17.07.2012
11. एकूण खर्च रु.3,61,847 (प्र.क्र.2288 दि.11/09.2013 प्रथम व अंतिम देयक)

12. मोजमाप पुस्तक क्र.- 50(सी) पृ.क्र.109 ते 110

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व देयकाची नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.45 दि.27.07.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे स्वरूप नाल्यातील कचरा काढणेचे असल्याने नाल्यातील काढावयाच्या कचऱ्याचे परिमाण निश्चित करून प्रचलित जिल्हा/एम.जे.पी. दरसूचीतील दरानुसार अंदाजपत्रक बनविणे आवश्यक असताना 2011-12 च्या एम.जे.पी. दरसूचीतील मजूर व मुकादम यांचे प्रती दिन दरानुसार मजूरांचे 1040 दिवसाचे दर रु.314.60 व मुकादम यांचे 104 दिवसाचे दर रु.330.30 नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. नाल्यातून किती कचरा काढायचा याचे परिमाण निश्चित न करता कामगार व मुकादम यांचे कामास आवश्यक दिवस कसे निश्चित करण्यात आले याचा खुलासा झाला नाही. परिणामी केलेले अंदाजपत्रक वास्तववादी नाही. त्यामुळे केलेल्या कामानुसार ठेकेदारास प्रदान झाल्याची पडताळणी करता आली नाही.

2) नाल्यातून किती कचरा बाहेर काढला याचा तपशील व कामावर हजर मुकादम व मजूर यांचे हजेरीपत्रक नस्ती व प्रमाणकासोबत नसल्याने मजुरांच्या 1040 दिवसांचे व मुकादम यांचे 104 दिवसांचे केलेले प्रदान योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) कामाची मोजमाप पुस्तिका क्र. 50(सी) तपासणीस उपलब्ध झाली नाही.तसेच ठेकेदाराने कामगारांचा विमा काढल्याची पावती नस्तीत आहे.तथापि याबाबतची पॉलिसि नस्तीसोबत नाही. त्यामुळे किती कामगारांचा विमा काढला याची पडताळणी करता आली नाही.

4) कामाच्या देयकातून 5% कार्यकंत्राट कर रु.18,092 व 1% लेबर सेस रु.3,618 कपात करण्यात आला नाही. त्यामुळे सदर रक्कमेची सबंधीताकडून वसुली करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) कामाचे आदेश दि.19.05.2012 रोजी देवून काम दि.17.07.2012 रोजी पूर्ण झाले असताना ठेकेदारास कामाचे प्रदान दि.11.09.2013 रोजी दीर्घ विलंबाने करण्यात आले आहे.

उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.21,710 वसूलपात्र व रक्कम रु.3,40,137 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.3,40,137.
वसूलपात्र रक्कम रु.21,710.

DATBEPM6101 (Ref No : 2, Hmm No : 45)

## *51 वार्ड क्र. 21 मधील बॅरेक क्र. 1135, 1136, 1137 व 1139 येथे 225 मिमी. व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 642956.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 636485.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6471.00/-

***कामांच्या अंदाजपत्रकात नमूद बाबींच्या दराबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 2012-13 ची जिल्हा दरसूची तपासणीस उपलब्ध न होणे, कामांच्या मोजमाप पुस्तिका क्र.14 लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध न करणे, कामाच्या केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे,आवश्यकतेपेक्षा भरावासाठी जादा साहित्य वापरल्याचे दर्शविल्याने रु.3,600 चे जादा प्रदान, महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौख/10/1009/सिआर 309/ख दि.11/02/2010 नुसार कामात वापरलेल्या साहित्याचे स्वामित्वधन रु.2,871 शासन खाती भरणा केल्याची खात्री देयकाचे प्रदान करताना न करणे, कामात वापरलेल्या पाईपचे इन्स्पेक्शन अहवाल नस्ती व देयकासोबत नसताना प्रदान करणे.***

उपरोक्त नमूद ठिकाणी 225 मिमी.व्यासाची मलवाहिनी टाकणे या कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- महापालिका अतिरिक्त आयुक्त दिनांक 03.01.2014.
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.6,43,422 ता.म.क्र.164 दि.08.01.2014 कार्यकारी अभियंता.
3. मंजूर निविदा रक्कम रु. 6,43,422. जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ,ठाणे यांची शिफारस.
4. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-4 अंडर ग्राउंड ड्रेनेज जोडणी साहित्य खरेदी,महसुली खर्च.
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे. नालंदा मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित,उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./220 दि.05.02.2014 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा - रु.100.
9. कामाचा कालावधी - 30 दिवस.
10. काम पूर्ण दि.-20.02.2014
11. एकूण खर्च रु.6,42,956(प्र.क्र.5708 दि.11/03.2014 प्रथम व अंतिम देयक)

12. मोजमाप पुस्तक क्र.-14 पृ.क्र.37 ते 41.

सदर कामाचे अंदाजपत्रक,प्रशासकीय मंजुरी नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून आढळून आलेल्या

अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.79 दि.29/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अनुक्रमे सन 2012-13 च्या जिल्हा दरसूचीतील दरानुसार करण्यात आले आहे. तथापि सदरच्या दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध करून न दिल्याने अंदाजपत्रकात नमूद दर अचूक असल्याची खात्री करता आली नाही.

2) कामांच्या नोंदी अनुक्रमे मोजमाप पुस्तिका क्र.14 पृ. क्र.37 ते 41 मध्ये घेतल्याचे देयकात नमूद करण्यात आले आहे. तथापि सदर मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न झाल्याने केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) कामाच्या केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

4) कामात 200 मिमी.व्यासाचे 220 र.मी.आर.सी.सी.एन.पी.-2 क्लास पाईप टाकणे व 50 चेंबर बांधणेचे काम करण्यात आले आहे. त्यासाठी 215.5 घ.मी.खोदाई करणेत आली आहे.त्यातील 128.81 घ.मी.खोदाईचे साहित्य पाईप भरावासाठी वापरून उर्वरित 86.69 घ.मी. साहित्य बाहेर नेवून टाकले आहे. प्रत्यक्षात खोदाई केलेल्या भागात केलेले पी.सी.सी. काम 17.60 घ.मी.,खडीचा भराव 40.62 घ.मी.व पाईपचे आकारमान 6.90 घ.मी. तसेच 50 नग चेंबरचे 76.11 आकारमान असे एकूण 141.23. घ.मी. परिमाण वजा जाता 74.27 घ.मी.साहित्य भरावासाठी वापरणे आवश्यक असताना 128.81 घ.मी.साहित्य वापरल्याचे दर्शविल्याने जादा दर्शविलेलेल्या 54.54 घ.मी. परिमाणाचे चे दर रु.66 प्रती घ.मी.नुसार रु.3,600 चे जादा प्रदान झाले आहे. सदर जादा प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

5)कामात 40.62 घ.मी.खडीचा भराव पी.सी.सी.पूर्वी करणेत आला आहे. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.गौख/10/1009/सिआर-309/ख दि.11/02/2010 नुसार कामात वापरलेल्या सदर साहित्याचे स्वामित्वधन रु.2,871 शासन खाती भरणा केल्याची खात्री देयकाचे प्रदान करताना करण्यात आली नाही. त्यामुळे सदरची रक्कम रु.2,871 सबंधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6)पाईप पुरविणे, जोडणे व बसविणे या अंदाजपत्रकातील बाबीत पाईपचे इन्स्पेक्शन करणे नमूद आहे. तथापि कामात वापरलेल्या पाईपचे इन्स्पेक्शन अहवाल नस्ती व देयकासोबत नसताना प्रदान केले आहे. इन्स्पेक्शन अहवाला अभावी कामात वापरलेले पाईप योग्य तांत्रिक दर्जाचे असल्याची खात्री करता आली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.6,471.

आक्षेपाधीन रक्कम रु.6,36,485.

DATBEPM6101 (Ref No : 6, Hmm No : 79)

## *52 पाणी पुरवठा विभागातील जमेचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील 2013-14 मधील जमा पडताळणीसाठी माहिती उपलब्ध करुन न दिल्याने पाणीपुरवठा विभागातील जमेचे लेखापरीक्षण करता आले नाही.***

राष्ट्रीय लेखा संहीता 2004 मधील नियम क्र. 9.3 मध्ये पाणी परुवठा कर आकारणी बाबतची तरतुद विषद केली आहे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी कर आकारणी बाबत कोणती पध्दत अवलंबली जाते तसेच 2013-14 व 2014-15 मधील पाणी पुरवठा विषयक एकुण जमेची सांखीकी माहिती खालील मुददे विचारात घेउन लेखा परीक्षणास सादर करणेबाबत अर्धासामास पत्र. क्र.31 दि.11/07/2016 नुसार विचारणा करण्यात आली होती तथापि लेखे उपलब्ध करून न दिल्याने पुढील लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेची अनियमितता कायम करण्यात येत आहे.

1) पाणी कर
2) मलनिंसारण कर
3) पाणी पुरवठा मुल्य
4) मलनिंसारण मुल्य
5) पाणी पुरवठा मिटर भाडे
6) पाणी पुरवठा नवीन जोडणी मुल्य
7) पाणी पुरवठा टॅकर मुल्य
8) रस्ता दुरुस्ती भरपाई मुल्य
9) नोटीस फी
10) वारंट फी
11) दंडात्मक रक्कम
12) थकीत रक्कम
13) बुडीत रक्कम

वरील बाबी विचारत घेउन 2013-14 व 2014-15 मधील पाणी पुरवठा विषयक जमा नोंदवहया व जमा रोखवहया तसेच जमेची बॅक विवरणपत्रे (Bank Statement) लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही.

DATAPJF8101 (Ref No : 75, Hmm No : 31)

## *53 प्रभाग क्र.16 मध्ये विविध ठिकाणी पेव्हमेंट व नाली बसविणेच्या खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

उल्हासनगर महानगरपालिका

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 10182.00/-

| |
|---|
| ***महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जीईएन 1098/1357/प्र.क्र./166/98 नवि-24 नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.03/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली उतरविणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा उतरविलेला नाहीमहापालिका आयुक्तांनी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजुरी दिलेल्या कामासंदर्भात स्थायी समितीस कळविलेले नाही. स्वामित्वधनाची रक्कम रू.1413 शासनाकडे भरल्याची पावती लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नाही. वाहतुक खर्च रक्कम रू.3040 जास्त दाखविण्यात आला असून तो वसूल केलेला नाही.*** |

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.16 मध्ये विविध ठिकाणी पेव्हमेंट व नाली बसविण्यासाठी मा.जिल्हा उपनिबंधक ठाणे यांनी वितरण केलेल्या आदेशानुसार अलका मजुर कामगार सहकारी संस्था उल्हासनगर यांना महापालिकेकडून विनानिविदा काम देण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| अंदाजपत्रक्रीय रक्कम | : 750000 |
| वित्तीय व प्रशासकीय मान्यता | : मा.आयुक्त 23/12/2012 |
| तांत्रिक मान्यता क्र.वदिनांक | : कार्यकारी अभियंता 6539 दि.15/12/2011 |
| जिल्हा उपनिबंधक यांचे काम वाटप पत्र | : 6031 दि.02/01/2012 |
| कामाची कालावधी | : 150 दिवस |
| कामाचे आदेश क्रमांक व दि. | : umc/pwd/ee 3598 दि.02/01/2012 |
| कामावरील खर्च | : 572943 |
| कंत्राटदाराचे नाव | : अलका मजुर कामगार सहकारी संस्था मर्यादित, उल्हासनगर |

प्रमाणक क्र.3075 दि.30/10/2013 अन्वये ठेकेदारास 498461 रू. प्रदान करण्यात आले आहे धनादेश क्र. 79961 हा आहे. अर्धसमास पत्र क्र. 50 दि. 29/07/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.याबाबत खालील अनियमितता दिसून येतात.

1) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जीईएन 1098/1357/प्र.क्र./166/98 नवि-24 नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.03/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली उतरविणे आवश्यक आहे. परंतु प्रमाणका बरोबर विम्याची कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरी एकुण खर्चाच्या 1% रक्कम रू.5729 ठेकेदाराकडून वसुल केल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणास दाखविण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील प्रकरण क्र.73(ड) नुसार 25 लाख पेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्गत असलेल्या अशा आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्यांनी अशी संविदा केलेल्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविले पाहिजे. असे असतांनाही या नियमानुसार कार्यवाही झाली असले बाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका परि.क्र.24 मधील नियम क्र.8(एच) नुसार झालेल्या कामाची 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय

मोजमाप पुस्तिकेत नोंदलेले नाहीत.

4) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र.12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर अभिलेखे प्रमाणकासोबत जोडलेले नाहीत.

5) महसुल व वनविभाग शा.नि.क्र.गोणे/खनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/12/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेले वाळु,खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजाचे स्वामित्वधन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधणकारक आहे (परिमाण 20 घ.मी) 20X70.67=1413 रू.शासनाकडे भरल्याची पावती लेखा परिक्षणास दाखविण्यात आलेली नाही.

6) वाळु व खडी वाहतूक 97.39 घनमीटर झाल्याचे मोजमाप पुस्तिकेत दिसून येते. परंतु 129.53 घनमीटर झाल्याचे मोजमाप पुस्तिकेत दाखविले आहे. एकुण 32.14 घमी जास्त दाखविण्यात आले आहे त्यासाठी 32.14 घमीX 94.60 रू.दर याप्रमाणे 3040 रू. वाहतुक खर्चाचे जास्त प्रदान झाले आहे रक्कम रू.3040 वसुल करणेत आलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 23, Hmm No : 50)

## *54 उल्हासनगर मनपा उद्याना जवळ व आस्था हॉस्पिटल समोर सि.सि.पेव्हमेंट व नाली बसविणेच्या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 11370.00/-

***महापालिका आयुक्तांनी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजुरी दिलेल्या कामासंदर्भात स्थायी समितीस कळविलेले नाही. ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमा पत्राखाली उतरविला नाही. सदर जागेवर यापूर्वी केलेल्या कामाची इतिहास नोंदवही (History Register) ठेवण्यात आली नाही. झालेल्या कामाची 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही.माल वाहतूक खर्च रक्कम रूपये 5162 जास्त दाखविण्यात आला आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका उद्यानाजवळ व आस्था हॉस्पिटल समोर सि.सि.पेव्हमेंट व नाली बसविण्यसासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांनी वितरण केलेल्या आदेशानुसार मेसर्स स्टॅण्डर्ड मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. उल्हासनगर यांना विना निविदा काम देण्यात आले आहे.

अंदाजपत्रकिय रक्कम : 621600

प्रशासकिय व वित्तीय मान्यता : मा. आयुक्त दि.10/09/2013

तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक : कार्यकारी अभिंयता 1132 दि.11/07/2013
जिल्हा उपनिबंधक ठाणे यांचे कामवाटप पत्र : 2430 दि. 26/09/2013
कामाचे आदेश : UMC/PWD/EE/585 दि.30/09/2013
कामाचा कालावधी : 150 दिवस
काम पूर्ण झाल्याची तारीख : 10/10/2013
कामावरील खर्च : 620799

प्रमाणक क्र. 3049 दि. 30/10/2013, धनादेश क्रमांक 79970 अन्वये रक्कम रुपये 532335 प्रदान झाले आहे. अर्धसमास पत्र क्र.52 दि. 29/07/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील प्रमाणे अनियमितता आहेत.

1) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील प्रकरण क्र. 73(ड) नुसार 25 लाख पेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्गत असलेल्या अशा आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्यांनी अशी संविदा केलेल्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविले पाहिजे. असे असतांनाही या नियमानुसार कार्यवाही झाली असले बाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.जी.ईएन1098/1357/प्र.क्र.166/98 नवि-24 नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई दि. 3/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमा पत्राखाली उतरविणे आवश्यक आहे कामावरील खर्च रक्कम रूपये 620799 च्या 1% रक्कम रूपये 6208 वसूल केलेली नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये व बांधकामाचे अंदाज, नगरपालिका अभियंता यांच्याकडून प्रशासनिक मंजुरीसाठी रेखाकिंत नकाशे, प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपाशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. महराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971च्या नियम क्रमांक.165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरिक्षण अतिंम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर करणे आवश्यक आहे. परंतु या बाबतचे अभिलेखे प्रमाणकासोबत नाही. त्याचप्रमाणे सदर जागेवर यापूर्वी केलेल्या कामाची इतिहास नोंदवही (History Register) ठेवलेली नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनियमातील परिच्छेद क्र. 24 मधील नियम क्र. 8(एच) नुसार झालेल्या कामाचे 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. झालेल्या कामाबाबतचे कार्यकारी अभिंयता यांचे निरिक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणावरील भेट नोंदवही ठेवलेली नाही.

5) मोजमाप पुस्तिका क्र.3601 ची तपासणी केली असता 258.1 घमी इतकी मालाची वाहतुक झालेली आहे. परंतु मोजमाप पुस्तिकेत 284 घमी इतका दाखवलेली आहे (284-258.1=25.9) एकुण 25.9 घनमीटर जास्त दाखविलेली आहे.

(25.9 घमीX199.32 रू. दर= 5162 रू.) जास्त प्रदान झालेला वाहतुकीचा खर्च रक्कम रुपये 5162 वसूल केलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 24, Hmm No : 52)

## *55 उल्हासनगर मनपा क्षेत्रातील प्रभाग 11- मध्ये गारुडीपाडा येथे बॅरेक क्रमांक 1201 जवळ आरोग्य केंद्र बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 100890.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14623.00/-

***ठेकेदाराने कंत्राटकामाचा विमा उतरविल्याचे कागदपत्र प्रमांणका सोबत जोडलेले नाही. प्राकलन रक्कमेपेक्षा 10 टक्के रक्कम वाढवून दिल्याबाबतचे सबळ कारण प्रमाणका सोबत जोडलेले नाही. त्याचप्रमाणे सदर थकलेल्या कामाची इतिहास नोंदवही ठेवण्यात आली नाही. मंजुरी दिलेल्या कामासंदर्भात स्थायी समितीस कळविलेले नाही. स्वामित्वधनाची रक्कम शासनाकडे भरलेली नाही.***

उल्हासनगर मनपा क्षेत्रातील प्रभाग -11 मध्ये गारुडीपाडा येथे बॅरेक क्र. 1201 जवळ आरोग्य केंद्र बांधण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक ठाणे यांनी वितरण केलेल्या कामवाटप शिफारशीनुसार मेसर्स वणीदेवी मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. उल्हासनगर यांना विनानिविदा महापालिकेने काम दिले आहे.

प्राकलन रक्कम रू. : 999900/-
प्रशा. व वित्तीय मान्यता : मा. आयुक्त दि. 03/02/2011
तांत्रिक मान्यता : कार्यकारी अभियंता 4605 दि. 15/11/2010
जिल्हा उपनिबंधक यांचे शिफारस पत्र: 5648 दि. 14/02/2011
कामाचे आदेश : UMC/PWD/EE/2656 दि. 25/02/2011
कामाचा कालावधी : 180 दिवस
कामपूर्ण झालेले दि. : 24/05/2012
कामावरील एकुण खर्च : 1099890/-
मोजमाप पुस्तिका क्र. : 2952

प्रमाणक क्र. 1944 दि. 17/08/2013 धनादेश क्रमांक 59977 अन्वये ठेकेदारास 956903/- चे प्रदान करण्यात आले आहे. अर्धसमास पत्र क्र. 58 दिनांक 30/07/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही.
याबाबत खालील अनियमितता आहे.

1) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.ईएन 1098/357/प्र.क्र. 165/98 नवि - 24 नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई दि. 03/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व प्रमाणकाबरोबर विमा उतरविल्याचे कागदपत्र जोडलेले नाही तरी एकूण खर्च रक्कम रू.1099890/- च्या 1 टक्के रक्कम रूपये 10999/- ठेकेदाराकडून वसुल केलेली नाही.

2) आरोग्य केंद्र बांधण्यासाठी प्राकलन रक्कम व कामाचा कार्यादेश रक्कम रु. 999000/- असुन एकुण कामाचा खर्च रु. 1099890/- म्हणजेच प्राकलन रक्कमेपेक्षा 10 टक्के वाढ करुन दिलेला आहे. परंतु रक्कम वाढीबाबतची सबळ कारणे नस्तीत नमूद केलेली नाहीत.

3) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम- 1949 मधील प्रकरण क्र. 73(ड) नुसार 25 लाख पेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्गत असलेल्या अशा आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्यांनी अशी संविदा केलेल्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविले पाहिजे. असे असतांनाही या नियमानुसार कार्यवाही झाली असले बाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये व बांधकामाचे अंदाज नगरपालिका

अभियंता यांच्याकडून प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे प्राथमिक अंदाज ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर करणे आवश्यक आहे. परंतु या बाबतचे अभिलेखेप्रमाणकासोबत नाही. त्याचप्रमाणे सदर जागेवर यापूर्वी केलेल्या कामाची इतिहास नोंदवही (History Register) ठेवण्यात आलेली नाही.

5) महसुल व वनविभाग यांची अधिसुचना 10/02/2003 व शा.नि.क्र. गौण खनिज 10/1009 सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळु, खडी, मुरुम इत्यादी गौण खनिजाचे स्वामित्वधन रक्कम शासनाकडे भरणे आवश्यक आहे. 51.28 घमी स्वामित्वधन वापरण्यात आलेचे मोजमाप पुस्तिकेत दिसून येते (51.28 घमी X 70.67 दर = 3624) रक्कम रु. 3624 शासनाकडे भरल्याची पावती लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 25, Hmm No : 58)

## *56 प्रभाग क्र. 59 मधील बॅरेक क्रमांक 1666 जवळ सरस्वती शाळा रोड येथे समाजमंदिर बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 5149.00/-

***समाजमंदिराचे बांधकाम महापालिकेच्या जागेत केलेले आहे, याबाबतचे अभिलेखे प्रमाणका बरोबर जोडलेले नाही कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा उतरविल्याचे कागदपत्र जोडलेले नाही. स्थानिक संस्था कराची 0.25 टक्के रक्कम कपात केलेली नाही. मंजूर केलेल्या कामासंदर्भात स्थायी समितीस कळविण्यात आलेले नाही. झालेल्या कामाबाबतचे कार्यकारी अभियंता यांचे निरिक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणावरील भेट नोंदवही ठेवलेली नाही. कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/ साहित्याच्या वाहतुकीचे पास, इनव्हाईस/ त्याच्या खरेदीचे चलन, प्रमाणकासोबत जोडलेले नाही. ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम शासनाकडे भरल्याची पावती लेखापरीक्षणास सादर केली नाही.***

उल्हासनगर प्रभाग क्र. 59 मधील बॅरेक क्रमांक 1666 जवळ सरस्वती शाळा रोड येथे समाज मंदिर बांधण्यासाठी जिल्हा उपनिबंधक ठाणे यांनी वितरण केलेल्या कामवाटप शिफारशीनुसार मेसर्स जगदंबा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. अंबरनाथ जिल्हा. ठाणे यांना विनानिविदा महापालिकेने काम दिले आहे.

लेखाशिर्ष : C-4(3) P II
प्राकलन रक्कम रू. : 950000
प्रशा. व वित्तीय मान्यता : आयुक्त दि.10/01/2011

उल्हासनगर महानगरपालिका

तांत्रिक मान्यता : कार्यालयीन आदेश क्र. 4617 दि.15/11/11

जिल्हा उपनिबंधक ठाणे यांचे: जा.क्र.ठाणे/म.का.स/कामवाटप/6814 दिनांक 10/03/2011

शिफारस पत्र

कामाचे आदेश : UMC/PWD/EE 2857 दि. 10/03/2011

ठेकेदाराचे नाव : मे. जगदंबा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.

कालावधी : 180 दिवस

कामपूर्ण : 27/09/2011

कामावरील खर्च : 1042439

मोजमाप पुस्तिका : 2536 पान क्र. 1 ते 17

प्रमाणक क्रमांक 5367 दि. 01/03/2014 रक्कम रू.906922 धनादेश क्र.059977 अन्वये प्रदान करण्यात आले आहे अर्धसमास पत्र क्र.60 दि. 20/08/2016 नुसार निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील प्रमाणे अनियमितता आहे.

1) नगर विकास विभाग शासन परिपत्रक दि. 07/04/1994 नुसार समावेषक आरक्षणातून मनपास प्राप्त झालेल्या मालमत्ता/भुखंड मनपाच्या ताब्यात/नावावर असणे आवश्यक आहे. समाजमंदिराचे बांधकाम महापालिकेच्या जागेतच केलेले आहे याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

2) महराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.ईएन 1098/357/प्र.क्र. 165/98 नवि- 24 नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई दि. 03/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा उतरविल्याचे कागदपत्र जोडलेली नाही. एकूण खर्चाच्या 1टक्के रक्कम रू.29996 ठेकेदाराकडून वसुल करण्यात आली नाही.

3) महारष्ट्र मनपा (स्थानिक संस्था कर) नियम-27(5) नुसार महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही काम हाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मुल्याच्या एकुण रक्कमेच्या 0.25 टक्के इतक्या ठोक दराने उक्त कर प्रदान करण्याचा पर्याय असेल. समाजमंदिराच्या बांधकामावर एकुण खर्च **रक्कम** रु.1042439 इतका झालेला आहे. प्रमाणक क्र.5367 दि. 01/03/2014 अन्वये रक्कम रू.906922 प्रदान करण्यात आली असुन सदर रक्कमेतुन स्थानिक संस्था कराची 0.25 टक्के रक्कम रूपये 2606 कपात केलेली नाही (1042439 X 0.25टक्के=2606)

4) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम- 1949 मधील प्रकरण क्र.73(ड) नुसार 25 लाख पेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्गत असलेल्या अशा आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्यांनी अशी संविदा केलेल्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविले पाहिजे. असे असतांनाही या नियमानुसार कार्यवाही झाली असले बाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनियमातील परिच्छेद क्र. 24 मधील नियम क्र.8(एच) नुसार झालेल्या कामाची 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे झालेल्या कामाबाबतचे कार्यकारी अभिंयता यांचे निरिक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणावरील भेट नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

6) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र.12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.परंतु अशी कारवाई झालेली नाही.

7) महसुल व वन विभाग यांची अधिसुचना 10/02/2003 व शा.नि.क्र. गौण खनिज 10/1009 सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळु,खडी,मुरुम इत्यादी गौण खनिजाचे स्वामित्वधन रक्कम शासनाकडे भरणे आवश्यक आहे. 35.86 घमी स्वामित्वधन वापरण्यात आलेचे मोजमाप पुस्तिकेत दिसून येते (35.86 घमी X 70.67 दर = 2543) रक्कम रु. 2543 शासनाकडे भरल्याची पावती लेखापरिक्षणास सादर केलेली नसल्यामुळे रक्कम रू.2543 वसूल पात्र आहे.

DATPKCM7101 (Ref No : 26, Hmm No : 60)

## *57 प्रभाग क्र.15 मधील निळकंठ अपार्टमेंट ते पोलिस प्लॉट पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे व C.C.M-350 रस्ता बनविणेच्या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 12372.00/-

***ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली उतरविलेला नाही. माल/इनव्हाईस मालाच्या वाहतुकीचे पास, साहित्याच्या खरेदीचे चलन/प्रमाणका सोबत नाहीत. सदर जागेवर यापूर्वी केलेल्या कामाची इतिहास नोंदवही (History Register) ठेवण्यात आली नाही झालेल्या कामाबाबतचे कार्यकारी अभियंता यांचे निरिक्षण अहवाल प्रमाणकासोबत नाही तसेच कामाच्या ठिकाणावरील भेट नोंदवही ठेवण्यात आली नाही स्थानिक संस्था कराची रक्कम 0.25टक्के प्रमाणे 2474 रुपये वसुल केलेली नाही. स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेतलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.15 मध्ये निळकंठ अपार्टमेंट ते पोलीस प्लॉट पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे तसेच C.C.M-350 रस्ता बनविणेच्या कामासाठी मा. जिल्हा उपनिबंधक यांनी विरतण केलेल्या आदेशानुसार शेरावाली मजुर कामगार सहकारी संस्था यांना महापालिकेकडून विनानिविदा काम देण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| लेखाशिर्ष | : | C-4(6) P II |
| प्राकलन रक्कम रू. | : | 998725 |
| प्रशा व वित्तीय मान्यता | : | आयुक्त दि. 03/02/2011 |
| तांत्रिक मान्यता | : | कार्यालयीन आदेश क्र.4809, दि. 13/01/2011 |
| जिल्हा उपनिबंधक ठाणे पत्र | : | जा.क्र.ठाणे/म.का.स/कामवाटप/5266 दिनांक 28/01/2011 |
| कामाचे आदेश | : | UMC/PWD/EE 2587 दि. 03/02/2011 |
| ठेकेदाराचे नाव | : | शेरावाली मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. |
| कालावधी | : | 180 दिवस |
| कामपूर्ण | : | 10/05/2011 |
| कामावरील खर्च | : | 989789 |
| मोजमाप पुस्तिका | : | 2890 पान क्र. 1 ते 5 |

प्रमाणक क्र.4262 दि. 08/01/2014 रक्कम रू.851219 धनादेश क्र. 989789 अन्वये ठेकेदारास प्रदान करण्यात आले आहे. अर्धसमास पत्र क्र.61 दि. 20/08/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही याबाबत खालील अनियमितता आहे.

1) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जीईएन 1098/1357/प्र.क्र./166/98 नवि 24 नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई दि. 03/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली उतरविणे आवश्यक आहे. तरी एकुण खर्चाच्या 1 टक्के रक्कम रु. 9898 ठेकेदाराकडून वसुल केल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणास दाखविण्यात आले नाहीत.
2) राष्ट्रीय लेखा संहिता नियम क्र.12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे सदर अभिलेखे प्रमाणकासोबत जोडलेली नाहीत.
3) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये बांधकामाचे अंदाज नगरपालिका अभियंता यांच्याकडून प्रशासनिक मंजुरीसाठी रेखाकिंत नकाशे प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण, अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्या अगोदर करणे आवश्यक आहे. परंतु याबाबतचे अभिलेखे प्रमाणकासोबत नाही. त्याचप्रमाणे सदर जागेवर यापूर्वी केलेल्या कामाची इतिहास नोंदवही (History Register) ठेवण्यात आलेली नाही.
4) सार्व. बांधकाम विभागाच्या आधिनियमातील परिच्छेद क्र.24 मधील नियम क्र.8(एच) नुसार झालेल्या कामाचे 5टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे झालेल्या कामाबाबतचे कार्यकारी अभियंता यांचे निरिक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणावरील भेट नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.
5) सदर कामावरील एकुण खर्च 989789 रु. इतका झालेला आहे. परंतु प्रमाणक क्र.4262 दि. 08/01/2014 मधून स्थानिक संस्था कराची रक्कम 0.25 टक्के प्रमाणे रू. 2474 वसुल केलेली नाही.
6) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम -1949 मधील प्रकरण क्र.73(ड) नुसार मा. आयुक्तानी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजुरी दिलेल्या कामासदंर्भात मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे. याबाबतचे कार्यात्तर मंजुरीचे कागदपत्र लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 27, Hmm No : 61)

## *58 उल्हासनगर-4 विलास कंट्रीबार जवळ कल्व्हर्ट बनविण्याच्या खर्चातील अनियमितेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 4149.00/-

***मजूर कामगार सहकारी संस्थेस काम दिल्याचे जिल्हा उपनिबंधक ठाणे यांचे शिफारसपत्र प्रमाणकासोबत जोडले नाही. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी, दि. 30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार व तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि. क्र. सीए.टी***

***07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि.16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. परंतु जिल्हा उपनिबंधक, ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजुरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले आहे. जिल्हा उपनिबंधक ठाणे यांना महापालिकेने सदर मजुर सहकारी संस्थेस दिलेल्या वाढीव खर्चाच्या कामाच्या प्राकलना बाबत कळविले नाही. आयुक्त तसे तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजुरी दिलेल्या कामाबाबत स्थायी समितीस कळविलेले नाही. झालेल्या कामाबाबत कार्यकारी अभियंता यांचे निरिक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणा वरील भेट नोंदवही ठेवण्यात आली नाही. कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी इनव्हाईस/साहित्याच्या खरेदीचे चलन/अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त केलेले नाही. स्वामित्वधनाची रक्कम रू.4149 वसूल केलेली नाही.***

उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील विलास कंट्रीबार उल्हासनगर 4 येथील जिल्हा उपनिबंधक ठाणे यांनी वितरण केलेल्या आदेशानुसार कल्व्हेट बनविण्यासाठी मे. शिवानी मजुर सहकारी संस्था यांना महापालिकेकडून विनानिविदा काम देण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष | : D-(I) P II |
| प्राकलन रक्कम रू. | : 1424000 |
| प्रशा व वित्तीय मान्यता | : आयुक्त दि. 04/10/2013 |
| तांत्रिक मान्यता | : कार्यालयीन आदेश क्र.1241 दि. 24/09/201 |
| जिल्हा उपनिबंधक ठाणे यांचे | : दि.10/03/2011 चे शिफारस पत्र नस्तीत जोडलेले नाही. |
| कामाचे आदेश | : UMC/PWD/EE 436 दि. 03/07/2013 |
| ठेकेदाराचे नाव | : मे. शिवानी मजुर सहकारी संस्था |
| कालावधी | : 180 दिवस |
| कामावरील खर्च | : 1416225 |
| मोजमाप पुस्तिका | : 3584 पान 1 ते 4 |

प्रमाणक क्र.422 दिनांक 03/01/2014 धनादेश क्रमांक 937868 अन्वये रक्कम रू.1228575 चे प्रदान करण्यात आले आहे अर्धसमास पत्र क्र.76 दि. 24/08/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही याबाबत खालील प्रमाणे अनियमितता आहे.

1) विलास कंट्रीबार, उल्हासनगर-4 येथील कल्व्हर्ट बनविण्यासाठी रक्कम रू.928100 या खर्चास मा. आयुक्त यांनी प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली होती. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक ठाणे यांनी मेसर्स शिवानी मजुर सहकारी संस्थेस काम देण्याची शिफारस केल्यामुळे सदर संस्थेस विनानिविदा काम देण्यात आले होते. प्रमाणकासोबत जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांचे शिफारसपत्र जोडलेले नाही. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी दि.30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार व तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि.क्र.सीए.टी 07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि.16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजुरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले आहे. तसेच

सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर मनपा यांचे फेरसादर पत्र क्र. सप्टेंबर 2013 नुसार सदर कामावर तयार करण्यात आलेल्या प्राकलनपेक्षा अतिरिक्त कामे केल्याने जास्त खर्च झाला आहे त्यामुळे सदर कामाचे रु.1424000 एवढया रक्कमेचे सुधारित प्राकलन तयार करण्यात आले असता मा. आयुक्त यांनी दि. 04/10/2013 रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे परंतु सदर वाढीव प्राकलनाच्या खर्चाबाबत जिल्हा उपनिबंधक ठाणे, यांना सदर मजुर सहकारी संस्थेस वाढीव कामाच्या खर्चाबाबत कळवून मान्यता घेतल्याचे पत्र प्रमाणकासोबत जोडलेले नाही.

2) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 मधील प्रकरण क्र.73 (ड) नुसार 25 लाख पेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्गत असलेल्या अशा आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्यांनी अशी संविदा केलेल्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविले पाहिजे. असे असतांनाही या नियमानुसार कार्यवाही झाली असले बाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनियमातील परिच्छेद क्र. 24 मधील नियम क्र. 8 (एच) नुसार झालेल्या कामाचे 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे झालेल्या कामाबाबतचे कार्यकारी अभिंयता यांचे निरिक्षण अहवाल तसेच कामाच्या ठिकाणा वरील भेट नोंदवही ठेवलेली नाही.

4) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र.12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेखे रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

5) महसुल व वन विभाग यांची अधिसुचना 10/02/2003 व शा.नि.क्र. गौण खनिज 10/1009 सीआर/309/ख दि. 11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळु, खडी, मुरुम इत्यादी गौण खनिजाचे स्वामित्वधन रक्कम शासनाकडे भरणे आवश्यक आहे. 58.71 घमी स्वामित्वधन वापरण्यात आलेचे मोजमाप पुस्तिकेत दिसून येते (58.71 घमी X 70.67 दर = 4149) रक्कम रु.4149 शासनाकडे जमा केल्याची पावती लेखा परिक्षणास सादर केली नसल्यामुळे रक्कम रू.4149 वसुल पात्र आहे.

6) प्राकलनात नमुद केलेले साहित्य हे सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांची दरसुची 2011-2012 चा वापर केल्याचे कामाचे आदेशात नमुद आहे. परंतु वापरलेले साहित्य, दरसुचिच्या कोणत्या पानावरील आहे हे प्राकलनात नमुद केले नाही. तसेच प्रमाणकासोबत दर पृथःकरण केल्याचे कागदपत्र जोडण्यात आले नाही त्यामुळे प्राकलन तपासतांना दर्शविलेल्या किंमतीचा मेळ घेता आला नाही.

DATPKCM7101 (Ref No : 28, Hmm No : 76)

## *59 कर निर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***कर निर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2004 मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवलेले नाही.*** |

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात कर निर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2004 मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे विहीत केलेल्या नमुन्यात महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे. परंतु विहीत नमुन्यात लेखे ठेवलेले नाहीत. याबाबत अर्धसमास क्र.162 दि. 30/11/2016 रोजी खुलासा मागविला असता उत्तर विचारात घेउन खालील अनियमितता दिसून येते.

1) महापालिकेने खालील विहीत नमुन्यात लेखे ठेवलेले नाहीत.

1) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा-11)
2) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा-12)
3) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा-20)
4) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा-21)
5) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा-22)
6) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा-23)
7) नोटीस फी वांरट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा-24)
8) परतावा, remission व write off नोंदवही (नमुना सर्वसा-25)
9) परतावा व remission गोषवारा विवरणपत्र.
10) काढून टाकलेल्या मालमत्ताचे गोषवारा विवरणपत्र (नमुन सर्वसा-26 तसेच या व्यतिरिक्त
11) दरवाढीचे गोषवारा विवरणपत्र (नमुणा P&OT-1)
12) मागणी व वाढचे जुळवणी गोषवारा विवरणत्र (नमुना P&OT-2)
13) वर्षानुसार सारांश विवरणपत्रे, मालमत्ता व इतर करांचे लेखाशिर्षानुसार जमा विवरणपत्रे (नमुना P&OT-3)
14) परतावा व सवलतीचे सारांश विवरणपत्र
15) वाढ व घट नोंदवही.

DATPKCM7101 (Ref No : 29, Hmm No : 162)

## *60 महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांच्या फायर वॉटर टेंडरचे फॅब्रिकेशनचे काम करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6860000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5960.00/-

***करारनाम्याच्या मुद्रांक शुल्कापोटी रक्कम रु.5960/- इतकी रक्कम वसुल करून शासनजमा करणे आवश्यक आहे. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.अशंस 2012/प्र.क्र.45/नवि-20 दि.31/03/2012 अन्वये महानगरपालिकेस वाहन खरेदीकरीता अनुदान प्राप्त झाल्यामुळे खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.***

कामाचे नाव- महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांच्या फायर वॉटर टेंडरचे शासनमान्य दरानूसार फॅब्रिकेशनचे काम करणे
प्रशासकीय मान्यता क्र.-स्थायी समिती ठराव क्र.22 दि.23/09/2012
कार्यादेश क्र.उमपा/134/12 दि.28/12/2012
कंत्राटदाराचे नाव- मे. विजय फायर व्हेईकल व पंप लि.मुंबई
कालावधी- 120 दिवस
शासकीय दरानूसार एकूण किंमत रु.1715000 चार वाहने रु.6860000/-
कंत्राटदाराकडून काम पुर्ण केल्यानंतर गाडया प्राप्त् दि.03/06/2013
प्रमाणक क्र.1053 दि.12/06/2013 रक्कम रु.6386660/-
उपरोक्त कामाबाबत निविदा नस्ती व देयकाच्या स्थळ प्रतीच्या नस्तीची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.96 दि.14/09/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09दि.20.07.2009 व मुद्रांक शुल्क अधिनियम 1959 मधील कलम 63 नूसार एकूण निवीदा रकमेच्या रु. 10 लक्षकरीता रु.100/- व पुढील प्रत्येक लक्ष रुपयास रु.100/- प्रमाणे कमाल रु.5,00,000/- इतक्या रकमेच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची रक्कम रु.6860000/-चा करारनामा रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. करारनामा रु.6060/- च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. तरी शिल्लक रक्कम रु.5960/- इतकी रक्कम वसुल करून शासनजमा करणे आवश्यक आहे. प्राप्त अनुपालनात वसुलीची कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

2) नगरविकास विभाग , शासन निर्णय क्र .अशंस 2012/प्र.क्र.45/नवि-20 दि.31/03/2012 अन्वये महानगरपालिकेस वाहन खरे दीकरीता अनुदान प्राप्त झाल्यामुळे खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे . प्राप्त अनुदानातून अग्निशमन केंद्र बांधण्याचे काम शिल्लक असल्याने काम पुर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात येईल, असे नमूद आहे.

वसुलपात्र रक्कम रु.5960/-
आक्षेपाधीन रक्कम रु.6860000/-

## *61 प्रभाग कार्यालय क्र.2 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत आहे. माहे मार्च 2014 मधील विवाह नोंदणीची दोन प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. विवाह नोंदणीची रक्कम शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.2 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .109 दि.15/10/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रभाग समिती क्र.2 अंतर्गत 2013-14 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 30 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. तसेच सदर खर्चाची मागणी देखील संबंधिताकडून वसूल करण्यात आलेली नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालना वसुलीच्या अनुषंगाने कार्यवाही चालू असल्याचे नमूद आहे.

2) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे . पावती क्र.145301 ची स्थळ प्रत रक्कम रु.60/- लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

3) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधि नियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे . सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. माहे मार्च 2014 मधील विवाह नोंदणीची दोन प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

4) प्रभाग कार्यालयात जमा झालेली विवाह नोंदणीची रक्कम लेखा विभागा त रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत . त्यामुळे जमा रक्कम शासन जमा केलेची पडताळणी करता आली नाही . याबाबत प्राप्त अनुपालनात सदर आक्षेप मुख्यालय लेखा विभागाशी संबंधित असल्याचे नमूद केले आहे.

5) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात .

परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे . याबाबत प्राप्त अनुपालनात आक्षेपाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

DATPVWM7501 (Ref No : 51, Hmm No : 109)

## *62 प्रभाग कार्यालय क्र.3 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. निष्कासना करीता मनपाकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. दि:28/02/2013 ते दि:14/07/2013 , दि:16/07/2013 ते दि:11/08/2013, दि:13/08/2013 ते दि:30/08/2013, दि:01/09/2013 ते दि:06/10/2013 व दि:08/10/2013 ते दि:29/10/2013 या कालावधीत रोखवही नोंदविली नसल्याचे निदर्शनास आले आहे. पावती पुस्तक क्र.917 व 743 लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही. जमा रक्कम विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे. विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे भरणा केल्याची पडताळणी अभिलेख्याअभावी करता आली नाही. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.3 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .110 दि. 15/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब,खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

2) 2013-14 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 25 अनधिकृत बांधकामे प्रभाग कार्यालय क्र.3 कडून निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही.

3) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली

नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे . सदर नोंदवही तपासली असता दि .27/02/2013 रोजी पावती क्र .91699 द्वारे रक्कम रु .16/- जमा केल्याचे निदर्शनास येते. त्यानंतर दि.15/07/2013 रोजी पावती क्र.91700 द्वारे रक्कम रु.1586/- जमा केले आहे. म्हणजेच दि .28/02/2013 ते दि .14/07/2013 या कालावधीत रोखवही नोंदविण्यात आलेली नाही. तसेच दि .16/07/2013 ते दि .11/08/2013, दि.13/08/2013 ते दि .30/08/2013, दि.01/09/2013 ते दि .06/10/2013 व दि .08/10/2013 ते दि .29/10/2013 या कालावधीत देखील रोखवही नोंदविली नसल्याचे निदर्शनास आले आहे . पावती पुस्तक क्र .917 व 743 लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही . प्रभाग कार्यालय स्तरावर जमा रक्कम त्याच दिवशी किंवा दुस -या दिवशी मुख्यालयातील रोखपालाकडे भरणा करणे आवश्यक असतांना खालीलप्रमाणे रक्कम विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक | पावती दिनांक | लेखा विभागात रक्कम भरणा केल्याचा दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 155151 | 29/10/2013 | 15/06/2015 | 24/- |
| 2 | 155152 व 155153 | 30/10/2013 | 15/06/2015 | 5260/- |
| 3 | 155154 | 31/10/2013 | 15/06/2015 | 1000/- |
| 4 | 155155 | 16/11/2013 | 15/06/2015 | 1000/- |
| 5 | 155156 | 21/11/2013 | 15/06/2015 | 1000/- |
| 6 | 155157 व 155158 | 26/11/2013 | 15/06/2015 | 252/- |
| 7 | 155159 | 29/11/2013 | 15/06/2015 | 500/- |
| 8 | 155160 | 07/12/2013 | 15/06/2015 | 6/- |
| 9 | 155161 | 13/12/2013 | 15/06/2015 | 12/- |
| 10 | 155162 | 28/02/2014 | 15/06/2015 | 2/- |
| 11 | 155163 | 03/03/2014 | 15/06/2015 | 500/- |
| 12 | 155164 | 06/03/2014 | 15/06/2015 | 500/- |
| 13 | 155165 | 04/05/2014 | 15/06/2015 | 3000/- |
| 14 | 155166 | 05/08/2014 | 15/06/2015 | 44/- |
| 15 | 155167 | 00/09/2014 | 15/06/2015 | 250/- |
| 16 | 155168 | 06/12/2014 | 15/06/2015 | 250/- |
| 17 | 155101 ते 155104 | 20/05/2013 | 18/07/2013 | 584/- |
| 18 | 155105 ते 155109 | 04/06/2013 | 18/07/2013 | 850/- |
| 19 | 155110 ते 155112 | 06/06/2013 | 18/07/2013 | 550/- |
| 20 | 155113 | 07/06/2013 | 18/07/2013 | 250/- |
| 21 | 155114 | 10/06/2013 | 12/08/2013 | 250/- |
| 22 | 155115 | 11/06/2013 | 12/08/2013 | 250/- |
| 23 | 155116 व 155117 | 19/06/2013 | 12/08/2013 | 100/- |
| 24 | 155118 ते 155120 | 25/06/2013 | 12/08/2013 | 350/- |
| 25 | 155121 ते 155124 | 28/06/2013 | 12/08/2013 | 600/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | 155125 व 155126 | 29/06/2013 | 12/08/2013 | 500/- |
| 27 | 155127 ते 155131 | 26/07/2013 | 31/08/2013 | 550/- |
| 28 | 155132 | 19/09/2013 | 08/10/2013 | 500/- |
| 29 | 155133 | निरंक | 08/10/2013 | 250/- |
| 30 | 155134 ते 155135 | 26/09/2013 | 08/10/2013 | 750/- |
| 31 | 155136 | 27/09/2013 | 08/10/2013 | 250/- |
| 32 | 155137 ते 155139 | 04/10/2013 | 08/10/2013 | 350/- |
| 33 | 155140 ते 155144 | 05/10/2013 | 08/10/2013 | 850/- |
| 34 | 155145 | 08/10/2013 | 30/10/2013 | 250/- |
| 35 | 155146 | 15/10/2013 | 30/10/2013 | 8/- |
| 36 | 155147 व 155148 | 19/10/2013 | 30/10/2013 | 258/- |
| 37 | 155149 व 155150 | 29/10/2013 | 30/10/2013 | 500/- |

4) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे . सदर नोंदवही तपासली असता दि .07/08/2013 नंतर विवाह नोंदणी प्रकरणांची नोंद घेण्यात आलेली नाही . विवाह नोंदणीची माहे मार्च -2014 मधील दोन प्रकरणे विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

5) प्रभाग कार्यालयात जमा झालेली विवाह नोंदणीची रक्कम लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत . त्यामुळे विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे भरणा केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात . परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 52, Hmm No : 110)

## *63 प्रभाग कार्यालय क्र.4 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्राप्त व वापरलेल्या पावती पुस्तकांचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. अनधिकृत बांधकामाच्या***

***निष्कासनाकरीता आलेल्या खर्चाची वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे नमूद केले आहे. विवाह नोंदणीची रक्कम शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.4 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.111 दि.15/10/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली असून सदर नोंदवहीत माहे एप्रिल 2015 पासून प्राप्त पावती पुस्तकांची नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे 2013-14 व 2014-15 वर्षात प्राप्त व वापरलेल्या पावती पुस्तकांचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती साठा पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालनात पावती पुस्तकांच्या नोंदी पावती पुस्तके साठा नोंदवहीत घेण्यात येत असल्याचे नमूद आहे.

2) प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत 2013-14 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 57 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. परंतू अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाकरीता आलेल्या खर्चाची वसुली करण्यात आली नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालनात निष्कासित केलेल्या अनधिकृत बांधकामांना परिगणना व वसुलीबाबत नोटीस बजावण्यात आल्या असल्याचे, सहा जणांकडून रक्कम रु.69000/- वसुल केल्याचे व उर्वरीत जणांकडून वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे नमूद केले आहे.

3) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. पावती क्र.171335 दि.31/01/2014 अन्वये रक्कम रु.250/- जमा असतांना रक्कम रु.50/- लेखा विभागात भरणा केल्याने रक्कम रु.200/- कमी भरणा केला आहे. प्राप्त अनुपालनात फरकाची रक्कम रु.200/- पावती क्र.17782 दि.04/11/2016 नूसार लेखा विभागात जमा केल्याचे नमूद आहे. तरी अनुपालनपृष्ठयर्थ पावतीची छायांकीत प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तरी अधिनियमानूसार विहीत नमून्यात नोंदवही ठेवण्यात यावी.

5) 2013-14 वित्तीय वर्षात प्रभाग कार्यालयात जमा झालेली रोखवहीनूसार विवाह नोंदणीची लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. याबाबत लेखा विभागाकडून अहवाल प्राप्त होवू शकेल, असे अनुपालनात नमूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात. परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या

अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतच्या प्राप्त अनुपालनात येथून पुढे याप्रमाणे कार्यवाही होणार असल्याचे नमूद आहे.

DATPVWM7501 (Ref No : 53, Hmm No : 111)

## *64 शिक्षण मंडळ येथील जादा प्रदान निवृत्तीवेतन व लेख्यासंबंधी इतर अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सेवापुस्तकातील निवृत्तीवेतनाच्या नोंदीवर प्रशासकीय अधिका-यांची स्वाक्षरी नाही. निवृत्त होणारे शिक्षकांनी कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता विवाहीत मुलगा किंवा मुलगी किंवा नातेवाईक यांची नावे नामनिर्देशित केली आहे. प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाची नोंद निवृत्तीवेतनधारकांच्या संपुर्ण तपशिलासह विहीत नमून्यात लेखे ठेवले असलेची पडताळणी करता आली नाही. हयातीचे दाखले लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने हयात असलेल्याच निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान होत असलेबाबत तपासणी करता आली नाही. निवृत्तीवेतन निधीचा जमाखर्च व शिल्लक दर्शविणारा लेखा सामान्य रोखवहीच्या विहीत नमून्यात नमूना क्र.1 ठेवल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. शासनाकडून निवृत्तीवेतनापोटी प्राप्त अनुदान याबाबत तसेच निवृत्तीवेतन निधी इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही. निवृत्तीवेतनाचे अंशराशीकृत रक्कम त्या महीन्याच्या सरुवातीपासून कपात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. निवृत्तीवेतन निधीबाबत अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. निवृत्तीवेतनाच्या प्रमाणकांवर कोणत्याही प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी नसतांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातील काही निवडक निवृत्तीवेतन प्रकरणांची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.130 दि.25/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)श्रीमती सविता आर भंभानी, सहाय्यक शिक्षक यांचे सेवापुस्तकातील निवृत्तीवेतनाच्या नोंदीवर प्रशासकीय अधिका-यांची स्वाक्षरी नाही.

2) श्रीमती सुभद्रा अ. कोळंबे, शिक्षक, श्रीमती कल्पना अडवानी, मुख्याध्यापिका व श्रीमती. मानिक

सी. थोरात, उपशिक्षिका यांचे उपदान व अंशराशीकरण रक्कम प्रदान केलेले प्रमाणक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने त्यांची तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 116 (16)बी अन्वये कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता कुटूंबाची व्याख्या खालीलप्रमाणे आहे. शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत कुटूंब म्हणजे पुरूष शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत पत्नी आणि महिला कर्मचा-याच्या बाबतीत पती अथवा एकविस वर्ष वयाच्या आतील मुलगा आणि अविवाहीत चोविस वर्ष वयाच्या आतील मुलगी यांचा समावेश होतो. सेवानिवृत्तीपुर्वी निवृत्तीवेतनाची कागदपत्रे भरून देतांना निवृत्त होणारे शिक्षकांनी कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता पती/पत्नी किंवा अविवाहीत/बेरोजगार मुलगी (वय 24 वर्षेपर्यंत) किंवा मुलगा (वय 21 वर्षेपर्यंत) यांचे नाव नामनिर्देशित न करता विवाहीत मुलगा किंवा मुलगी किंवा नातेवाईक यांची नावे नामनिर्देशित केली असल्याचे खालील निवृत्तीवेतनधारकांचे कागदपत्रे तपासली असता निदर्शनास आले आहे.

अ) श्रीमती.कल्पना सी थोरात, मुख्याध्यापिका

ब) श्रीमती सुनिता बोराळे, (क) श्रीमती पींकी भगवानदासानी, सहाय्यक शिक्षक

व (ड) श्री.जगन्नाथ नेमाडे, शिक्षक

4) शिक्षण मंडळाकडून प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाची नोंद निवृत्तीवेतनधारकांच्या संपुर्ण तपशिलासह मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 22(2) अन्वये नमुना क्र.26 किंवा महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्र.325 नूसार नमूना क्र.34 मधील नमून्यात निवृत्ती प्रदान आदेश नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतू सदर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे विहीत नमून्यात लेखे ठेवले असलेची पडताळणी करता आली नाही.

5) प्रत्येक निवृत्तीवेतनधारकांने निवृत्तीवेतन घेत असलेल्या बँकेचे बँक व्यवस्थापक किंवा राजपत्रीत अधिकारी यांचे स्वाक्षरीने हयातीचा दाखला प्रत्येक वर्षी माहे नोंव्हेंबर मध्ये शिक्षण मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू माहे नोंव्हेंबर 2013 या महीन्यात दिलेले हयातीचे दाखले लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने हयात असलेल्याच निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान होत असलेबाबत तपासणी करता आली नाही.

6) मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 22(1) नुसार निवृत्तीवेतन निधीचा जमाखर्च व शिल्लक दर्शविणारा लेखा सामान्य रोखवहीच्या विहीत नमून्यात नमूना क्र.1 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच 22(7) नूसार निवृत्ती वेतन प्रदान केल्याबाबतची प्रमाणपत्रे ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर नमूना नोंदवही व प्रमाणपत्रे लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही.

7) मासिक निवृत्तीवेतनाच्या निम्मी रक्कम राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात देण्यात येते. उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाकडून प्रदान केलेली निवृत्तीवेतनाची रक्कम व शासनाकडून निवृत्तीवेतनापोटी प्राप्त अनुदान याबाबत तसेच निवृत्तीवेतन निधी इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने त्यांची तपासणी करता आली नाही.

8) महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्र.342 अन्वये विवाहानंतर अथवा पुनर्विवाहानंतर ज्यांचे निवृत्तीवेतन संपुष्टात येण्याजोगे असेल अशा स्त्री (70 वर्षापेक्षा कमी वय असलेल्या महिलांकडून) निवृत्तीवेतनधारकाकडून नमूना क्र.40 या नमून्यात दर सहामाही प्रतिज्ञापत्र घेण्यात येईल व ते प्रतिज्ञापत्र जून आणि डिसेंबरसाठी देण्यात येणा-या निवृत्तीवेतनाच्या बिलाला जोडण्यात येईल. परंतू उमपा शिक्षण मंडळ यांचेकडून सदर अभिलेख लेखापरीक्षणास उपलबध झाले नाही.

9) निवृत्तीवेतनाचे अंशराशीकृत रक्कम निवृत्तीवेतन धारकास अदा केल्यानंतरच्या दिनांकानंतर अंशराशीकृत रक्कम निवृत्तीवेतनातून कपात करणे आवश्यक असतांना शिक्षण मंडळाकडून त्या महीन्याच्या सरुवातीपासून रक्कम कपात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.
10) मुंबई प्राथमिक शिक्षण मंडळ 1949 मधील नियम क्र.194 नूसार अनुसुची एन मधील क्र.4 नूसार निवृत्तीवेतन घेण्यास पात्र असतील अशा कर्मचा-यांसाठी निवृत्तीवेतन निधी स्थापन केला पाहिजे. त्या निधीचे हिशोब वेगळे ठेवली जातील व दरवर्षी त्यांची शासनाच्या लेखा परीक्षकांकडून हिशोब तपासणी केली जाईल, असे नमूद आहे. परंतू याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 54, Hmm No : 130)

## *65 जाहिरात व मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षातर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 200000.00/-

***बॅनर्स व स्टिकर्सची मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. पुरवठा आदेश, प्राप्त मालाची पोच व नोंदवही, टॅक्स इनव्हॉईस, बॅनर्स व स्टिकर्सद्वारे जाहिरातीकरीता कोणकोणते ठिकाण निश्चित केले? याबाबत अहवाल व प्रत्यक्ष बॅनर्स व स्टिकर्सद्वारे जाहीरात केलेली ठिकाणे ईत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. आयकर भरणा केलेबाबत चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे. जाहिरातीऐवजी कार्यालयीन सामग्री खरेदीकरीता प्रदान केल्याचे प्रमाणकावरुन निदर्शनास आले आहे. खरेदीची नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. प्रमाणकासोबत असलेल्या चलनावर दिनांक, पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही. प्रमाणकांवर प्रशासकीय अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. बॅनर्सच्या मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षातर्गत 2013-14 या वित्तीय वर्षात खर्च केलेली रक्कम रु.173000/-बाबत अभिलेख व प्रमाणके लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. अनामत रक्कमेची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळ अधिनस्त शाळांमधील विदयार्थ्यांची पटसंख्या वाढविणेकरीता जाहीरात खर्चापोटी 2013-14 या वित्तीय वर्षात रक्कम रु.200000/- खर्च केल्याचे अर्थसंकल्पात नमूद आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रुपये | कंत्राटदाराचे नाव | वित्तीय वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ए-38 | 18/03/2014 | 196000/- | ओम मनिष एन्टरप्रायझेज | 2013-14 |
| 2 | ए-39 | 18/03/2014 | 4000/- | स्टेट बँक ऑफ इंडिया (आयकर) | |

अ) विदयार्थी पटसंख्या वाढविणेकरीता जाहीरातीसाठी बॅनर्स व स्टिकर्स खरेदी व रक्कमेचे प्रदान प्रमाणक क्र. ए-38 दि.18/03/2014 अन्वये करण्यात आले असून तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर (रुपये) | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | बॅनर्स छपाई ( 5 फुट x 3 फुट) | 300 | 283/- | 85000/- |
| 2 | स्टिकर्स (12 इंच x 18 इंच) | 2000 | 35/- | 70000/- |
| 3 | स्टिकर्स (4 इंच x 8 इंच) | 5000 | 9 | 45000/- |
| | | | एकूण | 200000/- |

उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) बॅनर्स व स्टिकर्सची मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. त्यामुळे बॅनर्स व स्टिकर्सची मागणी कोणत्या निकषावर निश्चित करण्यात आली? दर निश्चितीकरीता दरपत्रके मागविली किंवा कसे? प्रशासकीय मान्यता घेतली किंवा कसे? याबाबत तपासणी करता आली नाही.

2) पुरवठा आदेश, प्राप्त मालाची पोच व नोंदवही, टॅक्स इनव्हॉईस, बॅनर्स व स्टिकर्सद्वारे जाहिरातीकरीता कोणकोणते ठिकाण निश्चित केले? याबाबत अहवाल व प्रत्यक्ष बॅनर्स व स्टिकर्सद्वारे जाहीरात केलेली ठिकाणे ईत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

3) बॅनर्स छपाई 300 नगकरीता रु.283/-प्रमाणे एकूण रक्कम रु.84900/- परिगणित होत असतांना रु.85000/- प्रदान केल्याने रु.100/-जादा प्रदान केले आहे.

4)प्रमाणक क्र.ए-39 दि.18/03/2014 अन्वये रक्कम रु.4000/- आयकरपोटी बँकेत भरणा केली आहे. परंतू आयकर भरणा केलेबाबत चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे.

ड) मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षांतर्गत 2013-14 या वित्तीय वर्षात खर्च केलेली रक्कम रु.173000/-बाबत अभिलेख व प्रमाणके लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत.

इ) अनामत रक्कमेच्या परताव्यापोटी वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये रक्कम रु.1650000/- अर्थसंकल्पात नमूद असतांना निरंक रक्कम खर्ची पडल्याचे दर्शविले आहे. अनामत रक्कमेची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाली नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 25/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

DATPVWM7501 (Ref No : 56, Hmm No : 131)

## *66 संगणकाची दुरूस्ती व देखभाल तसेच मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1044720.00/-

***स्टारनेट कॉम्प्युटर एज्युकेशन यांची संगणक देखभाल व दुरूस्तीकरीता निवड केलेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. संगणकाची दुरूस्ती व देखभाल केल्यानंतर स्टारनेट एज्युकेशन यांनी शाळा मंडळास अहवाल सादर केला किंवा कसे याबाबत अभिलेख अप्राप्त आहे. टोनरची रिफिल करणे आवश्यक असलेबाबत संबंधित शाळा मुख्याध्यापकांचे मागणीपत्रक प्रमाणकासोबत नाही. विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षण उपलबध झाली नाही. इनव्हॉईसच्या दिनांक व प्रमाणकाचा दिनांकानूसार माहे मार्च 2015 चा कालावधी पुर्ण होण्याअगोदरच मागणी व रक्कम प्रदान केली आहे. संगणक प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षकांनी विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले किंवा कसे याबाबत मुख्याध्यापकांचे अहवाल प्रमाणकासोबत जोडलेले नाही. इनव्हॉईस क्र.14 दि.01/04/2014 अन्वये माहे मार्च 2014 या कालावधीत दिलेल्या प्रशिक्षणापोटी रक्कम रु.95440/- ची मागणी केली आहे. इनव्हॉईसचा दिनांक व प्रमाणकाच्या दिनांकानूसार माहे मार्च 2014 चा कालावधी पुर्ण होण्याअगोदरच मागणी व प्रदान केले आहे. कपात केलेली आयकराची रक्कम रु10339/- बँकेत चलनाद्वारे भरलेबाबत चलनाची प्रत अप्राप्त आहे.***

अ) स्टारनेट कॉम्प्युटर एज्युकेशन यांना शिक्षण मंडळ कार्यालय व शाळेतील संगणकाची मासिक देखभाल व दुरूस्तीकरीता प्रती संगणक रु.750/- प्रमाणे प्रमाणक क्र.ए-45 दि.26/03/2014 अन्वये रक्कम रु.10800/- प्रदान करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) स्टारनेट कॉम्प्युटर एज्युकेशन यांची संगणक देखभाल व दुरूस्तीकरीता निवड केलेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्यांची निवड, नेमणूक कशी,कोणी व कोणत्या निकषावर केली, दर निश्चिती कशी केली याबाबत तपासणी करता आली नाही.

2) मनपा शिक्षण मंडळ व शाळेत एकूण किती संगणक आहेत? त्यापैकी किती चालू स्थितीत आहेत? याबाबत लेखापरीक्षणाकरीता लेखे उपलब्ध झाले नाहीत.

3) संगणकाची दुरूस्ती व देखभाल केल्यानंतर स्टारनेट एज्युकेशन यांनी शाळा मंडळास अहवाल सादर केला किंवा कसे याबाबत अभिलेख अप्राप्त आहे.

ब) उल्हासनगर मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणा-या शिक्षकांचे वेतनापोटी पानसी टेक्नॉलॉली, कल्याण यांना खालीलप्रमाणे रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | रककम रुपये |
|---|---|---|
| 1 | ए-43 दि.18/03/2014 | 1023581/- |

1) विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षण उपलबध झाली नाही. त्यामुळे मे.पानसी टेक्नॉलॉजी यांची निवड कोणी, कशी व कोणत्या निकषावर केली? प्रशिक्षणाकरीता कोणत्या अभ्यासक्रमावर शिक्षण देणे कंत्राटदारावर बंधनकारक होते? दराची निश्चिती कशी केली? याबाबत लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही.

2) संगणक प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षकांनी विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले किंवा कसे याबाबत मुख्याध्यापकांचे अहवाल कंत्राटदारास रक्कम अदा करण्यापुर्वी घेणे आवश्यक असतांना तसे अहवाल प्रमाणकासोबत जोडलेले नाही.

ड) प्रमाणक क्र.ए-43 दि.18/03/2014 अन्वये रक्कम रु.10,23,581/- इतकी प्रदान केली आहे. सदर रक्कम खालील तपशिलानूसार प्रदान केली आहे.

| अ.क्र. | इनव्हॉईस क्र. | दिनांक | कालावधी | प्रती विदयार्थी रक्कम रुपये | एकूण विदयार्थी संख्या | प्रदान रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 10 | 01/04/2013 | मार्च 2013 | 9.94 | 8000 | 79520/- |
| 2 | 11 | 01/09/2013 | जुन 2013 ते ऑगस्ट 2013 | 11.93 | 24000 | 286320/- |
| 3 | 12 | 01/12/2013 | सप्टें.2013 ते नोव्हें.2013 | 11.93 | 24000 | 286320/- |
| 4 | 13 | 01/03/2014 | डिसें.2013 ते फेब्रु.2014 | 11.93 | 24000 | 286320/- |
| 5 | 14 | 01/04/2014 | मार्च 2014 | 11.93 | 8000 | 95440/- |
| | | | | | | 1033920/- |

1) इनव्हॉईस क्र.14 दि.01/04/2014 अन्वये माहे मार्च 2014 या कालावधीत दिलेल्या प्रशिक्षणापोटी रक्कम रु.95440/-ची मागणी केली आहे. इनव्हॉईसचा दिनांक व प्रमाणकाच्या दिनांकानूसार माहे मार्च 2015 चा कालावधी पुर्ण होण्याअगोदरच मागणी करण्यात आली आहे. व त्यानुसार रक्कमदेखील प्रदान केली आहे. तसेच इनव्हॉईस क्र.14 दि.01/04/2014 पुढील दिनांक नमूद करून अगोदरच शाळा मंडळाकडे सादर केले आहे.

2) संगणक प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षकांनी विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले किंवा कसे याबाबत मुख्याध्यापकांचे अहवाल कंत्राटदारास रक्कम अदा करण्यापुर्वी घेणे आवश्यक असतांना तसे अहवाल प्रमाणकासोबत जोडलेले नाही.

3) कपात केलेली आयकराची रक्कम रु10339/- बँकेत चलनाद्वारे भरलेबाबत चलनाची प्रत अप्राप्त आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.132 दि. 25/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

## *67 अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील जमा रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाली नाही. कार्यवाहीत जप्त केलेल्या मालाची/सामानाची नोंदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाली नाही.पदपथ विभागाकडून मार्च 2014 मध्ये एकूण रक्कम रु.19500/- वसूल केली असतांना अंदाजपत्रकात निरंक रक्कम दर्शविली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.157 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब,खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून घेण्यात आली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत? याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) पदपथ विभागाकडून केलेल्या कार्यवाहीत जप्त केलेल्या मालाची/सामानाची नोंदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाली नाही.

3) सन 2013-14 कालावधीत पदपथ विभागाकडून एकूण किती रोखवही वापरात होत्या? याबाबत अभिलेख अप्राप्त आहे.

4) पदपथ विभागाकडून मार्च 2014 मध्ये एकूण रक्कम रु.19500/- वसूल केली असतांना अंदाजपत्रकात निरंक रक्कम दर्शविली आहे.

DATPVWM7501 (Ref No : 60, Hmm No : 157)

## *68 अनाधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला रु.75 लाख खर्च संबंधिताकडून वसूल केला नसल्याबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 7500000.00/-

***सन 2013-2014 या वित्तीय वर्षात एकूण 142 अनधिकृत बांधकामांचे निष्कासन केलेल्या अनधिकृत बांधकामांच्या मालकांकडून निष्कासनाचा खर्च वसूल केलेला नाही. महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 260 व कलम 264 प्रमाणे निष्कासनाचा खर्च रु.7500000/- अनाधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल केला नसल्याने महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.***

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधिल कलम 260 (2) नुसार अनाधिकृत इमारतीच्या बाबतीत सदर इमारत किंवा काम काढून टाकण्यांत येऊ नये. त्यात फेरफार करण्यात येऊ नये किंवा काम पाडण्यात येऊ नये याबाबत आयुक्तांची खात्री होईल अशा रीतीने कारण दाखविण्यात जर अशी व्यक्ती कसूर करील तर आयुक्तांस इमारत काढून टाकता येईल. त्यात फेरफार करता येतील किवा ते पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 264(4) पोटकलम 3 अन्वये धोकादायक बांधकामाच्या निष्कासनाचा खर्च इमारत मालक/भोगवटादाराने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उल्हासनगर महापालिका आयुक्तांचे आदेश क्र.उमपा/अवानिवी/अतिक्रमण/196/2001 दिनांक 30/10/2001 उल्हासनगर महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागाकडून अनधिकृत बांधकाम निष्कासित करतांना होणारा खर्च 1 (प्रती) चौरस फूट चटई क्षेत्राचे बांधकामास रु. 63/- या प्रमाणे अनधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल करण्यात यावेत असे नमूद करण्यात आले आहे. सन 2013-2014 वित्तीय वर्षात एकूण 142 अनधिकृत बांधकामांचे निष्कासन महानगरपालिकेने केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर अनधिकृत बांधकामांच्या मालकांकडून निष्कासनाचा खर्च वसूल झाला नसल्याने वसूल होणे आवश्यक आहे.

2) उल्हासनगर महानगरपालिकेने 2013-2014 या वित्तीय वर्षामध्ये अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाकरीता पोलीस संरक्षण शुल्कापोटी खालीलप्रमाणे रक्कम पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | प्रमाणक दिनांक | प्रमाणकाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 43 | 04/04/2013 | 2500000/- |
| 2 | 901 | 03/06/2013 | 500000/- |
| 3 | 1214 | 20/06/2013 | 2000000/- |
| 4 | 1608 | 09/07/2013 | 2500000/- |
| | | एकूण रक्कम | 7500000/- |

एकूण रु. 75,00,000/- इतक्या रक्कमेचा खर्च महानगरपालिका निधीतून केला आहे, महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 260 व कलम 264 प्रमाणे निष्कासनाचा खर्च अनाधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल केला नसल्याने महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.158 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

## *69 अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***अतिक्रमण व पदपथ विभागातील अनधिकृत बांधकामांची संख्या, त्याचे सर्वेक्षण कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांनी केले त्यांच्या दैनंदिनी अहवालासह अनधिकृत बांधकामे पाडल्याचे कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत. बांधकामे निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे, बांधकामे निष्कासित करतांना निरुपयोगी साहित्य निघाल्याची जमा नोंद व त्यांचा लिलावाद्वारे केलेल्या विक्रीची कागदपत्रे, धोकादायक इमारतींची संख्या इ.बाबत अभिलेख अप्राप्त आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेचे अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागातील अभिलेखाचे लेखापरीक्षण करणेसाठी अर्धसमास ज्ञापन क्र.159 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. तसेच खालील अभिलेख उपलब्ध झालेले नाहीत.

1) सन 2013-14 अखेर एकूण किती अनधिकृत बांधकामे आहेत. त्याचे सर्वेक्षण कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांनी केले त्यांच्या दैनंदिनी अहवालासह अनधिकृत बांधकामे पाडल्याचे कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत.

2) बांधकामे निष्कासित करणेसाठी मंजुरी मागितली व विभागाने दिलेल्या मंजुरीचे आदेश व त्यानुसार निष्कासनाबाबत केलेल्या कार्यवाहीचे पंचनामे, फोटो अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.

3) अनाधिकृत बांधकामे निष्कासित करतांना निरुपयोगी साहित्य निघाल्याची जमा नोंद ठेवली नसल्याचे दिसून आहे व लिलावाद्वारे केलेल्या विक्रीची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

4) अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणेसाठी आयुक्त यांचे पत्र क्र.उमपा/अबांनिवि/अतिक्रमण/ 196 /2001 दि. 30/10/2001 चे आदेश आहेत. त्यामध्ये प्रति चौरस फुट रु.63/- दर असून महानगर पालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी दर सुधारीत करणे आवश्यक आहे.

5) उल्हासनगर मनपा क्षेत्रातील धोकादायक इमारतींची संख्या इ.बाबत अभिलेख अप्राप्त आहे. त्याबाबत मनपाने पुढील काय कार्यवाही केली याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

## ***70 अतिक्रमण विभागाकडून अनधिकृत/धोकादायक बांधकाम निष्कासनाकरीता केलेल्या खर्चाबाबत अभिप्राय...***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 17**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3050000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3050000.00/-

***दरपत्रकांची मागणी जाहीराती/ नोटीस पत्रकाद्वारे झालेली नाही. कंत्राटदार काम करण्यास सक्षम असलेबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे. इमारत निष्कासन केल्यानंतर कंत्राटदाराने महानगरपालिकेस काम पुर्णत्वाचा अहवाल सादर करणे आवश्यक असतांना सदर अहवाल लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाला नाही. भुखंड मालकाकडून निष्कासनाकरीता आलेला एकूण खर्च वसूल केलेबाबत अभिलेखे अप्राप्त आहेत. कंत्राटदाराबरोबर करारनामा केलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेचे अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागामार्फत खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | प्रमाणक दिनांक | कंत्राटदाराचे नाव | प्रमाणकाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 210 | 18/04/2013 | एडीफीस इंजिनिअरींग | 1600000/- |
| 2 | 1753 | 01/08/2013 | एडीफीस इंजिनिअरींग | 1450000/- |
| | | एकूण रक्कम | | 3050000/- |

विभागाने सादर केलेली टिपणी दि.22/03/2013 नूसार उपरोक्त अ.क्र.1 च्या अनुषंगाने राणी माँ अपार्टमेंटच्या (सहा मजले) निष्कासनाकरीता दरपत्रके मागविण्यात आली असता प्राप्त दरपत्रकांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

1) मे.नाझ ट्रान्सपोर्ट सर्व्हीसेस– रु.18 लक्ष अधिक सेवा कर

2) मे.इडिफीस इंजिनिअरींग, अंधेरी------रु.16 लक्ष अधिक सेवा कर

3) मे. दिव्या कंस्ट्रक्शन, अंधेरी -----20 लक्ष अधिक सेवा कर

त्यापैकी मे. एडीफाईस इंजिनिअरींग,अंधेरी यांचे दर सर्वात कमी असल्याने आयुक्त, उमपा यांचे दि.22/03/2013 च्या मान्यतेअंती त्यांना कामाच्या अनुषंगाने कार्यादेश क्र.युमसी/वाहन/299 दि.25/03/2013 देण्यात आले. याबाबत निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.160 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) निविदेच्या अनुषंगाने दरपत्रके जाहीराती/ नोटीस पत्रकाद्वारे मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. सबब, दरपत्रके कोणत्या प्रसिध्दीच्या माध्यमातून मागविण्यात आली? याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.
2) कंत्राटदाराने निविदेत नमूद दर योग्य आहेत किंवा कसे, कंत्राटदार इमारत निष्कासनाचे काम करण्यास सक्षम आहे किंवा कसे, त्याच्याकडील मालकीची यंत्रसामग्री, मनुष्यबळाची संख्या इत्यादींचा तपशिल नस्तीत नसल्यामुळे सदर काम कंत्राटदाराकडून योग्यप्रकारे करण्यात येईल किंवा कसे याबाबतची खात्री विभागाकडून केल्याचे लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.
3) इमारत निष्कासन केल्यानंतर कंत्राटदाराने महानगरपालिकेस काम पुर्णत्वाचा अहवाल सादर करून सदर अहवालावर निष्कासनाकरीता नियुक्त प्राधिकारी यांनी प्रमाणीकरण केल्यानंतर कंत्राटदारास रक्कम अदा करणे आवश्यक होते. परंतू सदर प्रमाणित अहवाल लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाला नाही.
4) आयुक्त, उमपा यांनी त्यांचे पत्र क्र.114 दि.10/04/2013 अन्वये भुखंड मालकाकडून निष्कासनाकरीता आलेला एकूण खर्च वसूल करणेचे आदेशित केले आहे. तरी सदर खर्च भुखंड मालकाकडून वसूल केला किंवा कसे याबाबत अभिलेखे तसेच विभागाचे अनुपालन प्राप्त झाले नाही.
5) सदर कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 5(2)(2) अन्वये आयुक्तांनी मान्यता दिली असल्याने स्थायी समितीला तिच्या कार्यवृत्तात कारणे नमूद करून संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल. परंतू याबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे.
6) आयुक्त, उमपा यांचे आदेश क्र.उमपा/आका/114 दि.10/04/2013 नूसार राणी माँ अपार्टमेंट इमारत निष्कासित करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु.16,00,000/- भुखंडाचे मालक यांचेकडून त्यांच्या मालमत्ता करामध्ये समावेश करून वसुल करावे, असे निर्देश आहेत. तरी सदर रक्कम मालमत्ता करात समाविष्ठ केली किंवा कसे व समाविष्ठ केली असल्यास त्याची वसुली झाली किंवा कसे याबाबत अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाही.
7) काम पुर्ण झाल्यानंतर इमारतीचे डेब्रीज (राडारोडा) कोठे वाहून नेऊन टाकण्यात आले याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणात प्राप्त झाले नाही.
8) मे.एडिफीस इंजिनिअरींग यांचेशी केलेला करारनामा नस्तीत आढळून आला नाही. सबब, त्याची पडताळणी करता आली नाही.

तसेच विभागाने सादर पृ.क्र.7 टिपणी क्र.4 मध्ये माधुरी पॅलेस, सदारंगानी अपार्टमेंट व गुरूकृपा मार्केट या इमारती निष्कासनाकरीता दरपत्रके मागविण्यात आल्याचे नमूद आहे. प्राप्त दरपत्रकांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | | | एकूण तास | एकूण रक्कम रुपये | दरपत्रकाची एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.एडिफीस इंजिनिअरींग,अंधेरी | माधुरी पॅलेस | पोकलेनचे प्रति तास भाडे रु.35000/- | 13 | रु.455000/- | रु.1508000 |
| | | सदारंगानी अपार्टमेंट | पोकलेनचे प्रति तास भाडे | 7 | रु.245000/- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रु.35000/- | | | |
| | | गुरूकृपा मार्केट | रु.650 | 320 | रु.208000 | |
| 2 | मे.ड्रीम कंन्स्ट्रक्शन | माधुरी पॅलेस | पोकलेनचे प्रति तास भाडे रु.38000/- | 22 | रु.836000/- | रु.1589500 |
| | | सदारंगानी अपार्टमेंट | पोकलेनचे प्रति तास भाडे रु.38000/- | 7 | रु.456000/- | |
| | | गुरूकृपा मार्केट | रु.700 | 425 | रु.297500 | |
| 3 | मे. साई कंन्स्ट्रक्शन | माधुरी पॅलेस | पोकलेनचे प्रति तास भाडे रु.36500/- | 25 | रु.912500/- | रु.1577500 |
| | | सदारंगानी अपार्टमेंट | पोकलेनचे प्रति तास भाडे रु.35000/- | 10 | रु.365000/- | |
| | | गुरूकृपा मार्केट | रु.750 | 400 | रु.300000 | |

उपरोक्तपैकी मे.एडिफिस इंजिनिअरींग यांचे दरपत्रक लघुत्तम असल्याने त्यांना कार्यादेश क्र.युएमसी /व्हेईकल/ 56 दि.21/06/2013 अन्वये कार्यादेश देण्यात आले आहेत. अर्धसमास ज्ञापन क्र.160 दि.29/11/2016 अन्वये सदर खर्चाबाबत निविदा नस्ती व प्रमाणके लेखापरीक्षणाकरीता मागणी केली असता प्रमाणक लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे. परंतू निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून दिली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) दरपत्रके जाहीराती/ नोटीस पत्रकाद्वारे मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2) पोकलेन मशीनचे भाडे प्रति तास रु.35000 व मॅन्युअली काम करणेकरीता प्रती तास रु.650 तसेच मोबिलायझेशनकरीता रक्कम रु.600000 याप्रमाणे सदर दर कशाच्या आधारे निश्चित करण्यात आले. याबाबत अभिलेख नस्तीत आढळून न आल्याने दर योग्य असलेची पडताळणी करता आली नाही.

3) कंत्राटदार काम करण्यास सक्षम असलेबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे.

4) इमारत निष्कासन केल्यानंतर कंत्राटदाराने महानगरपालिकेस काम पुर्णत्वाचा अहवाल सादर करुन सदर अहवालावर निष्कासनाकरीता नियुक्त प्राधिकारी यांनी प्रमाणीकरण केल्यानंतर कंत्राटदारास रक्कम अदा करणे आवश्यक होते. परंतू सदर प्रमाणित अहवाल लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाला नाही.

5) आयुक्त, उमपा यांनी भुखंड मालकाकडून निष्कासनाकरीता आलेला एकूण खर्च वसूल करणेचे आदेशित केले आहे. तरी सदर खर्च भुखंड मालकाकडून वसूल केला किंवा कसे याबाबत अभिलेखे प्राप्त झाले नाही.

6) सदर कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 5(2)(2) अन्वये आयुक्तांनी मान्यता दिली असल्याने स्थायी समितीला तिच्या कार्यवृत्तात कारणे नमूद करून संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल. परंतू याबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे.

7) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी इमारत निष्कासनाकरीता आलेला खर्च रु.14,50,000 संबंधित भुखंडाच्या मालकाकडून वसूल करणेबाबतची कार्यवाही मिळकत कर विभागाकडून प्राधान्याने करण्याचे आदेश नस्तीमधील पृ.क्र.8 टिपण्णी क्र.4 वर दिले आहेत. परंतू सदर आदेशानूसार कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. 8) मे.एडिफीस इंजिनिअरींग यांचेशी केलेला करारनामा नस्तीत आढळून आला नाही. सबब, त्याची पडताळणी करता आली नाही.

9) प्रमाणक क्र.1753 दि.01/08/2013 रक्कम रु.1450000/- लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. सबब, त्याचे लेखापरीक्षण करता आले नाही.

DATPVWM7501 (Ref No : 63, Hmm No : 160)

## *71 नगररचना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नगररचना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाली नाही. पावती पुस्तक क्र.1906 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. उल्हासनगर मनपा अंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार/स्थापत्य अभियंता आहेत? त्यांनी परवान्याचे नुतनीकरण केले किंवा कसे? तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतनीकरणापोटी एकूण किती रक्कम वसुलपात्र आहे? इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत. त्यामुळे मनपा विभागाकडून महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील कलम 6 चे उल्लघंन झाले आहे.***

नगररचना विभाग , उल्हासनगर महानगरपालिका विभागांतर्गत नविन इमारत बांधकामास मंजूरी देण्यात येते . मंजूरीच्या अनुषंगाने विकासकाकडून जमीन विकास शुल्क , निवासी/वाणिज्य इमारतीकरीता विकास शुल्क, उपकर, स्थानिक संस्था कर, जीना/लिफट अधिमुल्य शुल्क इत्यादीच्या अनुषंगाने रक्कम आकारण्यात/जमा करण्यात येतात. याबाबतचे प्राप्त लेखे तपासणीअंती निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .185 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नगररचना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखा परीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून प्राप्त झाली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला?

व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत? याबाबत पडताळणी करता आली नाही.
2) पावती पुस्तक क्र.1906 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.
3) उल्हासनगर मनपा ठराव क्र .26 दि.09/07/2012 अन्वये अभियंता/पर्यवेक्षक परवाना रु .10000/- इतके शुल्क आकारून देण्यात येतो. तसेच सदर परवान्याचे नुतनीकरण रक्कम रु .10000/- आकारून करण्यात येते. उल्हासनगर मनपा अंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार /स्थापत्य अभियंता आहेत? त्यांनी परवान्याचे नुतनीकरण केले किंवा कसे ? तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतनीकरणापोटी एकूण किती रक्कम वसुलपात्र आहे ? इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 64, Hmm No : 185)

## *72 नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 277929.00/-

***जोता तपासणी प्रमाणपत्रावर दिनांक नमूद नाही. जोता पुर्णत्वाचा दाखला शुल्काची रक्कम वसुल केली नाही. स्टॅबिलीटी प्रमाणपत्रावर स्थापत्य अभियंता यांचे नाव, कार्यालयाचा पत्ता व परवाना क्रमांक नमूद नाही. बांधकाम परवानगी विलंबाने दिली आहे. विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत निदर्शनास आले नाही. लिफट निवासी व वाणिज्य वापर यांचे अधिमुल्य शुल्काची रक्कम वसुल केली नाही. अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. जोता तपासणी दाखला महानगरपालिकेकडून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र वास्तुविशाररद / स्थापत्य अभियंता यांनी महानगरपालिकेस सादर करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त् करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

नगररचना विभागातील अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या सर्वसाधारण अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.189 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब,खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.
1) श्री. आनंद भाटीया, बांधकाम परवानगी क्र.1/13/207 दि.14/06/2013 च्या अनुषंगाने जोता तपासणी मिळणेकरीता अर्ज सादर करण्यात आला असून त्यासोबत सुयोग असोशिएसन यांनी जोत्यापर्यंत काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. परंतू त्या प्रमाणपत्रावर दिनांक नमूद

नसल्याने सदर काम जोत्यापर्यंत कधी पुर्ण झाले याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच जोता पुर्णत्वाचा दाखला दिला असून त्याच्या शुल्काची रक्कम रु.5000/- विकासकाकडून घेतली नसल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. स्थापत्य अभियंता यांनी दि.16/03/2013 रोजी स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर केले आहे. परंतू सदर प्रमाणपत्रावर स्थापत्य अभियंता यांचे नाव, कार्यालयाचा पत्ता व परवाना क्रमांक नमूद नाही.

विकासकाने बांधकाम परवानगी मिळणेचे अर्जात निवासी वापराकरीता इमारतीचा विकास करण्यात येत असल्याचे नमूद असतांना आदित्य कॉम्प्युटर सर्व्हिसेस यांनी त्यांच्या दि.28/03/2013 च्या संगणकीय अहवालात निवासी व वाणिज्य असे दोन्ही वापर दर्शविले आहे. तसेच आदित्य कॉम्प्युटर सर्व्हीसेस यांचे अहवालात नमूद इमारत बांधण्याचे क्षत्रफळ , त्यांचे वापर व सामासिक अंतरात सुट, जीना/लिफट/पॅसेज यांचे क्षेत्रफळ व विकासकाने सादर केलेले सदर बाबींचे क्षेत्रफळ यांत तफावत आहे.

2) उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.4.22.1 नूसार विकासकाने विहीत नमून्यात व संबंधित कागदपत्रांसोबत बांधकाम परवानगीसाठी अर्ज सादर केल्यानंतर संबंधित प्राधिकारी यांनी 60 दिवसांत बांधकामास परवानगीस मंजूरी / ना-मंजूरी (कारणासहीत) देणे अपेक्षित आहे. श्री.प्रकाश मखिजानी, बांधकाम परवानगी क्र.21/13/408 दि.07/10/2015 यांनी दि.30/04/2013 रोजी अर्ज सादर केला असतांना बांधकाम परवानगी दि.07/10/2015 रोजी विलंबाने दिली आहे. विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत निदर्शनास आले नाही. तसेच बांधकाम परवानगीच्या प्रकरणात जोता तपासणी दाखल्याचे शुल्क रक्कम रु.5000/- घेतलेबाबत अभिलेख नस्तीत नसल्याने शुल्क आकारल्याची पडताळणी करता आली नाही.

3) मालक-श्री. विधी धनवानी, बांधकाम परवानगी क्र.70/13/514 दि.28/08/2013 यांचे प्रकरणात लिफट निवासी व वाणिज्य वापर यांचे अधिमुल्य शुल्काची रक्कम वसुल केली नसल्याने खालीलप्रमाणे रक्कम रु.272929.5/-वसुलपात्र आहे. तसेच अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | वापराचा प्रकार | लिफटचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | महासभा ठराव क्र.91 दि.10/03/10 अन्वये आकारावयाचे अधिमुल्य शुल्क (जमीनीचा दर) | ठरावानूसार आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| | | | | | | (5x6) | (7-8) |
| 1 | विधी जितू धनवानी | 70/13/513 दि.28/08/13 | रहिवास | 9.72 | 14650 x 1.5 | 213597 | 272929.5 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वाणिज्य | 1.62 | 14650 x 2.5 | 59332.5 | |

4) उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. 4.22.3 नूसार बांधकाम परवानगी प्रमाणपत्राची वैधता चार वर्षाची असून बांधकाम परवानगी प्रमाणपत्राच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत इमारत बांधकामास सुरूवात करणे आवश्यक आहे. किंवा एक वर्ष पुर्ण होण्याअगोदर बांधकाम परवानगी प्रमाणपत्राचे नगररचना विभाग ,उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडून नुतनीकरण करुन घेणे आवश्यक आहे. तसेच नियम क्र.5.3 नूसार जोता तपासणी दाखला महानगरपालिकेकडून घेणे आवश्यक असतांना खालील प्रकरणांत वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रमाणे इतर बांधकाम परवानगी प्रकरणांत देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| 1 | विधी जितू धनवानी | 70/13/513 दि.28/08/2013 |
| 2 | श्रीमती शिला लुंड व श्रीमती रेश्मा लुंड | 12/13/204 दि.14/06/2013 |

5) उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.5.5 व 5.6 नूसार इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र वास्तुविशाररद / स्थापत्य अभियंता यांनी महानगरपालिकेस सादर करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त् करून घेणे आवश्यक असतांना खालीलप्रकरणांत वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. उदाहरणादाखल प्रकरणांव्यतिरीक्त इतर प्रकरणांत देखील वरीलप्रमाणे अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| 1 | श्री. आनंद भाटीया | उमपा/नरवि/बांप/1/13/207दि.14/06/2013 |
| 2 | श्री.महेश सचदेव | 64 दि.30/07/2013 |
| 3 | विधी जितू धनवानी | 70/13/513 दि.28/08/2013 |
| 4 | श्रीमती शिला लुंड व श्रीमती रेश्मा लुंड | 12/13/204 दि.14/06/2013 |

6) श्री.हसवानी यांचे बांधकामास दि.22/07/2016 रोजी प्रमाणपत्र क्र.79/13/249 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. परंतू भोगवटा प्रमाणपत्र देणेपुर्वी प्रत्यक्षात बांधकाम केलेल्या इमारतीचा नकाशा, जल-मल निसारण विभाग, अग्निशमन विभाग, वृक्ष प्राधिकारण नियमांतर्गत इमारतीभोवती झाडे लावले किंवा कसे तसेच जमीन विकास करण्याच्या अनुषंगाने तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदलात नवीन झाडे लावण्यात आली किंवा कसे, सोलर सुविधा बसविली किंवा कसे व रेन वॉटर सुविधा बसविण्यात आली किंवा कसे याबाबत संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना व स्थापत्य अभियंता/वास्तुविशारद यांचे इमारत बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणत्र सादर करणे आवश्यक असतांना कोणत्याही अभिलेख्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इतर प्रकरणांत देखील उपरोक्तप्रमाणे अनियमितता झाली असण्याची शक्यता आहे.

## *73 क्रीडा विभाग खर्चाचे प्रमाणके व संबधित निविदा नस्ती व इतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2686658.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागाचे 2013-2014 मधील खर्च रक्कम रु.2686658/- बाबतची लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नाहीत***

उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागाचे सन 2013-14 मध्ये 32 प्रमाणकांची रक्कम रु.2686658/- इतका निधी खर्च केल्याचे लेखापरीक्षणास अनुदान पुस्तिकेवरून दिसून येते खर्चाची केलेल्या खर्च सदर तरी. सूचित तोंडी याबाबात यावेत देण्यात करून उपलब्ध परीक्षणास लेखा नस्ती निविदा सबंधित व प्रमाणके करणेत आले होतेतसे.च अर्धसमास ज्ञापन क्रं.203 दि.07/01/2017 अन्वये कळविले होते,परंतु लेखापरीक्षण शिबीर कालावधी संपेपर्यत संबंधित विभागाकडून खर्चाची कोणतीही अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.रु रक्कम त्यामुळे.2686658 /-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATNTBM6101 (Ref No : 69, Hmm No : 203)

## *74 कर्ज निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :07 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कर्ज निवारण निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध नसलेने स्थानिक निधी लेखा विभागाकडून तपासणी झालेली***

| ***नाही*** |
|---|

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामाचे कलम 112 नुसार महानगरपालिकेने कर्जनिवारण निधी स्थापन करणेचा आहे व उक्त अधिनियमाचे कलम 115(1) नुसार कर्जनिवारण निधीची तपासणी स्थानिक निधी लेखा विभागाकडून करणेची आहे याबाबत अर्धसमासपत्र क्र. 2 दि.03//05/2016 अन्वये कर्जानिवारण निधीच्या लेख्यांची तपासणीसाठभ् मागणी करणेत आली होती तथापी असे कर्ज निवारण निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केल्याने अशा लेख्यांची तपासणी करता आली नाही.

DATAPJF8101 (Ref No : 76, Hmm No : 2)

**आक्षेप विवरणपत्राबाबत:-**

लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व परिच्छेदांबाबत लेखापरीक्षण चालू असताना अर्धसमासपत्रे निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त उत्तरे व अनुपालने तपासून सर्वसामान्य स्वरुपांच्या आक्षेपांची पूर्तता करुन घेण्यात आली असल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित केले नाही.

**विवरणपत्रे व परिशिष्टे :-**

2013-2014 या आर्थिक वर्षाच्या महानगरपालिका लेखापरीक्षण अहवालासाठी आवश्यक विहीत नमुन्यातील 1 ते 8 विवरणपत्रांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी विवरणपत्र क्रं.1 ते 3 व 5(अ) विवरणपत्र अशी एकूण 4 विवरणपत्र प्राप्त झालेली असून ती या अहवालासोबत जोडण्यात आली आहेत. विवरणपत्र क्रं. 4, 5(ब), 6 (प्रलंबित अग्रिमाचे विवरणपत्र), विवरणपत्र क्रं. 7 (अपूर्ण बांधकाम) व विवरणपत्र क्र.8 अप्राप्त असल्याने अहवालासोबत जोडता आली नाहीत.

**अनुपालन :-**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार सदरचा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्याच्या आत या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपावरील अनुपालन अहवाल (तीन प्रतीत) महासभेच्या मान्यतेच्या ठरावाच्या प्रतीसह आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर यांच्या स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

**पोहोच :-**

सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद करुन तात्काळ पोहोच देण्यात यावी.

(मंगेश ना. गावडे)
उप संचालक (मनपालेप)
उपविभाग-2
स्थानिक निधी लेखापरीक्षा
नवी मुंबई.

प्रत अग्रेषित :-

1.मा.प्रधान महालेखापाल,(लेखापरीक्षा)-1, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
2.मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
3.मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
4.मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
5.मा.सह संचालक(म.न.पा.ले.प.), स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
6.पुनर्विलोकन अहवाल शाखा, रायगड भवन, नवी मुंबई.

स्वा/-
(मंगेश ना. गावडे)
उप संचालक (मनपालेप)
उपविभाग-2
स्थानिक निधी लेखापरीक्षा
नवी मुंबई.

***लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र***

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| अश्विनी प्रकाश जाखलेकर, सहाय्यक संचालक | 1, 17, 30, 48, 52, 74 |
| भाई एकनाथ पाटील, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 3, 4, 5, 25, 26, 32, 50, 51 |
| निवृत्ती तुकाराम भांगरे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 73 |
| पंडित काशीनाथ चंद्रमोरे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 2, 6, 7, 8, 19, 20, 42, 44, 46, 49, 53, 54, 55, 56, 57, 58, 59 |
| प्रदिप पंढरीनाथ तेलवणे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 31, 43 |
| प्रविणकुमार वसंत वाघ, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 11, 21, 22, 23, 24, 39, 40, 41, 45, 47, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72 |
| राजु यमू जाधव, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 12, 13, 14, 15, 16, 18, 34, 35, 36, 37, 38 |
| अनिल नामदेव माळी, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 9, 10, 27, 28, 29, 33 |

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 842980.00 | 16750.00 | ---- | ---- | 844650.00 |
| 2 | 4 | 547618.00 | 30444.00 | ---- | ---- | 578062.00 |
| 3 | 5 | 1500000.00 | ---- | ---- | ---- | 1500000.00 |
| 4 | 6 | ---- | 3944.00 | ---- | ---- | ---- |
| 5 | 7 | 26261716.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 6 | 9 | 2895982.00 | 350982.00 | ---- | ---- | 2895982.00 |
| 7 | 10 | 3431250.00 | 75488.00 | ---- | ---- | 3431250.00 |
| 8 | 11 | 3452823.00 | 78462.00 | ---- | ---- | ---- |
| 9 | 12 | 2255540.00 | ---- | ---- | ---- | 2255540.00 |
| 10 | 13 | 1947630.00 | ---- | ---- | ---- | 1947630.00 |
| 11 | 14 | 773519.00 | ---- | ---- | ---- | 773519.00 |
| 12 | 15 | 9682070.00 | ---- | ---- | ---- | 9682070.00 |
| 13 | 16 | 11616738.00 | 1427738.00 | ---- | ---- | 13044476.00 |
| 14 | 17 | 1480200.00 | ---- | ---- | ---- | 1480200.00 |
| 15 | 18 | 1514628.00 | ---- | ---- | ---- | 1514628.00 |
| 16 | 19 | 7544810.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 17 | 20 | 8832224.00 | 6160.00 | ---- | ---- | ---- |
| 18 | 22 | ---- | ---- | ---- | ---- | 1800000.00 |
| 19 | 23 | ---- | 2300.00 | ---- | ---- | ---- |
| 20 | 25 | 1749700.00 | 210802.00 | ---- | ---- | 1960502.00 |
| 21 | 26 | 1324120.00 | 53767.00 | ---- | ---- | 1329497.00 |
| 22 | 27 | 760642.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 23 | 28 | 316771.00 | ---- | ---- | ---- | 316771.00 |
| 24 | 29 | 489685.00 | ---- | ---- | ---- | 489685.00 |
| 25 | 30 | 599853000.00 | ---- | ---- | ---- | 595853000.00 |
| 26 | 32 | 3201832.00 | 148256.00 | ---- | ---- | 3350088.00 |
| 27 | 33 | 15086058.00 | ---- | ---- | ---- | 15086058.00 |
| 28 | 34 | 1957557.00 | ---- | ---- | ---- | 1957557.00 |
| 29 | 35 | 3580379.00 | 605842.00 | ---- | ---- | 4186221.00 |
| 30 | 36 | 2075114.00 | 296611.00 | ---- | ---- | 2371725.00 |
| 31 | 37 | ---- | 1030000.00 | ---- | ---- | 1030000.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 38 | 4557190.00 | 1534316.00 | ---- | ---- | 6091506.00 |
| 33 | 39 | ---- | 350691.00 | ---- | ---- | ---- |
| 34 | 40 | ---- | 111178.00 | ---- | ---- | ---- |
| 35 | 41 | ---- | 23200.00 | ---- | ---- | ---- |
| 36 | 42 | ---- | 1766676.00 | ---- | ---- | ---- |
| 37 | 44 | ---- | 2103231742.00 | ---- | ---- | 2103231742.00 |
| 38 | 45 | ---- | 1368441.00 | ---- | ---- | ---- |
| 39 | 46 | 1611807.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 40 | 47 | ---- | 1137233.00 | ---- | ---- | ---- |
| 41 | 48 | 622558849.00 | ---- | ---- | ---- | 622558849.00 |
| 42 | 49 | 644000.00 | ---- | ---- | ---- | 644000.00 |
| 43 | 50 | 340137.00 | 21710.00 | ---- | ---- | 361847.00 |
| 44 | 51 | 636485.00 | 6471.00 | ---- | ---- | 642956.00 |
| 45 | 53 | ---- | 10182.00 | ---- | ---- | ---- |
| 46 | 54 | ---- | 11370.00 | ---- | ---- | ---- |
| 47 | 55 | 100890.00 | 14623.00 | ---- | ---- | ---- |
| 48 | 56 | ---- | 5149.00 | ---- | ---- | ---- |
| 49 | 57 | ---- | 12372.00 | ---- | ---- | ---- |
| 50 | 58 | ---- | 4149.00 | ---- | ---- | ---- |
| 51 | 60 | 6860000.00 | 5960.00 | ---- | ---- | ---- |
| 52 | 65 | 200000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 53 | 66 | 1044720.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 54 | 68 | ---- | 7500000.00 | ---- | ---- | ---- |
| 55 | 70 | 3050000.00 | 3050000.00 | ---- | ---- | ---- |
| 56 | 72 | ---- | 277929.00 | ---- | ---- | ---- |
| 57 | 73 | 2686658.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| **एकूण रक्कम** | | **1359265322** | **2124780938** | **0** | **0** | **3403210011** |

(1)

## विवरणपत्र 1 – (अ)

वर्ष:- 2013-2014 गोषवारा जमाबाजू

(रक्कम रू लाखात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे सुधारित अंदाज | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकडा | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | उल्हासनगर महानगरपालिका | 361.85 | 310.73 | | 51.02 |
| 2 | | | | | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

| विवरण पत्र - 1 (ब) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गोषवारा खर्च बाजू | | | | | |
| वर्ष:- 2013-2014 | | | | | रक्कम रू. (लाखात) |
| अ.क्र | लेखाशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे सुधा रित अंदाज | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकाडा | वाढ | घट |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | एकूण | 361.85 | 310.73 | | 51.12 |
| | | | | | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## विवरणपत्र क्र. 1 (क)

## महानगरपालिकेचे दिनांक लेखापरीक्षण वर्ष अखेर मत्ता व दायित्व विवरणपत्र

आकडे रक्कम रु. (लाखात)

| अ.क्र. | मत्ता | रक्कम रु. | अ.क्र. | दायित्व | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 13-14 | 862.65 | 1 | | 789.22 |
| | एकूण | 862.65 | | एकूण | 789.22 |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## विवरण पत्र क्र. 2

### लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

आकडे रक्कम रु. (लाखात)

| अ.क्र. | अनुदानाचे नाव | मंजूर करणारे प्राधिकारी | राज्य लेख्यातील प्रधानशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाच्या आरंभीची शिल्लक अनूदान रक्कम रु. | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाच्या आरंभीची प्राप्त अनूदान रक्कम रु. | एकुण उपलब्ध अनुदान रक्कम रु | लेखापरीक्षण वर्षामध्ये केलेला खर्च रु. | शिल्लक अनुदान रु. | सन (लेखापरीक्षण वर्षानंतरचे वर्ष) मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम रु. | शासनास परत करावयाची अनुदानाची रक्कम रु. | उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | 13-14 | | | | | 340.63 | 310.73 | 29.9 | | | | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

5

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

### विवरणपत्र क्र. 3

### महापालिकेने घेतलेल्या व सन 2013- 2014 या वित्तिय वर्षात थकीत असलेल्या कर्ज रकमांचे विवरणपत्र.

आकडे - रक्कम (रू लाखत)

| अ. क्र. | कर्जाचा तपशिल | कर्जाचे प्रयोजन | कर्जाची रक्क्म | कर्ज प्राप्त दिनांक | व्याजाचा दर | परता व्याचा अवधी | सरकारने हमी हमी आहे काय? | दि.1/04/2013 रोजी | | सन 13-14 | | दि 31/03/14 | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | शिल्लक कर्ज | | मधील परतफेड | | रोजी शिल्लक | | |
| | | | | | | | | मुददल | व्याज | मुददल | व्याज | कर्ज | | |
| | | | | | | | | | | | | मुददल | व्याज | |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9अ** | **9ब** | **10अ** | **10ब** | **11अ** | **11ब** | **12** |
| 1 | एम.जे.पी. | भुयारी गटार | 11.84 | 1986-97 | 6.75 | 25 | नाही. | 9.2 | 4.33 | 0 | 0 | 9.2 | 4.33 | |
| 2 | (एम.जे. पी. खुल्या बाजारातील) | पाणी पुरवठा | 8.5 | 1997-98 | 14.55 & 15.35 | 10 | नाही. | 7.65 | 5.54 | 0 | 0 | 7.65 | 5.54 | |
| 3 | (एम.जे. पी. एलआयसी) | पाणी पुरवठा | 5.18 | 1999-02 | 11.5 | 25 | होय | 3.06 | 1.49 | 0 | 0 | 3.06 | 1.49 | |
| 4 | एम.एम. आर.डी. ए. | रोड व उड्डानपूल बनविणे | 19.27 | 2000 | 11 | 15 | नाही. | 1.51 | 0.77 | 1.51 | 0.77 | 0 | 0 | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

- नाही दिले

__________________महानगरपालिका,__________

विवरणपत्र क्र. ५ ( अ )

महानगरपालिकेने दिलेल्या व दिनांक ( लेखापरीक्षण वर्ष ) अखेर थकीत ~~कर्ज व~~ आगाऊ रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र

वर्ष 2013-14

आकडे रक्कम रु.(लाखात)

| अ.क्र. | कर्जाऊ/आगाऊ रकमेचा प्रकार | मागणी | | | वसुली (लेखापरीक्षण वर्षातील) | | | थकबाकी (लेखापरीक्षण वर्ष अखेर) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील | लेखापरीक्षण वर्ष मधील प्रदान | एकूण | मुद्दल | व्याज | एकूण | मुद्दल | व्याज | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | नि | | रं | क | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

[signature]

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

(८)